सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, २३ नोव्हेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक १७ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

दर्बी
क्लॉथ मार्केट
(नवी पेठ)
सुटींग, शर्टिंग, लिनन, खादी, कॉटन, सिल्क
प्रीमियम व एक्सुक्लुझिव्ह शुटिंग आणि शर्टिंग साठी एकदा आवश्य भेट द्या...!
१०६, गोल्डफिंच पेठ, (नवी पेठ), सोलापूर - ४१३००७
9422459645 | 9130008644



**सोलापूर - भवानी पेठ** - राठी सिमेंट, **नई जींदगी** - एस.ए.बडेपीर, **वि.डी घरकुल** - वैष्णवी स्टील, **न्यु पाच्चा पेठ** - हारूण स्टील, **होटगी रोड** - एम.आर.सेल्स, **शेळगी** - शहा ट्रेडर्स, **सिध्देश्वर पेठ** - बेसकर ॲण्ड कंपनी, **कुर्डुवाडी** - श्री.गणेश स्टील, **सांगोला** - महालक्ष्मी स्टील सेंटर, **माढा** - तांबोळी स्टील ॲण्ड हार्डवेअर, **पिंपळनेर** - डिमांड ट्रेडर्स, **नातेपुते** - पोतेकर एंटरप्रायजेस, **पंढरपूर** - दुर्गा स्टील, **मांडवे** - बालाजी ट्रेडर्स, **टेभुंर्णी** - श्री साई ट्रेडर्स, **बार्शी** - भराडीया स्टील, **करमाळा** - शिवम स्टील, **अक्कलकोट** - माशाळे स्टील, **मोहोळ** - तलफदार स्टील, **कुरूल रोड** - श्री.भैरवनाथ स्टील ट्रेडर्स, **अकलुज** - चकेंश्वरा स्टील, **वैराग** - गांधी एजन्सी, **दहिताने** - एस. एस. मकंदर स्टील कॉर्पोरेशन, **जेऊर** - तांबोळी सिमेंट ॲण्ड मार्बल, **मरवडे** - सह्याद्री ट्रेडर्स, **मोडलिंब** - शिवाई ट्रेडर्स, **करकंब** - लक्ष्मी स्टील, **मंगळवेढा** - महालक्ष्मी ट्रेडर्स, **बेगमपूर** - सिध्दनाथ ट्रेडर्स, **वेळापूर** - रॉयल बिल्डींग सोल्युशन, **टाकळी** - गुरूकृपा ट्रेडर्स, **कंदलगाव** - श्री.केदारेश्वर हार्डवेअर ॲण्ड सिमेंट, **मुळेगाव** - आदित्य ट्रेडर्स, **महुद** - शेवाळे हार्डवेअर, **हुन्नूर** - लक्की ट्रेडर्स, **साळमुख** - त्रिमूर्ति स्टील, **माळसिरश** - अभिनंदन टाईल्स्, **मैंदर्गी** - खलील ट्रेडर्स, **वसंत विहार** - पूजा स्टील, **श्रीपुर** - शक्ती स्टील अँड किसान मॉल, **भोसे (क)** - पटेल स्टील, **कुरूल** - जगदंबा हार्डवेअर, **सोड्डी** - ओम ट्रेडर्स, **तडवळ** - स्वामी समर्थ ट्रेडर्स, **टाकळी सिकंदर** - लक्ष्मी टाईल्स, **नारखेड** - राहुल एंटरप्रायझेस.

आयकॉन स्टील
टीएमटी बार

## महत्त्वाचे

### निवडणूक निकालापूर्वीच बाजारात तुफान उसळी

**मुंबई :** बँक शेअर्समधील तेजीने देशांतर्गत शेअर बाजाराला आठवड्याच्या शेवटच्या सत्रात एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले. भारतीय बाजारातील निर्देशांकात



१,९६१ तर निफ्टीत ५५७ अंकांची वाढ झाली.

अमेरिकेत अदानी समूहावर लाचखोरी, फसवणुकीचे आरोप झाल्यानंतरही आज अदानींच्या शेअर्समध्ये सुधारणा दिसून आली आणि त्यांच्या कंपन्यांच्या शेअर्समध्येही वाढ झाली. शुक्रवारी निर्देशांकातील ३० पैकी २९ शेअर्स तेजीत होते. केवळ एका कंपनीचा शेअर्स किंचित घसरणीसह बंद झाला. निफ्टीतील ५० पैकी ४९ शेअर्स वाढले होते. निर्देशांकात एसबीआयचे शेअर्स सर्वाधिक ४.३४ टक्क्यांच्या वाढीसह बंद झाले. वाढलेल्या शेअर्समध्ये बजाज फायनान्स, आयटीसी, टायटन, टीसीएस, लॉर्सन ॲण्ड टुब्रो, रिलायन्स इंडस्ट्रीज, एचसीएल टेक, जेएसडब्ल्यू स्टील, अल्ट्राटेक सिमेंट, टाटा मोटर्स, महिंद्रा, एनटीपीसी, आयसीआयसीआय बँक यांचा समावेश होता.



# आज महानिकाल

◆ **मुंबई, २२ नोव्हेंबर**

राज्यात सध्या लोकशाहीचा उत्सव सुरू आहे. १५ व्या विधानसभेची निवडणूक २० तारखेला पार पडली. शनिवारी मतमोजणी असून, महाराष्ट्रातील जनतेने महायुती की महाविकास आघाडीला आपला कौल दिला आणि गुलाल कोण उधळणार, हे स्पष्ट होणार आहे.

शनिवारी सकाळी ८ वाजता सर्व केंद्रांवर मतमोजणी सुरू होईल. या प्रक्रियेदरम्यान पोस्टल मतपत्रिकांची मतमोजणी सकाळी ८ वाजता सुरू होईल, त्यानंतर ईव्हीएमवरील मतांची मोजणी सकाळी साडेआठ वाजता सुरू होईल. यासाठी प्रशासनाची तयारी पूर्ण झाली आहे. २८८ विधानसभा मतदारसंघांसाठी २८८ मतमोजणी केंद्रे आणि नांदेड लोकसभा मतदारसंघासाठी १ मतमोजणी केंद्र स्थापन करण्यात आले आहे. निरीक्षक व उपस्थित उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या समोर सीलबंद स्ट्राँग रूम्स उघडण्यात येतील व ईव्हीएम मतमोजणी केंद्रावर नेण्यात येतील. सर्व कार्यवाही सीसीटीव्हीद्वारे चित्रित केली जाईल.

### ऑनलाईन पाहता येणार निकाल

निवडणूक आयोगाने मतमोजणीसाठी तयारी पूर्ण केली आहे. तब्बल २८८ मतदारसंघांचे निकाल निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर अपडेट केले जाणार आहेत. त्यामुळे निकालाची अधिकृत आकडेवारी निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर पाहता येणार आहे. ◂*(तभा वृत्तसेवा)*

## महायुती की महाविकास आघाडी?

### सत्ता स्थापनेसाठी ४८ तास, धाकधूक वाढली

निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर महायुती किंवा महाविकास आघाडीकडे केवळ ४८ तासांचा कालावधी आहे. २६ नोव्हेंबर रोजी विधानसभेचा कार्यकाळ संपत असल्याने, ज्या कोणाला बहुमत किंवा बहुमताजवळचे संख्याबळ असेल, त्याला २६ नोव्हेंबरला सत्ता स्थापनेचा दावा करावा लागेल. तसे न झाल्यास राष्ट्रपती राजवट लावणे किंवा राज्यपाल सर्वांत मोठ्या पक्षाला सत्ता स्थापनेचे निमंत्रण देऊन सरकार स्थापन करण्यास सांगू शकतात. मात्र, बहुमताचा आकडा गाठता आला नाही तर, एवढ्या कमी कालावधीत विधिमंडळ गटनेता कसा ठरणार, मुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्यावर तीन-तीन पक्षांत एकमत कसे होणार, या चिंतेने राजकीय पक्षांची धाकधूक वाढलेली आहे.


## श्रीनगर गारठले, उणे १.२ अंश

◆ **श्रीनगर, २२ नोव्हेंबर**

संपूर्ण काश्मीर खोऱ्यात थंडीची प्रचंड लाट आली असून, श्रीनगरची या मोसमातील सर्वाधिक थंड शहर म्हणून नोंद झाली आहे. खोऱ्यातील बहुतांश भागांमध्ये शून्याच्या खाली तापमान नोंदविण्यात आले.

श्रीनगरमध्ये उणे १.२ अंश सेल्सियस इतक्या कमी तापमानाची नोंद करण्यात आली. त्यापूर्वीच्या रात्री या शहरात उणे ०.४ तापमान होते. काश्मिरातील बहुताश भागांमध्ये पारा झपाट्याने खाली आला आहे.

काझिगुंड येथे उणे १.४ अंश, पहलगाममध्ये उणे २.३ अंश, जगभरातील पर्यटकांचे आकर्षण असलेल्या गुलमर्ग येथे उणे ०.६ आणि कुपवाड्यात उणे ०.८ अंश इतक्या कमी तापमानाची नोंद झाली. ◂*(वृत्तसंस्था)*



## छत्तीसगडमधील चकमकीत १० नक्षल्यांचा खात्मा

### सुरक्षा दलाचे मोठे यश

◆ **सुकमा, २२ नोव्हेंबर**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात शुक्रवारी सकाळी झडलेल्या भीषण चकमकीत सुरक्षा दलाच्या जवानांनी १० नक्षलवाद्यांना ठार मारले. मुख्यमंत्री विष्णुदेव साय यांनी या कामगिरीसाठी जवानांचे अभिनंदन केले आहे.

भेज्जी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जंगलात काही नक्षलवादी आले असल्याची माहिती सुरक्षा दलांना गुप्तचर यंत्रणांकडून मिळाल्यानंतर राज्य राखीव गार्ड आणि सीआरपीएफच्या जवानांनी आज पहाटेलाच या भागात संयुक्त मोहीम उघडली. कोराजगुडा, दंतेसपुरम्, नागाराम आणि भांदरपाडा या चार गावांना लागून असलेल्या जंगलाला जवानांनी चहूबाजूंनी वेढा दिला. जवानांना पाहताच नक्षल्यांनी गोळीबार केला. जवानांनी तितक्याच प्रखरपणे प्रत्युत्तर दिल्यानंतर चकमक झडली. सुमारे दोन तासांनंतर गोळीबार शांत झाला. यानंतर जवानांनी जंगलात शोधमोहीम हाती घेतली असता, १० नक्षलवाद्यांचे मृतदेह आढळून आले, अशी माहिती बस्तरचे पोलिस महानिरीक्षक सुंदरराज पी. यांनी वृत्तसंस्थेला दिली.

सर्व नक्षल्यांचे मृतदेह ताब्यात घेण्यात आले असून, घटनास्थळावरून इन्सास रायफल, एके-४७ रायफल, सेल्फ लोडिंग रायफल आणि स्फोटकांचा मोठा साठा जप्त करण्यात आला. हे सर्व नक्षलवादी कोंटा आणि किस्तराम एरिया कमिटीचे सदस्य होते, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री विष्णुदेव साय यांनी आपल्या समाजमाध्यमावर पोस्ट करून या चकमकीची माहिती दिली. आपल्या बहादूर जवानांनी आज १० नक्षलवाद्यांना ठार मारले. बस्तर जिल्ह्याची वाटचाल आता शांततेकडे सुरू झाली आहे. नागरिकांची सुरक्षा आणि बस्तर प्रांतात शांतता प्रस्थापित करण्यासाठी माझ्या सरकारने नक्षल्यांविरोधात कठोर मोहीम हाती घेतली आहे. शस्त्र खाली ठेवून शरण येणे हाच त्यांच्यापुढे पर्याय उरला आहे, असे त्यांनी या पोस्टमध्ये म्हटले आहे. ◂*(वृत्तसंस्था)*

### वर्षभरात २०७ नक्षलवादी ठार

यावर्षीच्या जानेवारी महिन्यापासून आतापर्यंत सुरक्षा दलाच्या जवानांनी सात जिल्ह्यांचा समावेश असलेल्या बस्तर प्रांतात विविध चकमकींमध्ये २०७ नक्षलवाद्यांना ठार केले आहे, अशी माहिती सुंदरराज यांनी दिली.




| | PULSAR 125 कार्बन फायबर | | PULSAR 150 | | PULSAR N150 | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सिंगल सीट | स्प्लिट सीट | सिंगल डिस्क | ट्विन डिस्क | सिंगल डिस्क | ट्विन डिस्क |
| बचत | ₹3000/- | ₹4800/- | ₹3000/- | | | |
| बचतीनंतर/सूट दिल्यानंतर निव्वळ किंमत | ₹90 278/- | ₹92 282/- | ₹1 08 290/- | ₹1 15 374/- | ₹1 19 362/- | ₹1 22 862/- |

pulsar DEFINITELY DARING

72198 21111 | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | अतिरिक्त ऑफर्स उपलब्ध Flipkart आणि amazon.in वर

*नियम आणि अटी लागू. *एक्स-शोरुम किंमत पल्सर 125 CF सिंगल सीट वेरिएंटसाठी. ऑफर फक्त निवडक वेरिएंट्सवर. ऑफर 31 डिसेंबर 2024 पर्यंत उपलब्ध. बजाज ऑटोने पूर्वसूचना न देता कोणतीही किंवा सर्व ऑफर्स काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. साहसी दृश्य एक्सपर्ट्सने प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून वेगळ्या स्थानावर केली आहेत. ह्या दृश्यांचं अनुकरण करण्याचा प्रयत्न करू नका आणि नेहमी रहदारीचे व सुरक्षिततेचे नियम पाळा. एएमसी विशिष्ट मॉडेल्सवर आणि विशिष्ट राज्यात उपलब्ध आहे. अधिक माहिती बजाज डीलरकडे मिळवा. रस्त्यावरील मदत तृतीय पक्षांकडून दिली जाते आणि ती त्यांच्या नियम व अटींच्या अधीन आहे. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवरील ऑफर्स त्यांच्या नियम आणि अटींच्या अधीन आहेत.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Solapur • Station Road** AHERKAR BAJAJ 9689899840 • **Hotgi Road** AHERKAR BAJAJ 8956 069 355 • **Akkalkot Road** AHERKAR BAJAJ 8956 320 060 • **Pandharpur** PANDURANG BAJAJ 8600024805 • **Jeur** SHIVRATNA BAJAJ 9922044676 • **Barshi** AHERKAR BAJAJ 8308004007.
**Authorised Service Centre: Mangalwedha** 9890214155, **Marwade** 9028703555, **Akkalkot** 9011556800, **Sangola** 8888109109, **Karkamb** 7057447777, **Vairag** 8308006007, **Karmala** 8888984084, **Kandar** 9673005524, **Rashin** 9975704778, **Mirajgaon** 7774826060, **Akluj** 7756999799, **Temburni** 9552679777, **Natepute** 9850738876, **Mohol** 8830070701.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# काँग्रेस व मित्रपक्षांच्या सरकारांनीच घेतली अदानींकडून लाच

**फेडरल कोर्टातील दस्तावेजांमधून समोर आले सत्य**

◆ **नवी दिल्ली, २२ नोव्हेंबर**

भारतातील उद्योगपती गौतम अदानी यांनी त्यांच्या वीज वितरण कंपन्यांसाठी सौर ऊर्जा करार प्राप्त करण्याकरिता भारतातील काही राज्य सरकारांना २,११० कोटी रुपयांची लाच दिल्याचा गंभीर आरोप अमेरिकेने नुकताच केला. यावरून अपेक्षेप्रमाणे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. मात्र, या प्रकरणी न्यू यॉर्क येथील फेडरल कोर्टात जे दस्तावेज सादर करण्यात आले आहेत, ते राहुल गांधी यांनाच तोंडघशी पाडणारे आहेत. कारण, अदानी यांनी ही लाच काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांचे सरकार असलेल्या राज्यांमधील अधिकाऱ्यांना दिली असल्याचे यात स्पष्टपणे नमूद आहे.



गौतम अदानी यांच्यासोबतच त्यांचा भाचा सागर याशिवाय विनीत जैन, रंजीत गुप्ता, सायरिल कॅबेनिस, सौरभ अग्रवाल, दीपक मल्होत्रा आणि रूपेश अग्रवाल यांच्यावरही अमेरिकेने लाचखोरीचा आरोप केला आहे. ही लाच २०२० ते २०२४ या काळात देण्यात आली होती.

अमेरिकेच्या सिक्युरिटीज अ‍ॅण्ड एक्सचेंज कमिशनच्या (एसईसी) याचिकेवर न्यू यॉर्क येथील फेडरल कोर्टात सुनावणी झाली. यात गौतम अदानी यांच्यासह आठ जणांवर लाच देण्याचा आरोप ठेवण्यात आला. यानंतर लगेच राहुल गांधी यांनी पत्रपरिषद घेत, पंतप्रधान मोदी यांच्यावर थेट हल्ला केला. पंतप्रधान मोदी या प्रकरणी काहीच करू शकत नाही. कारण, चौकशीचा आदेश दिला तर आपणच त्यात अडकू, याची भीती त्यांना आहे, असे राहुल गांधी यांनी नेहमीच्या शैलीत सांगितले. त्यानंतर आता फेडरल कोर्टातील दस्तावेजांमध्ये नमूद असलेली लाचखोरांची नावे समोर आली आहेत. यात प्रामुख्याने काँग्रेसची सत्ता असलेले तेलंगणा राज्य, मित्रपक्ष द्रमुकची सत्ता असलेले तामिळनाडू, जगनमोहन रेड्डी यांची सत्ता असलेले आंध्रप्रदेश आणि नवीन पटनायक यांच्या ओडिशा राज्यातील अधिकाऱ्यांना अदानी यांच्या समूहाने लाच दिली असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. ◀(वृत्तसंस्था)

### भाजपाचा जोरदार पलटवार

हाच धागा पकडून भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते संबित पात्रा यांनी राहुल गांधी आणि काँग्रेसवर जोरदार पलटवार केला. भारत आणि देशाची सुरक्षा करणाऱ्या उद्योगांवर गंभीर आरोप करण्याची काँग्रेसची जुनी सवय आहे. त्यांच्या रणनीतीचा तो एक भागच आहे. राहुल गांधी यांनी २०१९ मध्ये राफेलचा मुद्दा असाच उपस्थित केला होता. कोरोना महामारीच्या काळातही ते लसींच्या मुद्यावर अशाच प्रकारे पत्रपरिषद घ्यायचे. यानंतर त्यांना सर्वोच्च न्यायालयात माफी मागावी लागली, हा भाग वेगळा.

## महत्त्वाचे

### मणिपूर हायकोर्टाच्या न्यायाधीशपदी कृष्णकुमार

**इम्फाळ** : न्या. डी. कृष्णकुमार यांनी शुक्रवारी मणिपूर उच्च न्यायालयाचे आठवे मुख्य न्यायाधीश म्हणून शपथ घेतली. इम्फाळ येथील राजभवनात झालेल्या शपथविधी समारंभात राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांनी नवीन मुख्य न्यायाधीशांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. न्या. कृष्णकुमार यांनी यापूर्वी मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून काम केले आहे. मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी नवीन सरन्यायाधीशांचे अभिनंदन केले. एक्सवरील एका पोस्टमध्ये ते म्हणाले की, न्यायाचे कारण पुढे नेण्यासाठी आणि प्रत्येक नागरिकाच्या हक्कांचे रक्षण आणि आदर केला जाईल, याची खात्री करण्यासाठी मी तुमच्यासोबत काम करण्यास उत्सुक आहे.

### प्रदूषणावरून सुप्रीम कोर्टाने दिल्ली सरकारला फटकारले

**नवी दिल्ली** : दिल्लीतील प्रदूषणावरून सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिल्लीतील आप सरकारला फटकारले. न्यायालयाने म्हटले की, दिल्ली सरकारच्या प्रयत्नांवर आम्ही समाधानी नाही. ट्रक प्रवेश बंद करण्यासाठी सरकारने काहीच केले नाही. ११३ एंट्री पॉईंटवर फक्त १३ सीसीटीव्ही का आहेत, सरकारने या सर्व प्रवेश स्थळांवर पोलिस तैनात करावे. वाहनांच्या प्रवेशावर खरोखरच बंदी आहे की नाही, हे पाहण्यासाठी कायदेशीर पथक तयार केले पाहिजे. त्यासाठी बार असोसिएशनमधील तरुण वकील तैनात करावे. न्या. अभय एस. ओक आणि न्या. ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांच्या न्यायासनाने प्रदूषण नियंत्रणासाठी दिल्ली सरकारच्या पावलांवर आक्षेप घेतला. आदेश असूनही दिल्ली पोलिस स्टेज ४ निर्बंध वेळेवर लागू करण्यात अयशस्वी झाले. या प्रकरणाची पुढील सुनावणी २५ नोव्हेंबरला होणार आहे.

### खत कारखान्यात गॅस गळतीमुळे तिघांचा मृत्यू

**मुंबई** : महाराष्ट्राच्या सांगली जिल्ह्यातील खत निर्मिती प्रकल्पात रिॲक्टरमध्ये झालेल्या स्फोटानंतर गॅस गळतीमुळे दोन महिलांसह तीन जणांचा मृत्यू झाला असून, नऊ जण जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही घटना कडेगाव तालुक्यातील शालगाव एमआयडीसीमधील म्यानमार केमिकल कंपनीत गुरुवारी सायंकाळी घडली. खत कंपनीत अणुभट्टीचा स्फोट होऊन रासायनिक धूर निघाला. १२ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असता, उपचारादरम्यान तिघांचा मृत्यू झाला.

### बिष्णुपूरला भूकंपाचा धक्का

**इम्फाळ** : मणिपूरच्या बिष्णुपूर जिल्ह्यात शुक्रवारी पहाटे ३.६ रिश्टर स्केलचा भूकंप झाला. यात कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्याचे वृत्त नाही, असे पोलिसांनी सांगितले. हा भूकंप पहाटे ४.४२ वाजता झाला.

### चोऱ्या करणाऱ्या महिला टोळीचा पर्दाफाश

**वाराणसी** : येथील रामनगर पोलिस स्टेशन हद्दीतील डोमरी येथे धार्मिक कथा कार्यक्रमात दागिने चोरांच्या टोळीत सहभागी असलेल्या १५ महिलांना पोलिसांनी अटक केली, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली. प्रसिद्ध कथावाचक पंडित प्रदीप मिश्रा यांच्या कथाकथना कार्यक्रमात पकडलेल्या महिलांकडून अंदाजे १० लाख रुपयांचे दागिने जप्त करण्यात आले. सर्व महिलांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ७९,११७.११ (+१,९६१.३२) |
| निफ्टी | २३,९०७.२५ (+५५७.३५) |

### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | ७८,८२० रु. |
| चांदी (प्रतिकिलो) | ९२,००० रु. |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३२.३ | १७.४ |
| अमरावती | २९.६ | १६.७ |
| भंडारा | ३०.० | -.- |
| बुलडाणा | २७.० | १५.२ |
| चंद्रपूर | २८.६ | १५.२ |
| गडचिरोली | २८.६ | १३.० |
| गोंदिया | २८.२ | १२.८ |
| नागपूर | २९.१ | १५.१ |
| वर्धा | २९.१ | १५.२ |
| वाशीम | २९.० | -.- |
| यवतमाळ | ३०.० | -.- |

# गोंदियात शुक्रवारी यंदाचे नीचांकी तापमान

**विदर्भात सर्वात थंड**




◆ **गोंदिया, २२ नोव्हेंबर**

गत आठवड्यापासून जिल्ह्याचा पारा सातत्याने घसरत चालला आहे. शुक्रवार, २२ नोव्हेंबर रोजी गोंदिया जिल्ह्यात यंदाच्या मोसमातील सर्वात कमी तापमानाची नोंद करण्यात आली. आज जिल्ह्यातील किमान तापमान थेट १२.८ अंश सेल्सिअस व कमाल तापमान २८.१ अंश सेल्सिअस नोंदले गेले आहे.

नोव्हेंबरच्या पंधरवड्यानंतर तापमानात सातत्याने घट होत आहे. बुधवार, १३ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील तापमान १६.२ अंश सेल्सिअस नोंदले गेले होते, तर गुरुवारी किमान तापमान घसरून १४.८ अंश सेल्सिअसवर आले होते. शुक्रवारी १४.६ अंश सेल्सिअसवर आले. त्यानंतर आठवडाभर जिल्ह्यातील तापमान १४ अंश सेल्सिअसच्या खालीच राहिले. त्यामुळे जिल्हावासीयांना थंडीचा सामना करावा लागत आहे. त्यातच आज, शुक्रवार २२ नोव्हेंबर रोजी तापमान १३ अंश सेल्सिअसच्या खाली गेले असून १२.८ अंश सेल्सिअसची नोंद घेण्यात आली. यंदाच्या मोसमातील ही नीचांकी नोंद असून विदर्भात सर्वात थंड वातावरण गोंदियात आहे. ◀(तभा वृत्तसेवा)



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी आपल्या तीन देशांच्या पाच दिवसीय दौऱ्याचा समारोप गयानाच्या जॉर्जटाऊन शहरात केला. या शहरातील सरस्वती विद्या निकेतन शाळेला त्यांनी भेट दिली आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधल्यानंतर भगवान शिवशंकराच्या पिंडीचे दर्शन घेतले

# हरयाणात होणाऱ्या गीता महोत्सवात टांझानियाची भागीदारी

◆ **चंदीगड, २२ नोव्हेंबर**

वार्षिक आंतरराष्ट्रीय गीता महोत्सव हे जागतिक सौदार्य आणि परस्पर समंजसपणाला चालना देण्यासाठी एकत्र आणू शकते. गीता महोत्सव हा असा पूल आहे, जो आपल्याला जोडतो आणि सांस्कृतिक वारशाचे सखोल संबंध वाढवते, असे भारतातील उच्चायुक्त अनिसा म्बेगा यांनी पत्रपरिषदेत सांगितले.

२८ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर दरम्यान कुरूक्षेत्र हरयाणात साजऱ्या होणाऱ्या या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय गीता महोत्सवासाठी टांझानिया हा भागीदार देश आहे, तर ओडिशा भागीदार राज्य आहे. या महोत्सवातील मुख्य कार्यक्रम ५ ते ११ डिसेंबर दरम्यान होणार आहेत. आंतरराष्ट्रीय गीता महोत्सव दोन प्रदेशांमधील आकर्षक भागीदारी प्रतिबिंबित करतो. सांस्कृतिक परंपरा आणि चिरस्थायी संबंध कसे निर्माण करू शकतात, हे या माध्यमातून दर्शवते. ◀(वृत्तसंस्था)

# नवतरुणाईचे राजकीय भवितव्य आज ठरणार

◆ **मुंबई, २२ नोव्हेंबर**



महाराष्ट्राच्या पंधराव्या विधानसभेसाठी राज्यात निवडणूक पार पडली. या निवडणुकीत नव्या दमाच्या १७ तरुण उमेदवारांनी राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवले आहे. त्यामुळे शनिवारी होणाऱ्या मतमोजणीत मतदारांनी नव तरुणाईचे राजकीय भवितव्य काय ठरवले आहे, हे स्पष्ट होणार आहे.

मतदारांनी कोणत्या उमेदवाराच्या पदरात आपला कौल दिला, हे शनिवारी स्पष्ट होणार आहे. या निवडणुकीत २८८ मतदारसंघांपैकी १७ मतदारसंघांत १७ नव्या दमाच्या तरुणाईने राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवत भवितव्याची सुरुवात केली आहे. मात्र, यापैकी किती उमेदवारांना जनतेने विधानसभेत जाण्यासाठी कौल दिला, हे शनिवारी दिसणार आहे.

**१७ उमेदवार पुढीलप्रमाणे**

सलीम अनिल देशमुख, काटोल, अमित राज ठाकरे, माहीम, योगेंद्र श्रीनिवास पवार, बारामती, श्रीजया अशोक चव्हाण, मुखेड, संजना रावसाहेब दानवे, कन्नड, स्नेहल माणिकराव जगताप, महाड, राहुल प्रकाश आवडे, इचलकरंजी, मंदा बाबुळकर-कुपेकर, चंदगड, रोहित रावसाहेब पवार, कवठेमहांकाळ, अर्चना चाकूरकर पाटील, लातूर शहर, सना मलिक, अनुशक्ती नगर, फहाद अहमद, नगर, केदार दिघे, पाचपखाडी कोपरी, दीपेश म्हात्रे, डोंबिवली, वरुण सरदेसाई, वांद्रा, करण संजय देवतळे, वरोरा, बंटी शेळके, नागपूर मध्य, भाग्यश्री आत्राम, अहेरी. ◀(तभा वृत्तसेवा)

# माफी मागा, अन्यथा १०० कोटींची नुकसानभरपाई द्या

### विनोद तावडे यांची खडगे, राहुल गांधी यांना नोटीस

◆ **नवी दिल्ली, २२ नोव्हेंबर**

५ कोटींच्या केलेल्या आरोपांवर भाजपा महासचिव विनोद तावडे यांनी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना १०० कोटी रुपयांच्या मानहानीनीची नोटीस पाठवली आहे.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या आधी विनोद तावडे मतदारांना वाटण्यासाठी ५ कोटी रुपये घेऊन मुंबईतील एका हॉटेलमध्ये पोहोचले होते, असा आरोप काँग्रेसने करीत राज्यात खळबळ उडवली होती. या आरोपांसाठी खडगे, राहुल गांधी तसेच काँग्रेस प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत यांनी माफी मागावी, अशी मागणी तावडे यांनी या नोटिसीतून केली आहे. माफी मागितली नाही, तर १०० कोटी रुपयांच्या नुकसान भरपाईची मागणीही तावडे यांनी केली. खडगे आणि राहुल गांधी यांना एकतर माफी मागावी लागेल, वा मानहानीच्या खटल्याला सामोरे जावे लागेल, असा इशारा या नोटिसीतून देण्यात आला आहे.

विनोद तावडे यांनी आज एक्स या समाजमाध्यमातून या नोटिसीची माहिती दिली. जनतेची दिशाभूल करणाऱ्या बातम्या पसरवणे एवढे एकच काँग्रेसचे काम आहे. नालासोपारा प्रकरणी मी खडगे, राहुल गांधी आणि सुप्रिया श्रीनेत यांच्यावर नोटीस बजावली आहे. मतदारांना पैसे वाटण्यासाठी मी ५ कोटी रुपये घेऊन आलो होतो, असा आरोप करून त्यांनी माझी आणि भाजपाची बदनामी केली. निवडणूक आयोग आणि पोलिसांना कुठेच ५ कोटी रुपये सापडले नाही, ही वस्तुस्थिती सर्वांसमोर आहे. हे प्रकरण म्हणजे काँग्रेसच्या निम्नदर्जाच्या राजकारणाचा धडधडीत पुरावा आहे, असे तावडे म्हणाले. या आरोपाबाबत काँग्रेस नेत्यांनी केलेल्या टि?टमुळे त्यांना मानहानीच्या खटल्याची ही नोटीस देण्यात आली आहे, असे ते म्हणाले. ◀(तभा वृत्तसेवा)

# वानखेडे निवडून येतील; पण आपला राजकीय संन्यास!

### आ. दादाराव केचे यांची भूमिका

◆ **आर्वी, २२ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीचा प्रचार संपल्यानंतर आपण भाजपा उमेदवार सुमित वानखेडे यांच्या विरोधात काम केल्यासंबंधी अफवा मतदारसंघात पसरवण्यात आल्या. त्यामुळे आपण व्यथित झालो. त्यामुळेच आपण राजकीय संन्यास घेण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती आ. दादाराव केचे यांनी आज पत्रपरिषदेत दिली.

आ. दादाराव केचे म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत भाजपाने आर्वी विधानसभेत उमेदवारी देण्याचे पक्षश्रेष्ठींनी आश्वासन देऊनही आपल्याला उमेदवारी न देता सुमित वानखेडे यांना उमेदवारी दिली. आपण



अपक्ष व भाजपाकडून उमेदवारी अर्ज भरला होता. परंतु, गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्याला बोलावून समजावल्यावर अर्ज मागे घेतला. निवडणूक प्रचारात मतदारसंघात भाजपाचे अधिकृत उमेदवार सुमित वानखेडे यांच्यासाठी २७ प्रचार सभा, अनेक समाजाचे मेळावे, मोठ्या सभांमध्ये स्वतः उपस्थित राहून भाषण देत सुमित वानखेडे यांना विजयी करण्याचे आवाहन केले. काही मेळावे स्वत: लावून घेतली व पक्षनिष्ठेने काम केले. मात्र, प्रचार संपल्यानंतर दोन दिवसांत आपल्याविरुद्ध षडयंत्र रचून सुमित वानखेडे यांच्या विरोधात काम केले, अशा अफवा पसरवण्यात आल्या. आपण आर्वी विधानसभा मतदारसंघात कार्यकर्ते निर्माण करून कमळ फुलवले. असे असतानाही पक्षविरोधी काम केल्याचा आरोप होत असल्यामुळे आपण व्यथित झालो असल्याचे त्यांनी सांगितले.

पक्षातर्फे संधी मिळू नये, याकरिता पक्षातीलच चार-पाच कार्यकर्त्यांनी कट रचला आहे. परंतु, आपली भूमिका ठाम होती. वानखेडे ११० टक्के निवडून येणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यापुढे राजकारणात भाग घेणार नाही. परंतु, कार्यकर्त्यांवर प्रेम ठेवून त्यांची कामे व सामाजिक कार्य करीत राहील, असेही केचे यांनी सांगितले. ◀(तभा वृत्तसेवा)

# आ. बच्चू कडू यांची निर्दोष मुक्तता

### मंत्रालयात लिपिकाला मारहाण प्रकरण

◆ **मुंबई, २२ नोव्हेंबर**

येथील विशेष न्यायालयाने शुक्रवारी राज्याचे माजी मंत्री आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष, आमदार ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू यांची २०११ च्या दक्षिण मुंबईतील राज्य सचिवालयातील मंत्रालयातील लिपिकाला थापड मारल्याच्या खटल्यातून निर्दोष मुक्तता केली.

विशेष न्यायालयाचे न्या. ए. यू. कदम यांनी खासदार आणि आमदारांशी संबंधित खटल्यांची सुनावणी करताना अमरावती जिल्ह्यातील अचलपूरचे अपक्ष आमदार कडू यांची निर्दोष मुक्तता केली. आदेशाचे तपशील अद्याप उपलब्ध नाहीत.

तक्रारीनुसार, बच्चू कडू यांनी जानेवारी २०११ मध्ये मंत्रालयात सार्वजनिक आरोग्य विभागात काम करणाऱ्या एका लिपिकाला वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यासाठी निवडलेल्या एका व्यक्तीकडून पैशाची मागणी केल्याप्रकरणी मारहाण केली होती.

बच्चू कडू यांनी कर्मचाऱ्याला थापड मारली आणि तत्कालीन आरोग्य मंत्री सुरेश शेट्टी यांच्या स्वीय सहायकाच्या केबिनमध्ये हात धरून ओढले. डॉक्टरांच्या नियुक्तीशी आपला काहीही संबंध नाही, असे तक्रारीत म्हटले आहे. तक्रारीच्या आधारे आमदार बच्चू कडूंविरुद्ध मरिन ड्राईव्ह पोलिस ठाण्यात संबंधित कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. ◀(वृत्तसंस्था)

# राज्यात सर्वाधिक मतदान चिमूर व ब्रह्मपुरीत!

◆ **चंद्रपूर, २२ नोव्हेंबर**

राज्य निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील मतदानाची अधिकृत आकडेवारी जाहीर केली असून राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघात झालेल्या मतदानात चंद्रपूर जिल्ह्यातील दोन विधानसभा मतदारसंघ अग्रेसर ठरले आहे. चिमूर आणि ब्रह्मपुरी हे दोन विधानसभा मतदारसंघ अनुक्रमे पहिल्या व दुसऱ्या क्रमांकावर आहेत. २०१९ च्या निवडणुकीतही चंद्रपूर जिल्ह्यात चिमूर विधानसभेतच सर्वाधिक मतदान झाले होते. यंदा तर या मतदारसंघाने अवघ्या राज्यात आपले नाव नोंदविले आहे.

तिसऱ्या क्रमांकावर छत्रपती संभाजीनगरचा सिल्लोड विधानसभा मतदारसंघ आहे. चिमूर व ब्रह्मपुरी हे दोन विधानसभा मतदारसंघ राज्यात मतदानाच्या टक्केवारीत अव्वल ठरण्याची ही बहुधा पहिलीच वेळ असावी.

निवडणूक आयोगाच्या आकड्यानुसार, राज्यात पहिल्या क्रमांकावर चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर मतदारसंघ आहे. या मतदारसंघात विक्रमी ८१.९५ टक्के मतदान झाल्याची नोंद आहे, तर ब्रह्मपुरी विधानसभा मतदारसंघ दुसऱ्या क्रमांकावर आहे, जेथे ८०.५४ टक्के मतदान झाले आहे.

चिमूर विधानसभा मतदारसंघात भाजपाचे बंटी भांगडिया हे अधिकृत उमेदवार असून त्यांची लढत काँग्रेसचे उमेदवार सतीश वारजुकर यांच्याशी होत आहे. ही लढत चुरशीची ठरली असून शनिवारी या मतदारसंघातून कोण निवडून येईल याचा निकाल लागेल, तर ब्रह्मपुरी विधानसभा मतदारसंघात राज्याचे विरोधी पक्षनेता विजय वडेट्टीवार यांनी काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढवली. त्यांच्या विरोधात नवा चेहरा म्हणून भाजपाने क्रिष्णालाल सहारे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले होते.

त्यांनीही चांगली लढत दिली. याही मतदारसंघाच्या निकालाची सर्वांना उत्सुकता आहे. मतदानाच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड विधानसभा मतदारसंघात ८० टक्के मतदान झाले आहे. येथील निवडणुकीसाठी महायुतीतील शिवसेनेने अब्दुल सत्तार यांना उमेदवारी दिली आहे, तर महाविकास आघाडीतील उबाठाने सुरेश बनकर यांना उमेदवार केले आहे. ◀(तभा वृत्तसेवा)



गुजरातच्या सुरत येथील नेचर पार्कमध्ये सिंहिणीचे ही दोन छावे शुक्रवारी सकाळच्या कोवळ्या उन्हात मस्ती करताना दिसत आहेत

## इति-उवाच...



अजून निकाल लागायचा आहे आणि संजय राऊतांना सत्तास्थापनेची घाई झाली आहे. नवरीचा पत्ता नाही आणि हॉल घेतला, बॅण्डबाजा आला. सगळे आहे पण सत्ता कुठे आहे?

**नारायण राणे**, भाजपा



आतापासूनच एकनाथ शिंदे व इतर नेत्यांनी उमेदवारांना ५०-५०, १००-१०० कोटी रुपयांची ऑफर द्यायला सुरुवात केली आहे. कारण, त्यांना जिंकण्याची खात्री नाही. ज्यांना जिंकण्याची खात्री नसते, तेच पैसे द्यायला तयार होतात.

**संजय राऊत**, उबाठा



राजकारणात सीमा ठेवून वागता यायला हवे. एकमेकांचा विरोध करताना अलिकडच्या काळात एकमेकांना नावे ठेवण्याची स्पर्धा सुरू आहे. गेल्या निवडणुकीत हे दिसून आले. हे व्हायला नको.

**राम नाईक**, भाजपा



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत अपक्ष आणि छोट्या पक्षांची भूमिका महत्त्वाची ठरू शकते. आमचा पक्ष सत्ता स्थापन करणाऱ्यांसोबत जाईल, हे स्पष्टच आहे.

**प्रकाश आंबेडकर**, वंचित बहुजन आघाडी

# बहुमत न मिळाल्यास भाजपाचा 'प्लॅन बी'

## सहा नेत्यांवर सोपवली महत्त्वाची जबाबदारी

**◆ मुंबई, २२ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीची मतमोजणी शनिवारी होणार आहे. दुपारपर्यंत राज्यातील चित्र स्पष्ट होणार आहे. अर्थात्, राज्यात महायुतीची सत्ता येणार की महाविकास आघाडीची, याचे उत्तर मिळणार आहे. तथापि, महायुतीला पूर्ण बहुमत मिळाले नाही तर काय करायचे, याची ठोस योजना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शासकीय निवासस्थानी आज झालेल्या बैठकीत निश्चित करण्यात आली आहे. अशा स्थितीत अपक्ष आणि बंडखोरांना महायुतीकडे आणण्याची जबाबदारी सहा नेत्यांवर सोपविण्यात आली आहे.



राज्य विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होण्यासाठी अवघे काही तास उरले आहेत. बहुतेक सर्वच जनमत चाचण्यामधून राज्यात महायुतीचे सरकार येणार असल्याचे भाकीत करण्यात आले आहे. तथापि, अंतिम निकाल काय असणार, हे सध्या तरी अस्पष्ट असल्याने महायुती आणि महाविकास आघाडीच्या गोटात हालचालींना वेग आला आहे. अपक्ष आणि बंडखोर उमेदवारांना आपल्याकडे व:ळविण्याचे प्रयत्न महाविकास आघाडी आणि महायुतीकडून करण्यात येत आहेत.

त्यातच, देवेंद्र फडणवीस यांनी आज सकाळी आपल्या सागर बंगल्यावर काही महत्त्वाच्या नेत्यांची बैठक बोलावली होती. विजयी होणाऱ्या बंडखोर आणि अपक्ष उमेदवारांवर भाजपाची नजर आहे. या आमदारांशी संपर्क करण्यासाठी भाजपाने सहा नेत्यांवर जबाबदारी सोपवली आहे. यात रवींद्र चव्हाण, प्रवीण दरेकर, संजय कुटे, मोहित कंबोज, नितेश राणे आणि निरंजन डावखरे यांचा समावेश आहे. *(तभा वृत्तसेवा)*

# सरकार कोणाचे, महायुतीचे की महाविकास आघाडीचे

## २०१९ मधील चुकांची पुनरावृत्ती टाळण्याचे भाजपाचे प्रयत्न


**श्यामकांत जहागीरदार**



**◆ नवी दिल्ली, २२ नोव्हेंबर**

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत झालेल्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही, याची काळजी यावेळी भाजपा घेत आहे. त्यावेळी भाजपा सर्वात जास्त म्हणजे १०५ जागा जिंकणारा पक्ष असतानाही सत्तेपासून वंचित राहिला होता. २०१४ च्या निवडणुकीत राज्यातील दोन्ही आघाड्या तुटल्या होत्या. भाजपा, शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढवली होती. नंतर शिवसेना भाजपासोबत आली होती, हा भाग वेगळा.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपा आणि शिवसेना यांनी एकत्रित निवडणूक लढवली होती. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचीही आघाडी होती. भाजपाने १६४ जागा लढवत १०५ जागा जिंकल्या होत्या, शिवसेनेने १२४ जागा लढवत फक्त ५६ जागा जिंकल्या होत्या. काँग्रेसने १४७ जागा लढवत ४४, तर राष्ट्रवादी काँग्रेसने १२१ जागा लढवत ५४ जागा जिंकल्या होत्या. निवडणुकीचे निकाल लागण्याआधीच उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाची स्वप्ने पडू लागली. या मुद्यावरून शिवसेनेने भाजपावर दबाव आणायला सुरुवात केली होती. भाजपाला बहुमत न मिळाल्यामुळे शिवसेनेने मुख्यमंत्रिपदाची मागणी लावून धरली. त्यामुळे भाजपा-सेना युतीत तणाव निर्माण झाला, त्याची परिणती युती तुटण्यात झाली. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस राज्यात सरकार स्थापन करण्याच्या स्थितीत नव्हते. राज्यात अस्थिर राजकीय परिस्थिती निर्माण झाल्यामुळे राष्ट्रपती राजवट लावावी लागली.



२३ नोव्हेंबरला पहाटे भाजपाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्याने सरकार स्थापन केले. देवेंद्र फडणवीस यांनी दुसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. अजित पवार उपमुख्यमंत्री झाले. पण अचानक अजिदादांसोबत आलेले आमदार परत शरद पवारांकडे गेल्यामुळे नवे सरकार बहुमत सिद्ध करण्याच्या स्थितीत नव्हते. त्यामुळे तीन दिवसांतच या सरकारला राजीनामा द्यावा लागला. नंतर शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची महाविकास आघाडी तयार झाली आणि त्यांनी सरकार स्थापन केले. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. अजित पवार नेहमीप्रमाणे उपमुख्यमंत्री झाले. काँग्रेसचे नाना पटोले यांच्याकडे विधानसभेचे अध्यक्षपद आले. भाजपा आणि शिवसेना तसेच काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस अशा आघाड्या विचारधारेच्या दृष्टीने नैसर्गिक मानल्या जात होत्या. हिंदुत्ववादी शिवसेना हिंदुत्वविरोधक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत गेल्यामुळे ही आघाडी अनैसर्गिक म्हटली जाऊ लागली. उद्धव ठाकरे यांच्या या भूमिकेवरून जनतेतच नाही तर शिवसेनेचे आमदार आणि शिवसैनिकांमध्येही असंतोष निर्माण झाला.

उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री म्हणून राज्यातील जनतेने मनापासून स्वीकारलेच नाही. त्यामुळे ठाकरे यांचीही मंत्रालयात जाण्याची आणि सहाव्या मजल्यावरील मुख्यमंत्री कार्यालयातील खूर्चीवर बसण्याची हिंमत झाली नाही. याची परिणती अखेर शिवसेनेत बंड होण्यात झाली. एकनाथ शिंदे जवळपास ४० अपक्ष आमदारांसह शिवसेनेतून बाहेर पडले. दहा अपक्ष आमदारांनीही त्यांना पाठिंबा दिला. शिंदे गटासोबत भाजपाने सरकार स्थापन केले. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले, तर आधी मुख्यमंत्री असणारे देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. काही महिन्यांतच राष्ट्रवादी काँग्रेसमधून अजित पवार समर्थक आमदारांसह बाहेर पडले आणि आणि या सरकारमध्ये सहभागी झाले. अजित पवार यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यामुळेच यावेळी निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडी अशी झाली. दोन्ही आघाड्यांमध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस आहे. त्यामुळे महायुतीला बहुमत मिळो की महाविकास आघाडीला, नवीन सरकारमध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस कायम राहणार आहे.

कोणत्याच आघाडीला बहुमत मिळाले नाही, तर मात्र राज्यात काही धक्कादायक नवी राजकीय समीकरणे आकारला येतील, अशी चर्चा आहे. महाविकास आघाडीला बहुमतासाठी काही जागा कमी पडल्या तर अजित पवार आपल्या काकांकडे परत जाऊ शकतात. भाजपाला म्हणजे महायुतीला बहुमतासाठी काही जागा कमी पडल्या तर उद्धव ठाकरे परत भाजपासोबत येऊ शकतात. उद्धव ठाकरे भाजपासोबत आले नाही, तर शरद पवारही भाजपा सरकारला पाठिंबा देण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही आमदार निवडून आले तर राज ठाकरे यांची मनसे महायुतीला पाठिंबा देऊ शकते ■

# ओझरला रात्री साडेदहापर्यंत मतदान

## सुरगाणा, त्र्यंबकेश्वर, इगतपुरीच्या मतपेट्या मध्यरात्री जमा



**◆ नाशिक, २२ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीत मतदानाच्या दिवशी निफाड मतदारसंघातील ओझर टाऊनशिप येथे रात्री साडेदहापर्यंत मतदान सुरू राहिले. मनमाड शहरात ९.५० पर्यंत मतदान चालले. मतदान झाल्यावर येथील मतपेट्या 'सील' करून मतमोजणीच्या ठिकाणी जमा करण्यात आल्या.

जिल्ह्यात सुरगाणा तालुक्यातील मतपेट्या मध्यरात्री प्राप्त झाल्या. त्र्यंबकेश्वर व इगतपुरी तालुक्यांतील दुर्गम भागातील मतपेट्या येण्यासाठी पहाटेचे तीन वाजल्याचे जिल्हा प्रशासनाने सांगितले. त्यामुळे मतदान झाल्यावर ईव्हीएम 'सील' करण्याची प्रक्रिया पार पाडून शासनाने दिलेले अहवाल पूर्णतः भरल्यावर केंद्रप्रमुखांना गाडीबरोबर यावे लागले. त्र्यंबकेश्वर आणि इगतपुरी येथील केंद्रांवरील कर्मचाऱ्यांना सर्वाधिक प्रवास करावा लागला.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील शासकीय कन्या शाळेत त्यांनी मतदान यंत्रे जमा केली आहेत. निफाड तालुक्याचे मतदान घटले, तरी रात्री उशिरापर्यंत मतदान सुरू होते. ओझर टाऊनशिप येथील १४९ क्रमांकाच्या बुथवर रात्री साडेदहापर्यंत मतदान झाले. मतदानाची वेळ सायंकाळी सहापर्यंत असताना त्यापूर्वीच एकगठ्ठा लोक मतदान केंद्रात आले. त्यांना टोकन वाटप करण्यात आले. ज्या मतदारांना वेळीच टोकन प्राप्त झाले, त्यांचे मतदान होईपर्यंत ही प्रक्रिया सुरू राहिली. *(वृत्तसंस्था)*

# इम्तियाज जलीलांवर ॲट्रॉसिटी गुन्हा दाखल

### मतदानाच्या दिवशी झाला होता वाद

**◆ छ. संभाजीनगर, २२ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या दिवशी भाजपाचे कार्यकर्ते आणि पूर्व विधानसभा मतदासंघातील एमआयएमचे उमेदवार इम्तियाज जलील यांच्यात वाद झाला होता. याप्रकरणी भाजपा पदाधिकाऱ्यांच्या तक्रारीनुसार, जलील यांच्यावर ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. यामुळे राजकीय वाद पुन्हा उफाळून येण्याची शक्यता वर्तवली जात आहे



विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी जलील आणि भाजपाचे सरचिटणीस जालिंदर शेंडगे पंडित नेहरू महाविद्यालयातील बूथवर आपसात भिडले होते. यानंतर शेंडगे यांनी गुरुवारी रात्री उशिरा पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. यानुसार जलील यांच्यावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारीत म्हटले आहे की, भारतनगर परीसरात केंद्रावर मतदान सुरू असताना जलील १५ ते २० जणांसह तेथे आले. *(वृत्तसंस्था)*

### बूथ कॅप्चर भाजपाने केले : जलील

भाजपा आणि शिवसेना लढत असलेल्या विधानसभा मतदारसंघात पैशांचा पाऊस पाडला गेला. मुख्यमंत्री, गृहमंत्र्यांकडून कारवाई न करण्याचा आदेश असल्याने भाजपाचे मंत्री अतुल सावे यांच्या कार्यकर्त्यांनी पैसे वाटले. अनेक ठिकाणी बुथ कॅप्चर केले. असे असतानाही माझ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. मतदान काळातील गैरप्रकाराचे व्हिडीओसह पुरावे आणि कारवाईची मागणी करणारे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांपासून केंद्रीय निवडणूक आयोगाला देत असल्याची माहिती जलील यांनी पत्रपरिषदेत दिली. माझ्याविरोधात उभे भाजपाचे मंत्री अतुल सावे यांच्या कार्यकर्त्यांनी गरीब, मुस्लिम वस्त्यांमध्ये इलेक्शन कार्ड आणि आधार कार्ड घेऊन पैसे देऊन शाई लावल्या जात होती. तीन मुस्लिम उमेदवारांना पैसे दिले गेले. या सर्व प्रकाराचे व्हिडीओ त्यांनी पत्रपरिषदेत दाखवले. अतुल सावे यांनी शेंडगे, सोनवणे यांना दलित वसाहतीत वाटण्यासाठी बुधवारी दुपारी चार वाजता २ कोटी रुपये दिले. त्यांच्यावर निवडणूक विभाग कारवाई का करीत नाही, असा सवाल इम्तियाज जलील यांनी केला. ■

# ४९ मतदारसंघ ठरवणार खरी शिवसेना कोणाची!

### ठाकरे-शिंदेंची प्रतिष्ठा पणाला

**◆ मुंबई, २२ नोव्हेंबर**

एकनाथ शिंदेंबरोबर जास्त आमदार असल्याने निवडणूक आयोगाने त्यांच्या गटाला खरी शिवसेना म्हणून मान्यता दिली. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या गटाला नवे नाव आणि नवे निवडणूक चिन्ह घेऊन ही निवडणूक लढवावी लागली. मात्र, निवडणुकीत मतदार कोणत्या शिवसेनेची निवड करणार, जनतेच्या न्यायालयात खरी शिवसेना म्हणून कुणाला मान्यता मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शिवसेनेचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या मुंबई महानगर प्रदेशात १९ जागांवर आणि एकट्या मुंबईत १२ मतदारसंघात ठाकरेंची शिवसेना विरुद्ध शिंदेंची शिवसेना असा थेट सामना होत आहे. मराठवाडा आणि कोकणात आठ, विदर्भात सहा, उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्रात प्रत्येकी चार जागांवर शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत झाली. मतदारांच्या नजरेतील बाळासाहेबांचा खरा वारसदार कोण, याचा निकाल या शनिवारी मतमोजणीनंतर लागणार आहे.

यावेळची विधानसभा निवडणूक ही उद्धव ठाकरे आणि त्यांच्या गटासाठी लिटमस टेस्टसारखी आहे. आपल्या वडिलांचा खरा वारसदार कोण, हे सिद्ध करण्याची संधी त्यांच्याकडे चालून आली आहे. दुसऱ्या बाजूला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोरही शिवसेनेचे जास्तीत जास्त आमदार निवडून आणण्याचे आव्हान आहे. *(वृत्तसंस्था)*

### आमचा पक्ष खरा असल्याचा दावा

राज्यातील एकूण ४९ मतदारसंघांमध्ये शिवसेना (ठाकरे) विरुद्ध शिवसेना (शिंदे) पक्षाचे उमेदवार आमने-सामने उभे ठाकले आहेत. या ४९ मतदारसंघांवर संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. यातील जास्त जागा जो पक्ष जिंकेल, तो बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांवर चालणारा पक्ष आमचाच आणि आम्हीच मूळ शिवसेना आहोत, असा दावा करू शकेल. त्या ४९ मतदारसंघांमध्ये मागाठाणे, भांडुप पश्चिम, जोगेश्वरी पूर्व, दिंडोशी, चेंबूर, माहीम, भायखळा, वरळी, विक्रोळी, कुर्ला, अंधेरी पूर्व, कुडाळ, रत्नागिरी, राजापूर, सावंतवाडी, महाड, दापोली, गुहागर, कर्जत, पालघर, अंबरनाथ, भोईसर, भिवंडी ग्रामीण, कल्याण पश्चिम, ओवळा माजिवडा, कोपरी पाचपाखाडी, छ. संभाजीनगर पश्चिम, मध्य, परभणी, सिल्लोड, पैठण, कन्नड, वैजापूर, धाराशिव, उमरगा, कळमनुरी, चोपडा, नांदगाव, मालेगाव बाह्य, बार्शी, सांगोळा, राधानगरी, नेवासा, बुलढाणा, मेहकर, बाळापूर, रामटेक, दर्यापूर आदींचा समावेश आहे. ■

# ठाकरेंच्या उमेदवाराने निकालाआधीच काढली 'विजय रॅली'



**◆ रत्नागिरी, २२ नोव्हेंबर**

अवघ्या कोकणचे लक्ष लागून राहिलेल्या दापोली विधानसभा मतदारसंघात 'काँटे की टक्कर' होणार असल्याचे संकेत आहेत. शिवसेनेचे नेते, माजी पर्यावरण मंत्री रामदास कदम यांचे पुत्र व विद्यमान आमदार योगेश कदम यांच्यासमोर ठाकरे गटाचे उमेदवार संजय कदम यांनी मोठे आव्हान उभे केले आहे. या मतदारसंघात योगेश कदम यांचा विजय निश्चित मानला जात असतानाच ठाकरे गटाचे उमेदवार संजय कदम यांनी निकालाआधीच विजय रॅली काढून आपला विजय निश्चित असल्याचे जाहीर केले.

कोकणात दापोली मतदारसंघात शिवसेना-भाजपामधील वाद सर्वश्रुत होता. मात्र, निवडणुकीच्या दरम्यान मुख्यमंत्र्यांच्या सभेआधी तो मिटवण्यात आला होता. त्यामुळे महायुतीने एकत्र काम केले होते. असे असले तरी महायुतीमधीलच भाजपाच्या एक महिला पदाधिकाऱ्याने मात्र दाभोळ गटात आमदार योगेश कदम यांच्या विरोधात भूमिका घेतल्याची उघड चर्चा दापोलीत सुरू आहे. त्या महायुतीच्या एकाही बैठकीला उपस्थित राहिल्या नाहीत. त्यामुळे दाभोळ जिल्हा परिषद गटात महाविकास आघाडीच्या संजय कदम यांना बळ मिळाले. इतकेच नाही, तर काही गणिते फिरवण्यात आल्याचीही दापोलीत जोरदार चर्चा आहे. त्यामुळे दापोली विधानसभा मतदारसंघ हा अचानक चर्चेत आला आहे. *(वृत्तसंस्था)*

# राज्यभरात निवडणुकीशी संबंधित १५९ गुन्हे

## 'ईव्हीएम' मोडतोड, आचारसंहितेचा भंग

**◆ मुंबई, २२ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी राज्यभरात कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. निवडणुकीदरम्यान १५९ गुन्हे दाखल करण्यात आले. त्यात अदखलपात्र गुन्ह्यांचाही समावेश असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. निवडणुकीशी संबंधित मुंबईत दोन, ठाण्यात चार गुन्हे, नवी मुंबईत तीन गुन्ह्यांचा समावेश आहे. परळी येथे ईव्हीएम मोडतोडप्रकरणी तीन गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यात ११ जणांना अटक करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

निवडणुकीच्या काळात मुंबईत दोन गुन्हे व दोन अदखलपात्र गुन्ह्यांची नोंद करण्यात आली. त्यापैकी पहिला गुन्हा आग्रीपाडा पोलिसांनी दाखल केला. त्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नावाचे



बनावट पत्र प्रसारित केल्याप्रकरणी शिंदे गटाच्या माजी शाखाप्रमुखाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याशिवाय मुंबईत मुंबादेवी व मलबार हिल येथील मतदारयादीसह गुजरातमधील दोन व्यक्ती सापडल्या. त्यांच्याविरोधात व्ही. पी. रोड पोलिसांनी आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

याशिवाय नाशिक, पुणे, नागपूर, सोलापूर नगर, चंद्रपूर, पालघर, हिंगोली येथे गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. सर्वाधिक गुन्हे नाशिक जिल्ह्यात दाखल झाल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

### बीडमध्ये ईव्हीएम फोडण्याचा प्रयत्न

बीड जिल्ह्यातील घाटनांदूर येथे मतदान यंत्र फोडण्याचा प्रयत्न झाला तसेच दोन गट एकमेकांसमोर आले. याप्रकरणी तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यात ११ जणांना अटक करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. याप्रकरणी जवळपास ४० जणांवर अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात अतिशय गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले. *(वृत्तसंस्था)*

## भाजपा कार्यकर्त्यांचा वॉर रुममध्ये घुसण्याचा प्रयत्न : रोहित पवार

**◆ नगर, २२ नोव्हेंबर**

भाजपाच्या सुमारे २५-३० कार्यकर्त्यांनी कर्जत-जामखेड मतदारसंघात मध्यरात्री ईव्हीएम ठेवलेल्या स्ट्रॉंग रूममध्ये घुसण्याचा प्रयत्न केला, असा आरोप शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी एक्सवर पोस्टवर केला.

सीआरपीएफ आणि माझ्या कार्यकर्त्यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. भाजपा कार्यकर्त्यांचा हा प्रयत्न म्हणजे पराभवाच्या भीतीने सुरू असलेली गुंडागर्दी आहे, असा आरोप त्यांनी केला.

रोहित पवार यांनी ट्विटमध्ये म्हटले की, भाजपाच्या कार्यकर्त्यांनी मध्यरात्री ईव्हीएम ठेवलेल्या स्ट्रॉंग रुममध्ये घुसण्याचा प्रयत्न केला, परंतु माझे कार्यकर्ते आणि सीआरपीएफच्या जवानांनी संयमाने परिस्थिती हाताळत हा प्रयत्न हाणून पाडल्याबाबत त्यांचे आभार! याबाबत गुन्हा दाखल करताना भाजपाच्या दबावाखाली असलेल्या स्थानिक पोलिस प्रशासनाने मात्र सहकार्य करण्याऐवजी त्रास देण्याची भूमिका घेतली, याची निवडणूक आयोगाने योग्य दखल घ्यावी. भाजपा कार्यकर्त्यांना आता पराभव दिसत आहे. त्यामुळे ते गुंडागर्दी करीत आहे. *(वृत्तसंस्था)*

# आघाडी, महायुतीकडून बच्चू कडूंना फोन

**◆ मुंबई, २२ नोव्हेंबर**

परिवर्तन महाशक्तीचे घटक असलेले आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांना महाविकास आघाडी आणि महायुतीसोबत येण्यासंदर्भात फोन आल्याची माहिती पुढे आली आहे.

बच्चू कडू यांनी स्वत: याबाबत माहिती दिली. शनिवारी निकाल लागल्यावर आम्ही पुढील निर्णय घेणार असल्याचे बच्चू कडू म्हणाले. बच्च कडू सध्या मुंबईतच आहेत. त्यामुळे ते नेमकी काय भूमिका घेतात आणि मविआ की महायुतीची साथ देतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



शनिवारी सकाळी ८ वाजता राज्यातील सर्व मतदारसंघांमध्ये मतमोजणीला सुरुवात होईल. या पृष्ठभूमीवर महायुती आणि महाविकास आघाडीच्या गोटात हालचालींना प्रचंड वेग आला आहे.

### माढा, करमाळ्यावर विशेष लक्ष


निकालाआधीच महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांनी अपक्ष निवडणूक लढवलेल्या संभाव्य विजयी उमेदवारांना फोन करण्यास सुरुवात केली आहे. यात माढा मतदारसंघातून आमदार बबन शिंदे यांचे पुत्र रणजीत शिंदे यांनी अपक्ष निवडणूक लढवली होती. त्यांच्याकडे संभाव्य विजयी उमेदवार म्हणून बघितले जात आहे. तर करमाळा विधानसभा मतदारसंघात त्यांचे चुलते संजयमामा शिंदे यांनी देखील अपक्ष निवडणूक लढवली होती. या दोन्ही नेत्यांना महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांचे फोन येत आहेत. *(वृत्तसंस्था)*

# कुणी पत्नी, आईला गमावले; पण आधी मतदान मग अन्त्यसंस्कार!

**◆ जळगाव, २२ नोव्हेंबर**

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी राज्यभरात मतदान पार पडले. जळगाव जिल्ह्यात दोन कुटुंबातील सदस्यांचे निधन झाल्यानंतर त्यांचा मृतदेह घरात असताना दोघांनी मतदानाचे कर्तव्य बजावल्याचे आदर्श उदाहरण समाजासमोर ठेवले. पहिल्या घटनेत एका व्यक्तीच्या पत्नीचा मृत्यू झाला. दुसऱ्या घटनेत आईचे निधन झाले असताना मुलाने आईवर अन्त्यसंस्कार करण्यापूर्वी मतदानाचे कर्तव्य बजावत समाजासमोर आदर्श ठेवला.

जळगाव जिल्ह्यातील कळमडू येथील छायाबाई बच्छे यांचे मतदानाच्या दिवशी आकस्मिक निधन झाले. त्यानंतरही पती राजेंद्र नामदेव बच्छे यांनी भावांसह मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचे कर्तव्य पार पाडले.



राजेंद्र बच्छे हे शेतमजूर आहेत. घरात पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे. मुलगा अंकुश याची चार महिन्यांपूर्वी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या अग्निवीर प्रशिक्षणासाठी निवड झाली होती. तो प्रशिक्षणासाठी बेळगाव येथे गेला आहे. त्यामुळे तो आईच्या अन्त्यविधीसाठी येऊ शकला नाही. मुलगी रोहिणीने आईला अग्नी दिला.

### आई गेल्याचे दु:ख, तरी राष्ट्रीय कर्तव्य निभावले

दुसऱ्या घटनेत एरंडोल शहरात किराणा दुकानदार विशाल राजेंद्र येवले यांच्या आई सुनीता यांचे बुधवारी पहाटे सहा वाजता निधन झाले. संपूर्ण परिवार दु:खात बुडालेला असताना, विशाल याने आई गमावल्याचे दु:ख बाजूला सारून राष्ट्रीय कर्तव्याचा विचार केला. आधी मतदान केले आणि नंतर आईवर अन्त्यसंस्कार केला. *(वृत्तसंस्था)*

## अग्रलेख...

# प्रतीक्षा संपली; आज निकाल

झारखंड आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची मतमोजणी आज होत असून, या दोन्ही राज्यांचा कौल कुणाला मिळाला, याचे उत्तर यातून मिळणार आहे. झारखंडमध्ये एनडीए आणि इंडिया आघाडी, तर महाराष्ट्रात महायुती आणि महाविकास आघाडी अशी लढत आहे. बहुतांश एक्झिट पोलने या दोन्ही राज्यांत एनडीएला म्हणजे रालोआला बहुमत दाखवले आहे. एक्झिट पोलचे निष्कर्ष खरे ठरले तर भाजपा झारखंडमधील सत्ता झारखंड मुक्ती मोर्चाकडून हिसकावून घेईल, तर महाराष्ट्रातील आपली सत्ता कायम ठेवल. अपेक्षेप्रमाणे निकाल लागला तर या दोन्ही राज्यांना डबल इंजिनच्या सरकारचे फायदे मिळतील. केंद्रात आणि राज्यात एकाच पक्षाचे सरकार असले तर राज्याच्या विकासाला गती मिळते, याचा अनुभव आपण आतापर्यंत भाजपाशासित राज्यांच्या विकासावरून घेतला आहे. अशा राज्यांना निधीची अडचण येत नाही. यावेळच्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात विक्रमी मतदान झाले आहे. याआधी १९९५ मध्ये राज्यात विक्रमी मतदान झाले होते; त्यानंतर ३० वर्षांनंतर मतदारांनी भरभरून मतदान करत लोकशाहीवरील आपली अढळ निष्ठा प्रकट केली आहे. लोकसभा निवडणुकीत राज्यात जवळपास ६१ टक्के मतदान झाले होते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीतही एवढेच मतदान झाले होते. यावेळी मात्र ६६ टक्के मतदान राज्यात झाले. मतदानातील ५ टक्क्यांची वाढ हे चांगले लक्षण म्हटले पाहिजे. सुरुवातीला मतदानाची गती संथ होती, त्यामुळे ५० टक्के मतदान तरी होईल की नाही, अशी चिंता वाटत होती. पण दुपारनंतर मतदार घराबाहेर पडला आणि मतदान केंद्रावर पोहोचला; त्याचा हा परिणाम म्हणायला हरकत नाही. या वाढीव मतदानाचा फायदा कुणाला मिळणार त्यावर निवडणुकीचा निकाल अवलंबून आहे. मात्र सध्या वाढीव मतदानाने महायुती आणि महाविकास आघाडी या दोघांच्याही चिंता वाढवल्या आहेत. आपल्या विजयाबाबत महायुतीचे नेते जेवढे आश्वस्त आहेत, तेवढे महाविकास आघाडीचे नेते दिसत नाही. उसने अवसान आणून बोलायचे तसे आघाडीचे नेते बहुमताचे दावे करताना दिसत आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपाला स्वबळावर बहुमत मिळविता आले नव्हते. त्यामुळे भाजपाला जनतेने नाकारले, असा सोयीस्कर अपप्रचार विरोधी पक्षांनी सुरू केला होता. भाजपाने संयुक्त जनता दल आणि तेलगू देसम या दोन मित्रपक्षांच्या पाठिंब्यावर सरकार स्थापन केले तरी भाजपाच्या नेतृत्वाच्या मनात एक रुखरुख लागून गेली होती. भाजपाचा आत्मविश्वासही काही प्रमाणात डगमगला होता.

हरयाणा विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे भाजपात नवचैतन्य आले, आत्मविश्वास निर्माण झाला. झारखंड आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपाला यश मिळाले तर येथून पुढे भाजपाच्या विजयाचा रथ भरधाव निघेल, यात शंका नाही. लोकसभा निवडणुकीच्या निकालाने काही प्रमाणात आलेले औदासीन्य या दोन राज्यांतील निकालाने पूर्णपणे निघून जाणार आहे. भाजपा नेत्यांचा आत्मविश्वास वाढणार आहे. झारखंडमध्ये कोणाला बहुमत मिळाले याचा राष्ट्रीय राजकारणावर फारसा परिणाम होणार नाही; मात्र महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक निकालाचा राष्ट्रीय राजकारणावर दूरगामी परिणाम होणार आहे. याचे कारण महाराष्ट्र हे राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे राज्य आहे. लोकसभेच्या देशातील दुसऱ्या क्रमांकाच्या म्हणजे ४८ जागा महाराष्ट्रात आहेत. लोकसभेच्या ८० जागा असलेले उत्तरप्रदेश देशात पहिल्या क्रमांकावर आहे. झारखंडमध्ये विधानसभेच्या ८१ जागा आहेत, तर महाराष्ट्रात २८८. त्यामुळे महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निकालाकडे संपूर्ण राज्याचेच नाही तर देशाचेही लक्ष लागणे स्वाभाविक आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात ज्या नाट्यपूर्ण राजकीय घटना घडल्या, त्यामुळे यावेळची निवडणूक अतिशय चुरशीची आणि थरारक झाली. निवडणूक विधानसभेची असली, तरी प्रत्येक राज्यातील निवडणूक तेथील राजकीय परिस्थिती, समस्या, लोकांचे प्रश्न यानुसार वेगळी असते, निवडणुकीचे मुद्दे वेगळे असतात. त्यामुळे दोन राज्यांत एकाच वेळी होणाऱ्या निवडणुकीची तुलना करता येत नाही. महाराष्ट्रात यावेळी दोन्ही बाजूने झंझावाती प्रचार केला. मतदारांवर लोकप्रिय आश्वासनांचा वर्षाव करण्यात आला. आरोप-प्रत्यारोप झाले. काही वेळेला यात दोन्ही बाजूने पातळीही सुटली. दोन्ही बाजूचे कार्यकर्ते प्रसंगी हाणामारीवरही आले. पैसा तर पाण्यासारखा खर्च झाला. युद्धात आणि प्रेमात सर्व माफ असते, असे म्हणतात, त्यात आता राजकारण आणि निवडणूकही जोडायला हरकत नाही. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे बदलून गेली. राज्यात आधी चार प्रमुख पक्षांच्या दोन आघाड्या होत्या. भाजपा, शिवसेना आणि काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे राज्यातील चार प्रमुख पक्ष होते. पण नंतर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली. शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या हिंदुत्वविरोधी भूमिकेमुळे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात हिंदुत्वाच्या मुद्यावर आमदारांचा एक गट शिवसेनेतून बाहेर पडला आणि त्याने भाजपासोबत सरकार स्थापन केले. काही काळाने राष्ट्रवादी काँग्रेसमधून अजित पवारही या सरकारमध्ये सामील झाले. विशेष म्हणजे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या दोन्ही गटांनी आपली वैधानिकता सिद्ध केली, त्यामुळे त्यांना मूळ पक्ष म्हणून मान्यता मिळाली. त्यामुळे यावेळची निवडणूक दोन आघाड्यांतील सहा पक्षांत झाली. भाजपाच्या नेतृत्वातील युतीत भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस, तर काँग्रेसच्या नेतृत्वातील आघाडीत काँग्रेससोबत शिवसेना उबाठा तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आहे. विशेष म्हणजे यावेळी कोणत्याच आघाडीने आपला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केला नाही. निकालानंतर आम्ही मुख्यमंत्रिपदाबाबत विचार करू, अशी सावध भूमिका दोन्ही आघाड्यांनी घेतली आहे; जी स्वाभाविक म्हणावी लागेल. कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील, त्यावरून मुख्यमंत्रिपदाचा निर्णय दोन्ही आघाड्यांना करावा लागणार आहे. महायुती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात निवडणूक लढवत असली, तरी निकालानंतर तेच मुख्यमंत्री होतील, याची जशी खात्री देता येत नाही तसेच ते होणारच नाही, हेही छातीठोकपणे सांगता येणार नाही.

महाविकास आघाडीत तर 'बाजारात तुरी...'प्रमाणे मुख्यमंत्रिपदावरून आतापासूनच कलगीतुरा सुरू झाला आहे. काँग्रेस आणि उबाठा गटाचे नेते निकाल लागला नसताना नळावर बायका भांडतात, त्याप्रमाणे मुख्यमंत्रिपदासाठी एकमेकांचे कपडे फाडू लागले आहेत. त्या तुलनेत महायुतीत मुख्यमंत्रिपदावरून कोणतेच मतभेद दिसत नाहीत. राज्यात आधी सत्ता येणे म्हणजे बहुमत मिळणे आवश्यक आहे. त्यानंतर या पदाबाबत निर्णय घेता येईल, अशी समजूतदारीची भूमिका महायुतीतील तिन्ही पक्षांच्या नेत्यांनी घेतली आहे. महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर तिन्ही पक्षांचे नेते एकत्र बसून याबाबतचा निर्णय सर्वसहमतीने घेतील, यात शंका नाही. भाजपा संसदीय मंडळाची यात मोठी भूमिका राहू शकते. एखादवेळी महाविकास आघाडीला बहुमत मिळाले तरी मुख्यमंत्रिपदावरून त्यांच्यात तीव्र स्वरूपाचे मतभेद झाल्याशिवाय राहणार नाही. शिवसेना उबाठा काँग्रेसला मुख्यमंत्रिपदावर बसू देणार नाही आणि काँग्रेस उबाठाला. या वादात दोन मांजरांच्या भांडणात बोका लोण्याचा गोळा पळवतो, तशी स्थिती महाविकास आघाडीत झाली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. यात बोका कोण राहू शकतो, हे वेगळे सांगायची गरज नाही. कोणालाही बहुमत मिळाले आणि कोणीही मुख्यमंत्री झाला तरी त्याने राज्यातील लोकांचे प्रश्न सोडविले पाहिजे. आपले प्रश्न सोडविण्यासाठी जनतेने आपल्याला निवडून दिले, याचे भान ठेवले पाहिजे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे बहुमत मिळाल्यामुळे कोणी उतू नये आणि पराभवामुळे कोणी खचू नये. लोकशाहीतील लोकांचा जो कौल असेल त्याचा आदरपूर्वक स्वीकार केला पाहिजे.


## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# राज ठाकरे ००७?

आज महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल घोषित होईल. साधारण दुपारनंतर महाराष्ट्राच्या जनतेचा कौल कोणाला आहे, हे स्पष्ट होईल. महायुती आणि महाविकास आघाडी हे दोन प्रमुख संघ एकमेकांविरोधात उभे ठाकले आहेत. विशेष म्हणजे शिवसेना आणि राष्ट्रवादीचे दोन गट परस्परविरोधी संघात असून, त्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. एकनाथ शिंदे यांचे म्हणणे आहे की, गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्राच्या जनतेने आघाडी आणि युती दोन्ही सरकारचा कारभार पाहिला आहे; दोन्ही सरकारे सुमारे अडीच वर्षे सत्तेवर होती. त्यामुळे महाराष्ट्राची जनता युतीलाच बहुमत देईल. दुसरीकडे वंचित बहुजन आघाडी कोणाची मते खाणार, हेसुद्धा लवकरच कळेल. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रात राष्ट्रीय पक्षांची जादू चालणार नाही; मात्र स्थानिक पक्ष चांगली कामगिरी करू शकतात. दोन्ही शिवसेना आणि दोन्ही राष्ट्रवादी असे स्थानिक पक्ष सोडले तर कोणाचीही इतकी क्षमता नाही की, ते महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी कामगिरी करू शकतील.

अजित पवार आघाडीतून युतीत आले आणि उद्धव ठाकरे युतीतून आघाडीत गेले. मात्र दोन्ही नेत्यांमध्ये फरक आहे. अजित पवार जरी युतीत आले असले, तरी त्यांनी त्यांची सेक्युलर इमेज जपली आहे. 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेवरही त्यांनी आक्षेप घेतला होता. त्यांनी हिंदुत्वासाठी कोणतीही सकारात्मक विधाने केली नाहीत. त्यामुळे युतीत त्यांच्याविषयी नाराजी आहे. पण एक स्वतंत्र पक्ष म्हणून त्यांनी त्यांची ओळख कायम ठेवली. दुसरीकडे उद्धव ठाकरे मात्र आघाडीला पूर्णपणे शरण गेले. उलट आघाडीतले नेते जितके सेक्युलर नसतील, त्याहीपेक्षा आपण मोठे सेक्युलर आहोत हे दाखवण्याचा अट्टहास उद्धव ठाकरेंनी केला आणि त्यांनी परतीचे सगळे मार्ग बंद करून टाकले. बाळासाहेबांच्या अगदी विपरीत राजकारण ते करीत आहेत. या अट्टहासापोटी त्यांना त्यांचा पक्ष गमवावा लागला आणि उबाठा गट म्हणून मिरवावे लागत आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात असे म्हणतात की, शरद पवारांच्या गळाला लागलेल्या कोणत्याही माश्याचे



भवितव्य चांगले नसते. असो...

उद्धव ठाकरेंच्या तुलनेत राज ठाकरेंचा विचार केला तर राज यांनी व्यवस्थित माघार घेत आपलं स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवलं. २०१९ मध्ये ते पवारांसाठी प्रचार करीत आहेत की काय, अशी शंका महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात निर्माण झाली होती. पण ते वेळीच सावरले. त्यानंतर त्यांनी पक्षाचे धोरण म्हणून हिंदुत्व हाती घेतलं. लगेच 'हिंदुजननायक' ही उपाधीही पदरात पाडून घेतली आणि हिंदुत्वाचा आणखी एक नवा चेहरा समोर आला. त्यांचा प्रवास अगदी बाळासाहेबांसारखा आहे. आधी मराठी आणि मग हिंदुत्व. दुर्दैवाने त्यांना बाळासाहेबांसारखे यश लाभले नाही. शिंदेंनी उठाव केल्यानंतर शिंदे, फडणवीस आणि राज ठाकरे एकत्र येतील असे वातावरण होते. भेटीगाठीही होत होत्या. पण अजित पवार बंड करून युतीत सहभागी झाल्यामुळे मनसेला कोणते स्थान द्यायचे हा मुद्दा होता. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत राज ठाकरेंनी युतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला; पण शिवसेनेच्या चिन्हावर निवडणूक लढण्यास ठाकरेंनी नकार दिला. आपला पक्ष वेगळा आहे आणि आपला उमेदवार मनसेच्याच चिन्हावर निवडणूक लढेल, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. आता विधानसभेच्या निवडणुकीतही काही अंशी त्यांनी शिंदे व भाजपावर टीका करून आपलं स्वतंत्र अस्तित्व अबाधित ठेवलं. मात्र त्यांचं मुख्य लक्ष्य होतं शरद पवार आणि उद्धव ठाकरे. राज ठाकरेंनी पवारांना नास्तिक म्हटल्यावर पवार आपण आस्तिक आहोत, हे दाखवण्यासाठी पुढे सरसावले. महाराष्ट्रात पवारांनी जातीयवाद रुजवला अशी राज यांनी केलेली टीकादेखील पवारांना झोंबली. या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान उद्धव ठाकरेंचा त्यांनी कठोर समाचार घेतला. शिवसेना उद्धव ठाकरेंमुळेच फुटली असं त्यांनी जाहीरपणे सांगितलं. अमित ठाकरे यांनीही आपल्या काकांवर टीका केलेली आहे. त्यामुळे आपलं युद्ध हे शरद पवार आणि उद्धव ठाकरेंविरोधात आहे हे त्यांनी घोषित केलं आहे.

या निवडणुकीत मनसेने १३५ उमेदवार उभे केले आहेत. २५ उमेदवार तर मुंबईत दिले आहेत. राज ठाकरे गेली दोन महिने ते सत्तेत बसणार असं आत्मविश्वासाने म्हणत आहेत. या आत्मविश्वासामागचं कारण आपण शोधलं पाहिजे. अजित पवार हे दीर्घकाळ युतीत राहू शकत नाहीत. आज निकाल लागला आणि महायुतीचं सरकार स्थापन होणार आहे, असं स्पष्ट झालं आणि उद्या हिंदुत्वाच्या मुद्यावर आक्षेप घेत अजित पवार बाहेर पडले तर सरकार पडेल, अशी शंका भाजपाला असू शकते. म्हणूनच राज ठाकरे जरी प्रत्यक्षात युतीत नसले आणि एक पक्ष म्हणून स्वतःची वेगळी ओळख जरी त्यांनी कायम ठेवली असली, तरी ते युतीबाहेरील युतीचे हितचिंतक म्हणून काम करीत आहेत. त्यामुळे अजित पवारांशिवाय सत्ता स्थापन होऊ शकते याची पूर्वतयारी आधीच झालेली असू शकते. १३५ उमेदवारांपैकी राज ठाकरे यांनी सुमारे ३०-३५ जागांवर जोर लावला आहे. यापैकी ८ ते १० जागा जरी त्यांना जिंकता आल्या तरी सत्तेत बसण्याचा त्यांचा मार्ग मोकळा होईल. मात्र, किमान ८ जागा तरी त्यांना जिंकाव्या लागणार आहेत. असे झाले तर त्यांच्या पक्षाला नवी भरारी मिळेल. केवळ निवडणुकीच्या वेळीच चार्ज होणारा पक्ष अशी नकारात्मक ओळख त्यांना पुसावी लागणार आहे आणि या निवडणुकीनंतर पक्ष बांधणी, संघटनेवर लक्ष केंद्रित करावे लागणार आहे. राज ठाकरे यांचे भवितव्य काय असेल हे आज स्पष्ट होईलच. मात्र राज हे युतीचे हितचिंतक आहेत आणि त्यांना युतीच्या सरकारमध्ये बसण्याची इच्छा व खात्री आहे तसेच त्यांना शिंदे व फडणवीसांचा पाठिंबा आहे, असेही वरवर पाहता दिसून येते. म्हणूनच 'राज ठाकरे ००७?' हे या लेखासाठी योग्य शीर्षक आहे. तुम्हाला काय वाटते?

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# विदर्भातील काश्मीरची संपावी आता उपेक्षा!

काश्मीरचे नाव काढताच निसर्गरम्य वातावरण डोळ्यांपुढे येते. त्या खऱ्या जम्मू-काश्मिरात जाण्याची बहुतांश लोकांची मनोमन इच्छा असते. याकरिता ते लोक लाखो रुपये खर्च करून आपली इच्छा पूर्णही करतात. पण हीच मंडळी विदर्भातील काश्मीरकडे भटकतही नाही. असे का व्हावे? याचा विचार करण्याची वेळ प्रत्येकावर आली आहे. नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी आणि रामटेक तालुक्यात विदर्भातील काश्मीर वसले आहे. या काश्मीरचा नियोजित विकास करून येथे आपण डॉलरचा पाऊस पाडू शकतो, एवढी ताकद या भागाची आहे. पण सातत्याने होत असलेली उपेक्षा आणि स्थानिकांची निराशा यामुळे विदर्भातील काश्मीर निसर्गसंपन्न असतानाही मागे पडले आहे. पेंच व्याघ्र प्रकल्पातील कोलितमारा, कुंवारा भिवसेन, कामठी खैरी येथील पेंच प्रकल्प जलाशय, तोतलाडोह येथील मेघदूत जलाशय, अंबाखोरी, खिंडसी, रामटेक गडमंदिर, नगरधनचा किल्ला, मनसर येथील स्तूप, पारशिवनी येथील ऐतिहासिक तलाव, घोगरा महादेव, कालभैरव पेठ येथील ऐतिहासिक मंदिर, घाटकुकडा, धवलापूर, देवलापार या भागातील निसर्गसौंदर्य डोळे दीपवून टाकणारे आहे. ज्या व्यक्तीला रामटेक गडमंदिरावर सकाळ पाहायला मिळाली, त्याला येणारी अनुभूती स्वर्गसुख देणारी असते. एवढे तेथील वातावरण आल्हाददायक आहे. मग आपण मागे का पडलो याचे मंथन करायला हवे. पहिले कारण येथील वाहतूक व्यवस्था मजबूत नाही. याकरिता रेल्वे मंडळाशी बोलून तातडीने सेवाग्राम एक्सप्रेस, पॅसेंजर गाड्या आणि इतरही गाड्या रामटेक येथून सुरू करायला हव्यात. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मनावर घेतले तर पारशिवनीपर्यंत महामेट्रो येऊ शकते. ती मेट्रो रेल्वे आल्यास पर्यटक वाढतील, पर्यायाने लोकांना जाणे-येणे सोपे होईल. समजा मेट्रो आणणे खर्चीक असल्यास मनसर डुमरी येथून पारशिवनीपर्यंत रेल्वे मार्ग टाकण्यात यावा; जेणेकरून पारशिवनी रेल्वे मार्गाशी जुळेल. त्यात अडचणी आल्यास खापरखेडा येथून पारशिवनीपर्यंत रेल्वे मार्ग आणता येईल. पाहा, इच्छा असेल तर कुठूनही रेल्वे पारशिवनीत येऊ शकते. इच्छा नसेल तर मग काहीच होणार नाही. तसे पाहता पारशिवनी तालुका सन १९८० मध्ये उदयास आला, पण इतरांच्या तुलनेत मागेच पडला. पारशिवनी येथील साधा बसस्थानकाचा विषय वर्षानुवर्षे रखडला होता. पण आता दिवस बदलले आहेत. लोकांना झटपट विकास हवा आहे. कुठलीही व्यक्ती प्रतीक्षा करायला तयार नाही.

ही नव्या युगातील मंडळी वायुवेगाने समोर जाण्यासाठी आसुसलेली आहे. अशा नव्या युगाचा विचार करता सरकारनेही पुढाकार घ्यावा. सरकार समजा तयार नसेल तर त्यांनी खाजगी विश्वासू कंपन्यांना याकरिता नेमावे. रामटेक तालुक्यातील मनसर येथे पर्यटक महर्षी चंद्रपाल चौकसे यांनी स्वबळावर रामधामची निर्मिती करून लिम्का बुकमध्ये आपले नाव सुवर्ण अक्षराने नोंदविले. त्यांनी तर सरकारकडून मदतही घेतली नाही. मग एक व्यक्ती स्वबळावर एवढे काही करू शकते, तर सरकारने समजा विचार केल्यास चमत्कार घडू शकतो, नाही का? ही सर्व चर्चा करण्याची गरज म्हणजे या भागातील खनिज संपत्ती, वनसंपदा, वनसौंदर्य, वन्यप्राण्यांची वाढलेली संख्या पाहता येथे पर्यटन वेगाने वाढू शकते. मागे जलसंपदा विभागाने पारशिवनी तालुक्यातील कामठी खैरी येथील पेंच प्रकल्प धरणाच्या सुशोभीकरणाचे काम हाती घेतले होते. तेव्हा त्यांनी आहे त्याला विकसित न करता सर्व तोडून धरणासह पिंपळाच्या आकारातील उद्यानाचा सत्यानाश केला. ज्यांनी पिंपळाचे उद्यान पाहिले होते, ती मंडळी आज धरण भागात गेल्यावर अक्षरशः रडतात. एवढी विदारक परिस्थिती धरणासह पिंपळाच्या आकारातील उद्यानाची केली आहे. ज्या सुपिक डोक्यातून ही कल्पना आली होती आणि ज्यांनी हे काम केले त्यांच्याकडून या नुकसानीची भरपाई करायला हवी. विकास म्हणजे भकास करणे होत नसते. कदाचित त्यांनी तोच विचार केला आणि होतकरू अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी केलेल्या मेहनतीवर पाणी फेरले. विदर्भातील काश्मीरमध्ये वन उपज संपदा भरपूर आहे. पण त्यावर प्रक्रिया करणारा उद्योगच नाही. नाशिकमध्ये द्राक्षापासून वाईन काढली तर जगमान्यता मिळते. पण विदर्भाच्या काश्मीरमधील लोकांवर मात्र मोहफुलापासून दारू काढल्यास गुन्हा दाखल होतो. यावर गांभीर्याने विचार करून त्यांनाही सनदशीर मार्गाने मोहफुलापासून अर्क काढण्याची परवानगी शासनाने द्यायला हवी. कदाचित तोही चांगला उद्योग या क्षेत्रातील लोकांना लाभदायक ठरेल.

९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# गुडघ्याला बाशिंग...!

एका मुख्यमंत्रिपदासाठी भाजपाच्या पाठीत खंजीर खुपसून काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या मांडीवर जाऊन बसणारे उद्धव ठाकरे यावेळी पुन्हा गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असल्याचे दिसते. अर्थात हा चर्चा किंवा अंदाज नव्हे, तर प्रत्यक्षात त्यांच्या घरगड्याने याबाबतचा दावा केलाय्. दुसरीकडे महाविकास आघाडीतला मोठा भाऊ असलेल्या काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेदेखील गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असल्याचं त्यांच्या वक्तव्यातून दिसले. बरं; अद्याप निकालाचा पत्ता नाही. वेगवेगळ्या सर्व्हेमधून महायुतीला झुकतं माप देण्यात आलं आहे. तर, सट्टेबाजाराने महायुतीला फेव्हर केल्याचे दिसते. अशात कुठूनही सत्ता येण्याची चिन्हे नसताना, मुख्यमंत्रिपदासाठी दावे-प्रतिदावे, मारामारी करून गुडघ्याला बाशिंग बांधून फिरण्याच्या प्रकाराला 'उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग' असे म्हणतात.

राज्यात कुणाची सत्ता येणार हे आज स्पष्ट होणार आहे. मात्र, त्याआधीच काँग्रेस आणि उबाठा गटाला मुख्यमंत्रिपदाची स्वप्ने पडू लागली आहेत. यात सर्वांत चतुर पक्ष हा शरद पवारांचा आहे. नेहमी एकदम सेफ खेळी करत असतात. शरद पवार, सुप्रिया सुळे आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे सातत्यानं सांगताहेत की, आम्ही मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत नाही. अर्थात संख्याबळ साजेसं मिळालं, तर शरद पवार आपल्या हयातीत मुलीला मुख्यमंत्री बनविल्याशिवाय राहणार नाहीत; किंबहुना त्यांची हीच शेवटची इच्छादेखील म्हणता येईल. पण माणसाच्या सर्वच इच्छा एका जन्मात पूर्ण होत नसतात, ही दुसरी बाजूदेखील असल्याने व जनता आपल्या पदरात सत्तास्थापनेसाठी लागणारी मॅजिक फिगर टाकते किंवा नाही याबाबत कदाचित शरद पवारांच्या मनात संभ्रम असल्याने ते सावध पावलं टाकत असल्याचे दिसत आहे. तसे शरद पवारांइतकं महाराष्ट्राला कोणी ओळखून नाही, असे म्हणतात. त्यामुळे शरद पवारांना महाराष्ट्राच्या मनात काय आहे, याची कुणकुण लागली असावी; त्याहीमुळे कदाचित पवार आणि त्यांचे नेते दूर बसून काँग्रेस आणि उबाठामध्ये चाललेला तमाशा बघत बसले असावेत. बरं; यात दोन्ही घरचा घरगडी आपल्या मालकाच्या नावासोबत दुसऱ्या मालकाच्या मुलीचे नाव चालविण्याऐवजी जयंत पाटलाचे नाव पुढे करू लागला आहे. महत्त्वाचं म्हणजे जयंत पाटलासाठी



ठाकरे गटाचा पाठिंबा असल्याचेदेखील जाहीर करून टाकले घरगड्याने. आता हा सर्व प्रकार मालकाला विचारून केलाय् की दुसऱ्या मालकाच्या इशाऱ्यावर करताय् हा मात्र गुलदस्त्यातला विषय आहे. पवार गट स्वतः मुख्यमंत्रिपदावर दावा करत नसताना, घरगड्याला नसता उपद्रव करायला सांगितलं तरी कोणी, असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. कदाचित काँग्रेसवर कुरघोडी करण्याचा हा प्रयत्न असण्याची शक्यता नाकारता येत नाही. आम्हाला नाही तर तुम्हालाही नाही... या सूत्रावर आधारित हा प्रकार उबाठाकडून सुरू केला असण्याची शक्यता आहे. काही का असेना, पण मुख्यमंत्रिपदाच्या लोभात आंधळे झालेल्या काँग्रेस आणि उबाठाला कळत नाही आहे की, अद्याप जनादेश आपल्या बाजूला आलेला नाही. सगळे सर्व्हे आणि एक्झिट पोल हे महायुतीच्या बाजूने दाखविले जात आहेत. सट्टाबाजारात दिलेले दर हे कुठेही जुळत नाहीत; त्यात जमीन-आसमानचा फरक आहे. त्यामुळे काटेकी टक्कर आहे असे म्हणता येईल, अशातला भागदेखील नाही. त्यात फार मोठी तफावत आहे. महायुतीला ते केवळ १५ पैसे तर आघाडीला ६ रुपये देत आहेत. सगळ्या शक्यता आणि संकेतांकडे कानाडोळा करत महाविकास आघाडीतील तीन पक्षांपैकी दोन म्हणजे काँग्रेस आणि उबाठा हे बैठका काय घेत आहेत, रणनीती काय बनवत आहेत, मुख्यमंत्रिपदाचे चेहरे घोषित करण्याची चढाओढ काय चालली आहे, आमदार सुरक्षित ठेवण्याची रणनीती काय आखली जात आहे, नवनियुक्त आमदार कुणाच्या संपर्कात येणार नाही, याची काळजी काय घेतली जात आहे, सारं काही हास्यास्पद.

बरं; या सगळ्या सर्कसजन्य वागणुकीत काँग्रेस तर उबाठापेक्षा दोन पावलं पुढे निघाली आहे. त्यांनी राष्ट्रीय पातळीवरून उपाययोजना आखण्याची व्यवस्था करणे, तेलंगणाचे मुख्यमंत्री आणि कर्नाटकचे उपमुख्यमंत्र्यांची आमदारांच्या सुरक्षेसाठी नेमणूक करणे आणि विजयी आमदारांना विशेष विमानाने सुरक्षित स्थळी हलवण्याची योजना आखणे, आमदारांसाठी सुरक्षितस्थळ निवडणे, कदाचित यालाच 'मुंगेरीलाल के हसीन सपनें' असे म्हणत असावेत.

राज्यात मतदान झाल्यानंतर विविध वृतवाहिन्यांनी एक्झिट पोलचे निष्कर्ष जाहीर केले आहेत. त्यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळत असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. तर, सर्वाधिक जागा भाजपाला दाखवण्यात आल्या आहेत. त्यामुळे भाजपा आणि महायुतीच्या घटक पक्षांच्या गोटात सध्या 'फिल गुड'चे वातावरण आहे. शिवाय तसाच काहीसा ग्राऊंड रिपोर्ट येत आहे. जेथे लोकसभेत भाजपाचा दारुण पराभव झाला, त्या लोकसभा मतदारसंघातही भाजपा-महायुतीचे घटक पक्ष चांगली कामगिरी करताना दिसत आहेत. सर्व स्तरावरून चांगले संकेत येत असताना महायुतीतील घटक पक्ष मुख्यमंत्रिपदावरून मारामारी तर सोडा; साधी चर्चादेखील करण्यात स्वारस्य दाखवताना दिसत नाही. खऱ्या अर्थाने ज्यांना महाराष्ट्रातील जनता संधी देत असल्याचे सबळ संकेत मिळत असताना, महायुतीचे घटक पक्ष काँग्रेस आणि उबाठासारखा आततायीपणा करताना दिसत नाहीत. भाजपाचे देवेंद्र फडणवीस तर सध्याच्या राजकारणातील चाणक्यच आहेत. ते आपली रणनीती प्रत्यक्षात अमलात येईपर्यंत माहिती होऊ देण्यात माहीर आहेत. पण शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार यांनीदेखील कमालीची परिपक्वता दाखविली आहे. या संयमाला आणि राजकीय चातुर्यालाच परिपक्वता म्हणतात. जी महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये दिसली नाही; किंबहुना त्यांच्यात नाहीच. त्यामुळेच कशात काही नसताना नाना पटोले, उद्धव ठाकरे गुडघ्याला बाशिंग बांधून फिरताना दिसत आहेत. शिवाय सार्वजनिकपणे स्वतःच्याच अब्रूचे धिंडवडे काढत निघाल्याचे दिसत आहे. उद्या दुपारपर्यंत बेस्ट सीएम व त्यांच्या घरगड्याच्या चेहऱ्यावरील हास्य आणि उसनं अवसान हे गळून पडेल, यात शंका नाही.

९२७०३३३८८६

### लोकोत्सव थाटात संपन्न

२० नोव्हेंबरला नेहमीपेक्षा जास्त मतदान झाले. यामुळे लोकोत्सवाला आगळेवेगळे महत्त्व आल्याचे दिसून आले व लोकोत्सव थाटात संपन्न झाला. जास्त मतदानाचा फटका मतदार कोणाला देतील हे आज कळेलच. एक्झिट पोलचे बहुमताचे पारडे महायुतीकडे दाखवीत आहे. माझ्या मते महाविकास आघाडी व महायुती यांच्यात सर्वत्र काट्याची टक्कर असल्याने स्पष्ट बहुमत दोघांना मिळण्याची शक्यता कमी दिसत आहे. त्यामुळे युती व आघाडी आट्यापाट्यावर राहण्याची दाट शक्यता आहे. महायुती किंवा महाविकास आघाडी फक्त १५० चा आकडा गाठू शकते; यापेक्षा जास्त नाही यालाही नाकारता येत नाही. कारण या विधानसभा निवडणुकीत महायुतीचे घटक पक्ष व महाविकास आघाडीचे घटकपक्ष आणि आजी-माजी आमदार- खासदार- मंत्री हे सुद्धा रिंगणात होते. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात विजयी होणारा उमेदवार किंवा पराजय होणारा उमेदवार यामध्ये ५००-१००० ते ५००० पर्यंत फरक दिसून येईल. या महासंग्रामात महाविकास आघाडीसुद्धा बाजी मारू शकते, हेही नाकारता येत नाही. सत्तेसाठी जर दोन्ही आघाड्यांना बहुमत मिळाले नाही तर मोठ्या प्रमाणात आपल्याला घोडेबाजार होताना दिसेल. मतदार कोणाच्या बाजूने उभे आहेत हे आपल्याला निकालानंतरच कळेल. परंतु महायुतीचे सरकार येवो अथवा महाविकास आघाडीचे सरकार येवो सत्ता स्थापनेसाठी दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात घोडेबाजार आपल्याला दिसून येईल यात दुमत नाही. मतदारांच्या लोकोत्सवाला राजकीय पुढारी सत्तेसाठी घोडेबाजार करून कलंकित करण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. ही बाब लोकशाहीसाठी चिंतेचा विषय आहे.

**रमेश लांजेवार**/९९२१६९०७७९

### विचारांचे ब्लॉकेजेस

मनातले दुःख, भावभावनांचा निचरा होत नाही आणि रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉकेजेस निर्माण होतात; तोच प्रकार सध्याच्या निवडणुकीच्या काळात निर्णय होईपर्यंत होताना दिसतो. वृत्तपत्र म्हणा किंवा मीडिया; आपापल्यापरीने आपले स्वतःचे विचार वाचक आणि श्रोते यांच्यावर लादतात आणि मतदारांच्या व उमेदवारांच्या विचारांचे ब्लॉकेजेस वाढवत राहतात. परिणामस्वरूपी ना तेजस्वी चेहरे होताना दिसतात, ना वेदना कमी होतात. उलट चारित्र्यसंपन्नतेला डाग पडतात. सहजरीत्या होणारी कपालभाती थांबली, खुललेले चेहरे काळवंडू लागले आणि खोटारड्या, सुकलेल्या चेहऱ्याचा दिखाऊपणा जनमानसात डोलू लागला. गोंधळातून आलेले हास्य कोणाचे याची चर्चा एक्झिट पोलमधून रंगू लागली, पण एक सत्य हेच आहे की, तुम्ही धर्माची बाजू घेत नसाल तर विनाश अटळ आहे. हेच गंगापुत्र भीष्म, गुरुश्रेष्ठ द्रोणाचार्य, दानशूर कर्ण यांच्या कर्तृत्व, पुण्य, शारीरिक बळ, आर्थिक बळ यांच्या माध्यमातून सिद्ध झालेले आहे, ते नाकारता येणार नाही; यासाठीच संस्कारित विचार, चारित्र्य यांचा सांभाळ करावा.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

## वाचक पत्रे

### ऊसतोड कामगार मुलांचे शैक्षणिक भविष्य अंधारात

विधानसभा निवडणूक मतदानाच्या आधीच मराठवाडा व विदर्भातील ऊसतोड कामगार आपल्या कुटुंबासह अहल्यानगर जिल्हा, गुजरात राज्य व नाशिककडे निघून गेले. त्यांच्या समवेत शाळेत शिकणारी त्यांची मुले-बाळे ही आता सहा महिने गावाकडे परतणार नाही. या सहा महिन्यांच्या काळात यांच्या मुला-मुलींचे शिक्षण कसे होणार? ते जेथे जेथे जातील तेथे त्यांच्या पाल्यासाठी शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणार काय? त्यांच्या द्वितीय सत्र परीक्षेबाबत काय? त्यांच्या शैक्षणिक साहित्याची पूर्तता कशी होणार? त्यांच्या शालेय उपस्थितीबाबत निकष कसे लावणार? असे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. फुले-शाहू-आंबेडकरांच्या महाराष्ट्र राज्यात ऊसतोड कामगार मुलांच्या शैक्षणिक हेळसांडीची दखल शासनाने त्वरित घेण्याची गरज आहे. ऊसतोड कामगारांप्रमाणे त्यांची मुलेही शिक्षणापासून वंचित राहू नये असे वाटते.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### मतदान न करणे गुन्हा

मतदान न करणे हा राष्ट्रद्रोह, राष्ट्रीय गुन्हा असावा. कुठेही १०० टक्के मतदान झाले नाही याची कारणमीमांसा व्हायला हवी. सुटी असून ज्यांनी मतदान केले नाही त्यांचा पगार कापावा. कामकरी लोकांना मतदानापुरती सुटी दिली होती. त्यांनी मतदान केले नसेल तर त्यांचे रेशन कार्ड, सरकारी सुविधा बंद कराव्या. काही सुशिक्षित नामवंत लोकांनी मतदान केले नाही. त्यांचे वीज, पाणी दोन दिवस बंद करावे. यावेळी ८५ वर्षांवरील मतदान करणारा घरून मत देऊ शकत होता. सार्वजनिक सुटी होती. ऑनलाईन मतदानाची सोय, जास्त बसेसची सोय होती. वरमायपेक्षा यांची जास्त बडदास्त होती. परंतु मतदार उदासीन होता. त्यांनी अनमोल मताचा अपमान केला त्यांची मीमांसा होऊन कारवाई व्हायलाच हवी.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# राज्याच्या घोषित मतदानात एक टक्क्याची वाढ

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २२ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र २८८ विधानसभा मतदार संघातील निवडणूकीत निवडणूक आयोगाने बुधवारी रात्री उशिरा घोषित केलेल्या मतदानाच्या टप्प्यात आणखी एक टक्क्यांनी वाढ झाली आहे.

आयोगाचे नव्याने जाहीर केलेल्या आकडेवारीत राज्यात एकूण सरासरी ६६.०५ टक्के मतदान झाले आहे.२८८ मतदारसंघांत एकूण ६ कोटी ४० लाख ८८ हजार १९५ मतदारांनी आपला हक्क बजाविला असल्याचे नमूद केले आहे.

राज्यात बुधवारी झालेल्या एक मतदानामध्ये एकूण ३ कोटी ३४ लाख ३७ हजार ५७ पुरूष, ३ कोटी ६ लाख ४९ हजार ३१८ महिला तर १ हजार ८२० इतर मतदारांनी मतदान केले असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. मतदानाची अंतिम आकडेवारी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून प्रकाशित झाली आहे. यात प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतदारांचा समावेश आहे. प्रत्यक्ष मतमोजणी करतांना टपाली मतदानाचा समावेश करण्यात येईल. त्याचप्रमाणे मतदान केंद्राध्यक्षाद्वारे भरण्यात आलेला १७ सी हा प्रत्यक्ष झालेल्या मतदानासंदर्भातील फॉर्म उमेदवारांच्या प्रतिनिधींनाही देण्यात आला असल्याचेही मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत स्पष्ट करण्यात येत आहे

# काँग्रेस महाविकास आघाडी स्पष्ट बहुमतासह सत्ता स्थापन करेल

## रमेश चेन्नीथला यांना विश्वास

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २२ नोव्हेबर-**

विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेचा कौल महाविकास आघाडीलाच मिळेल व स्पष्ट बहुमतासह काँग्रेस महाविकास आघाडी सरकार स्थापन करेल असा विश्वास काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी शुक्रवारी व्यक्त केला आहे.

टिळक भवन येथे पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही महाराष्ट्रातील जनता काँग्रेस व महाविकास आघाडीच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहिली आहे. विधानसभेला जास्त मतदान झाल्याचा फायदाही आघाडीलाच होईल. मविआला स्पष्ट बहुमत मिळत असल्याचे दिसत आहे त्यामुळे त्रिशंकु विधानसभेचा प्रश्न उद्भवत नाही. निवडून आलेल्या आमदारांना काँग्रेस पक्षाने हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था केली आहे का, यावर चेन्नीथला म्हणाले की, काँग्रेसचे आमदार कठीण परिस्थितीतही पक्षासोबत राहिले आहेत त्यामुळे त्यांना हॉटेलमध्ये ठेवण्याची आवश्यकता वाटत नाही.

मुख्यमंत्रीपदावरून आमच्यात कोणताही वाद नाही, निकालानंतर महाविकास आघाडीतील प्रमुख नेते एकत्र बसून त्यावर निर्णय घेतील. असेही चेंन्निथला यांनी एका प्रश्नावर स्पष्ट केले.

# महाराष्ट्रात सत्ता आणण्यासाठी काँग्रेसने तीन निरीक्षक नेमले

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २२ नोव्हेंबर-**

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीची उद्या मतमोजणी असून एक्झिट पोल महायुतीच्या बाजुने आले आहेत. असे असले तरीही मविआ आणि महायुती दोघांनीही बहुमत मिळाले नाही तर जुळवाजुळव करण्यावर लक्ष केंद्रीत केले आहे. दोन्ही बाजुंकडून अपक्ष, लहान पक्षांच्या आमदारांना आपल्याबाजुने करण्यासाठी प्रयत्न सुरु झाले आहेत.

महाराष्ट्रातील व झारखंडमधील राजकीय परिस्थितीवर, काँग्रेसच्या आमदारांवर लक्ष ठेवण्यासाठी काँग्रेसने दोन्ही राज्यांसाठी प्रत्येकी तीन-तीन निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. महाराष्ट्रात नियुक्ती करण्यात आलेल्या तीनपैकी दोन निरीक्षक हे दोन राज्यांचे माजी



मुख्यमंत्री आहेत आणि त्यांनी त्यांच्या राज्यातील सत्ता गमावलेली आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी महाराष्ट्र आणि झारखंडसाठी निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. खरगे यांनी पक्षाचे नेते राजस्थान माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत, छत्तीसगढचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल आणि कर्नाटकचे नेते डॉ. जी. परमेश्वर यांना निरीक्षक बनवण्यात आले आहे. त्याचबरोबर तारिक अन्वर, मल्लू भट्टी विक्रमार्क आणि कृष्णा अल्लावुरु यांना झारखंडसाठी निरीक्षक म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.

# सत्ता स्थापनेसाठीच्या गणितासाठी जुळवाजुळव सुरू

## ▶ महायुती, महाविकास आघाडीचा छोटे पक्ष, अपक्ष उमेदवारांशी संपर्क

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई,दि.२२ नोव्हेंबर-**

संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत जनतेने कोणाला कौल दिला आहे, याचे उत्तर आता अवघ्या काही तासानंतर स्पष्ट होणार आहे. मात्र स्पष्ट बहुमत न मिळाल्यास सत्ता स्थापनेची संधी आपल्या हातातून निघून जाऊ नये, यासाठी सत्ताधारी महायुती व विरोधी महाविकास आघाडीने खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी निवडून येण्याची शक्यता असलेल्या छोटे पक्ष, अपक्ष व नाराज बंडखोर उमेदवारांची संपर्क साधण्यात येत आहे.

महायुतीतील प्रमुख पक्ष भाजपाचे राज्यातील प्रमुख नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर आज दिवसभर त्या अनुषंगाने बैठका व चर्चा भेटीगाठी झाल्या. तर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी हॉटेल ग्रँड हयात येथे बैठक घेऊन निकालानंतर परिस्थिती हाताळण्याबाबतचे नियोजन केले. शनिवारी दुपारी बारा वाजेपर्यंत निवडणुकीचा कौल स्पष्ट झालेला असणार आहे.

राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघासाठी बुधवारी सरासरी ६६ टक्के मतदान झाले आहे. त्याची मतमोजणी उद्या सकाळी आठ वाजता सुरू होणार आहे. सत्ताधारी महायुती की विरोधी महाविकास आघाडीचे सरकार येणार? याबाबत राजकीय नेत्यांकडून वेगवेगळे दावे करण्यात येत आहेत. एक्झिट पोलच्या अंदाजानुसार महायुतीला जास्त जागा तर महाविकास आघाडीला कमी जागा मिळण्याचा अंदाज आहे. मात्र, निकाल समोर आल्यानंतरच कोणाला किती जागा मिळतात? हे स्पष्ट होईल. मात्र मावळत्या विधानसभेचा कालावधी २६ नोव्हेंबर पर्यंतच असल्याने सत्ता



स्थापन करण्यासाठी केवळ दोन दिवसाचा अवधी हाती असणार आहे त्यामुळे बहुमता स्पष्ट बहुमत न मिळाल्यास सर्वाधिक संख्याबळ असणारे आघाडी सत्तेत सत्ता स्थापन करण्यासाठीच दावा राज्यपालाकडे करतील मात्र बहुमत गाठण्यासाठी १४५ आमदारांची साथ असणे आवश्यक असल्याने हे संख्या पूर्ण करण्यासाठी छोटे पक्षी व अपक्ष म्हणून निवडून आलेल्या उमेदवारांची गरज लागू शकते त्यामुळे सत्ताधारी महायुती व विरोधी महाविकास आघाडी कडून आत्तापासूनच संभाव्य विजेते अपक्ष बंडखोर उमेदवार व छोट्या पक्षाचे उमेदवारांची संपर्क साधला जात आहे त्या अनुषंगाने आज मुंबईत दिवसभर राजकारणाचे बैठकीचा सिलसिला चालू होता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निवासस्थान असलेल्या सागर बंगल्यावर आज मनसेचे नेते व शिवडी विधानसभा मतदारसंघातील उमेदवार बाळा नांदगावकर यांनी भेट घेतली नांदगावकर यांना माहितीने पाठिंबा दिला असल्याने त्या ठिकाणी त्यांची ठाकरे गटाचे उमेदवार अजय चौधरी यांच्याशी सरळ सरळ लढत होत आहे त्यामध्ये नांदगावकर बाजी मारण्याची शक्यता वर्तवली जात असून तसे झाल्यास त्यांच्या साथ आपल्याला असावी, यासाठी भाजपाकडून प्रयत्न केले जात आहेत. नांदगावकर यांनीही मनसेचा महायुतीला पाठिंबा असल्याचे जाहीर केले. त्याचबरोबर भाजपाचे कोर कमिटीतील नेत्यांचीही बैठक झाली त्यामध्ये फडणवीस यांनी प्रत्येक नेत्यावर छोटे पक्ष अपक्ष यांच्याशी संपर्क साधण्याबाबत च्या जबाबदारी सोपवली असून उमेदवार विजयी झाल्यानंतर त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याची नियोजन करण्यात आले. तर दुसरीकडे महाविकास आघाडीतील ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत, काँग्रसचे नेते बाळासाहेब थोरात, काँग्रसचे नेते सतेज पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची मुंबईतील ग्रँड हयात हॉटेलमध्ये महत्वाची झाली ऋपडली. या बैठकीत निकालानंतर किती जागा येतात? आणि त्यानंतरची पुढील रणनीती काय असेल? याबाबत चर्चा झाल्याची माहिती सांगितली जात आहे. बैठकीनंतर जयंत पाटील, बाळासाहेब थोरात आणि संजय राऊत यांनी मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांच्याबरोबरही चर्चा केली. त्यामुळे मुंबईत नेमकं काय घडतंय? याकडे अनेकांच्या नजरा लागलेल्या आहेत. यासंदर्भात बाळासाहेब थोरात यांनी बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधत महाविकास आघाडीचं सरकार नक्कीच येईल, असा दावा करत महायुतीचं सरकार सत्तेवरून घालवण्याला आम्ही पहिले प्रधान्य देत असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले ,आम्ही २८८ जागाचा आढावा घेतला. तेव्हा आमच्या लक्षात आलं की महाविकास आघाडीचं सरकार बनेल. महाविकास आघाडीचं सरकार नक्कीच येईल, आम्हाला कोणतीही अडचण येणार नाही. . आम्हाला बहुमतापेक्षा कमी जागा येतील असे वाटत नाही. त्यानंतर आमच्याबरोबर कणी आले तर आनंदच मानतो. आता आधी निवडणूक झालेली आहे. मग निकाल समोर येईल. मग सरकार बनवताना आम्ही मुख्यमंत्रिपदाबाबत चर्चा करू. महायुतीचं सरकार सत्तेवरून घालवणं याला पहिलं प्रधान्य आम्ही देतो'', आमचा कोणीही आमदार फुटणार नाही. आमचा आकडा चांगला आल्यानंतर आम्ही सत्तास्थापनेचा दावा करणार आणि सरकार बनवणार. आजच्या बैठकीत एक ठरले की, मतमोजणीच्यावेळी शेवटचे मत मोजून झाल्यानंतर प्रमाणपत्र घेतल्यानंतर बाहेर पडायचे. त्याआधी कोणीही बाहेर यायचे नाही, असेही त्यांनी सांगितले.

# मतमोजणीचा फॉर्म १७ सी भाग दोन, फेरीनिहाय तक्ता, अंतिम निकालाची प्रत त्वरित मिळावी

## ● काँग्रेसची निवडणूक आयोगाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २२ नोव्हेंबर-**

मतदान मोजणीदिवशीचा फार्म १७ सी भाग दोन, फेरीनिहाय तक्ता (परिशिष्ट-५७) व अंतिम निकाल (फार्म-२०) पडताळणीसाठी याची प्रत उमेदवार प्रतिनिधीला त्वरित देण्यात द्यावी ,अशा सूचना सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना द्याव्यात, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे केली आहे.



त्याबाबत त्यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, निष्पक्ष व पारदर्शक निवडणुकीसाठी लोकप्रतिनिधी कायद्याच्या तरतुदी अन्वये मतमोजणी टेबलवर फेरीनिहाय मतमोजणी झाल्यावर फार्म १७ सी मोजणी प्रतिनिधीची सही घेवून मोजणी पर्यवेक्षक निवडणूक निर्णय अधिकारी यांना देतो. त्या अगोदर त्याची दुय्यम प्रत मोजणी प्रतिनिधी यास किंवा उमेदवार प्रतिनिधी यास त्वरित देण्यात यावी. तसेच फेरीनिहाय तक्ता हा फार्म १७ सी भाग २ वरून सहायक निवडणूक अधिकारी तयार करतो तो परिशिष्ट ५७ च्या तक्त्याची दुय्यम प्रत उमेदवार प्रतिनिधीला त्वरित देण्यात यावी. ही कायदेशीर तरतूद असून या द्वारे मतमोजणी प्रक्रिया पारदर्शक आहे हे समजून येईल.

माताचे संकलन फॉर्म २० मध्ये काटेकोरपणे झाले आहे की नाही हे उमेदवार प्रतिनिधीला प्राप्त फार्म १७ सी भाग २ तसेच फेरीनिहाय तक्त्यावरून होवू शकते. या कायदेसंमत बाबी ध्यानात घेवून संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना आपल्या स्तरावर या प्रक्रियेची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सुचना द्याव्यात, अशी मागणी पटोले यांनी केली आहे.

# छोटे पक्षच किंगमेकर ठरणार : जानकर

## पाठिंबा हवा असल्यास मंत्रिमंडळात सामील करण्याची दोन्ही आघाड्यांसमोर अट

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २२ नोव्हेंबर-**

विधानसभा निवडणुकीचा निकाल शनिवारी (दि.२२) जाहीर होणार आहे. या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागलेले आहे. सत्ता स्थापन करण्यासाठी राजकीय पक्षांकडून संख्याबळाची जमवाजमव केली जात आहे. यंदाच्या निवडणुकीत छोटे पक्ष आणि अपक्षांना महत्व राहणार आहे. अशात राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांनी छोटे पक्षच किंगमेकर ठरणार असल्याचे म्हटले आहे. तसेच रासपचा पाठिंबा हवा असल्यास मंत्रिमंडळात सामील करावे, अशी अट देखील महायुती आणि महाविकास आघाडीसमोर ठेवली आहे.

जानकर म्हणाले की, महाराष्ट्रातील तमाम मतदार बंधू-भगिनींचे आभार मानतो. लोकशाहीच्या उत्सवामध्ये मतदारांचा टक्का वाढल्यामुळे अभिनंदन करतो. हा वाढलेल्या टक्क्यामुळे परिवर्तन होण्याची शक्यता असू शकते. मागील विधानसभा निवडणुकीत एक आणि वरच्या सभागृहात एक असे आमचे दोन आमदार होते. पण आता आमचे दोनाचे चार, चाराचे सहा होतील. जनतेचा कौल शेवटी, त्यांच्या हातात आहे. राष्ट्रीय समाज पक्षाला चांगले यश मिळेल, असा मला विश्वास आहे.

### आम्ही छोटे पक्ष किंगमेकर ठरू

कोणासोबत जाणार यावर बोलताना जानकर म्हणाले, मेजॉरिटी महाविकास आघाडी किंवा महायुतीला असेल तर आमचा कोणाला विरोध असेल असे नाही.आम्ही दोघांसोबतही जायला तयार आहोत. सध्या ५०-५० टक्के दोघांची शक्यता आहे. आम्ही महायुती किंवा महाविकास आघाडी बरोबर नाही. आम्ही छोटे पक्ष असल्यामुळे किंगमेकरची भूमिका निभावणार आहोत.

### महादेव जानकरांच्या अटी काय?

महादेव जानकर म्हणाले की, आम्हाला महाविकास आघाडी किंवा महायुतीकडून कोणाचे निमंत्रण किंवा फोन आलेला नाही आणि आम्ही बिन बुलाय कोणाकडे जाणार नाही. आम्हाला मंत्रिमंडळात भागीदारी पाहिजे. आमची इच्छा आहे, आमचे जर १२ आमदार आले तर १२ चे १२ कॅबिनेट मंत्री झाले पाहिजे. आणि जर दोघांना वाटले तर मुख्यमंत्रीपण आमचा पक्षाचा झाला पाहिजे. त्यांनी हे मान्य केले, तर आम्ही त्यांचे स्वागत करू.


## जाहीर प्रसिध्दीकरण

नि.६
दिवाणी न्यायालय अंकीः २२/११/ २०२४
दि.की. अर्ज नं. २७/२०२४

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज.ज्यु.डी. यांचे कोर्टात**

**श्री. सतीश अप्पा शिंदे**
रा. स्वागत नगर, जेऊर रोड, अक्कलकोट -- **अर्जदार**
**श्री. संजय अप्पा शिंदे**
रा. स्वागत नगर, जेऊर रोड, अक्कलकोट

**विरुध्द**

**कोणीही नाही** -- **सामनेवाले**

ज्या अर्थी वरील अर्जदारानी या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. २७/२०२४ हा इंडियन सक्सेशन ॲक्टचे कलम ३७२ प्रमाणे दाखल केला असून अर्जदारांची आई कै. सुधाताई अप्पा शिंदे ह्या दि. २२/०१/२०२४ रोजी मयत झाल्या आहेत. अर्जदार हेच कै. सुधाताई अप्पा शिंदे यांचे कायदेशीर वारस असल्याने तसा वारसा दाखला मिळणेकामी अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे कै. सुधाताई अप्पा शिंदे यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हा जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक २१/१२/२०२४ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

हा जाहीर प्रसिध्दकरण प्रसिध्द केले. ता. २२/११/२०२४

**सही/-क.लि**
आज रोजी मे. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या सहीने प्रसिध्द केले.

शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी फौजदारी न्यायालय**
**सोलापूर**


# २९ वी तत्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमाला २४ नोव्हेंबरपासून

## विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठातर्फे आयोजन

**पुणे, दि.२१ नोव्हेंबर-**

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत आणि संत श्री ज्ञानेश्वर-संत श्री तुकाराम महाराज स्मृती व्याख्यानमाला न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने, युनेस्को अध्यासना अंतर्गत २४ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत २९वी तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या संतश्री ज्ञानेश्वर सभागृह, कोथरूड, पुणे येथे संपन्न होईल.

याचे उद्घाटन २४ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वा. उज्जैनचे आध्यात्मिक गुरू व लेखक पंडित विजयशंकर मेहता व संत एकनाथ महाराजांचे १४ वे वंशज ह.भ.प.श्री. योगीराज महाराज गोसावी पैठणकर यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न होणार आहे. जगविख्यात संगणक शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर हे सन्माननीय पाहुणे असतील. अध्यक्षस्थानी एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष व युनेस्को अध्यासनाचे प्रमुख प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड असतील. तसेच एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्यकारी अध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड व एमआयटी एडीटीचे कार्याध्यक्ष डॉ. मंगेश तु. कराड उपस्थित राहतील.

व्याख्यानमालेचा समारोप ३० नोव्हेंबर रोजी स. ११ वा.नवी दिल्ली



Philosopher Saint
Shree Dnyaneshwara

येथील मौलाना आझाद नॅशनल उर्दु विद्यापीठाचे माजी कुलगुरू मा. फिरोज बख्त अहमद यांच्या प्रमुख उपस्थित होईल. यावेळी एअर मार्शल भूषण गोखले, (सेवा निवृत्त) व्हीएसएम, एव्हीएसए, पीव्हीएसएम हे विशेष अतिथि म्हणून उपस्थित राहतील.

२५ ते २९ नोव्हेंबर या कालावधीत दुपारी ४ वा. होणाऱ्या व्याख्यानमालेत वैश्विक स्तरावरील बनारस हिंदू विश्वविद्यालयाचे महामहोपाध्याय प्रा. सदाशिव द्विवेदी, (भारतीय ज्ञान परंपरा व विश्वशांती) व आयआयएसईआर चे प्राध्यापक प्रा.डॉ. रामकृष्ण भट (विज्ञान, अध्यात्म आणि धार्मिक ग्रंथांचे संघटन), मुंबई विद्यापीठाचे



Philosopher Jagadguru
Saint Shree Tukaram

माजी कुलगुरू डॉ. संजय देशमुख (विज्ञान आणि आध्यात्माचा सुसंवादः जागतिक शांततेसाठी आयकेएस आणि एनईपी २०२० चा मार्ग उजळणे), माजी मुख्य वनसंरक्षक व हभप रंगनाथ नाईकडे, सुप्रसिध्द अभिनेते श्री. सुरेंद्र पाल (द्रोणाचार्य - धर्म, नीती आणि कर्तव्य यांच्यातील संघर्षाचे प्रतिक) आणि यूजीसीचे माजी उप संचालक डॉ.भूषण पटवर्धन (जीनोम ते ओम) अशा अनेक मान्यवरांची व्याख्याने होणार आहेत.

या व्याख्यानमालेला जोडूनच रोज स. ८.४५ ते १२.०० पर्यंत कार्यशाळा होईल. यामध्ये प्रसिद्ध गप्पाष्टककार डॉ. संजय उपाध्ये, प्रसिद्ध लेखक डॉ. ज्ञानश्री लेले, रामकृष्ण मिशनचे सचिव स्वामी आर्यानंद, प्रसिद्ध संशोधक डॉ. निलेश ओक, वरिष्ठ अभियंता विष्णू भिसे, शिवम फाउंडेशनचे संस्थापक आचार्य श्री शिवम, भारत सरकारच्या संगीत नाट्य अकादमीचे माजी अध्यक्ष पद्मश्री शेखर सेन, प्रा.डॉ. अक्षय मल्होत्रा, डॉ. श्रुती निरगुडकर, डॉ. ज्ञानदेव निलवर्णा, संकल्प संघई, प्रसिद्ध हदय रोग तज्ञ डॉ. जगदीश हिरेमठ, आणि शिव व्याख्याते नितिन बालगुडे इत्यादी विविध विषयांवर व्याख्यानांची विशेष कार्यशाळाही आयोजित केली आहे. प्रत्येक व्याख्यानानंतर वक्ता व श्रोते यांच्यामधील प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम या व्याख्यानमालांचे वैशिष्ट्ये आहे. विशेष म्हणजे या मध्ये २५ ते २९ नोव्हेंबर पर्यंत माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठ संकुलातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी स. ७ ते ८ या वेळात योगासन वर्गाचे आयोजन क्रीडा विभागाचे संचालक प्रा.डॉ. पी. जी. धनवे यांच्या मार्गदर्शनाखाली होईल.

अशी माहिती एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे सल्लागार डॉ. संजय उपाध्ये, कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस, २९ व्या तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमालेचे समन्वयक व प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, प्रा. मिलिंद पात्रे यांनी दिली. ही व्याख्यानमाला सर्वांसाठी खुली ठेवण्यात आली आहे.


Classifieds

**पाहिजेत**
**डॉक्टरांच्या घरी, घरगुती कामासाठी गरीब होतकरु अनुभवी ड्रायव्हर पाहिजे.**
**भेटण्याची वेळः- ९-५/६**
**फोन नं : ७०२०१४८४२६**
**८६५२७५१९०२**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र. ७२/२०२४
पुढील नेमलेली तारीख : ०४/०१/२०२५
निशान क्र. ५

**बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु.डि. साहेब यांचे कोर्टात**

१) श्रीमती सुनिता राजगोपाल सोमाणी,
वय- ५४ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. मोती निवास, आगळगांव रोड,
सुभाष नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) सिध्दांत राजगोपाल सोमाणी, -- **अर्जदार**
वय- २९ वर्षे, धंदा- व्यापार, रा. सदर ह.मु. अमेरिका
३) सौ. शरयु हर्ष जाजु,
वय- ३२ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. १२२, विष्णुकांतम, सरदार पटेल कॉलनी,
उस्मानपुराजवळ, अहमदाबाद, गुजरात

**विरुध्द**

कोणीही नाही -- **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील राजगोपाल नंदकिशोर सोमाणी हे दि. २९/५/२०२४ रोजी मयत झालेले आहे. तद्पश्चात कै. राजगोपाल नंदकिशोर सोमाणी यांचे अर्जदार क्र. १ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ३ यांनी राजगोपाल नंदकिशोर सोमाणी यांचे कायदेशीर वारस असलेबाबत मे. सि. ज. ज्यु. डि. साहेब, बार्शी यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाची कसलीही हरकत तक्रार असल्यास त्यांनी सदर प्रकरणात प्रसिध्दीपासून ३० दिवसाच्या आत किंवा पुढील नेमलेल्या ०४/०१/२०२५ या तारखेस न्यायालयात हजर राहुन कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची कसलीही हरकत नाही, असे समजून सदर प्रकरणी न्यायालय पुढील योग्य ते निर्णय पारीत करतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे. दि.२२/११/२०२४.

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**कनिष्ठ स्तर, बार्शी**

शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**कनिष्ठ स्तर, बार्शी**

## महत्त्वाचे

### ओम धारव कोलकाता फुटबॉल संघात



**यवतमाळ :** मूळचा यवतमाळ व सध्या कोलकाता येथे वास्तव्यास असलेला राष्ट्रीय फुटबॉल खेळाडू ओम राजेश धारव याची नुकतीच फुटबॉल या खेळाचे माहेरघर असलेल्या बंगालमधील कोलकाता विद्यापीठ फुटबॉल संघात 'राईट विंगर' या पोझिशनसाठी निवड झाली आहे. ओमच्या या यशाने यवतमाळचे फुटबॉल प्रशिक्षक व खेळाडूंनी त्याचे कौतुक केले आहे. ओम धारवला कोलकाता येथील फुटबॉल प्रशिक्षक अनुप नाग व भारतीय फुटबॉल संघाचा माजी उपकर्णधार तसेच मोहन बागान संघाचा कर्णधार प्रीतम कोटला यांचे मार्गदर्शन मिळत आहे. ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशन अंतर्गत मंडी, हिमाचल प्रदेश येथे आयोजित डॉ. बी. सी. रॉय या अतिशय प्रतिष्ठेच्या 'नॅशनल टुर्नामेंट चॅम्पियन २०२०'मध्ये महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व ओमने केले होते. अप्रतिम खेळाच्या जोरावर महाराष्ट्र संघाने प्रथमच ट्रॉफी जिंकून सुवर्णपदक पटकावले होते. ओम आपल्या यशाचे श्रेय फुटबॉल महर्षी हरिहर मिश्रा, जिल्हा फुटबॉल संघटनेचे सुशील दीक्षित, प्रीतम शहाडे, अक्षय शहाडे, रवी मेश्राम, श्याम तायवाडे यांना देतो.

# पहिल्या दिवशी गोलंदाजांचे वर्चस्व, १७ बळी

- भारत सर्वबाद १५०, ऑस्ट्रेलिया ७ बाद ६७
- जोश हेझलवूड, जसप्रीत बुमराहचे प्रत्येकी ४ बळी

◆ **पर्थ, २२ नोव्हेंबर**

बॉर्ड-गावस्कर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला शुक्रवारपासून येथे प्रारंभ झाला असून पहिल्या कसोटी सामन्याचा पहिला दिवस गोलंदाजांनी गाजवला. ऑप्टस स्टेडियमवर अनुकूल परिस्थितीत दोन्ही संघांतील वेगवान गोलंदाजांनी वर्चस्व गाजवले. सामन्याच्या पहिल्याच दिवशी १७ बळींची नोंद झाली. जोश हेझलवूडच्या (२९ धावांत ४ बळी) प्रभावी गोलंदाजीच्या बळावर ऑस्ट्रेलियाने भारताला १५० धावांत गुंडाळले, तर प्रत्युत्तरात हंगामी कर्णधार जसप्रीत बुमराहने १७ धावांत टिपलेल्या ४ बळींच्या बळावर भारताने पहिल्या दिवस अखेर ऑस्ट्रेलियाची ७ बाद ६७ धावा अशी स्थिती करून टाकली.

बुमराहने आपल्या १० षटकांत १७ धावा देत ४ गडी टिपण्याची उल्लेखनीय कामगिरी केली व ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजीची पहिली फळी उद्ध्वस्त केली. त्याने तिसऱ्या षटकांत नवोदित नॅथन मॅकस्विनीला १० धावांवर बाद केले आणि उस्मान ख्वाजा व स्टीव्ह स्मिथला सातव्या षटकात चेंडू टाकून पहिल्या कसोटी सामन्याला वेगवान वळण दिले.



स्टीव्ह स्मिथ बाद झाल्याची अपील करताना जसप्रीत बुमराह



देवदत्त पडिक्कलला बाद केल्यानंतर जोश हेझलवूडचे कौतुक करताना ऑस्ट्रेलियन खेळाडू

भारतीय संघाचा हंगामी कर्णधार जसप्रीत बुमराहने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु ते अपेक्षेनुसार फलंदाजी करणत अपयशी ठरले. भारताने सकाळच्या पहिल्या सत्रात उपहारापर्यंत २५ षटकांत अवघ्या ५१ धावांत चार महत्त्वापूर्ण मोहरे गमावले. यशस्वी जयस्वाल व देवदत्त पडिक्कल भोपळा न फोडताच तंबूत परतले. मिचेल स्टार्कने जयस्वालला, तर हेझलवूडने देवदत्तला बाद केले. पुढे विराट कोहली पाच धावा काढून हेझलवूडच्या गोलंदाजीला बळी पडला. २६ धावा काढणारा केएल राहुल याला मिचेल स्टार्कने ॲलेक्स कॅरीकडे झेल सोपवण्यास भाग पाडले.

नंतर ऋषभ पंत, ध्रुव ज्युरेल व नितीश कुमार रेड्डीने ऑस्ट्रेलियन गोलंदाजांचा धैर्याने सामना केला व संघाची धावसंख्या वाढवण्याचा प्रत्न केला, परंतु इतर फलंदाज एक अंकी धावसंख्येवरच बाद झाले. या बरोबरच भारताचा पहिला डाव ४९.४ षटकांत १५० धावांतच आटोपला. पंतने ७८ चेंडूंत ३ चौकार व एका षट्कारसह ३७ धावांचे, ज्युरेलने २० चेंडूंत २ चौकारांसह ११ धावांचे, तर नितीश कुमार रेड्डीने ५९ चेंडूंत ६ चौकार व एका षट्कासह ४१ धावांचे योगदान दिले. ऑस्ट्रेलियाकडून हेझलवूडने ४ बळी, तर मिचेल स्टार्क, पॅट कमिन्स व मिचेल मार्शने प्रत्येकी २ बळी टिपलेत.

प्रत्युत्तर देताना ऑस्ट्रेलियाची दाणादाण उडाली व दिवस अखेरपर्यंत त्यांची ७ बाद ६७ धावा अशी दयनीय स्थिती झाली. बुमराहने तोडीस तोड गोलंदाजी करत ऑस्ट्रेलियाच्या चार फलंदाजांना बाद केले. मोहम्मद सिराज व हर्षित राणानेसुद्धा प्रभावी मारा केला. सिराजने १७ धावांत २ बळी, तर राणाने ३३ धावांत एक बळी टिपला ऑस्ट्रेलियाकडून ॲलेक्स केरीने तेवढ्या सर्वाधिक नाबाद १९ धावा केल्या. ट्रॅव्हिस हेडने ११, तर नॅथन मॅकस्वीनीने १० धावांची भर घातली. (वृत्तसंस्था)

# जेद्दाह येथे आयपीएल लिलाव आजपासून

◆ **नवी दिल्ली, २२ नोव्हेंबर**

सौदी अरबमधील जेद्दाह येथे २३ व २४ नोव्हेंबर रोजी भव्य आयपीएल लिलाव आयोजित करण्यात आला आहे. भारताच्या बाहेर आयपीएल लिलाव होण्याची ही दुसरी वेळ असून यापूर्वी मागीललिलाव दुबईमध्ये घेण्यात आला होता. दोन दिवसीय हा लिलाव शनिवारी दुपारी १२.३० वाजतापासून सुरू होईल व रविवारी दुपारी ३.०० वाजता सुरू होईल.

या आयपीएल २०२२५ मेगा लिलावासाठी सुरुवातीला एकूण १५७४ खेळाडूंनी नोंदणी केली, परंतु ही संख्या ५७४ खेळाडूंवर कमी करण्यात आली आहे, ज्यात ३६६ भारतीय, २०८ परदेशी खेळाडू आणि सहयोगी राष्ट्राचे तीन खेळाडू आहेत.

या आयपीएल लिलावात एकूण २०४ जागा उपलब्ध आहेत, यात परदेशी खेळाडूंसाठी ७० जागा राखीव आहेत.

आयपीएल २०२५ लिलावात जोस बटलर, श्रेयस अय्यर, ऋषभ पंत, कॅगिसो रबाडा, अर्शदीप सिंग, मिशेल स्टार्क, युझवेंद्र चहल, लियाम लिव्हिंगस्टोन, डेव्हिड मिलर, केएल राहुल, मोहम्मद शमी व मोहम्मद सिराज यांच्यावर प्रामुख्याने मोठी बोली लागणार आहे. (वृत्तसंस्था)

## नितीश रेड्डी, हर्षित राणाचे कसोटी पदार्पण

**पर्थ :** बॉर्डर-गावस्कर करंडक स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी भारताच्या वेगवान गोलंदाज नितीश कुमार रेड्डी व हर्षित राणाने कसोटी पदार्पण केले. आर. अश्विन व विराट कोहलीने अनुक्रमे हर्षित व नितीशला त्यांची पहिली कसोटी कॅप दिली. आपल्या पदार्पणाच्या सामन्यात आपली छाप सोडणारा वेगवान गोलंदाज नितीश कुमार रेड्डी याने आपला आदर्श विराट कोहलीकडून कॅप स्वीकारल्याबद्दल आनंद व्यक्त केला. आज माझे स्वप्न प्रत्यक्ष साकारले गेले. मी नेहमीच भारतीय क्रिकेटसाठी चांगली कामगिरी करण्याचे स्वप्न पाहत होतो, आणि विराट भाऊकडून कॅप स्वीकारणे हा एक विलक्षण क्षण होता. मी क्रिकेट खेळायला सुरुवात केल्यापासून तो माझा आदर्श आहे. त्याच्याकडून कॅप मिळणे हा माझ्यासाठी आनंदाचा क्षण होता, असे २१ वर्षीय नितीश कुमार म्हणाला. रेड्डीने भारतीय डावाला चालना देण्याचा प्रयत्न सुरूच ठेवला आणि ४१ धावांवर उस्मान ख्वाजाकडे झेल देण्याआधी संघाला १५० पर्यंत खेचण्यात यश मिळविले, त्यामुळे तो दिवसांतील भारताचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला.

### प्रीमियर लीग फुटबॉल हंगाम १६ ऑगस्टपासून

**लंडन :** आगामी प्रीमियर लीग फुटबॉल हंगाम १६ ऑगस्ट २०२५ पासून प्रारंभ होणार असून अंतिम फेरीचा सामा २४ मे २०२६ रोजी खेळली जाणार आहे, असे लीगने शुक्रवारी जाहीर केले. ३८ फेऱ्यांपैकी ३३ सामने आठवड्याच्या अखेरच्या रविवारी खेळल्या जातील, तर पाच फेऱ्या मिडवीक गेम असतील. पुढील हंगामात नाताळच्या पूर्वसंध्येला कोणतेही सामने होणार नाहीत. २०२३-२४ हंगामात ख्रिसमसच्या पूर्वसंध्येला वॉल्व्हरहॅम्प्टन वॅण्डरर्सशी खेळण्यास भाग पडले होते, त्यामुळे आयोजकांना टीकेचा सामना करावा लागला. या हंगामात २४ डिसेंबर रोजी कोणताही खेळ नियोजित नाही, तर पुढील हंगामाच्या वेळापत्रकात जोडलेल्या लीग व्यस्त उत्सव कालावधीत एकमेकांच्या ६० तासांच्या आत दोन फेऱ्या होणार नाहीत याची खात्री करेल. २०२४-२५ मोहिमेच्या समाप्तीनंतर हंगाम सुरू करण्यास जवळपास तीन महिने शिल्क आहे. क्लब विश्वचषकाच्या वचनबद्धतेमुळे चेल्सी आणि मॅन्चेस्टर सिटीला विश्रांती मिळणार नाही. मॅन्चेस्टर सिटीचे व्यवस्थापक पेप ग्वार्डियेला यांनी गत महिन्यात प्रीमियर लीग हंगामाची सुरुवात दोन आठवड्यांनी पुढे ढकलण्याची विनंती केली होती, जेणेकरून त्यांचे खेळाडू बरे होऊ शकतील परंतु त्यांची विनंती नाकारण्यात आली.

### आशिया चषकासाठी भारतीय कनिष्ठ हॉकी संघ मस्कतकडे

**बंगळुरू :** भारतीय कनिष्ठ गट पुरुष हॉकी संघ शुक्रवारी बंगळुरूहून आपल्या आशिया चषक २०२४ मोहिमेसाठी, मस्कतकडे रवाना झाला आहे. मस्कत, ओमान येथे २६ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर या कालावधीत ही स्पर्धा होणार आहे. भारताने २००४, २००८, २०१३, २०१५ यासह विक्रमी चार वेळा ही स्पर्धा जिंकली आहे. भारताने गतवर्षी अंतिम फेरीत पाकिस्तानचा २-१ असा पराभव केला व विजेतेपद पटकावले. यावेळी या स्पर्धेत १० संघ सहभागी झाले असून भारताला कोरिया, जपान, चीन तैपेई थायलंडसह अ गटामध्ये स्थान देण्यात आले आहे. ब गटातील उर्वरित पाच संघ पाकिस्तान, मलेशिया, बांगलादेश, ओमान आणि चीन आहेत. कर्णधार अमीर अली आणि उपकर्णधार रोहित यांच्या नेतृत्वाखाली भारत २७ नोव्हेंबरला थायलंडविरुद्ध आणि त्यानंतर २८ नोव्हेंबरला जपानविरुद्धच्या लढतीत आपल्या मोहिमेची सुरुवात करेल.

### बहिणीचे स्वप्न पूर्ततेसाठी खो-खोपटू नसरीन शेख सज्ज

**नवी दिल्ली :** आपल्या बहिणीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भारतीय खो-खोपटू नसरीन शेख सज्ज झाली आहे. ती आगामी १३ ते १९ जानेवारी दरम्यान नवी दिल्ली येथे होणाऱ्या खो-खो विश्वचषक स्पर्धेच्या आगामी पहिल्या आवृत्तीसाठी सज्ज झाली आहे. नसरीनच्या बहिणीने खो-खोमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करण्याचे स्वप्न पाहिले होते, परंतु तिच्या कुटुंबाच्या पाठिंब्याच्या अभावामुळे ती ते करू शकली नाही. तिच्या पाठिंब्याने आणि प्रोत्साहनाने खेळ हाती घेतल्याने, नसरीनने चौथ्या आशियाई खो-खो स्पर्धेत भारतीय संघाची कर्णधार म्हणून सुवर्णपदक जिंकून तिच्या बहिणीचे स्वप्न पूर्ण केले. तिच्या खेळातील केवळ दुसरी अर्जुन पुरस्कारप्राप्त नसरीनला आता तिला आपल्या पदकांच्या रांगेत विश्वचषक सुवर्णपदकाची भर टाकायची आहे व आपल्या बहिणीचे स्वप्न पूर्ण करायचे आहे. विश्वचषक स्पर्धेसाठी ती तयार होत असताना नसरीनचा प्रवास इतरांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

# स्कॉट बोलण्डची ऑस्ट्रेलियन पीएम एकादश संघात निवड

◆ **पर्थ, २२ नोव्हेंबर**

आगामी ३० नोव्हेंबरपासून कॅनबेरा येथे सुरू होणाऱ्या भारतीय संघाविरुद्धच्या दोन दिवसीय गुलाबी-चेंडूच्या सामन्यासाठी शुक्रवारी ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधान एकादश संघात कसोटी वेगवान गोलंदाज स्कॉट बोलण्ड याची निवड करण्यात आली. पंतप्रधान एकादश संघाचे नेतृत्व न्यू साऊथ वेल्सचा नवोदित अष्टपैलू जॅक एडवर्ड्स करणार आहे.

दुसऱ्या मुलाच्या जन्मामुळे शुक्रवारी येथे सुरू झालेल्या बॉर्डर-गावस्कर करंडक स्पर्धेच्या पहिल्या कसोटीला मुकलेला भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा मनुका ओव्हल येथे पंतप्रधान एकादशविरुद्धच्या दोन दिवसीय सामन्यात सहभागी होण्याची शक्यता आहे. हा सामना भारतासाठी महत्त्वाची तयारी म्हणून काम करेल, कारण ॲडलेडमध्ये ६ डिसेंबरपासून सुरू होणारी दुसरा कसोटी सामना सुमारे तीन वर्षांतील पहिलाच गुलाबी-चेंडूचा कसोटी सामना असेल. येथील पहिल्या कसोटीसाठी बोलण्ड ऑस्ट्रेलियाच्या संघात आहे व कॅनबेरा येथे चांगल्या प्रदर्शनासह ॲडलेडमध्ये गुलाबी-चेंडूच्या दुसऱ्या कसोटीसाठी ऑस्ट्रेलियाच्या अंतिम एकादशमध्ये स्थान मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे. तो १४ खेळाडूंच्या पंतप्रधान एकादश संघातील सर्वात अनुभवी खेळाडू आहे.

आम्ही कसोटी संघाचा एक भाग म्हणून स्कॉट बोलण्डचा त्याच्या तयारीसाठी संधीचा उपयोग करत आहोत, असे निवड प्रमुख जॉर्ज बेली यांनी सांगितले.

आम्ही पंतप्रधान एकादशमध्ये देशातील काही सर्वात रोमांचक युवा क्रिकेटपटू व अत्यंत अनुभवी खेळाडूंचे मिश्रण आहे.



स्कॉट बोलंड

पंतप्रधान एकादशमध्ये गतवर्षीचे १९ वर्षांखालील विश्वचषक विजेत्या संघातील सॅम कोन्सास, महली बियर्डमन, चार्ली अँडरसन व ओ'कॉनर या खेळाडूंचासुद्धा समावेश करण्यात आला आहे. माजी कसोटी सलामीवीर मॅथ्यू रेनशॉला ऑस्ट्रेलिया अ सामन्यांमधून वगळण्यात आले होते, तर मधल्या फळीतील उदयोन्मुख फलंदाज ऑली डेव्हिसचाही समावेश होता.

पंतप्रधान एकादशचा ऑस्ट्रेलियन क्रिकेटमध्ये समृद्ध इतिहास आहे आणि या उन्हाळ्यात भारताविरुद्धच्या सामन्यासाठी संघ निश्चित करताना मला आनंद होत आहे, असे पंतप्रधान ॲन्थनी ॲल्बानीज म्हणाले.

विराट, जसप्रीत बुमराह आणि ऋषभ पंत यांसारख्या जागतिक क्रिकेटमधील सर्वोत्कृष्ट संघांपैकी एक असलेल्या भारताचा सामना करणे, संघासाठी एक आश्चर्यकारक अनुभव असेल, असेही ते म्हणाले.

**ऑस्ट्रेलियन पंतप्रधान एकादश संघ :** जॅक एडवर्ड्स (कर्णधार), चार्ली ॲण्डरसन, महली बियर्डमन, स्कॉट बोलँड, जॅक क्लेटन, एडन ओ'कॉनर, ऑली डेव्हिस, जेडेन सॅम हार्पर, हॅनो जेकब्स, सॅम कोन्स्टास, लॉयड पोप, मॅथ्यू रेनशॉ, जेम रायन. (वृत्तसंस्था)

## टीव्ही अम्पायरकडे पुरेशी व्यवस्था नव्हती : मांजरेकर

◆ **पर्थ, २२ नोव्हेंबर**

पर्थ येथे सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटीच्या पहिल्या दिवशी भारताचा सलामीवीर केएल राहुल बाद झाल्याचा निर्णय पुनरावलोकन प्रणालीच्या (डीआरएस) वापर करून देण्यात आला, परंतु हा निर्णय देताना तिसरा पंच म्हणजे टीव्ही अम्पायरकडे महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यासाठी पुरेशी व्यवस्था नव्हती, असे भारताचे माजी क्रिकेटपटू संजय मांजरेकर यांनी म्हटले आहे. त्यांनी तंत्रज्ञानाच्या वापरावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

भारताने फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर उपहाराच्या आधी ही घटना घडली, त्यावेळी भारताची स्थिती ४ बाद ४७ धावा अशी झाली.

२६ धावांच्या ७४ चेंडूंच्या खेळीत प्रचंड संयम दाखवणाऱ्या राहुलला ऑस्ट्रेलियाने रिव्ह्यू घेण्याचा निर्णय घेतल्यावर मिचेल स्टार्कच्या चेंडूवर झेलबाद केले. मैदानावरील पंच रिचर्ड यांनी सुरुवातीला त्याला नाबाद दिले होते. तथापि, थर्ड अंपायर रिचर्ड इलिंगवर्थ यांनी स्निकोच्या आधारे निर्णय रद्द केला, ज्यात चेंडू राहुलच्या बॅटमधून गेल्याचे दिसून आले. हताश झालेला राहुल डोके हलवत निघून गेला. आवाज चेंडूला नव्हे तर बॅटने पॅडला आदळल्याने झाला होता. (वृत्तसंस्था)

# आगामी आयपीएलची धूमशान १४ मार्चपासून

### बीसीसीआयने जाहीर केले


◆ **नवी दिल्ली, २२ नोव्हेंबर**

पुढील वर्षीचा इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) हंगाम १४ मार्च ते २५ मे २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे, असे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आयपीएल फ्रॅन्चायझींना सांगितले आहे, तसेच २०२६ आणि २०२७ च्या आवृत्त्यांसाठीसुद्धा तारखा निश्चित करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले आहे.

बीसीसीआयने रविवारी जेद्दाह येथे होणाऱ्या दोन दिवसीय मेगा खेळाडूंच्या लिलावात दुखापतग्रस्त इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चर, भारतीय वंशाचा अमेरिकन वेगवान गोलंदाज सौरभ नेत्रावळकर आणि मुंबईचा यष्टिरक्षक-फलंदाज हार्दिक तामोरे आदिंचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

आयपीएल लिलावाच्या नियोजनात फ्रॅन्चायझींना मदत करण्यासाठी पुढील तीन हंगामांच्या तारखा एकाच वेळी सामायिक केल्या जात आहेत, असे बीसीसीआयने म्हटले आहे.

स्पर्धेची २०२६ आवृत्ती १५ मार्चपासून सुरू होईल आणि ३१ मे रोजी ग्रॅण्ड फिनालेचे आयोजन करण्यात येणार आहे. २०२७ आवृत्ती पुन्हा एकदा १४ मार्च रोजी सुरू होईल व ३० मे रोजी अंतिम सामना होईल.



**पुढील ३ हंगामांसाठीचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| आयपीएल २०२५ | : | १४ मार्च ते २५ मे |
| आयपीएल २०२६ | : | १५ मार्च ते ३१ मे |
| आयपीएल २०२७ | : | १४ मार्च ते ३० मे |

तिन्ही अंतिम फेरीचे सामने रविवारी होतील. आयपीएलचे सामने दीड आठवडे चालतील याची खात्री करण्यासाठी बीसीसीआयने सामन्यांची संख्या वाढवण्याची योजना आखली होती आणि शिल्लक ठेवलेल्या तारखा लक्षात घेता साखळी सामन्यांची संख्या वाढेल असे दिसते.

आर्चर यावर्षी आयपीएलमध्ये सहभागी झाला नाही आणि कोपरच्या दुखापतीमुळे तो २०२३ च्या आवृत्तीत खेळला नाही.

सौरभ नेत्रावळकर हा या वर्षाच्या सुरुवातीला यूएसए टी-२० विश्वचषकातील ब्रेकआउट स्टार्सपैकी एक होता. त्याने प्रभावी कामगिरी केली होती व त्याची संघाला सुपर ८ मध्ये प्रवेश करण्यास मदत झाली होती.

भारताचा माजी १९ वर्षाखालील खेळाडू नेत्रावळकर रणजी करंडक स्पर्धेतही मुंबईमध्ये आला होता. तो संगणक अभियांत्रिकी करण्यासाठी अमेरिकेला स्थलांतरित झाला आणि सध्या तो ओरॅकलमध्ये नोकरीला आहे.

उन्मुक्त चंदचा हा दुसरा भारत-अमेरिकन खेळाडू असून त्याला छाटणी केलेल्या लिलाव यादीतून वगळण्यात आले. कारण तो नंतरच्या टी-२० विश्वचषकातील अमेरिकन संघाचा भाग नव्हता. (वृत्तसंस्था)

# सय्यद मुश्ताक अली चषक स्पर्धा आजपासून

◆ **नवी दिल्ली, २२ नोव्हेंबर**

एकीककडे जेद्दाह येथे आयपीएल लिलावाला प्रारंभ होणार असताना दुसरीकडे भारतात प्रतिष्ठेच्या सय्यद मुश्ताक अली चषक क्रिकेट स्पर्धेला शनिवारपासून विविध ठिकाणी प्रारंभ होणार आहे. या स्पर्धेत स्टार हार्दिक पांड्या व मोहम्मद शमीसारखे खेळाडू खेळणार आहेत.

हार्दिक पांड्याला मुंबई इंडियन्सने संघात कायम ठेवल्यामुळे त्याला आयपीएल लिलावाची चिंता करण्याची गरज नाही. त्यामुळे हार्दिक बडोद्याच्या जर्सीमध्ये अष्टपैलू खेळाडू म्हणून दिसणे हे बीसीसीआयच्या प्रमुख क्रिकेटपटूंना देशांतर्गत स्पर्धांमध्ये अनिवार्यपणे उपस्थित राहण्याच्या धोरणाशी सुसंगत आहे. बडोद्याला विजेतेपदासाठी मदत करणे हे त्याचे उद्दिष्ट असेल.

पण बंगालसाठी मोहम्मद शमीची खेळी बहुआयामी आहे. अलीकडेच मध्यप्रदेशविरुद्धच्या रणजी करंडक सामन्यात आपल्या राज्यासाठी सात बळी टिपल्यानंतर अनुभवी वेगवान गोलंदाज आपली तंदुरुस्ती अधिक अधोरेखित करण्यासाठी उत्कृष्ट प्रदर्शन करण्यास उत्सुक असेल. गुजरात टायटन्सने करारमुक्त केल्यानंतर ३४ वर्षीय खेळाडूला आयपीएल लिलावात सुद्धा निवडले जाईल.

त्याचप्रमाणे श्रेयस अय्यर (मुंबई) याने आयपीएल २०२४ मध्ये कोलकाता नाईट रायडर्ससाठी जेतेपद पटकावले होते आणि युझवेंद्र चहल (हरयाणा) या स्पर्धेत चांगले प्रयत्न करून आपले आयपीएल सीव्ही वाढवण्याचा प्रयत्न करेल.

तामिळनाडूला एसएमए विजेतेपद मिळवून दिल्यानंतर शाहरुख खानचे मूल्य काही पटींनी वाढले होते. या वर्षी सुद्धा युवा व नवोदित खेळाडूंना लिलावातून मोठी रक्कम आकर्षित करेल अशी आशा आहे. बंगालचा यष्टिरक्षक-फलंदाज अभिषेक पोरेल हा अलीकडेच भारत अ संघाचा ऑस्ट्रेलिया दौऱ्याचा भाग होता. तो तीव्र गतीने धावा करू शकतो व २२ वर्षीय खेळाडूला सुरुवातीच्या फेऱ्यांमध्येच आपले सर्वोत्तम पाऊल पुढे टाकायचे आहे.

कर्नाटकचा अभिनव मनोहरला गुजरात टायटन्सने करारमुक्त केले. अभिनवने अलीकडेच केएससीए महाराजा टी-२० मध्ये तब्बल १९६.५ स्ट्राइक रेटने ८४.५ च्या सरासरीने ५०७ धावा केल्या आणि मधल्या फळीत भरीव योगदान दिले. त्यामुळे तो आपला दावा आणखी मजबूत करण्यासाठी उत्सुक असेल.

राजस्थानचा तरुण मानव सुथार सुद्धा याच श्रेणीत येतो. डावखुरा फिरकी गोलंदाज सुथारने तळाच्या फळीतील एक उत्कृष्ट फलंदाज अशी प्रतिमा तयार केली आहे. (वृत्तसंस्था)

# मोदींनी गयानामध्ये घेतली वेस्ट इंडीजच्या क्रिकेट दिग्गजांची भेट

◆ **जॉर्जटाऊन, २२ नोव्हेंबर**

क्रिकेट हा खेळ भारताला वेस्ट इंडीजशी जोडणारा एक अनोखा बंध आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वेस्ट इंडीजमधील प्रमुख क्रिकेट दिग्गजांशी संवाद साधताना म्हणाले.

पंतप्रधान मोदी यांचे बुधवारी गयाना येथे आगमन झाले. ५० वर्षांहून अधिक काळानंतर भारतीय पंतप्रधानांची ही वेस्ट इंडीजला पहिलीच भेट आहे. शुक्रवारी त्यांनी गयानाचे अध्यक्ष इरफान अली यांच्यासह क्रिकेट क्षेत्रातील मान्यवरांची भेट घेतली. यावेळी वेस्ट इंडीजचे माजी क्रिकेटपटू क्लाईव्ह लॉईड, संघाचा माजी विश्वचषक विजेता कर्णधार, फलंदाज अल्विन कालिचरण व माजी फिरकी गोलंदाज देवेंद्र बिशू यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधला. या भेटीदरम्यानचे छायाचित्र समाजमाध्यमात सामायिक करण्यात आले.



पंतप्रधान मोदी यांच्याशी संवाद साधताना क्लाईव्ह लॉईड व वेस्ट इंडीजचे माजी क्रिकेटपटू

मैत्रीची खेळी! भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व गयानाचे अध्यक्ष इरफान अली यांनी आज जॉर्जटाऊनमध्ये वेस्ट इंडीजमधील प्रमुख क्रिकेट दिग्गजांची भेट घेतली, असे परराष्ट्र मंत्रालयाने एक्सवर एका पोस्टमध्ये म्हटले आहे. क्रिकेट भारताला कॅरिबियनशी जोडते जसे इतर माध्यम नाही! असे त्या छायाचित्राखाली लिहिले आहे.

तीन देशांच्या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यावर पंतप्रधान मोदी गयानामध्ये आहेत.

या भेटीमध्ये नायजेरियाच्या उत्पादक सहलीचा समावेश होता. १७ वर्षांमध्ये भारतीय पंतप्रधानांचा पश्चिम आफ्रिकन देशाचा हा पहिला दौरा होता. नायजेरियातून मोदी जी-२० परिषदेत सहभागी होण्यासाठी ब्राझीलला गेले होते. (वृत्तसंस्था)

# फिडे विश्वविजेतेपदासाठी गुकेश, लिरेन लढणार

◆ **सिंगापूर, २२ नोव्हेंबर**

आगामी २५ नोव्हेंबरपासून सिंगापूरमध्ये सुरू होणाऱ्या फिडे जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद २०२४ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताच्या डी. गुकेशची गाठ गतविजेत्या चीनच्या डिंग लिरेनशी पडणार आहे.

अंतिम सामना सिंगापूरच्या दक्षिणेकडील किनारपट्टीवरील सेंटोसा येथील रिसॉर्ट्स वर्ल्ड येथे होणार आहे. १९७८ मधील बागुइओ नंतर आग्नेय आशियामध्ये विश्व बुद्धिबळ विजेतेपदासाठीचा अंतिम सामना आयोजित करण्याची ही दुसरी वेळ असेल. अंतिम फेरीचा पहिला सामना २५ नोव्हेंबर रोजी होणार असून स्पर्धेचा उद्घाटन समारंभ दोन दिवस आधी होणार आहे. १४वी आणि अंतिम फेरी १२ डिसेंबरला होणार आहे, आवश्यक असल्यास दुसऱ्या दिवशी टायब्रेकसाठी राखीव दिवस ठेवण्यात आला आहे.




विश्वविजेतेपदासाठीच्या इतिहासातील हा पहिला अखिल आशियाई खेळाडूंचा अंतिम सामना आहे. भारत आणि चीन यांच्यातील स्पर्धा पाहणे मनोरंजक असेल. हा एक ऐतिहासिक सामना आहे, कारण १८ वर्षीय गुकेश हा जगातील सर्वात तरुण आव्हानवीर आहे व तो सर्वात तरुण जागतिक विजेता होण्याचीही शक्यता आहे, असे भारतीय ग्रॅण्डमास्टर विश्वनाथन् आनंद म्हणाला. (वृत्तसंस्था)

# मेस्सी, अर्जेंटिना संघ केरळमध्ये खेळण्याची शक्यता

◆ **तिरुवनंतपुरम्, २२ नोव्हेंबर**

लियोनेल मेस्सी व अर्जेंटिना फुटबॉल संघ पुढील वर्षी आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण फुटबॉल सामन्यासाठी केरळला भेट देणार आहेत, या वृत्ताला राज्याच्या क्रीडामंत्र्यांनी पुष्टी दिली.

अर्जेंटिना राष्ट्रीय फुटबॉल संघ आपल्या कर्णधारासह पुढील वर्षी राज्याला भेट देणार आहे व आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण खेळेल अशी अपेक्षा आहे. अब्दुरहिमन यांच्या नेतृत्वाखालील राज्याचे क्रीडा मंत्रालय आणि माद्रिदमध्ये अर्जेंटिना फुटबॉल असोसिएशन यांच्यात गेल्या सप्टेंबरमध्ये झालेल्या चर्चेनंतर हे विधान करण्यात आले. केरळचे मुख्यमंत्री पिनारी विजयन यांनीही फेसबुक पोस्टद्वारे अशीच घोषणा केली आहे.

मेस्सीसह जगातील प्रथम क्रमांकाचा फुटबॉल संघ अर्जेंटिना पुढील वर्षी केरळला भेट देणार आहे. हा सामना राज्य सरकारच्या संपूर्ण देखरेखीखाली होणार आहे. राज्याच्या व्यापाऱ्यांनी सामना आयोजित करण्यासाठी आर्थिक मदत देण्याचे आश्वासन दिले आहे, असे अब्दुरहिमान यांनी पत्रकारांना सांगितले.

पुढील चर्चा करण्यासाठी एएफएचे अधिकारी पुढील दीड महिन्यात केरळला भेट देतील, असे मंत्री म्हणाले. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# युगेंद्र पवार आमदार होणार, महाविकास आघाडीला १६० जागा मिळणार

## जितेंद्र आव्हाडांचा दावा

**मुंबई, दि. २२ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक अनेक कारणांमुळे चांगलीच गाजल्याचे पाहायला मिळाले. मतदानाची प्रक्रिया पार पडली असून, आता संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष २३ नोव्हेंबर रोजी लागणाऱ्या निकालांकडे लागले आहे. मतमोजणीसाठी अवघे काही तास राहिले असताना आता राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग आला आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीतील नेते अनेक दावे-प्रतिदावे केले जात आहेत.

यातच शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी मोठा दावा केला आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे. १६० पेक्षा जास्त जागा येणार आहेत. बारामतीत युगेंद्र पवार निवडून येतील. एक मताने का होईना पण युगेंद्र आमदार होतील, असे आव्हाड म्हणालेत. तसेच भाजपाकडे प्रचंड पैसा आहे, निवडणुकीत त्यांनी कोटींच्या कोटी वाटले, त्यामुळे आताही ते पैसे वाटणार, अपक्ष आमदारांना पैसे देणार, भाजपाला अजून काय येते, असे आव्हाड म्हणाले.

शरद पवार कुठल्याही क्षणी त्यांच्या पक्षातील आमदारांच्या हितासाठी राज्याच्या हिताचा निर्णय घेऊ शकतात, असे मला वाटते. निकालानंतर पवार आपला ट्रॅक बदलू शकतात. पवार हे उद्धव ठाकरे आणि काँग्रेससोबत राहणार नाहीत. शरद पवार महायुतीसोबत हातमिळवणी करु शकतात, असा दावा नारायण राणे यांनी केला. यावर बोलताना, नारायण राणे यांना सल्ला आहे, तुम्ही किती पक्ष बदलले ते बघा, तीन पक्ष बदलेल्या माणसाने शरद पवारांना सांगू नये, तुम्ही तुमचे बघा, असे प्रत्युत्तर आव्हाडांनी दिले.

# संगमेश्वर व केबीपी पंढरपूरचे वर्चस्व

## महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत येथील संगमेश्वर महाविद्यालय व पंढरपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या खेळाडूंनी वर्चस्व प्राप्त केले.

मराठा समाज सेवा मंडळ संचलित छत्रपती शिवाजी नाईट कला वाणिज्य महाविद्यालयाने या स्पर्धेचे आयोजन राजर्षी शाहू सभागृहात केले आहे. या स्पर्धेमध्ये १५० खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

याचे उद्घाटन मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य डॉ एम एस पवार, विद्यापीठाचे क्रीडा संचालक प्रा. डॉ अतुल लकडे, संस्थेचे सचिव प्रा महेश माने, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा सचिन गायकवाड, निवड समिती अध्यक्ष प्रा विजय पवार, सदस्य प्रा डॉ सुभाष मारकड, प्रा आनंद ढवण, प्रा सोनटक्के, आयोजन समिती सदस्य प्रा नंदकिशोर देशपांडे, प्रा डी के देशमुख, प्रा डॉ प्रशांत तांबिले, प्रा बापू मोहीते, पंच प्रमुख ज्ञानेश्वर उत्पात, प्रा गणेश बागल आदी उपस्थित होते. प्रस्ताविक प्रा संतोष गवळी यांनी केले.



### बॉक्सिंग ;जीवनात लढण्याची क्षमता विकसीत करतो : सपाटे

माजी महापौर सपाटे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धामध्ये सातत्याने सहभाग घेतला पाहिजे खेळामुळे मानसिक व शारीरिक क्षमता विकसित होते. बॉक्सिंग हा खेळ जीवनात लढण्याची क्षमता विकसित करतो. जीवन जगत असताना संघर्ष अटळ असतो त्यामुळे संघर्ष करायचा असेल तर लढण्याची क्षमता असली पाहिजे ती बॉक्सिंग या खेळामुळे विकसित होते.

**अंतिम निकाल (प्रथम तीन ) :**

**महिला :** ४५ ते ४८ किलो : समृद्धी मुळे (के बी पी कॉलेज पंढरपूर), श्रावणी सूपाते (छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज), वैष्णवी बस्के (के.एन भिसे कॉलेज, कुर्डवाडी), ४८ ते ५० किलो : श्रुती नगरे (डी एस जी कॉलेज मोहोळ), साक्षी गाडे (के.एन भिसे कॉलेज, कुर्डूवाडी), स्वाती जाधव (बी पी सी एस कॉलेज, अननगर), प्रचिती जोगदंडे (सुशीलकुमार शारीरिक शिक्षण महाविद्यालय). ५२ किलो ते ५४ किलो : शेख सानिया (के. एन. भिसे कॉलेज, कुर्डूवाडी), वैष्णवी ताटे (सोलापूर). ५४ ते ५७ किलो : नगरे कीर्ती (संगमेश्वर कॉलेज) पायल लोकरे (बीएमआयटी सोलापूर). ५७ ते ६० किलो : अपूर्वा गायकवाड (गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोला), अपूर्वा गायकवाड (डी.बी.एफ दयानंद).६० ते ६३ किलो : स्वामिनी डोळसे (कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी) दीक्षा पवार (संगमेश्वर कॉलेज). ६३ ते ६६ किलो : दीपक गलांडे (संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ), शेख महेक, ढोरे समीक्षा (छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज). ६६ ते ७० किलो : निर्जला माळी (के.बी.पी., पंढरपूर), हर्षिता पठारे (छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज). ७० ते ७५ किलो : सृष्टी काळे (पंढरपूर), संस्कृती केशिट्टीवार (एन. बी. नवले सिंहगड कॉलेज). ८१ किलो : सुप्रिया वळवे (संगमेश्वर कॉलेज), वैष्णवी भोसले (संगमेश्वर कॉलेज), वैष्णवी भारती (के. एन. भिसे कॉलेज, कुर्डूवाडी).



सोलापूर : सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदार संघातील मतमोजणीसाठी सिंहगड महाविद्यालयात तयारी पूर्ण झाली आहे.

# देवेंद्र कोठे यांच्या विजयासाठी भाजपा कार्यकर्त्यांकडून श्रीरामाची महाआरती!

## प्रभू श्रीरामाला घातले विजयाचे साकडे

**सोलापूर, दि.२२ नोव्हेंबर -**

विधानसभा निवडणुकीचे भाजपा आणि महायुतीचे उमेदवार देवेंद्र कोठे यांच्या विजयासाठी भाजपा कार्यकर्त्यांनी शुक्रवारी दाजी पेठ येथील श्रीराम मंदिरात महाआरती केली. देवेंद्र कोठे यांच्या रूपाने भाजपचा शहरातील तिसरा आमदार विधानसभेत जावा अशी प्रार्थना प्रभू श्रीरामाकडे करण्यात आली.

यावेळी भाजपाचे माजी शहर अध्यक्ष रामचंद्र जन्नू म्हणाले, भारतीय जनता पार्टी आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम करून भाजपा आणि महायुतीचे उमेदवार देवेंद्र कोठे यांचा प्रचार केला आहे. सर्वांच्या प्रयत्नाला यश यावे आणि देवेंद्र कोठे यांचा विजय व्हावा याकरिता प्रभू श्रीरामांकडे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी साकडे घातले.

यावेळी गुरुशांत धुत्तरगावकर म्हणाले, अत्यंत चुरशीच्या झालेल्या निवडणुकीत भाजपा आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांनी विजयासाठी प्रयत्न केले आहेत. त्यामुळे आमचा विजय निश्चित आहे, याची खात्री आहे. या विजयाकरिता प्रभू श्रीरामांचे आशीर्वाद मिळावेत यासाठी महाआरती करण्यात आली.



याप्रसंगी भाजपाचे माजी शहर अध्यक्ष रामचंद्र जन्नू, नागनाथ सोमा, रवींद्र नक्का, काशिनाथ गड्डम, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, माजी नगरसेवक मेघनाथ येमुल, मधुकर वडनाल, भाजपा शहर चिटणीस नागेश सरगम, बजरंग कुलकर्णी, महिला मंडल अध्यक्ष लक्ष्मी बदलापुरे, दत्तात्रय पोसा, ओबीसी मोर्चा सरचिटणीस श्रीनिवास जोगी, शिक्षक आघाडीचे दत्ता पाटील, विश्वनाथ बदलापुरे, प्रभाकर गोरंटी, राम गड्डम, संतोष चन्ना, विजय महिंद्रकर, अनिल वंगारी, शावरसिद्ध कोंडा, उमेश अंबाल, प्रकाश गाजुल, ज्ञानेश्वर गवते, अभिषेक चिंता, अंबादास साकीनाल, आदीसह भाजपा प्रभाकर क्रमांक नऊ मधील कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विशेष लक्ष केंद्रित करणारी आरोग्य विमा योजना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

मणिपालसिग्ना सर्व या नवीन आरोग्य विमा योजनेची घोषणा करण्यात आली आहे.संपूर्ण आरोग्य विमा उपाय ऑफर करण्यासाठी डिझाइन केलेली,सर्व-ज्याचा अर्थ सर्वांसाठी आहे,भारताच्या मिसिंग मिडल लोकसंख्येवर विशेष लक्ष केंद्रित करून,व्यापक ग्राहक वर्गांसाठी परवडणारे आणि सर्वसमावेशक आरोग्य कव्हरेज प्रदान करते.व्यवस्थापकीय संचालक प्रसून सिकदार यांनी की,मणिपालसिग्नामध्ये आमची वचनबद्धता केवळ आरोग्य विमा ऑफर करणे ही नाही,तर नवनवीन उपाय शोधून भारतातील मिसिंग मिडलसह परवडणारी आरोग्यसेवा सर्वांपर्यंत पोहोचविणे आणि त्यातील अंतर भरून काढणे ही आमची वचनबद्धता आहे.

## निधन वृत्त...

### नरहरी अलाट

**बार्शी, दि. २२ नोव्हेंबर-**



येथील माऊली चौक, अलिपूर रस्ता येथील रहिवाशी व करमाळ्याचे माजी नगरसेवक नरहरी बाबुराव अलाट (वय ७७) यांचे वृद्धापकाळाने शुक्रवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सुना, एक मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. दलित महासंघाचे शहराध्यक्ष संदीप अलाट व ॲड. अमोल अलाट यांचे ते वडील होत.

### दीपक गाडे

**नातेपुते, दि. २२ नोव्हेंबर-**



माळशिरस, सिद्धार्थनगरमधील रहिवाशी दीपक तुकाराम गाडे (वय ५२) यांचे यांचे अल्पशा आजाराने उपचारादरम्यान गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, दोन मुली, नातवंडे, जावई, बहिणी असा परिवार आहे. पत्रकार सुनील ओवाळ यांचे ते ज्येष्ठ मावस बंधू होते.

### कलावती एक्कलदेवी

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**



दाजी पेठेतील कलावती पुंडलिक एक्कलदेवी (वय ८५) यांचे शुक्रवारी २२ नोव्हेंबर रोजी निधन केले. त्यांची अंतयात्रा शनिवारी २३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या निवासस्थानापासून निघणार आहे. माजी परिवहन समिती सदस्य मधुकर एक्कलदेवी यांच्या त्या मातोश्री होत.

### अण्णाप्पा कोकटनूर

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**



अशोक चौक येथील हॉटेल व्यावसायिक अण्णाप्पा अमोगी कोकटनूर यांचे वयाच्या ९४ व्या वर्षी वृद्धापकाळाने गुरुवारी पहाटे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर अक्कलकोट रोड येथील स्मशानभूमी अंत्यसंस्कार करण्यात आले. शिंदे सेनेचे उपजिल्हा प्रमुख सुरेश कोकटनूर यांचे ते वडील होत.

# एक कोटी लिटर इथेनॉलचा करणार पुरवठा

## रोहन परिचारक : युटोपियन शुगर्स इथेनॉल ब्लेंडिग प्रोग्रॅममध्ये सहभागी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २२ नोव्हेंबर-**

कचरेवाडी (ता. मंगळवेढा) येथील युटोपियन शुगर्स लि. कारखान्याच्या या गळीत हंगामातील प्रथम इथेनॉल टँकरचे पुजन कारखान्याचे चेअरमन उमेश परिचारक व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

युटोपियन शुगर्सचा २०२४-२०२५ हा अकरावा गळीत हंगाम नुकताच सुरु झाला आहे. युटोपियन शुगर्सने केंद्र शासनाच्या आवाहनास प्रतीसाद देत राष्ट्रीय स्तरावरील इथेनॉल ब्लेंडिंग प्रोग्रॅममध्ये सहभाग घेतला आहे. त्यानुसार सुमारे १.०० कोटी लिटर इथेनॉलचा पुरवठा हिंदुस्तान पेट्रोलियम, भारत पेट्रोलियम, इंडियन ऑइल या कंपन्यानकडे करण्यात येणार असल्याचा मानस मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक यांनी सांगीतले.



रोहन परिचारक म्हणाले, युटोपियन शुगर्सने मागील दहा हंगामात भरीव कामगिरी केली आहे. चालू गळीत हंगामात ६.०० लाख मे.टन ऊसाचे गाळप करणेचे उद्दिष्ट ठेवले आहे. कारखान्याने पेट्रोलियम कंपन्याकडे १.०० कोटी लिटर इथेनॉल निर्मितीची निविदा भरलेली आहे. पेट्रोलियम कंपन्यांनी कारखान्यास ऊसाच्या रसापासुन ४० लाख लिटर व बी हेवी मोलॅसेस पासून ६० लाख लिटर इथेनॉल निर्मिती व पुरवठा करणेस मान्यता दिलेली आहे. ऊसाच्या रसापासुन इथेनॉल निर्मिती करताना १.३० इतकी रिकव्हरी खर्च होत आहे.

तसेच बी हेवी मोलॅसेस पासून इथेनॉल निर्मिती करताना १.३५ इतकी रिकव्हरी खर्च होत आहे. इथेनॉल विक्रीच्या मिळणाऱ्या रकमेतुन ऊस उत्पादकांना वेळेत ऊस बिल रक्कम अदा करणे पुढील काळात शक्य होणार आहे. यावेळी कारखान्याचे चेअरमन उमेश परिचारक, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक, चिफ फायनान्सियल ऑफीसर दिनेश खांडेकर, जनरल मॅनेजर (टेक.) सुधिर गाढवे, डिस्टलरी मॅनेजर महेश निंबाळकर, मुख्य शेती अधिकारी धनंजय व्यवहारे, चिफ केमिस्ट चंद्रकांत विभुते, सिव्हिल इंजिनिअर अनिल भोसले आदी खातेप्रमुख तसेच राज्य उत्पादन शुल्क विभाग अभिजीत सुर्यवंशी, मनोज सावंत व कामगार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार ईडीपी मॅनेजर अभिजीत यादव यांनी मानले.

# राज्यात २१व्या पशुगणनेस सोमवारपासून सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि.२२ नोव्हेंबर-**

राज्यात एकविसाव्या पशुगणनेस सोमवार २५ नोव्हेंबरपासून आरंभ होणार असून आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत मोबाईल ॲपच्या माध्यमातून ही पशुगणना करण्यात येणार आहे, अशी माहिती पशुसंवर्धन आयुक्तालयाचे सहसंचालक सुषमा जाधव यांनी कळविली आहे.

सर्व पशुपालकांनी पशुगणना करण्यासाठी येणाऱ्या प्रगणकांना आपल्याकडील पशुंची अचूक व योग्य ती माहिती देण्यात यावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे. पशुगणनेच्या माध्यमातून राज्यातील नागरी व ग्रामीण क्षेत्रनिहाय कुटुंब, कौटुंबिक उपक्रम, बिगर-कौटुंबिक उपक्रम आणि संस्था, गोशाळा यांच्याकडे असलेल्या राज्यात आढळणाऱ्या १६ पशुधन प्रजाती व कुक्कुटादी पक्षी यांची जातीनिहाय, वयोगट तसेच लिंगनिहाय आकडेवारी गोळा केली जाणार आहे. ही पशुगणना नोव्हेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत घेण्यात येणार आहे.

पशुपालन ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून देशाच्या तसेच राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये याचे लक्षणीय योगदान आहे. शासनाला नियोजनासाठी पायाभूत सांख्यिकीची आवश्यकता असून ही माहिती गणनेच्या स्वरुपात गोळा केली जाते. पशुधनामध्ये महाराष्ट्र संपन्न राज्य असून देशामध्ये ७ व्या क्रमांकावर आहे. तसेच कुक्कुट व कुक्कुटादी पक्षी यामध्ये ५ व्या क्रमांकावर आहे.

पशुपालन पूरक उत्पन्ननिर्मिती बरोबरच दूध, अंडी व मांस ही पशुधन उत्पादने पोषक आहाराचा महत्त्वाचा स्रोत आहे. देशात १९१९ पासून दर ५ वर्षांनी पशुगणना घेण्यात येत आहे. २०१९ मध्ये २० व्या पशुगणनेमध्ये प्रथमच प्रजाती व ग्रामीण आणि नागरी क्षेत्रनिहाय पशुधनाची आकडेवारी गोळा करण्यात आली.

# देशभक्तीचा अंगार फुलवणारी क्रांतिवीरांची वीरगाथा

**" क्रांतिवीरांची वीरगाथा सादर करतांना माझ्या वाणीतून क्रांतिकारकांचा इतिहास जीवंत उभा करु शकलो नाही, तर एक पैसाही मोबदला घेणार नाही, याउलट आयोजकांना एक हजार रुपये दंड देईलं." आपल्या सादरीकरणातील आत्मविश्वास व्यक्त करतांना एखाद्या सादरकर्त्यांनी हे आव्हान स्विकारावे ,यावरुन तो प्रयोग सादर करतांना तो सादरकर्ता क्रांतिवीरांच्या त्याग,बलिदान व आत्मसमर्पणाशी किती एकरुप होत असेल याची प्रत्येकाला कल्पना यावी.**

सव्वा ते दीड तासाच्या या प्रयोगात १८५७ ते १९४७ या नव्वद वर्षाच्या कालावधीतील मंगल पांडे, वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक, चाफेकर बंधू, बंकीमचंद्र चटर्जी, स्वामी विवेकानंद, खुदीराम बोस, प्रफुल्ल चक्रवर्ती, स्वा.सावरकर, मदनलाल धिंग्रा, प्रफुल्ल, चाकी, अनंत कान्हेरे, विष्णू पिंगळे, कर्तारसिंग, अशफाक उल्लाखान, चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, नेताजी सुभाषचंद्र बोस अशा अनेक क्रांतिकारकांच्या जीवनातील प्रसंग जीवंत उभे करुन आबालवृद्धांच्या मनात ज्वलंत देशभक्ती निर्माण करण्याचा प्रयोग अव्याहतपणे निर्माण करण्याचे कार्य मेहकर (जि. बुलडाणा) येथील प्रा. वसंत गिरी जानेवारी १९९५ पासून करत आहेत. सहस्त्र प्रयोगाकडे त्यांची वाटचाल सुरु आहे.

त्यांच्या सादरीकरणाविषयी अनेक मान्यवरांनी त्यांची विशेष दखल घेवून दिलेले अभिप्राय वाचकांनी लक्षात घेण्यासारखे आहेत. प्राचार्य यशवंत पाटणे म्हणतात,''क्रांतिकारकांच्या जीवनातील अनेक व्याख्याने ऐकली. त्यावेळी त्या व्याख्यात्याच्या विरोधातच क्रांती करुन उठावे असे वाटत होते पण प्रा. गिरींना ऐकल्यावर हा बुलढाण्याचा ढाण्या वाघ क्रांतिकारकांचे जीवंत चित्र उभे करतो हे लक्षात आले.'' प्रख्यात वक्ते स्व.शिवजीराव भोसले (कुलगुरु) म्हणाले होते.''स्वातंत्र्यानंतर स्वार्थी माणसांनी ज्या महान कार्याकडे पाठ फिरविलीआहे. त्या कार्यात प्रा. गिरींनी स्वत:ला झोकून दिले आहे.त्यांच्या महान राष्ट्रकार्याला माझ्या शुभेच्छा.'' स्व. मुजफ्फर हुसेन,:-'' प्रा.गिरीजीका प्रयास युवा पिढीको त्याग, बलिदान और राष्ट्रभक्ती सिखाएगा.'' स्व.प्राचार्य राम शेवाळकर म्हणाले होते,'' युवा पिढीसमोर क्रांतिवीरांची वीरगाथा सादर केलीच पाहिजे. या क्षेत्रात कार्य करण्यासाठी



प्रा. वसंत गिरी

त्यांना शुभेच्छा.'' तिफनकार कविवर्य प्राचार्य विठ्ठल वाघ म्हणतात ''तरुण पिढीला राष्ट्रकार्याने झपाटून टाकण्याची आणि प्रचंड परिवर्तन घडवून आणण्याची ताकद प्रा.गिरी यांच्या शब्दात आहे.'' मेहकर येथील स्व.कविवर्य ना. घ.देशपांडे यांचा त्यांच्या सादरीकरणाविषयी अभिप्राय असा,''१८५७ ते १९४७ या नव्वद वर्षाच्या स्वातंत्र्य संग्रामाचा परीणामकारक आलेख प्रा. गिरी आपल्या ओघवत्या शैलीत घेवून वातावरण भारावून टाकतात.स्वातंत्र्याच्या यज्ञवेदीवर बलिदान देणाऱ्या थोर क्रांतिकारकांचा परिचय उगवत्या पिढीला व्हावा आणि त्यांच्या आयुष्यात त्यांना हा इतिहास प्रेरणा देणारा ठरावा या हेतूने प्रेरित होवून ते प्रसंग जिवंत करतात.'' बाबा आमटे यांचे जेष्ठ चिरंजीव थोर समाजसेवक विकास आमटे म्हणतात,'' प्रा. गिरींचे व्यक्तीमत्व शब्दाची फेक विलक्षण आहे. अशा लोकोपयोगी,लोकशिक्षणात्मक उपक्रमास आनंदवन परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा.'' भारताचार्य सु. ग. शेवडे म्हणतात,'' क्रांतिवीरांची वीरगाथा सादरीकरणासाठी आवश्यक असणारे सुस्पष्ट व खणखणीत उच्चार रसपरिपोष आणि श्रोत्यावरील पकड ह्या सर्व बाबी गिरी सरांजवळ आहेत.

२०१२ मध्ये उद्यान मंगल कार्यालय,सदाशिव पेठ,पुणे येथे बाबासाहेब पुरंदरे यांच्या उपस्थितीत या वीरगाथेचे सादरीकरण केल्यावर बाबासाहेबांनी त्यांच्या सादरीकरणाची प्रशंसा करुन त्यांच्या पाठीवर थाप देणे. हा त्यांच्या जीवनातील खूप मोठा सन्मान आहे.क्रांतिवीरांची वीरगाथेच्या सादरीकरणासोबतच त्यांच्या व्याख्यानाचे अनेक विषय आहेत.सतत वाचन आणि विविध वृत्तपत्रातून त्यांचे लेखन सुरु असते.त्यांच्या प्रकाशित पुस्तकांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.२०१८ ला पलुस (जि. सांगली) येथे राज्यस्तरीय ग्रामिण साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या वाणीतून क्रांतिवीरांची वीरगाथा ऐकणे हा एक अविस्मरणीय प्रसंग असतो.

**- रामदास राजेगावकर**
मो. ९०११२२९२३२/८४८२८९०९९१

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# एस.एस. स्पोर्टस अकॅडमीच्या दोघांची राष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर -**
नेहरुनगर शासकीय मैदानावरील एस.एस. स्पोर्ट्स अकॅडमीच्या दोन खेळाडूंची राष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली.

पूजा राठोड हिने डेरवण (चिपळूण) येथे झालेल्या शालेय राज्य मैदानी स्पर्धेत १०० मीटर धावणे या क्रीडाप्रकारात रौप्य पदक पटकावले. तिची रांची, झारखंड येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय मैदानी स्पर्धेसाठी झाली.

तसेच विनीत दिनकर याने राज्य आंतर विद्यापीठ मैदानी स्पर्धेत १०० मीटर धावणे या क्रीडाप्रकारात सुवर्णपदक पटकावले. त्याची भुवनेश्वर येथे होणाऱ्या नॅशनल इंटर युनिव्हर्सिटी थलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी निवड झाली.

या खेळाडूंना एन.आय.एस. प्रशिक्षक सूर्याजी लिंगडे व भारती लिंगडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचा राज्य कबड्डी पंच सुभाष माने व रेल्वे अधिकारी निलेश वरवडकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.





# घरकुल येथील महापालिका उद्यानाची बकाल अवस्था

- स्मार्ट सिटीतील ४३ लाखांचा निधी गेला पालापाचोळ्यात
- मद्यपींचा बनला अड्डा; मोकाट जनावरांचा मुक्त वावर

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**
स्मार्ट सिटी योजनेतून ४३ लाखाचा निधी खर्चून सुशोभीकरण करण्यात आलेल्या विडी घरकुल येथील स्व. विष्णुपंत कोठे उद्यानाची बकाल अवस्था झाली आहे. कंपाउंडचे काम अर्धवट राहिल्याने या ठिकाणी मोकाट जनावराचा मुक्त वावर होत आहे तर मद्यपींचा अड्डा झाला असल्याचे विदारक चित्र आहे. यामुळे नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे.

सोलापूर शहरातील हैदराबाद रोडवरील घरकुल येथील पोशम्मा मंदिर शेजारीच महापालिकेचे स्व. विष्णुपंत कोठे उद्यान आहे. या परिसरातील नागरिकांची सोय असणारे हे उद्यान आहे. यापूर्वी स्मार्ट सिटी योजनेतून तब्बल ४३ लाख रुपये निधी खर्चून या उद्यानाचे सुशोभीकरण करण्यात आले होते. येथील कंपाउंडचे काम अर्धवट करण्यात आले आहे. यामुळे या उद्यानात थेट मोकाट जनावरांचा मुक्त वावर होत आहे. हे उद्यान म्हणजे या जनावरांसाठी चरायचे ठिकाण झाले आहे. तातडीने येथील कंपाउंडचे काम पूर्ण करण्याची आवश्यकता आहे.

या उद्यानाचे मोठ्या प्रमाणात बकाल अवस्था झाली आहे. या ठिकाणी मद्यपी दिवसाढवळ्याही बसतात. दारुड्यांचा अड्डा बनला आहे. यामुळे सुजाण नागरिकांना येथे वावरणे अडचणीचे ठरते. सद्यस्थितीत असलेले प्रवेशद्वार बंद करून वसाहतीच्या दिशेकडून या उद्यानाचे प्रवेशद्वार करण्याची गरज आहे. तरच अशा लोकांना उद्यानात येण्यास मज्जाव होऊ शकतो. या उद्यानात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता झाली आहे. काटेरी झुडपे वाढली आहेत. महापालिका उद्यान विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. यामुळे परिसरातील सुजाण नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे. तातडीने या उद्यानाची स्वच्छता, देखभाल दुरुस्ती करण्यात यावी, अशी ही मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. स्मार्ट सिटी योजनेतून ४३ लाख रुपये खर्चून या उद्यानात कामे करण्यात आली असली तरी या उद्यानाची बकाल अवस्था का असा सवाल उपस्थित होत आहे. झालेल्या कामांची तपासणी आणि चौकशी करण्याची गरज वर्तवली जात आहे.

### उद्यानात ना शिपाई, ना रखवालदार

या उद्यानात महापालिकेचा कोणताही कर्मचारी कार्यरत नाही. शिपाई नाही ना रखवालदार नाही. यामुळे या उद्यानाचा गैरवापर होत आहे. पर्यावरण रक्षणासाठी उद्यान फुलविणे गरजेचे आहे मात्र महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. या ठिकाणी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून आवश्यक ती दैनंदिन कामे करण्याची गरज आहे.

# हगलूर येथे हिंदू स्मशानभूमी शेड बांधकामाचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**
येथील बालाजी अमाईन्सच्यावतीने सी. एस. आर. अंतर्गत उत्तर सोलापूर तालुक्यातील हगलूर गावातील हिदू स्मशानभुमीच्या सुशोभिकरण व नविन शवदाहिनीकरीता आर. सी. सी शेड बांधण्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

हगलूर येथील हिंदु स्मशानभूमीमध्ये काही सुविधा सुविधा नव्हती. मोकळया जागेत अंत्यसंस्कार केले जात होते. यामुळे हगलूर ग्रामपंचायतीने बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे स्मशानभुमी मधील कामे करून मिळावीत अशी मागणी केली. यामुळे बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी व संचालक मंडळांनी या गावातील स्मशानभूमी सुशोभीकरण करून यामध्ये शवदाहिनीकरीता आरसीसी नविन शेड बांधकाम, बिडची शवदाहिणी बसवणे. वेटिंग कटटा, पत्रा शेड, कंपाऊंड, गेट, पेव्हर ब्लॉक, पाण्याची टाकी विविध कामे करण्यास तात्काळ मंजुरी दिली.या कामाचे भूमिपूजन बालाजी अमाईन्सचे तांत्रिक सल्लागार मल्लिनाथ बिराजदार यांचे हस्ते नारळ वाढवून करण्यात आले. यावेळी सरपंच कुमार खेळळे, उपसरपंच अंगद चव्हाण, सुरेश मगर, ज्ञानेश्वर कुंभार, पांडूरंग नवगिरे, सुरज नवगिरे, हरी शिंदे व बालाजी अमाईन्सचे दत्तप्रसाद सांजेकर, प्रदिप कोंडले, हगलूर ग्रामपंचायतीचे सदस्य व गावातील नागरीक उपस्थित होते.


## संक्षिप्त वृत्त

### मिरवणुका काढण्यास तसेच सभा घेण्यास मनाई; पोलिस आयुक्तांचे आदेश

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर -**
विधानसभा निवडणुकीची मतमोजणी शनिवार दि. २३ नोव्हेंबर रोजी होणार असून निकाल जाहिर झाल्यानंतर सोलापूर शहरात मिरवणुका काढण्यास तसेच सभा घेण्यास पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी मनाई केली आहे. निकाल जाहिर झाल्यानंतर विनापरवाना मिरवणुका व सभा घेणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा यावेळी आयुक्तांनी दिला आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरातील कायदा व सुव्यवस्थेस बाधा होण्याची शक्यता नाकारून पोलिस आयुक्तांनी शहरात विनापरवाना मिरवणुका तसेच सभा घेण्यास पोलिस आयुक्तांनी मनाई केली आहे. १५ नोव्हेंबर पासून २९ नोव्हेंबर पर्यंतच्या कालावधीत पोलिस आयुक्तांनी हे मनाई आदेश दिलेले आहेत. त्यामुळे निवडणुकीचा निकाल जाहिर झाल्यानंतर कोणीही विनापरवाना मिरवणुक अथवा सभा घेतली तर त्यांच्यावर कडक फौजदारी कारवाई होणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

### सराईत गुन्हेगार श्रीनिवास नंदाल दोन जिल्ह्यातून तडीपार

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर -**
शहरातील सराईत गुन्हेगार श्रीनिवास नंदाल यास पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपार करण्यात आल्यानंतर नंदाल यास पुणे येथे सोडण्यात आले आहे. श्रीनिवास नरेश नंदाल (वय २९, रा. प्लॉट नं. ५६, रा. जुना विडी घरकुल, पंचमुखी हनुमान मंदीरजवळ, सोलापूर) असे तडीपार करण्यात आलेल्याचे नाव आहे. नंदाल याच्याविरुध्द सन २०१३, २०१४ व २०२४ या कालावधीमध्ये घरफोडी करणे, चोरी करणे यासारखे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे नंदाल यास त्याच्या गुन्हेगारी कारवायापासून रोखण्यासाठी तडीपार करण्याबाबतचा प्रस्ताव सलगर वस्ती पोलिसांकडून उपायुक्त विजय कबाडे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्या प्रस्तावास पोलिस उपायुक्त कबाडे यांनी मंजुरी देत नंदाल यास सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीच्या आदेशानंतर नंदाल यास पोलिसांनी पुणे येथे सोडले आहे.



### तरूणास दगडाने मारहाण करणाऱ्या बारमधील महिलेसह सातजणांविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर -**
शहरातील मुरारजी पेठेतील सुराणा मार्केटमधील एलोरा बार बाहेर तरूणास दगडाने मारहाण करणाऱ्या बारमधील महिलेसह सातजणांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अमित शशिकांत पडवळकर (वय २६, रा. संग्राम गल्ली, कल्पना टॉकीजजवळ, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन अनोळखी व्यक्ती व महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री पावणे बाराच्या सुमारास सुराणा मार्केट येथील एलोरा बार मध्ये दोन मुले व एक मुलगी यांच्यासोबत झालेल्या अमित पडवळकर याच्या मित्राचे भांडण मिटविण्यासाठी अमित गेला होता. त्यावेळी त्या दोन मुले व मुलीने त्यांच्या ओळखीच्या लोकांना बोलावून घेऊन बार बाहेर अमित व त्याचा मित्र जात असताना मारहाण केली. त्यावेळी चार अनोळखी व्यक्तींनी अमितचा मित्र ऋषिकेश यास जबर मारहाण करून अमित यास रस्त्यावरील दगड फेकून मारहाण केली. यामध्ये अमितच्या डोक्यास जखम झाली असून याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक कामुर्ती तपास करीत आहेत.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त विशेष रेल्वे गाड्या सोडण्याची मागणी

- बसपाच्या वतीने रेल्वेचे वाणिज्य व्यवस्थापक पाटील यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**
विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रेल्वे प्रशासनाने विशेष गाड्या सोडाव्यात यासह विविध मागण्यांचे निवेदन बहुजन समाज पार्टीच्या वतीने सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांना देण्यात आले.



महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने दरवर्षी हजारो अनुयायी चैत्यभूमी, मुंबई येथे डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी ५ डिसेंबर रोजी मुंबईकडे प्रस्थान करतात. यासाठी रेल्वे प्रशासनाने विशेष गाड्या सोडण्याची मागणी करण्यात आली आहे.

दि. ४ व ५ डिसेंबर रोजी कलबुर्गी-सोलापूर-मुंबई तर दि. ६ व ७ डिसेंबर रोजी मुंबई-सोलापूर-कलबुर्गी या मार्गावर विशेष गाड्या चालवल्या जातात. मात्र, वाढत्या प्रवाशांच्या संख्येमुळे यंदा आणखी विशेष गाडी सायंकाळच्या सत्रात सोडण्यात याव्यात. महिलावर्ग, लहान मुले व वयोवृद्धांसाठी गाड्यांमध्ये स्लिपर डबे जोडण्यात यावेत. विशेष गाड्यांना सोलापूर जिल्ह्यातील प्रमुख स्थानकांवर थांबा देण्यात यावा. यामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांनाही मुंबईला जाण्याची सोय होईल, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी श्री. पाटील यांनी मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन पदाधिकाऱ्यांना दिले. निवेदन देतेवेळी बसपाचे शहर युवक अध्यक्ष अमरसेन साळवे, माजी शहर अध्यक्ष देवा उघडे, शिलवंत काळे, जालिंदर मसलखांब, युवराज बडेकर, महेंद्र कांबळे आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# बाळे येथे ७ डिसेंबरपासून खंडोबा यात्रेस प्रारंभ

- विविध धार्मिक विधी व पालखी सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ नोव्हेंबर-**
बाळे येथे श्री खंडोबा देवस्थान यात्रेस शनिवार दि. ७ डिसेंबर रोजी विविध धार्मिक कार्यक्रमाने प्रारंभ होणार आहे. या निमित्ताने यात्रा काळात शनिवारी चंपाषष्ठी व चार रविवारी विविध धार्मिक कार्यक्रम आणि पालखी सोहळा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विनय ढेपे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



सोमवार दि. २ डिसेंबर २०२४ रोजी घटस्थापना करण्यात येणार आहे. त्यानंतर चंपाषष्ठी निमित्त शनिवार दि.७ डिसेंबर २०२४ रोजी काकड आरती अभिषेक व महापूजा पालखी सोहळ्याने यात्रेस उत्साहात मंगलमय वातावरणात प्रारंभ होणार आहे. शनिवार तसेच पहिला रविवार दि. ८ , १५ , २२ आणि २९ डिसेंबर २०२४ या चार रविवारी असे एकूण चार दिवस खंडोबा देवाची यात्रा भरणार आहे. या प्रत्येक रविवारी पहाटे ५ वाजता काकड आरती, सकाळी ८ वाजता अभिषेक व महापूजा, सायंकाळी ८ वाजता अभिषेक व महापूजा, सायंकाळी ७ वाजता घोडा व नंदी ध्वजासह पालखी सोहळा होणार आहे. बांगरषष्ठी रविवार दि. ५ जानेवारी २०२५ रोजी निमित्त महाप्रसाद वाटप कार्यक्रमाने या यात्रेची सांगता होणार आहे. पाटील, तोडकरी, कांबळे, सुरवसे व गावडे आदी सर्व मानकरी व भाविकांना प्रसाद वाटप करण्यात येतो.चंपाषष्टी शनिवार, चार रविवार असे एकूण चार दिवस खंडोबा देवाची यात्रा भरणार आहे. दिवसभर जागरण गोंधळ, वाघ्या मुरळी नाचणे, तळी भंडारा उचलणे, वारू सोडणे, नवस फेडणे, जावळ काढणे आदी धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. या यात्रेत दर्शनासाठी लाखो भाविक महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र या राज्यातून येतात. चौथ्या रविवारी रात्री ८ वाजता शोभेचे दारू काम होणार आहे. सोलापूर महापालिकेच्या वतीने सिटी बस सेवा आणि पाण्याची सोय करण्यात आली आहे. यात्रा काळात दर्शनासाठी मंदिर दिवसभर खुले राहणार आहे. देवस्थान ट्रस्टच्या वतीने या ठिकाणी नेटके नियोजन व चांगली व्यवस्था करण्यात आली असल्याचेही अध्यक्ष विनय ढेपे यांनी यावेळी सांगितले. या पत्रकार परिषदेस सागर पुजारी, आदिनाथ पुजारी, सुरेश पुजारी आदी उपस्थित होते.

# शहरात थंडीचा कडाका वाढला

- उबदार कपडे घेण्याकडे तिबेटियन मार्केटमध्ये ग्राहकांची वाढली वर्दळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ नोव्हेंबर -**
सोलापूर शहरात गेल्या काही दिवसांपासून थंडीचा जोर वाढला आहे. एरव्ही थोड्याफार प्रमाणात जाणवणारी थंडी यंदा वाढलेली दिसत आहे. सकाळ सत्रात थंडीचा काडाका मोठ्या प्रमाणात असल्याने विद्यार्थ्यांना तसेच चाकरमान्यांना उबदार कपड्यांचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे शहरातील तिबेटियन मार्केट येथे स्वेटर, मफलर, कानटोपी, चिमुकल्या बाळगोपाळांसाठी स्वेटर, हातमोजे, पायमोजे असे विविध उबदार कपडे घेण्यासाठी ग्राहकांची वर्दळ वाढलेली दिसत आहे.



सोलापूर : तापमान घसरल्यामुळे शहरात थंडीची लाट आली. सोलापुरकर गरम कपडे खरेदी करण्यासाठी गर्दी करीत आहेत. (छायाचित्र : केवल तिवारी)

दिवाळीनंतर सोलापूर शहरात थंडीचा जोर वाढत आहे. यंदा थंडीचा जोर वाढेल असा हवामान खात्याचा अंदाज आहे. त्यानुसार शहरात पहाटे आणि रात्री थंड गारवा पसरत आहे. तर सकाळी धुके आणि अल्हाददायक गारवा पसरत आहे. शाळेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच नोकरदारांना स्वेटर आणि हातमोजे यांचा आधार घ्यावा लागत आहे. दिवसभर देखील थंड वातावरण पसरत असल्याने नागरिक उबदार कपडे परिधान करत आहेत. थंडीचा कडाका दरवर्षीपेक्षा यावर्षी जास्त प्रमाणात असेल, असे हवामान खात्याने शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे नागरिकांनी थंडीपासून आपल्या शरीराचे संरक्षण व्हावे, यासाठी उबदार कपडे, स्वेटर, मफलर आदींचा आधार घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. दरम्यान मध्यरात्री आणि सकाळी थंडगार वारे वाहत असल्याने या बोचनाऱ्या थंडीपासून आपल्या शरीराचे संरक्षण व्हावे, यासाठी स्वेटर, जरकिन, हातमोजे असे उबदार कपडे खरेदी करण्यासाठी यंदा तिबेटियन मार्केट येथे ग्राहकांची मोठी वर्दळ दिसत आहे. तरुणांना स्वेटर आणि जर्किन यांचे आकर्षण दिसून येत आहे. विविध प्रकारचे स्टायलिश जर्किन बाजारात उपलब्ध झाले असून, याला सर्वाधिक मागणी दिसून येत आहे. सुमारे ५०० रुपयांपासून ते ३ हजार रुपये पर्यंतचे जर्किन मार्केटमध्ये उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे महिलांसाठी लेडीज स्वेटर देखील उपलब्ध आहेत. यांची किंमत देखील ४०० ते ९०० रुपयापर्यंत असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले.

### उबदार कपड्यांचे वाढले दर

सोलापूर शहरात थंडीचा जोर वाढल्याने स्वेटर घेण्यासाठी तिबेटियन मार्केट येथे आलो आहोत. विविध प्रकारचे स्वेटर, जर्किन आदींसह उबदार कपडे उपलब्ध आहेत. मात्र दरामध्ये वाढ झालेली दिसत आहे.

**- संजना बनसोडे, ग्राहक**

श्रीनिवास सिनेमॅटिक जेलरोड जवळ, सोलापूर
Book The Ticket At BookMyShow
आजपासुन शानदार सुरुवात
सनी लिओनचे हॉरर सस्पेन एक्सपोझिंग
१२॥,०३॥, वा.


सत्यदेवचे फुल ॲक्शन तेलगु चित्र
०६॥ वा.



भागवत उमामंदिर
एअर कुल्ड
प्रेक्षकाच्या तुफान गर्दीत चालू


12.30 PM 03.30 PM 06.30 PM 09.30 PM
Book The Ticket At BookMyShow तिकिट बुक करण्यासाठी कॉल करा-9158142780

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## २५० वर्षांपूर्वीच्या पार्श्वनाथ मूर्तीचे वज्रलेप, आज लघुपंचकल्याणक महोत्सव

चिंतामणी-२३

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन कासार मंदिर सोलापूर येथील २५० वर्षांपूर्वीची मूलनायक १००८ चिंतामणी पार्श्वनाथ भगवान मूर्तीचे वज्रलेप कार्य संपन्न झाल्यानंतर मुनीश्री सौम्यसागर महाराज, मुनीश्री विभास्वरसागर महाराज, मुनीश्री सारस्वतसागर महाराज, मुनीश्री जयंतसागर महाराज, मुनीश्री शुद्धोपयोगसागर महाराज, क्षुल्लक श्री श्रुतसागर महाराज यांच्या मंगल सान्निध्यात एक दिवसीय लघुपंचकल्याण महोत्सव आयोजित करण्यात आले आहे. सकाळी ६:४५ वाजता ध्वजारोहण, अभिषेक, इंद्र प्रतिष्ठा, सकलीकरण, यागमंडल विधान, तप कल्याण, केवलज्ञान कल्याण, मोक्ष कल्याण, विश्वशांती महायज्ञ इत्यादी विधानांचे आयोजन आज करण्यात आले आहे.



प्रतिष्ठाचार्य म्हणून बाल ब्रम्हचारी पियुष, प्रशांत मोहरे, विजय काळेगोरे कार्य पाहतील. दिवसभर असणाऱ्या या महोत्सवात महाराष्ट्र कर्नाटक राज्यातील श्रावक श्राविका उपस्थित राहणार असल्याची माहिती मंदिर समितीचे अध्यक्ष विलास कंदले यांनी केले आहे. महोत्सव यशस्वी करण्यासाठी संजय कंदले, सुभाषचंद्र वनकुद्रे, रविकिरण मैंदर्गे, महेश नळे, नेमेश वनकुद्रे, बाबुराव तंगा, प्रा. धन्यकुमार बिराजदार, उमेश सगरशेट्टी, सचिन पाटील, चेतन वनकुद्रे, बाहुबली वनकुद्रे, महावीर लाळे, विभुते, ज्ञानदीप महिला मंडळाच्या पदाधिकारी व कासार समाज बांधव परिश्रम घेत आहेत.

दसरा, दिवाळी निमित्त
20% पर्यंत सूट
यल्लम्मा हॅण्डलूम
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं. १ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो. 9371289887
शाखा नं. २ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो. 9372351860

# धाकधूक आज थांबणार; मुख्यमंत्रीपदाची स्वप्नं

## उमेदवारांचे देव पाण्यात | महायुती-महाआघाडीचे दावे-प्रतिदावे; काही निकाल धक्कादायक

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

**महाराष्ट्र विधानसभा निवडणूक महाउत्सवाचा समारोप आज निकालाने होत असून मैदानातील उमेदवारांची धाकधूक आज संपणार आहे. विजयाच्या अपेक्षेने अनेक उमेदवारांनी देव पाण्यात ठेवलेत तर काही ठिकाणी धक्कादायक निकाल देखील अपेक्षित आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सत्तेचे दावे-प्रतिदावे सुरु केलेले असून अनेकांना मुख्यमंत्रीपदाची स्वप्नं देखील पडू लागल्याचे चित्र आहे. जागा वाटपावरून झालेली तू-तू मै-मै आता मुख्यमंत्रीपदावरून देखील पहावयास मिळाल्यास नवल वाटायला नको. वाढलेला मतांचा टक्का आणि लाडकी बहिण कोणाला पावणार यावर निकालाच्या अंदाजांचे भवितव्य ठरणार आहे.**

भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस, शरदचंद्र राष्ट्रवादी, ठाकरे सेना, मनसे, वंचित, प्रहार, स्वाभिमानी, माकप आणि एमआयएम या राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवारांनी यंदाच्या विधानसभा निवडणुकीत मोठी रंगत आणली. या निवडणुकीत पैसे वाटपाचे प्रकार देखील अनेक ठिकाणी दिसून आले तर आयोगाच्या भरारी पथकाने कोट्यवधी रुपये आणि मालमत्ता देखील जप्त केली. जवळपास महिनाभर चाललेला हा निवडणुकीचा महाउत्सव निकालानंतर संपणार असला तरी सरकार कोणाचे यावरून पुन्हा महाराष्ट्राचे राजकारण तापणार आहे. विविध संस्था आणि प्रसारमाध्यमांनी प्रसिध्द केलेल्या एक्झिट पोलनुसार महायुती आणि महाविकास आघाडी दोघांनाही सत्तेची स्वप्नं दाखवलेली आहेत. बहुतांशी एक्झिट पोल्सनी महायुतीला सत्तेचा कौल दिलेला आहे. असे असले तरी शनिवार, २३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणी निकालानंतरच निवडणुकीचे सर्व चित्र स्पष्ट होणार आहे.



यंदा महाराष्ट्रात जवळपास चार टक्के इतके मतदान वाढले असून गत ३० वर्षातील दुसरे सर्वाधिक मतदान २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत झाल्याचे दिसून आले आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत सरकारची लाडकी बहिण योजना मोठी चर्चेची ठरलेली आहे. तर आरक्षणावरून मराठा आणि ओबीसी समाजाची नाराजी देखील निवडणुकीवर परिणाम करणारी ठरेल अशी चर्चा आहे. निवडणूक काळात यंदा पहिल्यांदाच महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये राडा झाल्याचे दिसले. तर विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी प्रचाराची रणधुमाळी उडवली. आरोप-प्रत्यारोपांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा आखाडा यंदा चांगलाच गाजल्याचे पहावयास मिळाले.

**प्रशांत माने**
**मो. ९८८११९१४४३**

गतवेळी २८८ पैकी १०६ जागा जिंकून मोठा भाऊ ठरलेल्या भाजपाला राज्यात सत्ता स्थापन करता आलेली नव्हती. त्या एका घटनेने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ देखील महाराष्ट्राच्या जनतेने पहिलेले आहे. तर एक्झिट पोलनुसार यंदाही महाराष्ट्रात पुन्हा एकदा भाजपाचा सर्वाधिक जागा जिंकून मोठा भाऊ असणार असल्याचे दिसून आले आहे.

गतवेळचा प्रकार लक्षात घेता भाजपा यंदा सावध भूमिका घेणार हे निश्चित आहे. शनिवारच्या निकालात प्रत्यक्षात कोणाला किती जागा मिळतील हे स्पष्ट झाल्यानंतर सत्तेसाठीचे रामायण-महाभारत सुरु होणार आहे. प्रत्येक पक्षाला मुख्यमंत्रीपदाची स्वप्नं पडू लागली आहेत. तर मुख्यमंत्रीपदावरून पुन्हा राज्यातील राजकारणात नवी समीकरणे देखील पहावयास मिळतील, अशी चर्चा राजकीय जाणकारांमध्ये रंगू लागली आहेत. भाजपा सत्तेत असणार हे नक्की असले तरी भाजपाचे सत्तेतील सवंगडी कोण असतील, आहे ती महायुती तशीच राहिले का त्यात बदल होतील याचीही उत्सुकता महाराष्ट्राच्या जनतेला लागली आहे.

**जिल्ह्यावर वर्चस्व कोणाचे?**

शहर मध्य, शहर उत्तर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, सांगोला, माळशिरस, पंढरपूर-मंगळवेढा या जिल्ह्यातील ११ मतदारसंघांच्या निकालाकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहेत. शहर मध्य, बार्शी, सांगोला या मतदारसंघांकडे सर्वांचे विशेष लक्ष असणार आहे. जिल्ह्यावर कोणाचे राजकीय वर्चस्व हे आज स्पष्ट होणार आहे.

महायुतीत मुख्यमंत्रीपदासाठी देवेंद्र फडणवीस यांनाच अधीक पसंती आहे. तर एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री असावेत यासाठी शिवसेना आग्रही आहे. विशेष म्हणजे एक्झिट पोलमध्ये कमी जागा दाखवल्यानंतरही अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून मुख्यमंत्रीपदासाठीचे दावे सुरु झाले आहेत. मुख्यमंत्रीपदासाठी तडजोडीचाही प्रकार होण्याची शक्तया जाणकार व्यक्त करीत आहेत. निकालानंतरचे आकडे पाहूनच दाव्यांना महत्व असणार हे मात्र नक्की.

महाविकास आघाडी देखील मुख्यमंत्री कोण यावरून रुसवे-फुगवे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ठाकरे सेनेकडून मुख्यमंत्रीपदासाठी उध्दव ठाकरे यांचे नावे निवडणूक सुरु झाल्यापासूनच चर्चेत आहे. संजय राऊत हे सातत्याने उध्दव ठाकरे यांचे नाव पुढे करण्यात आघाडीवर आहेत. तर काँग्रेसकडूनही मुख्यमंत्रीपदासाठी दावा केला आहे. काही कार्यकर्त्यांनी तर नाना पटोले हेच मुख्यमंत्री होतील असेही सांगितले आहे. काँग्रेसवाले मात्र हायकमांड निर्णय घेतील असे सांगत आहेत. धुरंधर राजकारणी शरद पवार यांनी मात्र निकालनंतर नंबरच ठरवतील मुख्यमंत्री कोणाचा हे अगोदरच स्पष्ट केले आहे. याचा अर्थ शरद पवारांची राष्ट्रवादी देखील यंदा मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतील अग्रेसर आहे. एकूणच काय तर आजचा मतमोजणी निकालाचा दिवस हा महाराष्ट्रासाठी खूपच मोलाचा असणार आहे. पुढील पाच वर्षासाठी महाराष्ट्र कोणाच्या ताब्यात असणार हे स्पष्ट होणार आहे. परंतु आजचे राजकारण नव्या वळणाचे असल्याने कोण कोणासोबत असणार हे मात्र निकालानंतरच कळणार आहे.

## क्राईम वृत्त...

### हॅण्डल लॉक केलेली दुचाकी पळवली

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच १३ इडी ३३५८ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १७ नोव्हेंबर रोजी दुपारी सव्वा बारा ते पावणे दोन वाजण्याच्या सुमारास सोलापूर मंगळवेढा रोडवरील सांस्कृतिक मंगल कार्यालय येथे घडली. याप्रकरणी शेखर बिरू जाधव (वय २२, रा. मु. पो. गुंजेगाव) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार उपास हे करीत आहेत.

### पतीची बदनामी करत जातीवाचक शिवीगाळ

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

पतीची बदनामी करून जातीवाचक शिवीगाळ करत दमदाटी करून मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हि घटना २० ते २१ नोव्हेंबर दरम्यान होटगी रोड येथील यल्लमा देवी मंदिर शंकर नगर शिवशाही समोर घडली. याप्रकरणी अंजली संतोष कांबळे (वय २५, रा. शंकर नगर, होटगी रोड, शिवशाही समोर) यांनी एम आयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून लक्ष्मीबाई दिंडोरे व शिवशंकर उर्फ बाबुशा कामशेट्टी (रा. शंकर नगर, होटगी रोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. लक्ष्मीबाई दिंडोरे व शिवशंकर कामशेट्टी यांनी अंजली कांबळे व त्यांच्या पतीची बदनामी करून जातीवाचक शिवीगाळ करत दमदाटी केली. त्यानंतर कांबळे यांच्या अंगावर येऊन मारहाण केल्याचे फिर्यादीत आहे. तपास स. पोलीस आयुक्त पोमण हे करीत आहेत.

### जमाबंदीच्या आदेशाचे उल्लंघन; सहा जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

बेकायदेशीरपणे एकत्रित येऊन गैर कायद्याची मंडळी जमवून जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून शरद कोळी यांचा प्रतिकात्मक पुतळा गाढवावर बसवून आंदोलन करणाऱ्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस शिपाई आसिफ मौला शेख (नेमणूक जेलरोड पोलीस ठाणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलीस ठाण्यात शोएब महागामी व त्याच्या सोबत असलेले इतर चार ते पाच कार्यकर्ते यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. २१ नोव्हेंबर रोजी दुपारी पावणे चार वाजण्याच्या दरम्यान संपर्क कार्यालय समोरील सोशल कॉलेज जवळ मुस्लिम पाच्छा पेठ येथे बेकायदेशीरपणे आंदोलन केल्यामुळे पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस हवालदार खान हे करीत आहेत.

### विनापरवाना आंदोलन; ११ जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

विनापरवाना निषेध आंदोलन केल्याप्रकरणी अकरा जणांविरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना २१ नोव्हेंबर रोजी वॉटर फ्रंट इमारतीमधील असलेल्या शरद कोळी यांच्या बाळासाहेब ठाकरे शिवसेना कार्यालय येथे घडली. याप्रकरणी महिला पोलिस शिपाई क्रांती भीमराव कांबळे (नेमणूक सदर बझार पोलीस ठाणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून युवा काँग्रेस अध्यक्ष गणेश दत्तात्रय डोंगरे, शुभांगी विश्वजीत लिंगराज, सुनिता महादेव इंगळे, मनीषा राहुल साठे, प्रियंका भिमण्णा लिंबोळे, भाग्यश्री संतोष जाधव, जयश्री बाबुराव खैराटे, राधा भास्कर मोरखडे, देवता गोपीनाथ धायगुडे, सुजता श्रीपती माने व मिराबाई जगन्नाथ घटकांबळे (सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यातील आरोपी यांनी वरील ठिकाणी पोलीस प्रशासनाकडून आंदोलन करण्यास परवानगी नसताना देखील विनापरवाना आंदोलन करत जमाबंदी आदेशाचे व आचारसंहिताचे उल्लंघन करून गैर कायद्याची मंडळी एकत्र जमवून आंदोलन करून घोषणाबाजी केली म्हणून पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सोलापूर जिल्ह्यातील सर्व मतमोजणी केंद्र परिसरात कलम १६३ लागू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ नोव्हेंबर-**

विधानसभा निवडणुकीच्या मतदानाची दि.२३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. ही निवडणूक प्रक्रिया विना अडथळा व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्ह्यातील सर्वच मतमोजणी केंद्र परिसरात १६३ कलम लागू केल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

सोलापूर जिल्हयातील विधानसभा मतदार संघासाठीच्या मतमोजणी कामी मतमोजणीच्या ठिकाणी येणा-या उमेदवारांचे सोबत त्यांचे समर्थक, वाहने, कार्यकर्ते हे मोठ्या संख्येने उपस्थित असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मतमोजणी ठिकाणच्या परीसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे करीता खालील नमुद केलेली कृत्ये करणेस प्रतिबंध करण्यात येत आहे.

जिल्हादंडाधिकारी यांच्या आदेशान्वये भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १६३ खाली प्रतिबंध अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन असा आदेश देतो की, जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघनिहाय मतमोजणी ठिकाणच्या परीसरात दिनांक २३ नोव्हेंबर रोजी पहाटे ५ वाजलेपासून ते मतमोजणीची संपूर्ण प्रक्रिया संपेपर्यंत खालील कृती करण्यास मनाई करीत आहे. मतमोजणी दिवशी मतमोजणी ठिकाणापासून २०० मीटर परिघाच्या परीसरात मतमोजणी कर्मचारी/पुरवठादार, उमेदवार व त्यांचे नियुक्त केलेल्या प्रतिनिधी व्यतिरीक्त कोणाही व्यक्तिला प्रवेश करणेस मनाई आहे. मतमोजणी कालावधीत अथवा मतमोजणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही प्रकारच्या लाऊड स्पिकरचा वापर सक्षम पोलीस अधिकाऱ्यांच्या लेखी पूर्वपरवानगी शिवाय रस्त्यावर, व्यासपिठावर किंवा फिरत्या वाहनावर बसविणेस मनाई आहे.

**मतदानाची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत भरारी पथक**

सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ अनुषंगाने मा. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व मार्गदर्शक सुचनेनसार मतदानाची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत भरारी पथक व देखरेख पथकाकडून कार्यवाही सुरू ठेवण्यात यावी, असे आचार संहिता कक्ष प्रमुख सार्वत्रिक निवडणूक २०२४ तथा अपर जिल्हादंडाधिकारी सोलापूर मनिषा कुंभार यांनी आदेशित केले आहे.



**सोलापूर : विधानसभा निवडणुक निकाल मतमोजणी केंद्रावर जयत तयारी केली आहे. शहर मध्य मतदारसंघातील मतमोजणी केंद्रावर टिपलेले छायाचित्र (छायाचित्र : केवल तिवारी)**

आदर्श आचारसंहितेचा भंग होईल अशा प्रकारचे भाषण करणे, नक्कल करणे, चित्रे/चिन्हे रेखाटणे अगर त्यांचे प्रदर्शन करणे अथवा तत्सम कृती करणेस मनाई आहे.इंन्स्टाग्राम, व्हॉटस्अॅप, व्टिटर, फेसबुक, इत्यादी समाज माध्यमाद्वारे जातीय तणाव निर्माण करणा-या गोष्टी पसरवण्यास मनाई आहे.

मतमोजणी ठिकाणाच्या २०० मीटर परिघाच्या परिसरामध्ये कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण, वाद्य वाजवणे, गाणी वाजविणे, गाणी म्हणणे, गुलाल उधळणेस, वाहनांच्या सायलेन्सरच्या पुंगळ्या काढुन मोठ्याने आवाज करण्यास, गलाल, रंग उधळणे अशा प्रकारचे गैरशिस्त वर्तन करण्यास मनाई करणेत येत आहे.

## मतमोजणी केंद्रासह स्ट्राँगरूम परिसरात कडेकोट बंदोबस्त

**उमेदवारांचे भवितव्य उघडणार आज**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील मतदानानंतर आता मतमोजणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आज शनिवार (दी.२३) नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. त्याआधी विविध संस्थांचे एक्झिट पोल आले आहेत. काही संस्थांनी महायुती तर काही संस्थांनी महाविकास आघाडीचे सरकार येईल, असा अंदाज व्यक्त केला आहे. यंदा मतदानाची टक्केवारी वाढली आहे. त्यामुळे वाढलेल्या मतांच्या टक्केवारी महायुती आणि महाविकास आघाडीचाही विश्वास दुणावला आहे.

दरम्यान सकाळी आठ वाजता सर्व मतमोजणी केंद्रांवर मतमोजणी सुरू होईल. या प्रक्रियेदरम्यान, पोस्टल मतपत्रिकांची मतमोजणी सकाळी आठ वाजता सुरू होईल, त्यानंतर ईव्हीएमवरील मतांची मोजणी सकाळी साडे आठ वाजता सुरू होईल. दुपारनंतर खरे चित्र स्पष्ट होईल. मतमोजणी केंद्रांच्या प्रस्तावास निवडणूक आयोगाने मंजुरी दिली असून सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी यांनी याबाबत व्यापक प्रसिद्धी दिली आहे. निवडणूक लढविणारा उमेदवार, राजकीय पक्षांना मतमोजणी केंद्रांच्या ठिकाणाबाबत लेखी स्वरूपात कळविण्यात आले आहे. निरीक्षक व उपस्थित उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्यासमोर सीलबंद स्ट्राँग रूम्स उघडण्यात येतील व ईव्हीएम मतमोजणी केंद्रावर नेण्यात येतील.



**अनाधिकृत होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनरवर बंदी**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने उच्च न्यायालयाने नवे आदेश पारित केले. निवडणुकीचे निकाल स्पष्ट झाल्यानंतर विजयी उमेदवार किंवा त्यांच्या समर्थकांनी अनाधिकृत होर्डिंग्स फ्लेक्स बॅनर लावल्यास त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात येणार आहे. संबंधित व्यक्तींवर आणि फ्लेक्स तयार करणाऱ्या संस्थेंवर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. तसा देश उच्च न्यायालयाने विभागीय अधिकाऱ्यांना त्याच पद्धतीने महापालिका प्रशासनाला देण्यात आले आहेत.

मतमोजणी केंद्रातील सर्व कार्यवाही सीसीटीव्ही द्वारे चित्रित केली जाईल. दरम्यान शनिवारी स्ट्राँग रूम परिसरात पोलीस आणि सशस्त्र बल यांचा कडेकोट बंदोबस्त होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांच्या ज्यादा कुमक मागवण्यात आली होती.

शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील मतमोजणी केंद्र नूतन मराठी विद्यालय येथे कडक बंदोबस्त लावण्यात आला होता. केंद्राकडे जाणाऱ्या सर्व रस्ते बॅरिगेट्स लावून बंद करण्यात आले होते.


## उमेदवारांची घालमेल तर कार्यकर्त्यांची उत्कंठा शिगेला

### आज दुपारपर्यंत निवडणुकीचा कल स्पष्ट होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

२० नोव्हेंबरला मतदान झाल्यापासून प्रत्येक मतदारसंघातील उमेवारांत धाकधुक वाढली असून, विविध पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सर्वसामान्य जनतेची निकालाची उत्कंठा मात्र शिगेला पोहोचल्याचे दिसून येते. यामुळे मतमोजणीच्या पूर्वसंध्येपर्यंत अमूक मतदारसंघातून कोण निवडूण येणार? कोण पडणार? महायुतीची सत्ता येईल का मविआची सत्ता येईल अशी चर्चा, तर्कवितर्क सुरू होते. या सर्व प्रश्नांना आज मतमोजणीच्या दुपारपर्यंत उत्तरे मिळणार आहेत. कारण दुपारी १ वाजेपर्यंत निकालाचा कल येवून सायंकाळी ५ वाजेपर्यंत निकाल जाहीर होणार आहेत.

जिल्ह्यातील विविध मतदारसंघातील निकालाकडे सर्व मतदारांचे लक्ष लागले आहे. सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात सर्वात जास्त म्हणजेच २९ फेऱ्या होतील. तसेच सोलापूर शहर उत्तरसाठी २१, शहर मध्यसाठी २२, करमाळा मतदारसंघात २५, माढा मतदारसंघासाठी २६, मोहोळ मतदारसंघात २४, बार्शी मतदारसंघात २४, माळशिरस मतदारसंघात २५. सांगोल्यात २२, सोलापूर दक्षिण मतदार संघात २७ मतदानाच्या फेऱ्या होण्याची शक्यता आहे. दुपारपर्यंत या निवडणूक निकालाचा कल स्पष्ट होईल. तसेच सायंकाळी पाच वाजेपर्यंत अंतिम निकाल हाती येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



विधानसभा निवडणुकीतील मतदानानंतर आता मतमोजणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उद्या मतमोजणी होणार आहे. याआधी विविध संस्थांचे एक्झिट पोल आले आहेत. काही संस्थांनी महायुती तर काही संस्थांनी महाविकास आघाडीचे सरकार येईल, असा अंदाज व्यक्त केला आहे. यंदा मतदानाची टक्केवारी वाढली आहे. त्यामुळे वाढलेल्या मतांच्या टक्केवारी महायुती आणि महाविकास आघाडीचाही विश्वास दुणावला आहे. निकालाच्या पार्श्वभूमीवर शरद पवार गटानेही तातडीने आपल्या सर्व उमेदवारांची ऑनलाईन मिटींग घेतली आहे. उद्या विधानसभा निवडणुकीचा निकाल आहे. त्याआधीच पवारांनी आपल्या उमेदवारांची ऑनलाईन मिटींग घेतली. या बैठकीला पवारांसह सुप्रिया सुळे व जयंत पाटील यांनीही मार्गदर्शन केल्याची माहिती मिळत आहे. निकालापूर्वी काही महत्त्वाच्या सूचना देण्यासाठी ही मिटींग घेतल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, निकाल लागल्याबरोबर प्रमाणपत्र घेऊन पवारांनी त्यांच्या सर्व उमेदवारांना मुंबईला बोलावले आहे. याच धर्तीवर महायुतीच्या पक्षश्रेष्ठींनीही आपल्या उमेदवारांना बैठका घेवून सुचना दिल्याचे समजते. एकंदरीत, एखाद्या पक्षाला स्पष्ट बहुमत नाही मिळाल्यास पुन्हा तोडफोडीचे राजकारण राज्यात चालणार असल्याचीही चिंता जाणकार नागरिकांतून व्यक्त होत आहे. आपले आमदार सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक पक्षाचे श्रेष्ठी अशी रणनिती आखत आहेत. राज्यात पुन्हा महायुतीचेच सरकार येणार असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादांना वाटत आहे तर राज्यात महाविकास आघाडीचेच सरकार येईल, असा विश्वास उध्दव ठाकरे, नाना पटोले आणि शरद पवारांनी व्यक्त केला आहे. यामुळे विधानसभा निवडणूक निकालाची उत्कंठा राजकीय नेते, कार्यकर्त्यांनाच नाही तर सर्वसामान्यांनाही लागली आहे.

## शहर उत्तर मतमोजणीसाठी ४०० शासकीय कर्मचारी तैनात

### २१ राऊंडमध्ये २८९ केंद्रांवरील होणार मतमोजणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

शहर उत्तरमध्ये विद्यमान आमदार विजयकुमार देशमुख आणि माजी महापौर महेश कोठे यांच्यात अटीतटीचा प्रचार रंगला होता. दोघांनीही जोरदार प्रचार केल्याने कोण बाजीगर ठरणार? हे शनिवारच्या मतमोजणीतच कळणार आहे.

या मतदारसंघाची मतमोजणी पुणे रोडवरील सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये पार पडणार असून, यासाठी ४०० शासकीय अधिकारी आणि कर्मचारी तैनात केले आहेत. तर सीआरपी, एसआरपी आणि महाराष्ट्र पोलिसांचाही तगडा बंदोबस्त आहे. या मतमोजणीसाठी १४ टेबल लावण्यात आले असून, २१ फेऱ्यात ही मतमोजणी होणार आहे. या मतदारसंघातील प्रथम पोस्टल मतमोजणी होईल, त्यानंतर व्हिव्हिपॅट आणि नंतर सैनिकांची मते मोजली जाणार आहेत. सिंहगड कॉलेजवर शुक्रवारीच दुपारनंतर तगडा पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. मतमोजणी करणाऱ्या सर्वच पदाधिकाऱ्यांना शहर उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी अमोलसिंह भोसले यांनी योग्य ते प्रशिक्षण दिले आहे. एकंदरीत, या मतमोजणीसाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली योग्य ते मायक्रोप्लॅनिंग केल्याने मतदानाप्रमाणेच मतमोजणी शांततेत पार पडेल, असा आशावाद शहर उत्तरचे निवडणूक निर्णय अधिकारी भोसले यांनी दैनिक तरूण भारतशी बोलताना व्यक्त केला.



# योगामुळे कार्यक्षमता वाढते

## आर्ट ऑफ लिव्हिंगच्या साध्वी तत्वमयी : स्वेरीत पाचवा मासिक योग दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ नोव्हेंबर -**

'नियमित योग केल्याने आपले मन प्रसन्न राहते. हाती घेतलेल्या कार्यात सकारात्मकता निर्माण होते, उत्साह वाढतो व आपल्या कार्य करण्याच्या क्षमतेत कमालीची वाढ होते.' असे प्रतिपादन आर्ट ऑफ लिव्हिंगच्या साध्वी तत्वमयी यांनी केले.

प्रत्येक वर्षी दि.२१ जून रोजी 'जागतिक योग दिन' हा आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्थात जगभरात साजरा केला जातो. दि.२१ जून रोजी स्वेरीत मुख्य 'जागतिक योग दिन' साजरा करण्यात आला. यावेळी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी यापुढेही 'स्वेरी अंतर्गत असलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक महिन्याच्या दि.२१ तारखेला सामुहिक 'योग दिन' साजरा करण्याचे घोषित केले होते. तेंव्हापासून प्रत्येक महिन्याच्या दि. २१ तारखेला न चुकता स्वेरीत 'योग दिन' घेतला जातो. गुरुवार, दि. २१ नोव्हेंबर २०२४ हा स्वेरीमध्ये 'पाचवा योग दिन' साजरा करण्यात आला. अभियांत्रिकीच्या दुसऱ्या, तिसऱ्या व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना पीएल (पेपर लिव्ह) निमित्त सुट्टी आहे तरीही यामध्ये खंड न पडता 'योगा' घेण्यात आला. या उपक्रमाला प्रथम वर्ष अभियांत्रिकी व वसतीगृहातील सर्व विद्यार्थ्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला. डॉ.एन.पी. कुलकर्णी यांनी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या साध्वी तत्वमयी यांचे स्वागत करून कार्यक्रमाचे प्रास्तविक केले. प्रार्थनेने सुरवात करून साध्वी तत्वमयी यांनी विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक यांच्याकडून पुढे तासभर विविध प्राणायम करवून घेतले. सूर्यनमस्कार सह विविध आसने, भस्त्रीका प्राणायम तसेच श्वास, फुफुस्से, शरीराच्या विविध अवयवांच्या हालचालीसाठी योगाचे विविध प्रकार करून घेतले.

### योगामुळे शरीराच्या प्रत्येक अवयवाचा व्यायाम

मार्गदर्शन करताना अनुयायी साध्वी तत्वमयी म्हणाल्या की, 'योग हा शरीर, स्वास्थ्य आणि मनाच्या एकाग्रतेबरोबर शरीराच्या प्रत्येक अवयवाचा व्यायाम करुन घेतो. त्यामुळे मन, शरीर आणि आत्मा संतुलित राहण्यासाठी नियमित योगाची गरज आहे तसेच ध्यान केल्यामुळे मनाची एकाग्रता वाढते. नियमितच्या कामामुळे नकळत ताण-तणावामुळे मनाची अवस्था बदलते. म्हणून मानसिक शांतीसाठी नियमित योगा करणे आवश्यक आहे.' असे सांगून 'योगा' चे फायदे सांगितले.

हा कार्यक्रम स्वेरीचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार यांच्या सहकार्याने, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा.सतीश मांडवे, इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्या उपस्थितीत पार पडला. प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# शौकिनांची चांदी... चॉईस नंबरची संधी

## सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयात दुचाकीसाठी नवीन मालिका सुरू; आकर्षक क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर. दि. २२ नोव्हेंबर -**

सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयात लवकरच दुचाकी मालिका सुरू करण्यात येत आहे. यामुळे व्हीआयपी, आकर्षक क्रमांकांच्या शौकिनांची चांदी होणार असून, यासाठी चांगली संधी निर्माण झाली आहे.

वाहनांची नवीन मालिका चालू होण्याच्या दिवशी प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणावर इच्छुकांची गर्दी होते व त्यामुळे कार्यालयीन व्यवस्थेवर त्याचा ताण पडतो. बऱ्याचवेळा नागरिकांनाही याचा त्रास होतो. नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा व त्यांना हवा असणारा आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध असल्यास त्यांना सुलभतेने तो मिळावा, यासाठी ज्या दुचाकी वाहन मालकांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहीत शुल्क भरुन हवे असतील त्यांनी २६ नोव्हेंबर रोजी वेळापत्रकानुसार कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते




दुपारी ४ या दरम्यान विहीत नमुन्यातील अर्जांमध्ये कार्यालयाच्या नवीन नोंदणी विभागात डीडी (केवळ क्र १६ अन्वये जारी झालेले डीडी), पत्याचा पुरावा, आधार लिंक मोबाईल नंबर, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह स्वत: जमा करावा.हा डीडी फक्त डीवाय आरटीओ सोलापूर यांच्या नावे नॅशनलाईज, शेड्युल्ड बँकेचा असावा. या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील.

अर्जासोबत केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ४ तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५ अमध्ये विहीत केलेल्या पत्त्याच्या पुराव्याची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक असेल. (उदा. आधार कार्ड, टेलिफोन बील इ.) एकाच नंबरकरिता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी २६ नोव्हेंबर रोजी दुपारी ५ वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. या यादीतील अर्जदारांना लिलावाकरिता जर जास्त रक्कमेचा डीडी जमा करावयाचा असेल त्यांनी सोबतच्या वेळापत्रकानुसार दर्शविलेल्या दिवशी (दि. २७ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत) सीलबंद लिफाफ्यात कार्यालयात जमा करावा. लिलावासाठी सदर केलेला डीडी ३०० रुपयांपेक्षा कमी रक्कमेचा नसावा.

सदर डीडी फक्त डी वाय आरटीओ सोलापूर यांच्या नावे नॅशनलाईज, शेड्युल्ड बँकेचा असावा. या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील. डीडी कमीतकमी एक महिना मुदतीमध्ये असावा. २७ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ४ वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या उपस्थितीत संबंधित अर्जदारांसमोर लिफाफा उघडून ज्या अर्जदाराने विनिर्दिष्ट शुल्कापेक्षा जास्तीतजास्त रकमेचा डीडी सादर केला असेल. त्यास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाईल.

### नोंदणीसाठी १८० दिवसांची मुदत

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून १८० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर करून वाहन क्रमांक प्राप्त करून घ्यावा. अन्यथा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकारजमा होईल. कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेली फी, कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही. वाहनधारकाने एका वाहनासाठी एकापेक्षा जास्त आकर्षक नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी कार्यालयात डीडी जमा केल्यास सदर बाबीस कार्यालय जबाबदार राहणार नाही, अशी माहिती सहायक प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# निराळे वस्ती, रंगभवन परिसरात अतिक्रमण हटाव

## महापालिकेने केले हातगाड्यांसह इतर साहित्य जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने यशोधरा हॉस्पिटल समोर ते रंग भवन आणि निराळे वस्ती परिसरात रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले. हातगाड्या, काउंटर व इतर साहित्य या मोहिमेत जप्त करण्यात आले.

महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. आज सकाळच्या सत्रात यशोधरा हॉस्पिटल समोर ते रंग भवन रस्त्यावरील हात गाड्या व फुटपाथ वरील अतिक्रमण काढण्यात आले. या मोहिमेत ६ हातगाड्या, लोखंडी पलंग , दोन लोखंडी वजन काटे, पडदे, स्पीकर व साहित्य जप्त करण्यात आले. तर दुपारच्या सत्रात निराळे वस्ती येथील रस्त्यावरील अडथळा ठरणारे अतिक्रमण हटविण्यात आले. या मोहिमेत एक लोखंडी काउंटर, जाहिरात बोर्ड व इतर साहित्य जप्त करण्यात आले. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे, मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.



### अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचा इशारा

सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.



# स्मार्ट रस्त्यांवरील दुभाजक झाले चकाचक

## महानगरपालिका प्रशासनाने हाती घेतली वृक्ष लागवड मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ नोव्हेंबर -**

शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या व्हीआयपी रोड, प्रमुख रस्त्यावरील दुभाजकांचा कायापालट झाला आहे. एरव्ही कचऱ्याने भरलेले दुभाजक आज चकाचक झाले असून, त्यांमध्ये वृक्ष लागवड केली जात आहे. महापालिका प्रशासनाने मोहीम हाती घेत शहरातील दुभाजकांचे चित्र पालटलेले दिसून येत आहे.

स्मार्ट सिटीतील रस्त्यांच्या मधोमध असणारे दुभाजक अस्वच्छ आणि तोडक्या मोडक्या स्थितीत होते. यामध्ये स्थानिक नागरिकांकडून नेहमी कचरा टाकला जायचा. त्यामुळे हा परिसर अस्वच्छ राहत असे, परंतु आता दृश्य बदलत आहे. अशोक चौक, गुरुनानक चौक ते महावीर चौक येथील दुभाजकांममध्ये स्वच्छता अभियान राबवले. त्यामधील माती काढून त्यानंतर काळी माती टाकून वृक्ष लागवड करण्यात आली आहे. स्वच्छता मोहीम शहरातील प्रत्येक रस्त्यांवर राबवली जाणार आहे. दुभाजक दुरुस्त करून त्यामध्ये वृक्षारोपण करण्यात येत आहे. अशी माहिती सोलापूर महानगरपालिकेच्या संबंधित विभागीय कार्यालयाकडून देण्यात आली.

### शहराच्या वैभवात पडणार आणखी भर

शहरातील अनेक दुभाजकांची दयनीय अवस्था आढळून येत आहे. अशा दुभाजकांची देखील दुरुस्ती करून त्यात वृक्षारोपण करण्यात करावे. यामुळे शहराच्या सौंदर्यात आणखीन भर पडेल.

# आंतर महाविद्यालयीन ज्युदो स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ नोव्हेंबर -**




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर महाविद्यालयीन ज्युदो स्पर्धेत येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयाने घवघवीत यश मिळविले. ही स्पर्धा के. एन. भिसे महाविद्यालय कुर्डूवाडी येथे नुकतीच पार पडली. या स्पर्धेत विद्यापीठातील एकूण आठरा महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या सहा विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्यापैकी चार विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

यामध्ये ७३ किलो वजनी गटात चंद्रिका बाबर बी.एस्सी भाग २ हिने प्रथम क्रमांक मिळविला. त्यामुळे तिची भोपाळ येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी वेस्ट झोन स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. तसेच जयदीप पवार ६० किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक, पवन रुपनर १०० किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक, दिव्यसाक्षी धोत्रे ५६ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन संजीव पाटील, प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, महाविद्यालय विकास समितीमधील सर्व सदस्य, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकवळस, उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षचे समन्वयक डॉ. अमर कांबळे व स्वायत्त महाविद्यालय समन्वयक डॉ. मधुकर जडल यांनी विशेष अभिनंदन केले.

या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा. विठ्ठल फुले, प्रा. मनोज खपाले व प्रा. अनिल परमार यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयीन क्षेत्रात सिनिअर विभागातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांनी विशेष कौतुक केले.

# गरजू रुग्णांसाठी ऑक्सिजन मशिनचे लोकार्पण

**सांगोला, दि.२२ नोव्हेंबर-**

सांगोला शहर व तालुक्यातील गरजू रुग्णांना आपल्या घरीच ऑक्सिजन घेता यावा यासाठी आपुलकी प्रतिष्ठानच्यावतीने ऑक्सिजन मशीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मशीनचा लोकार्पण कार्यक्रम आपुलकी प्रतिष्ठानच्या डॉक्टर सदस्यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी आपुलकीचे राजेंद्र यादव, संतोष महिमकर, डॉ.मच्छिंद्र सोनलकर, डॉ.संतोष पिसे, डॉ.सचिन गवळी, डॉ.अनिल कांबळे, अरविंद केदार, अरविंद डोंबे, अमर कुलकर्णी, महादेव बोराळकर, सुभाष शिंदे, रमेश देशपांडे, सुरेश चौगुले, प्रा.राजेंद्र सूर्यवंशी, अजयकुमार बाबर, रविंद्र कदम, संजय शेळके, प्रकाश महाजन, वैभव म्हेत्रे उपस्थित होते. नाममात्र शुल्क घेऊन ही मशीन रुग्णांना देण्यात येणार असल्याचे अध्यक्ष राजेंद्र यादव यांनी सांगितले. गरजू रुग्णांनी ऑक्सिजनच्या मशीनसाठी मो. ९४२३९६९६४४ या नंबर वर संपर्क साधावा असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# विज्ञान प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद

## वैज्ञानिक डॉ. अभय देशपांडे यांचे आज व्याख्यान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ व मराठी विज्ञान परिषद सोलापूर विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जुळे सोलापूर युनिक इंग्लिश मीडियम स्कूल येथे आयोजित विज्ञान प्रदर्शनास परिसरातील सर्व शाळांनी भेटी देऊन मोठ्या उत्साहात प्रतिसाद मिळाला आहे.

उद्या (शनिवारी) विज्ञान प्रदर्शनाचा अंतिम दिवस असून प्रदर्शनातील पारितोषिक विद्यार्थ्यांची नावे व बक्षीस वितरण सरस्वती विद्यामंदिर सोलापूर गणपती घाट येथे संध्याकाळी ६ वाजता होणार आहे. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे खगोल वैज्ञानिक डॉ. अभय देशपांडे यांचे विश्वाचे अंतरंग या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यामध्ये नाविन्यपूर्ण असे अनेक प्रयोग उपक्रम विद्यार्थ्यांनी उत्तमरीत्या सादरीकरण करून दाखवले. यातील सेन्सबेस टेक्नॉलॉजी, ग्रीन एनर्जी, प्लास्टिकचा कमीत कमी वापर, ध्वनी, हवा, पाणी यांचे प्रदूषण कसे कमी करायचे याचा उपाय, सॉईल पोलुशन, वॉटर पोल्युशन यावरील उपक्रम पाहिल्यानंतर मुलांना पोलुशन कमी करण्याबद्दलचा विचारांचे सादरीकरण करून दाखवले. आपल्या जिल्ह्यातील कंबर तलावातील जलपर्णी कमी करण्याचा उपाय त्यांनी प्रयोगांच्या माध्यमातून सादर केले. सध्य परिस्थितीत ऑरगॅनिक फार्मची आवड निर्माण होत आहे हे अनुभव या विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांना पहावयास व शिकण्यास मिळाले.

# जिल्ह्यात २ लाख हेक्टरवर ज्वारीची पेरणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील ११ तालुक्यात यंदा मुबलक पाऊस झाल्याने रब्बी हंगामातील पेरण्या लांबल्या असल्या तरी यंदा रब्बीचे क्षेत्र आणि उसाचे क्षेत्र वाढणार असल्याची गुड न्युज जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी शुक्रवारी (दि. २२) दिली. दरम्यान, आजतागायत जिल्ह्यात सरासरी ७० टक्के पेरणी झाली असून, रब्बी ज्वारीचे क्षेत्र २ लाख हेक्टरपर्यंत पेरून झाल्याचेही त्यांनी सांगितले.

दुष्काळी स्थितीमुळे गतवर्षी ऊस क्षेत्र कमी झाल्याने यंदा साखर कारखाने कमी क्षमतेने चालणार आहेत. ऊस कमी असल्याने सर्वच कारखान्याचा पट्टा लवकर पडणार आहे. मात्र यंदा मोठ्या प्रमाणात ऊस लागवड होत असल्याने आगामी वर्षात उशिरापर्यंत कारखान्यांचे ऊस गाळप चालणार आहे. तसा तर रब्बीसाठीच आपला जिल्हा पोषक असतो. मंगळवेढा, पंढरपूर भागात ज्वारी मोठ्या प्रमाणात येते. यामुळे या भागाला ज्वारीचे कोठारही म्हटले जाते. आता खरिपाचाही पाऊस मोठ्या प्रमाणात जिल्ह्यात पडत असल्याने सोयाबीन पीक सर्वच तालुक्यात घेण्यात येत आहे. ज्वारीपिक दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मोहोळ व इतर तालुक्यातही घेतात. चांगला पाऊसकाळ झाल्याने यंदा ज्वारीचे क्षेत्रही वाढणार आहे. यंदा परतीचा पाऊस उशिरापर्यंत थांबल्याने जमिनीचा वापसा लवकर झाला नाही. यामुळे दिवाळीनंतरच शेतकऱ्यांनी तिफणीवर हात ठेवला. यामुळे आजही अनेक भागात पेरणीमध्ये शेतकरी गुंग असल्याचे दिसून येत आहे. एकीकडे पेरणीची लगबग आणि दुसरीकडे विधानसभा निवडणुकीचा धुराळा यंदा दिसून आला. ज्यांची लवकर पेरणी झाली अशा काही भागात ज्वारी पिके डोलू लागली असून, यंदा हुरडा पार्ट्या चांगल्याच रंगणार असल्याचे चित्र आहे. काही भागात लवकर पेरण्या झाल्याने त्या भागातील ज्वारी पिके गुडघ्याला लागत आहेत, त्यांनी आंतरमशागतीही चालू केल्या आहेत. तर काही ठिकाणी अजून पेरण्या चालूच आहेत.

### ज्वारी, गहू, हरभरा, कांद्याचा पेरा वाढला

ज्वारीबरोबर, यंदा गहू, हरभरा, कांदा पिकांचाही टक्का वाढला आहे. खरिपामध्ये अतीपावसाने काही भागात पिकांचे नुकसान झाले मात्र आता पाऊस थांबल्याने रब्बीची पिके शेतकऱ्यांच्या पदरात पडतील आणि जिल्ह्यातील रब्बी हंगामाचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात निघेल, असा आशावाद कृषी खात्याने व्यक्त केला.



# पंढरपूरच्या खवय्यांनी मतदान करुन घेतली बिलामध्ये सवलत

## मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद; श्री विठ्ठल कृपा स्वीटस् अँण्ड बेकर्स असोसिएशनचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ नोव्हेंबर -**

पंढरपूर शहर व तालुक्यातील खवय्या ग्राहकांसाठी पंढरपूरच्या ४५ हॉटेल चालकांनी मतदान करून मतदानाची निशाणी दाखवल्यानंतर त्या दिवशी त्यांच्या हॉटेलमधील बिलात १० टक्क्यांची भरघोस सूट देण्याचा निर्णय घेतला होता. या त्यांच्या स्तुत्य निर्णयाला खवय्या ग्राहकांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभला. अनेक ग्राहकांनी या चांगल्या उपक्रमासाठी सहभागी हॉटेल व्यवसायिकांचे आभार मानले

येथील श्री विठ्ठल कृपा स्वीटस् बेकर्स हॉटेल्स असोसिएशनच्या वतीने मतदानानिमित्त खाद्यपदार्थांवर दहा टक्के सवलत देण्याचा निर्णय पंचेचाळीस हॉटेल धारकांनी घेतल्याने खवय्यांसाठी पर्वणीच ठरली. मतदान करा आणि सवलत असलेल्या हॉटेलमध्ये उपलब्ध असलेल्या ४० विविध खाद्यपदार्थांवर दहा टक्के बिलात सवलत मिळवा अशी ही योजना पंढरपूर शहर व तालुक्यातील खवय्यांसाठी मतदानाचा टक्का वाढावा व लोकशाही बळकट व्हावी या उदात्त हेतूने प्रेरित होऊन घेतल्याचे पांडुरंग बापट यांनी सांगितले.



विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान झाले. मतदानासाठी सदर उपक्रमातून जनजागृती झाली, याचा लाभ असंख्य खवय्यां ग्राहकांनी घेतला. हल्ली मतदानाचा टक्का घटू लागला आहे. मतदानाचा टक्का वाढावा यासाठी विविध संस्था, संघटना आणि व्यक्तींकडून जनजागृती करण्यात येत आहे. त्या अंतर्गतच पंढरपुरातील श्री विठ्ठल कृपा स्वीटस् बेकर्स अँण्ड हॉटेल्स असोसिएशनने मतदान केलेल्या प्रत्येक खवय्या ग्राहकांना मतदानाच्या दिवशी त्याने केलेल्या हॉटेलच्या बिलामध्ये दहा टक्के सवलत देण्यात आली. हॉटेल हॉटेल असोसिएशनच्या या उपक्रमात शहरातील विविध ४५ हॉटेलचे मालक सहभागी झालेले होते. या सर्व हॉटेलच्या ठिकाणी मतदारांचे मतदान केल्या बद्दल आभार देखील मानण्यात आले. मतदारांनी देखील हॉटेल व्यवसायीकांनी राबविलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले.

खवय्या ग्राहकांचा मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता अशा प्रकारचे विविध उपक्रम यापुढेही देखील राबवण्याचा निर्णय आमच्या हॉटेल असोसिएशन कडून घेण्यात आलेला आहे.

**- पांडुरंग उर्फ आबा बापट,** मालक,
श्री विठ्ठल कृपा स्वीटस् बेकर्स

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## अक्कलकोटमध्ये मतमोजणीसाठी तगडा पोलिस बंदोबस्त

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ नोव्हेंबर-**

महाराष्ट्रातील लोकशाही उत्सवाचा आज निकाल लागणार आहे. अक्कलकोट विधानसभा निवडणुकीकरिता झालेल्या मतदानाची मतमोजणी अक्कलकोट तहसिल कार्यालय येथे शनिवारी सकाळी ८ पासून होत आहे. याकरिता एसआरपी कर्मचारी ३०, बीएसएफ ८०, पोलीस कर्मचारी ८०, पोलीस अधिकारी दहा तैनात करण्यात आले आहेत.



मतमोजणीसाठी सर्व यंत्रणा सज्ज असून सकाळी ८ वाजता मतमोजणीस प्रारंभ होणार आहे. याकरिता ईटीपीबीएस मतमोजणी टेबल सात असून मतमोजणी टेबल सोळा आहेत. मतमोजणीच्या पंचवीस फेऱ्या होतील. मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी कर्मचारी संख्या २०५ आहे. पोलीस अधिकारी, पोलीस, एसआरपी, बीएसएफ असे एकूण ३६५ अधिकारी, कर्मचारी लोकशाहीचा उत्सव अंतिम टप्प्यात पूर्णत्वास नेण्यासाठी योगदान देत आहेत.

## मोहोळमध्ये २४ फेऱ्यांमध्ये फैसला

### १४ टेबलची व्यवस्था; तहसीलदार सचिन मुळीक यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २२ नोव्हेंबर-**

उद्या होणाऱ्या मतमोजणीसाठी एकूण २४ फेऱ्यांमध्ये मतमोजणी होणार असून पुरेशा संख्येने कर्मचारी वर्ग तैनात करण्यात आल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार सचिन मुळीक यांनी दिली.

ही मतमोजणी टेलिफोन कार्यालयाजवळ असलेल्या धान्य गोडाऊनमध्ये होईल. यासाठी तयारीची माहिती ते म्हणाले, सकाळी आठ वाजता मतमोजणीला सुरुवात होईल. पहिल्यांदा टपाली मतदान मोजले जाईल. या मतमोजणीसाठी १४ टेबलची व्यवस्था केली असून याद्वारे २४ फेऱ्या होणार आहेत तर पोस्टल मतमोजणीसाठी ७ टेबल, आणि इटीपीबीएस (इलेक्ट्रॉनिकली ट्रान्समिटेड पोस्टल बॅलेट सिस्टीम) साठी २ टेबलद्वारे मोजणी केली जाणार आहे. मतमोजणी प्रक्रियेत एका टेबलला ३ कर्मचारी व १ अधिकारी असे एकूण ५६ कर्मचारी तर पोस्टलसाठी ३० कर्मचारी, अधिकारी इटीपीबीएससाठी ८ कर्मचारी, ईव्हीएम मशिनची ने-आण करण्यासाठी ५० कर्मचारी सिलिंग करण्यासाठी ३० कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे. तसेच या सर्व यंत्रणेला राखीव ११० टक्के कर्मचारी ठेवले आहेत. मतमोजणी शांततेत पार पाडण्यासाठी १३ पोलिस अधिकारी १०० पोलिस कर्मचारी, एक दंगा काबू पथक, तसेच शहर परिसरात पेट्रोलिंग करण्यासाठी एक पथक, मतमोजणी परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. ही निवडणूक शांततेत पार पाडण्या साठी निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन मुळीक, नायब तहसीलदार सुधाकर धाईजे, नायब तहसीलदार अनिल शहापुरे, मंडल अधिकारी प्रकाश दळवी, मंडळ अधिकारी जे. एफ. नदाफ, निवडणूक महसूल सहाय्यक अजित वाघमोडे प्रयत्नशिल आहेत. तसेच शुक्रवार २२ रोजी मतमोजणी निवडणूक निरीक्षक दर्शनाबीन भागलानी यांनी मतमोजणी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. मतमोजणी केंद्रापासून १०० मीटर परिसरात पादचारी मार्ग तालुका कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी घोषित केला आहे.

या मतदारसंघांमध्ये २ लाख ३० हजार ८४४ जणांनी मतदान केले. त्यात १,२३,६८९ पुरुष आणि १,०७,१५५ महिला मतदार आहेत. साधारणपणे ६९.६५ टक्के एवढी टक्केवारी होते. महायुतीचे विद्यमान आ. यशवंत माने यांच्याविरुद्ध महाविकास आघाडीचे राजाभाऊ खरे अशी प्रामुख्याने लढत झाली भाजपातून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश करून तिथले तिकीट न मिळालेले लोकसेवक संजय क्षीरसागर यांनी बंडखोरी करून फॉर्म ठेवला होता. मात्र अखेरच्या दिवशी त्यांनी खरे यांना पाठिंबा दिला खरा. पण त्यांचे नाव मतपत्रिकेमध्ये आलेलेच आहे. या तीन जणाशिवाय १० जण आणि नोटांमध्ये सामना झाला. आता घड्याळाची टिकटिक चालणार की तुतारी वाजणार याकडे मतदार संघाचे लक्ष लागून राहिले आहे.

### अफवा पसरविल्यास कारवाई करणार

नागरिकांनी चुकीच्या अफवा पसरवू नये. कोणत्याही खोट्या अफवांना बळी पडू नये, निवडणूक आयोगाची प्रतिमा मालिन होऊन लोकशाही व लोकांच्या मनात संभ्रम निर्माण होण्याची शक्यता असते असे आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल. पारदर्शक मतमोजणीची प्रशासनाकडून प्रक्रिया सुरू आहे. ईव्हीएम मशीन हे कोणत्याही नेटवर्कला कनेक्ट होत नाही. चुकीची माहिती व्हायरल करू नयेत, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर यांनी केले.

## विधानसभा निवडणूक काळात गुन्हेगारी प्रवृत्तींवर आळा; वळसंग पोलिस ठाण्याची कामगिरी

# गर्दीवर वर्दीचे वचक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर, अक्कलकोट हे दोन विधानसभा मतदारसंघ, दोन राष्ट्रीय महामार्ग, संवेदनशील कुंभारी, कॉ. गोदुताई परुळेकर विडी घरकूल आणि ३६ गावांची हद्द यावर नियंत्रण ठेवणे फार जिकिरीचे. यंदा या सर्व आव्हानांवर ताभा मिळवत वळसंग पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अनिल सनगल्ले यांनी थेट आणि नीट नियोजन करत गुन्हेगारांच्या गर्दीवर वर्दीचे वचक ठेवले आणि नेहमीच वादग्रस्त असलेल्या हद्दीत यंदा शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. यामुळे जिल्हा प्रशासनाने सुटकेचा निश्वास सोडला.

चोऱ्या, खून, मारामारी, सतत वाढणारी गुन्हेगारी, विडी घरकूलमध्ये दिवसागणिक वाढत असलेली लोकसंख्या, त्यात रे-नगरची पडलेली भर. सोलापूर-हैदराबाद, सोलापूर-अक्कलकोट राष्ट्रीय महामामार्गामुळे वाढलेली वाहतूक अन्‌ ताण, सिमेंट कारखाने, साखर कारखाने आणि ऊस वाहतूक त्यात चोहोबाजूंनी पसरलेली मोठी हद्द, वाड्या, वस्त्या, तांडे यावर निवडणूक काळात नियंत्रण ठेवणे पोलिसांसाठी फारच आव्हानात्मक. २०१४ विधानसभा निवडणूक काळात विडी घरकुल हद्दीत दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे माजी विरोधी पक्षनेते गुरुनाथ कटारे यांचा खून झाला होता. यामुळे निवडणूक काळात नेहमीच वळसंग पोलिस ठाण्यासमोर मोठे आव्हान निर्माण होते. अवैध धंद्यांसाठी कुंभारीसह विडी घरकूल, एनटीपीसी परिसर, होटगी यासह अन्य गावे कलंकित झाली आहेत. पक्षांची फोडाफोडी, नेत्यांची बंडखोरी, कार्यकर्त्यांचा वाढलेला उत्साह यामुळे वळसंग पोलिस ठाण्याच्या हद्दीत शांतता व सुव्यवस्था आबाधित ठेवण्याबाबत अनेकांच्या मनामध्ये शंका निर्माण होतात. मात्र या सर्व शंका, आव्हानांवर मात करत प्रभारी अधिकारी अनिल सनगल्ले यांनी योग्य नियोजन करुन विधानसभा निवडणूक शांततेत पार पाडली.

कायदा व सुव्यस्था आबाधित ठेवण्यासाठी सपोनि अनिल सनगल्ले यांच्याबरोबर तीन अधिकारी, ६० पोलिसांचा फौजफाटा, सीएपीएफ, एसएसबी, बीएसएफच्या तुकड्यांसह खडा पहारा ठेवला. त्यात पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अक्कलकोट उपविभागीय पोलिस अधिकारी विलास यामावार यांनी कुंभारीसह अनेक गावांना भेटी देऊन मार्गदर्शन केले. गुन्हेगारांना सूचक इशारे दिले. याचाही फायदा वळसंग हद्दीत शांतता राखण्यास झाला. याशिवाय निवडणूक काळात गोपनीय यंत्रणा विविध पद्धतीने कार्यान्वित असल्याने गुन्हेगारांच्या हालचाली टिपता आल्या आणि त्यांच्यावर कारवाई करणे सुलभ झाले. अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील २२ आणि दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील १४ गावांना वारंवार भेटी देऊन नागरिकांसह गुन्हेगारांना सपोनि अनिल सनगल्ले यांनी आदर्श नागरिकत्वाचे धडे दिले. यामुळे तंटे, वाद, भांडण यासह अन्य अनुचित प्रकाराचे एकही गुन्हा दाखल न होता यंदाची विधानसभा निवडणूक प्रक्रिया पार पडली. या कालावधीत प्रतिबंधात्मक कारवाई करत अनेकांना बेड्या ठोकल्या. तडीपार केले. अवैध वाहतूक होणाऱ्या दारुवरही नियंत्रण मिळवत गुन्हे दाखल केले.



दोन विधानसभा मतदारसंघात विभागलेल्या वळसंग पोलिस ठाण्याचा विस्तार फार मोठा आहे. त्यात ३६ गावे, विडी घरकूल, रे-नगरचा समावेश आहे. यंदा वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार योग्य नियोजन केल्याने निवडणूक प्रक्रियेला गालबोट लागले नाही. सहकाऱ्यांबरोबरच केंद्रीय सुरक्षा बलाच्या तुकड्यांनीही मोठे योगदान दिले आहे.

**- अनिल सनगल्ले,** प्रभारी अधिकारी, पोलिस ठाणे, वळसंग

### निवडणूक काळातील कारवाई

| | |
|---|---|
| प्रतिबंधात्मक कारवाई | ५६० |
| तात्पुरती तडीपार | ७ जण |
| दोन वर्षांसाठी तडीपार | ३ जण |
| तडीपार प्रस्ताव | ५ जण |
| दारुबंदी गुन्हे | ५१ |

दारुचा मुद्देमाल जप्त ४ लाख २७ हजार ९६५

### कुंभारीत मतदान केंद्रांना स्वतंत्र ओळख

कुंभारी येथे एकाच ठिकाणी तब्बल २० हजार मतदारांना मतदान करण्यासाठी व्यवस्था असते. यामुळे नेहमी गर्दी होऊन वादावादीचे प्रसंग उद्भवायचे. यंदा मात्र सपोनि अनिल सनगल्ले यांनी मतदान केंद्रांना स्वतंत्र ओळख निर्माण करुन देत त्या-त्या केंद्रांसाठी बॅरिगेटिंग केल्याने गर्दीवर नियंत्रण मिळविणे, वादावादी टाळण्याबरोबरच मतदारांना सुलभ मतदान करण्यासाठी मदत झाली. पोलिसांच्या फौजफाट्यासह केंद्रीय सुरक्षा बलाच्या विविध तुकड्यांबरोबर सहा गावांत रुट मार्च काढण्यात आले. याचाही चांगला परिणाम झाला.

## करमाळा मतदारसंघात यंदाही 'टफ फाईट'

### आबा, मामा की प्रिन्स आज फैसला

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २२ नोव्हेंबर**

करमाळा विधानसभा निवडणुकीत करमाळा तालुक्यातील जनता सतत नवीन व धक्कादायक निकाल देत असते. यंदाही करमाळा विधानसभेसाठी अशीच टफ फाईट दिसून येणार आहे. संपूर्ण राज्याचे लक्ष लागून रहिलेल्या या मतदारसंघात कोण बाजी मारणार हे कोणीही सांगण्याचे धाडस करणार नाही. करणं येथे महाविकास आघाडीचे नारायण पाटील व अपक्ष उमेदवार आ. संजयमामा शिंदे यांच्यात चरशीची लढत पहायला मिळणार आहे. त्यातच महायुतीचे उमेदवार दिग्विजय बागल यांनीही तगडे आव्हान उभे केले आहे.

रामदास झोळ हे कोणाचे मताधिक्य कमी करणार यावर निकालाची सूत्रे ठरणार आहेत. या मतदारसंघात एकूण ३ लाख २८ हजार ९९४ इतक्या मतदारा पैकी २ लाख २९ हजार ३७५ मतदारांनी मतदान केले आहे. एकूण ६९.७२ टक्के मतदारांनी मतदान केले आहे. करमाळा तालुक्यातील १०८ गावे तर माढा तालुक्यातील ३६ गावांचा समावेश आहे. गेल्या वेळेस ३६ गावांतील भरघोस मताधिक्याने आ. संजयमामा शिंदे यांनी बाजी मारली होती. यंदा ते तिथे किती लीड घेतात यावर त्यांचे भवितव्य अवलंबून आहे. मात्र यंदा ३६ गावात अपेक्षित मतदान झाले नाही. ६७ टक्के मतदान हा आकडा कमी आहे तर महाविकास आघाडीचे शरद पवार गटाचे उमेदवार नारायण पाटलांना बड्या नेत्यांनी केलेला प्रचार, मोहिते-पाटलांची साथ व करमाळ्यातील जयवंतराव जगताप व सावंत गटाची हातमिळवणी किती फायद्याची ठरणार यावर त्यांचा विजय ठरणार आहे. दिग्विजय बागल यांना शिवसेना शिंदे गटाने उमेदवारी दिल्याने व स्वतः मुख्यमंत्री करमाळ्यात प्रचाराला आल्याने व दिगंबर बागल यांच्यावरील सहानुभूतीने बागलही रेसमध्ये आहेत. मात्र लाडकी बहीण योजनेचा फायदा त्यांना विजयाच्या समीप घेऊन जाईल का? हे सांगणे कठीण आहे.



### चुरशीने निवडणूक

अपक्ष उमेदवार रामदास झोळ यांनीही आपली पहिलीच निवडणूक ताकदीने लढले आहेत. मात्र जरांगे-पाटील फॅक्टर त्यांना तितकासा लाभदायक ठरताना दिसला नाही. यंदाची निवडणूक ही अत्यंत चरशीची निवडणूक ठरणार आहे. सर्वच उमेदवारांनी आपला प्रचार मोठ्या ताकदीने केला आहे. ही निवडणूक अत्यंत चुरशीची असल्याने यात कोण आमदार होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## माळशिरस विधानसभेची उत्कंठा शिगेला?

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २२ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागण्याला अवघा काही तासांचा कालावधी शिल्लक राहिला आहे. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार येणार की महाविकास आघाडीचे सरकार येणार याची उत्कंठा शिगेला पोहचली असताना माळशिरस विधानसभा निवडणुकीत भाजपाचे विद्यमान आमदार रामभाऊ सातपुते व राष्ट्रवादीचे उत्तमराव जानकर यांच्यातच मुख्य लढत होत आहे. यंदा कोण विजयी होणार याबाबत उत्कंठा शिगेला पोहचली आहे.

यामध्ये इतर बारा उमेदवारही आपले नशीब अजमावून पाहत आहेत.लोकसभा निवडणुकीपासून माळशिरस तालुक्याची सर्व राजकीय समीकरणे बदलली आहेत. एकमेकांचे हाडवैरी असणारे मोहिते-पाटील गट व उत्तमराव जानकर यांनी आपली दुश्मनी संपवून एकत्र येण्याचा निर्णय घेतला. यामुळे प्रमुख विरोधी गट एकत्र आल्यामुळे राजकीय वातावरण पूर्णपणे बदलले आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपाने पुन्हा एकदा आमदार रामभाऊ सातपुते यांना उतरवले असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटातून उत्तमराव जानकर या दोघांमध्ये लढत होत आहे. उत्तमराव जानकर यांच्यासाठी मोहिते-पाटील कुटुंबातील खा. धैर्यशील मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, अर्जुनसिंह मोहिते-पाटील, स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांनी संपूर्ण तालुक्यात प्रचार केला तर भाजपाकडून तालुक्यातील सर्वच पदाधिकाऱ्यांनी प्रचार केला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी राम सातपुते यांच्या प्रचारार्थ अकलूज येथे सभा घेतली. प्रचारात उत्तम जानकर यांच्यावर जातचोर, कारखान्याचे शेअर्स असे अनेक विषय आहे तर राम सातपुते यांच्यावर टक्केवारीचा आरोप करण्यात आला. आरोप-प्रति आरोपांच्या फैरी थांबल्या असून आता उद्याच्या निकालाकडे लक्ष लागले आहे. रतालुक्यात एकूण तीन लाख ४९ हजार ५६८ एवढे मतदान आहे. यापैकी २ लाख २९ हजार ६६९ एवढ्या मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला असून तालुक्यात ६८.९० टक्के एवढे मतदान झाले आहे. सुरुवातीला सोपी वाटणारी लढत अंतिम टप्प्यात मोठी चुरशीची झाली. यामुळे या मतदारसंघात कोण बाजी मारणार याकडे तालुक्यातील मतदारांचे लक्ष लागले आहे.





## यंदा अक्कलकोटमध्ये मतदान टक्केवारीत वाढ

### प्रबोधन मंच अक्कलकोटच्या प्रयत्नाला यश

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ नोव्हेंबर-**

अक्कलकोट तालुक्यात प्रबोधन मंचच्या माध्यमातून गत महिन्याभरापासून तालुक्यातील वाड्या, वस्त्या, तांडा येथे मतदानासाठी आवाहन करीत शिबीर राबविण्यात आले. या प्रयत्नाला मोठे यश मिळत मतदान टक्केवारीत वाढ झाली आहे.

तालुक्यातील १३५ गावे, वाड्या-वस्त्यामध्ये घरोघरी जाऊन देशहितासाठी १०० टक्के मतदान करा, जाती, भाषा, नेता या क्षणिक स्वार्थाचा विचार न करता राज्याची सुरक्षा, शाश्वत विकास, आरोग्य योजना, शैक्षणिक सुविधा, विचारधारा या मुद्यांचा विचार करून १०० टक्के मतदान करा असे आवाहन करून पत्रक वितरणाचे काम प्रत्येक गावातील विचार परिवारातील कार्यकर्त्यांच्या माध्यमातून प्रबोधनाचे, मतदार जागृतीचे कार्य जोमाने झाले आहे. लोकसभेला मतदानाची टक्केवारी कमी झाली तसे विधानसभेला होऊ नये म्हणून अक्कलकोट तालुक्यात प्रबोधन मंच्याच्या माध्यमातून गावागावात कॉर्नर बैठका, मतदार जागृती पर व्याख्यान, घरोघरी पत्रक वितरण, वैयक्तिक संपर्क, प्रत्यक्ष मतदान दिवशी प्रत्येक मतदाराकडून मतदान घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे अश्या विविध पद्धतीने कार्यकर्ते कामे केल्याने यंदा मतदानाची टक्केवारीत वाढ झाली आहे असे मत प्रबोधन मंचाचे संयोजक तम्मा शेळके यांनी व्यक्त केली आहे. या कामासाठी संघ विचार परिवारातील अक्कलकोट शहरातील व ग्रामीण भागातील शेकडो कार्यकर्ते मागील १ महिन्यापासून परिश्रम घेतल्याने मतदान टक्केवारीत वाढ़ झाल्याने कार्यकर्ते आनंद व्यक्त करत आहेत.




# बार्शी विधानसभा मतमोजणीसाठी तयारी पूर्ण

### सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची माहिती; २४ फेऱ्यांत प्रक्रिया होणार पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ नोव्हेंबर-**

बार्शी विधानसभा मतदारसंघ (क्रमांक २४६) सार्वत्रिक निवडणुकीच्या मतमोजणीसाठी प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली आहे. आज सकाळपासून सुरु होणाऱ्या मतमोजणी प्रक्रियेबाबत सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार एफ. आर. शेख यांनी माहिती दिली. मतमोजणी २४ फेऱ्यांमध्ये पार पडणार असून, प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी १५० कर्मचारी आणि कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

बार्शी विधानसभा मतमोजणीसाठी एकूण २४ फेऱ्या होणार आहेत. यासाठी १४ ईव्हीएम टेबल्स आणि १० पोस्टल मतपत्रिकांसाठी स्वतंत्र टेबल्स ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक टेबलवर तीन प्रमुख कर्मचारी असणार आहेत. सुपरवायझर संपूर्ण फेरीचे व्यवस्थापन पाहणार. सहाय्यक-तांत्रिक बाबी हाताळणार. मायक्रो ऑब्झर्व्हर-पारदर्शकतेसाठी प्रक्रिया देखरेख करणार. मतमोजणीचे पहिले टप्पे वेळखाऊ असल्यामुळे पहिल्या फेरीला साधारणतः २ तास लागतील. त्यानंतर प्रत्येक पुढील फेरी ३० मिनिटांत पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे. मतमोजणी वेळापत्रक सकाळी ८ वाजता पोस्टल मतपत्रिकांची मोजणी सुरु होईल. ८.३० वाजता ईव्हीएम मतमोजणीला प्रारंभ होईल.

प्रत्येक फेरी पूर्ण झाल्यावर संबंधित निकाल जाहीर केला जाईल. सुरक्षा आणि नियोजन मतमोजणी केंद्रामध्ये कडक सुरक्षा उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. सीसीटीव्ही देखरेखः मतमोजणी कक्ष आणि परिसर सीसीटीव्ही कॅमेऱ्याखाली असेल. अधिकृत ओळखपत्राशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. मतमोजणी केंद्र आणि परिसरात पोलीस तैनात असतील. मतमोजणीसाठी विशेष नियंत्रण कक्ष कार्यरत असेल. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सर्व उमेदवार, राजकीय पक्ष, आणि जनतेला शांतता राखण्याचे आवाहन केले आहे. मतमोजणी प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने पार पडेल आणि निवडणूक आयोगाच्या सर्व नियमांचे पालन केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



### निकालाकडे सगळ्यांचे लक्ष

बार्शी विधानसभा निवडणुकीचे निकाल येताच मतदारसंघाचा पुढील राजकीय प्रवास ठरवला जाईल. उमेदवारांसाठी हा निर्णायक क्षण असताना, बार्शीकरांचे लक्ष निकालांकडे लागले आहे. प्रशासनाने निवडणूक प्रक्रियेत कोणतीही त्रुटी होऊ नये यासाठी विशेष काळजी घेतली आहे.

धाराशिव
# दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## रस्ता अपघात एकाचा मृत्यु; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**
शेतातून घराकडे पायी जात असताना मोटारसायकलच्या धडकेत एकाचा मृत्यु झाल्याची घटना सुंभा ते आरणी रोडवर घडली आहे. याप्रकरणी ढोकी पोलीसात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी की, मयत शिवाजी गणपती मुसळे (वय ३६, रा. आरणी ता.जि. धाराशिव) हे दि.१६ नोव्हेंबर रोजी शेतातुन घराकडे पायी जात होते. दरम्यान आरणी गावातील परेश शहाजीराव यांचे शेताजवळ सुंभा ते आरणी रोडवर मोटारसायकल (क्र एमएच २५/बीबी २००४) चा चालक दयानंद माणिक पवार (वय ३०, रा. आरणी ता.जि. धाराशिव) यांनी त्याचे ताब्यातील मोटरसायकल ही हायगयी व निष्काळजीपणे चालवून शिवाजी मुसळे यांना पाठीमागून धडक दिली. या अपघातात शिवाजी मुसळे हे गंभीर जखमी होवून मयत झाले. याप्रकरणी फिर्यादी सतीश गणपती मुसळे (वय २८, रा. आरणी ता.जि. धाराशिव) यांनी दि.२१ नोव्हेंबर रोजी दिलेल्या तक्रारीवरुन ढोकी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### खानापुर येथे चोरट्यांनी मारला डल्ला; लाखो रुपयांचा मुद्देमाल लंपास

**इटकळ, दि.२२ नोव्हेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील खानापुर येथे बुधवार दि.२० रोजी रात्रीच्या सुमारास घरात कोणी नसल्याचा फायदा घेत चार घरातील मुद्देमाल लंपास करण्यात आला आहे. येथील आलमबाशा हुसेन मुजावर हे पत्नीसह शेतात पाणी देण्यासाठी गेले होते तर मुले कामासाठी सोलापूर येथे गेल्याने घरी कोणी नसल्याचा फायदा घेत त्यांच्या घरातील कपाट फोडून मुलाच्या लग्नासाठी ठेवलेली ३ लाख २६ हजार ५०० रोख रक्कम, दिड तोळे सोन्याचे दागिने व चांदीचे २० तोळे दागिने लंपास केले. यासह शेजारच्या संजय साबाय्या तेलंग हे पत्नीसह नातेवाईकाकडे गेले होते याची संधी साधून त्यांच्या घराचे कुलूप तोडून घरातील एक तोळे सोन्याचे दागिने, तीस हजार रोख रक्कम लांबवली. जवळच्या रहेमतबी महेबुब व्होगे यांच्या घरातील लाकडी कपाटातून आठ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. याबाबत पोलिसांकडून श्वान पथकास पाचारण करण्यात आले आहे.



### राष्ट्रीय इनलाईन हॉकी स्पर्धेसाठी संघरत्न नगदे यांची निवड

**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**
धाराशिव येथील संघरत्न सुभाष नगदे याची तामिलनाडू राज्यातील कोईंबतूर येथे होणाऱ्या ६२ व्या राष्ट्रीय इनलाईन हॉकी स्पर्धेकरिता महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे. त्याच्या या निवडीबद्दल शुक्रवार २२ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी नायब तहसीलदार सचिन पाटील, लघुपाटबंधारे विभागातील जलसंधारण अधिकारी सुभाष नगदे उपस्थित होते.



### मानमोडी शाळेस हॅलोतर्फे पुस्तकांचे वाटप

**इटकळ, दि.२२ नोव्हेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मानमोडी शाळेस हॅलो फाउंडेशन, अणदूर यांच्यावतीने विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून विद्यार्थ्यांना वाचनाची अधिक गोडी निर्माण व्हावी. यासाठी नोबल पारितोषिक विजेत्या मलाला, सामर्थ्य आहे चळवळीचे, साधना, लिंगभाव मानवी हक्क व कायदे, लिंगभाव लैंगिकता हिंसाचार आणि आरोग्य अशी अनेक प्रकारची विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी पुस्तके देण्यात आली. यावेळी हॅलो फाउंडेशन, मानमोडी गावातील समन्वयक ललिता पवार, मुख्याध्यापक विक्रम पाचंगे, सुचिता चव्हाण व प्रवीण गायकवाड तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. हॅलो फाउंडेशनच्यावतीने घेण्यात येणारे उपक्रमाविषयी पाचंगे यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

## महासत्तेचा आज फैसला...
# मतमोजणीसाठी जिल्ह्यात तगडा पोलीस बंदोबस्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**
महाराष्ट्राच्या सत्ताकारणाचा आज फैसला होणार असून त्या अनुषंगाने जिल्ह्यातील धाराशिव-कळंब, उमरगा-लोहारा, भूम-परंडा-वाशी आणि तुळजापूर विधानसभा मतदारसंघात आज (दि.२३) मतमोजणी होणार असून यासाठी जिल्ह्यातील चारही मतमोजणी केंद्रावर पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

धाराशिव जिल्ह्यात विधानसभा मतमोजणी अनुषंगाने लावण्यात आलेला पोलीस बंदोबस्त दि.२३ नोव्होंबर रोजी धाराशिव जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघ उमरगा- २४०, तुळजापूर- २४१, उस्मानाबाद- २४२ व परंडा- २४३ मतमोजणी असल्याने मतमोजणी शांततेत व भयमुक्त वातावरणात पार पडण्याकरीत , कोणतीही अप्रिय घटना घडु नये, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निमार्ण होवू नये याकरीता जिल्ह्यामध्ये बंदोबस्तकामी ०५ पोलीस उप अधीक्षक, १७ पोलीस निरीक्षक, १०० सपोनि., पोउपनि पोलीस अधिकारी तसेच १ हजार ४९४ पोलीस अमंलदार व १ हजार ४४२ होमगार्ड तसेच निम्नलष्करी दलाच्या कंपन्या असा बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. धाराशिव जिल्ह्यातील ४ मतदार संघात लावण्यात आलेला बंदोबस्त खालील प्रमाणे उमरगा- २४० येथे ०१ पोलीस उप अधीक्षक, ३ पोलीस निरीक्षक, १७ सपोनि, पोउपनि पोलीस अधिकारी, तसेच ३३२ पोलीस अमंलदार व ३०५ होमगार्ड असा बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. तुळजापूर- २४१ येथे १ पोलीस उप अधीक्षक, ४ पोलीस निरीक्षक, २३ सपोनि, पोउपनि पोलीस अधिकारी तसेच ३७३ पोलीस अमंलदार व ३८४ होमगार्ड असा बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. उस्मानाबाद- २४२ येथे २ पोलीस उप अधीक्षक, ६ पोलीस निरीक्षक, ३० सपोनि, पोउपनि पोलीस अधिकारी, तसेच ४०१ पोलीस अमंलदार व ३८६ होमगार्ड असा बंदोबस्त लावण्यात आलेला आहे परंडा- २४३ येथे १ पोलीस उप अधीक्षक, ४ पोलीस निरीक्षक, ३० सपोनि, पोउपनि पोलीस अधिकारी तसेच ३८८ पोलीस अमंलदार व ३६७ होमगार्ड असा बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.





मतमोजणी ठिकाणी कोणीही मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक गॅजेट सोबत ठेवू नये, असे निवडणूक अधिकाऱ्यांकडून कळविण्यात आले आहे.




**तेर :** निवडणुकीच्या आधीच धाराशिव तालुक्यातील तेर येथे झळाळले भारतीय जनता पार्टीचे उमेदवार राणाजगजितसिंह पाटील यांच्या विजयाचे बॅनर झळकल्याचे दिसून आले.

## कोण मारणार बाजी; परंडा मतदार संघात चर्चेला उधान

**तभा वृत्तसेवा / आप्पासाहेब शिंदे**
**परंडा, दि.२२ नोव्हेंबर -**
२४३ परंडा विधान सभा मतदार संघात भूम परंडा वाशी तालुक्यात अतिशय चुरशीने बुधवारी दि.२० नोव्हेंबर रोजी मतदान शांततेत पार पडले असुन जवळ जवळ ६५ टकेच्या पुढे मतदान झाले आहे. विशेष म्हणंजे महिला मतदारांनी भरभरून मतदान करण्यासाठी घराच्या बाहेर पडून मतदान बुथवर मोठी गर्दी करित आपला मतदानांचा हक्क बजावला आहे. परंडा मतदार संघात ३ लाख ३० हजार ३७३ असे स्त्री आणि पुरुष मतदारा असुन त्यांनी मोठ्या उत्साहात आपले मतदान केले आहे. अतिशय चुरशीने झालेल्या मतदानात कोण मारणार बाजी याचा फैसला शनिवारी होत असुन जवळ जवळ ६५ टक्केच्या पुढे मतदान झाल्याने लाडक्या बहिणीने कोणाच्या पारड्यात भरभरून मतदान टाकले आहे, यांची चर्चा सर्वत्र सुरु असुन परंडा मतदार संघात एकून २१ उमेदवार आपले नसीब अजमावत आहेत.



खरी टक्कर महायुतीचे शिवसेना उमेदवार धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री तथा परंडा विधानसभेचे विद्यमान आमदार प्रा.डॉ. तानाजीराव सावंत व महाविकास आघाडीचे माजी आमदार राहुल मोटे यांच्यात अतितटीची लढाई झाली असुन त्याच बरोबर वंचितचे उमेदवार प्रविण रणबागुल व रासपाचे उमेदवार डॉ. राहुल घुले यांनी सुद्धा चांगलीच टक्कर दिली असुन ते किती मतदान घेतात यावरच सावंत आणि मोटे यांचे विजयाचे गणित अवलंबून आहे. परंडा मतदार संघाच्या निवडणुकीची मतमोजणी आज भूम येथे होत असुन या निवडणुकीत मतदारांनी कोणाच्या पारड्यात भरभरून मताचे दान दिले आहे याचा फैसला होत असुन कोण गुलाल उधळतोय याची चर्चा मतदार संघात जोरात सुरु असुन शनिवारी दुपारी ३ वाजेपर्यंत याचे चित्र स्पष्ट होणार आहे. गेल्या निवडणुकीत झालेल्या पराभवचा वचपा या निवडणुकीत राहुल मोटे काढणारच अशी चर्चा होत आहे तर विद्यमाने आमदार तानाजी सावंतच यावेळीही राहुल मोटे यांना असमान दाखवणार अशी खंमग चर्चा मतदार संघात रंगु लागली आहे.

## निवडणुकीच्या वातावरणात थंडावा...
# पर्यावरणातील गारव्यामुळे शेकुट्या पेटल्या

**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**तेरखेडा, दि.२२ नोव्हेंबर -**
राज्यात विधानसभा निवडणुकांचे वातावरण आता गार झाले आहे. आज काही वेळात निकाल समोर येणार आहेत. यापूर्वी दिग्ज उमेदवार यांची आता धाकधूक वाढली आहे. राज्यात महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये थेट सामना पाहायला मिळाला होता. आता प्रत्यक्षात मात्र निकाल जाहीर झाल्यानंतर खरे चित्र स्पष्ट होणार आहे. कोणत्या पक्षाच्या किती जागा निवडून येणार यावर सत्तेचे गणित जुळणार आहे. यात अपक्ष उमेदवार किती निवडून येथील हे सुध्दा सत्ता स्थापनेसाठी महत्वाचे ठरणार आहे. सत्ता स्थापनेचा दावा कोण करणार आणि सत्ता स्थापनेपासून कोणाला वंचित राहावे लागणार हे चित्र लवकरच समोर येणार आहे.

यात अपक्ष निवडून आलेले उमेदवार यांची चांदी होणार अशी चर्चा सध्या राजकीय अभ्यासक सांगत आहेत. निकाल जाहीर झाल्यानंतर सत्तेचे गणित जुळवण्यासाठी आमदारांची देखील पळवापळवी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर २६ नोव्हेंबरला रात्री १२ वाजेपर्यंत सरकार स्थापन करावे लागणार आहे. असे नाही झाल्यास महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दुसऱ्या बाजूला राज्यात आता थंडीचा जोर वाढत चालला आहे. मागील काही दिवस झाले विधानसभा निवडणुकीने राजकीय वातावरण चांगलेच तापले होते, मात्र २० नोव्हेंबरला मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर राजकीय वातावरण गार झाले आणि निसर्गाचे वातावरण देखील गार झाले. वाशी तालुक्यातील तेरखेडा परिसरात किमान तापमानात सतत घसरण होत असल्याने थंडीची लाट उसळली आहे.

रात्रीच्या सुमारास आणि पहाटे उशिरापर्यंत तापमानात घट होत असल्याने गारटा वाढला आहे. त्यामुळे तेरखेडा परिसरातील नागरिकांनी थंडीपासून बचाव करण्यासाठी घरातील स्वेटर, मफलर, टोपी गरम कपडे बाहेर काढले आहेत. तसेच रात्रीच्या आणि पहाटेच्या सुमारास नागरिक गरम उबदार भेटावी म्हणून शेकोटी पेटवत आहेत.

### निकाला आधीच झळकले भावी आमदारांचे पोस्टरवार






**धाराशिव / तेरखेडा :** निवडणुकीच्या आधीच धाराशिव शहरात उबाठाचे उमेदवार कैलास पाटील व तेरखेडा येथे शिवसेना शिंदे गटाचे उमेदवारी प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांचे भावी आमदार असा उल्लेख असलेले बॅनर झळकले.

# तुळजापूर विधानसभा मतदारसंघावर 'पाटीलकी' कोणाची?

**तभा वृत्तसेवा / मेघराज किलजे**
**जळकोट, दि.२२ नोव्हेंबर -**
तुळजापूर विधानसभा निवडणुकीत महायूतीचे राणाजगजितसिंह पाटील व महाविकास आघाडीचे धीरज पाटील यांच्यात सरळ सामना रंगला होता. दोन पाटलामधील राजकीय झुंज पहावयास मिळाली. राजकीय पटलावर या विधानसभेच्या निवडणुकीत राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी महायुती व महाआघाडीच्या कार्यकर्त्यांनी जीवाचे रान केल्याचे दिसून आले. दोन पाटलामधील लढाईत कोणाचा उदय तर कोणाचा अस्त होणार आहे. याकडे तालुका वासियांचे लक्ष लागले आहे. एकंदरीत तुळजापूर मतदारसंघावर आमदाररुपी 'पाटीलकी' कोणाची राहणार आहे. याची जोरदार चर्चा मात्र ऐकावयास मिळत आहे.

महाराष्ट्र जिल्ह्याच्या व तुळजापूर तालुक्याच्या आगामी काळातील राजकीय भविष्य घडवणाऱ्या या निवडणुकीत महायुती व महाविकास आघाडी कसून कामाला लागली होती. संपूर्ण जिल्ह्याचा इतिहास पाहता राज्याच्या राजकारणात व जिल्ह्याच्या राजकारणावर प्रदीर्घकाळ आपली एकहाती सत्ता टिकवलेले माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यानंतर राणाजगजितसिंह पाटील यांनी सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली. काही काळ राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घालवल्यानंतर त्यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश करून तुळजापूरच्या विधानसभेवर गेल्या वेळेस कब्जा केला.



माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांचा पराभव करून काँग्रेसच्या ताब्यातील हा मतदारसंघ भारतीय जनता पार्टीच्या गोटात सामील करण्यात राणा पाटील हे यशस्वी ठरले. धाराशिव जिल्ह्याच्या राजकारणात डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब पाटील यांनी काँग्रेसच्या विचाराची धुरा संपूर्ण जिल्ह्यावर पसरवून काँग्रेस टिकवण्यात मोलाचे कार्य केले आहे. अनेक निवडणुका आप्पासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली लढण्यात आल्या. काँग्रेसचे प्रदीर्घकाळ अध्यक्ष ते राहिले. परंतु अलीकडच्या काळात काँग्रेसमधील दिग्गज मंडळीनी दुसऱ्या पक्षात घरोबा केल्याने काँग्रेससाठी कठीण काळ आहे. असे वातावरण निर्माण झाले. यात माजी मंत्री मधुकरराव चव्हाण पुन्हा एकदा निवडणूक मैदानात उतरणार आहेत. असे चित्र निर्माण झाले. परंतु पक्षश्रेष्ठींनी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धीरज पाटील यांना उमेदवारी दिली. धीरज पाटलांनी धीर न सोडता तेवढ्यात ताकतीने निवडणूक लढवली. धीरज पाटील जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष, विद्यमान काँग्रेस जिल्हाध्यक्ष आहेत. संपूर्ण जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचा विचार तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी त्यांनी संपूर्ण जिल्ह्यात काँग्रेसची जनसंवाद यात्रा काढली. यात्रेच्या माध्यमातून त्यांच्या जलसंपर्कात भर पडली.

महाविकास आघाडीने शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार, मित्रपक्ष काँग्रेसची अधिकृत उमेदवारी धीरज पाटील यांना मिळाल्यानंतर सुरुवातीला संथगतीने सुरू असलेला प्रचार शेवटच्या टप्प्यात जोर धरल्यानंतर निवडणुकीत खरी रंगत आली. धीरज पाटील यांच्या प्रचारसभेत मधुकररव चव्हाण यांनी पूर्णपणे पाठ दाखवली तर अशोकराव जगदाळे यांनी नॉट रिचेबल असतानाही पुन्हा प्रचारात रिचेबल झाले. त्यानंतर निवडणुकीतला खरा प्रचार सुरू झाला.

अशाच चित्र विचित्र परिस्थितीत महाविकास आघाडीचे धीरज पाटील यांना सुरुवातीला यश मिळणार का? याची जोरदार चर्चा ऐकावयास मिळत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे प्रमुख उद्धव ठाकरे, मराठवाड्याचे काँग्रेसचे मोठे नेते अमित देशमुख आदींनी प्रचार सभा घेऊन महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून देण्याचे आवाहन केले. आगामी काळात काँग्रेसचे प्राबल्य टिकणार का ? हे या निवडणुकीच्या निकालात स्पष्ट होणार आहे.

एकेकाळी डॉ. पद्मसिंह पाटील व आप्पासाहेब पाटील यांनी जिल्ह्याच्या राजकारणावर ठेवलेले वर्चस्व कायम नेमके कोणत्या पाटलाच्या हातात जाणार! याची उत्सुकता मात्र जनतेला लागली आहे. धीरज पाटील पहिल्यांदाच विधानसभा निवडणूक लढवत आहेत. तर दुसऱ्यांदा राणाजगजीतसिंह पाटील तुळजापूर विधानसभेतून पुन्हा कमळ फुलवण्यासाठी सज्ज आहेत. 'पाटील' पैकी कोणते पाटील आमदाररुपी 'पाटीलकी' राजकारण हाकणार आहेत. याचा फैसला आज होणार आहे. सध्या थंडीचे दिवस आहेत. प्रचाराच्या थंडीमध्ये विजयाची ऊब कोणाला मिळणार? याकडे आम जनतेचे लक्ष लागले आहे. दोन पाटील यामध्ये प्रत्यक्ष राजकीय झुंज पहावयास मिळाली. आरोप-प्रत्यारोप करण्यात आले. उत्तर प्रत्युत्तर देण्यात आले. निवडणूक रिंगणात अनेक उमेदवार उभे असले तरीही खरी लढत दोन पाटील मधील राजकीय द्वंदयुद्ध ठरणार आहे. कारण जिल्ह्याच्या राजकारणावर वर्चस्व ठेवायचे असेल तर हा विजय जिल्ह्याचे राजकीय भविष्य ठरवणारे आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूका या विजयावर अवलंबून आहेत. एकंदरीत तुळजापूर विधानसभेवर आमदार म्हणून पाटीलकी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची आमदारकी कायम राहणार? की धीरज पाटील नवे पाटील म्हणून राजकीय 'पाटीलकी' सुरू करणार? याचे उत्तर आजच्या निवडणूक निकालानंतर स्पष्ट होणार आहे.

### जाहीरनामा
**उस्मानाबाद येथील ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**वारसाचे प्रमाणपत्रा बद्दल जाहीरनामा**
**सीएनआर-एमएचओएस** ०२-००२१४३२०२४
**दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ७३७/२०२४**
**प्रयागबाई/निरंक**
**नि.क्रं. ०६**
ज्यापेक्षा मयत कै. बाबुराव नामदेव आडसुळ, रा. सुर्डी, ता.जि. उस्मानाबाद हे दिनांक १५/०७/२०२४ रोजी किंवा त्यासुमारास निरामय हॉस्पीटल, उसमानाबाद येथे मयत झाले असून अर्जदार १. प्रयागबाई बाबुराव आडसुळ, २. राजकुमार बाबुराव आडसुळ, ३. सुरेखा परसुराम वाघमारे, यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत कै. बाबुराव नामदेव आडसुळ यांच्या नावचे वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा अर्जदारास सदरहू प्रमाणपत्र हे कै. बाबुराव नामदेव आडसुळ यांचे मृत्यू पश्चात शासकीय व निमशासकीय कामासाठी अर्जदारांचे नावे वारसा हक्काने नांवे लावणेकामी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.
सदरहू अर्जदार मयत कै. बाबुराव नामदेव आडसुळ यांचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचे हक्क शाबीत दिसल्यास त्याचा सदरहू मयत कै. बाबुराव नामदेव आडसुळ चे वारसाचे प्रमाणपत्र देईल.
**दिनांक १८/१०/२०२४ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.**
**पुढील तारीख २२/११/२०२४**

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (व्ही.के. बेग) | (एस.एम. नावाडे) |
| कनिष्ठ लिपीक | सहा.अधिक्षक |

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद**

### रूपामाता शुगर युनिट क्रम.३ देवसिंगा (तुळ) चा गळीत हंगामाचा शुभारंभ...

# रूपामाता नॅचरल शुगर युनिट क्र.१ कडून २५०० रुपये प्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग

### चेअरमन ॲड. व्यंकटराव गुंड यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**
धाराशिव तालुक्यातील पाडोळी (आ.) येथील रुपामाता नँचरल शुगर यु.क्र. १ या कारखान्याच्या २०२४-२५ हंगामातील पहिल्या पंधरवड्यात गाळपासाठी आलेल्या उसाची बिल २५०० रुपये प्रमाणे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आल्याची माहिती रुपामाता उद्योग समूहाचे संस्थापक ॲड. व्यंकटराव गुंड यांनी दिली.

उत्पादक शेतकऱ्यांनी रूपामाता मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट साठी शाखेत जाऊन बिल घ्यावे व ज्या शेतकऱ्यांनी अद्याप खाते उघडले नाही त्यांनी त्वरित आपले खाते उघडून घ्यावे असेही अँड. गुंड यांनी सांगितले.

तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी कारखान्याला ऊस देऊन सहकार्य करण्याचे त्यांनी आवाहन केले. रुपामाता नँचरल शुगर युनिट क्र.३ देवसिंगा (तुळ) ता. तुळजापूर येथील २०२४- २५ चा मोळी पूजन करून गळीत हंगामाचा शुभारंभ माऊली उद्योग समूहाचे चेअरमन व्ही.पी.पाटील, बँक ऑफ महाराष्ट्र आनंद नगर शाखेचे मुख्य प्रबंधक राजेश कुशवाह, जि.प. माजी उपाध्यक्ष सुधाकर गुंड, हभप. बाबुराव पुजारी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी मुख्य पूर्वक ॲड. गुंड यांनी म्हणाले की तुळजापूर तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या जीवनात 'रूपामाता' च्या माध्यमातून आर्थिक उन्नती साधणे हेच आमचे लक्ष असल्याचे यावेळी सांगितले.

या समारंभास ऊस उत्पादक शेतकरी, दुध ऊत्पादक, ऊस तोड वाहतूक ठेकेदार, उद्योग समुहाचे पदाधिकारी, कारखान्यातील सर्व विभाग प्रमुख, कर्मचारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## नळदुर्ग बसस्थानकातील सिमेंट रस्त्याचे काम संथगतीने; प्रवाश्यांत नाराजी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ नोव्हेंबर -**
नळदुर्ग येथील बसस्थानकात सुरु असलेले सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम अतिशय संथगतीने सुरु असुन यामुळे प्रवाशांना धुळीचा तसेच बस पकडण्यासाठी कमालीचा त्रास होत आहे.

नळदुर्ग बसस्थानकात वारंवार मागणी केल्यानंतर सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम मंजुर झाले आहे. हे काम महाराष्ट्र औद्योगिक वसाहत महामंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

मात्र हे काम ज्या ठेकेदाराने घेतले आहे तो ठेकेदार हे काम अतिशय संथगतीने करीत आहे. त्याचबरोबर कामाच्या ठिकाणी संबंधित ठेकेदाराने कामाच्या माहितीचा फलकही लावलेला नाही.

सध्या संथगतीने सुरु असलेल्या कामाची गती वाढवुन हे काम लवकर पुर्ण करण्याचे आदेश संबंधित ठेकेदाराला द्यावे अशी प्रवाशांमधुन मागणी होत आहे.

## भैरवनाथ शुगर सोनारीचा १७ वा गळीत हंगाम मोळीपूजन कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२२ नोव्हेंबर -**
प्रा.डॉ. तानाजीराव सावंत, प्रा. शिवाजीराव सावंत (चेअरमन, भैरवनाथ शुगर्स समुह) यांच्या मार्गदर्शनाखाली १७ वा गळीत हंगाम मोळीपूजन कार्यक्रम संपन्न झाला. या सोहळ्यात पारंपरिक पद्धतीने गव्हाणची पूजन करून मोळी पूजन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी महिला आघाडी जिल्हाप्रमुख अर्चना दराडे, सारिका अंधारे, गंगाताई सातपुते, सोहम सावंत, अविनाश वाडेकर, ठोंबरे, काळे, भोसले, गडगे, गोविंद कुलकर्णी, सिंग, सुरेश साळुंखे, बोरकर, मालवदे कुटुंब उपस्थित होते. यावेळी दादा काळे, सुभाष भोसले यांनी सूत्रसंचालन व आभार मानले. तसेच यावेळी पंचक्रोशीतील ऊस उत्पादक शेतकरी, ऊस वाहतूक, तोडणी ठेकेदार सर्व खाते प्रमुख, विभाग प्रमुख व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेत असताना या हंगामात उच्चांकी गाळप करत यशस्वीपणे कारखाना चालवण्याचा संकल्प केला.

साखर उद्योग हा शेतकऱ्यांच्या अर्थकारणाचा कणा आहे. त्यामुळे त्यांची प्रगती आमची जबाबदारी आहे, अशा भावना त्यांनी याप्रसंगी व्यक्त केल्या.




## डॉ. आंबेडकर साखर कारखान्याचा २१ वा गळीत हंगाम शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**
तालुक्यातील केशेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगाम २०२४-२५ चा २१ व्या ऊस गळीत हंगामाचा शुभारंभ शुक्रवार (दि.२२) रोजी राजर्षी शाहू ट्रस्टचे तज्ञ विश्वस्थ चंद्रकांत माळी व ज्येष्ठ पत्रकार दिलीप पाठक-नारीकर यांचे हस्ते प्रथमतः वजन काटयाचे पुजन करुन तद्नंतर विधीवत गव्हाणीत ऊसाची मोळी टाकून गव्हाण पूजन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रास्तावीक संचालक ॲड, चित्राव गोरे यांनी केले. त्यात त्यांनी चालू हंगामासाठी एकूण ८५०० हे. ऊस नोंद झाली असून हेक्टरी ८० मे.टन उत्पादन गृहीत धरून एकूण ६५०००० मे. टन ऊस उपलब्ध असून इतर विल्हेवाट चजा जाता ५ लाख मे.टन ऊस आपणास उपलब्ध होत असल्याचा तपशील शेतकऱ्यांसमोर मांडला. यावर्षी बैलगाडी २००, मिनी १५०, मोठे वाहने ६५ ८ हार्वेस्टर ३० अशी भक्कम यंत्रणा कारखान्याकडे उपलब्ध असून कारखाना आज गाळप हंगाम चालू करण्यासाठी सज्ज आहे. तसेच यावर्षी चांगले गाळप होईल असे अपेक्षित असल्याचे सांगीतले. तसेच लचकर पक्क होणाऱ्या व साखर उतारा चांगला असणाऱ्या ऊस जातीमध्ये कोसी ६७१ च एमएस १०००१ या ऊस जातीची लागवड शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त करावी जेणे करून शेतकऱ्यांच्या ऊसाला जादाचा दर देता येईल. तसेच कारखान्याने यावर्षी केलेल्या धोरणाप्रमाणे या दोन ऊस जाती लवकर पक्क होणार असल्याने पुढील वर्षी यांचा प्रोग्राम सुरुवातीला काढून चाकीच्या ऊस जातीचा नंतर प्रोग्राम काढला जाईल असे नमूद केले.

कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष अरविंद गोरे यांनी सभेस मार्गदर्शन करताना सांगीतले की, ऊस शेती हेच शेतकयांचे प्रमुख उत्पन्नाचे साधन असून कमी पाण्यात व कमी खर्चात शेतीचे नियोजन करणे गरजेचे आहे. तसेच आपला कारखान्यासाठी आजपर्यंत सर्वसाधारण शेतकऱ्यांचे सहकार्य लाभले. त्यांच्या सहकार्यातूनच आपण आज संकटातून मार्ग काढ़त इतपर्यंत पोहोचली आहेत. आज ३ कोटी रकमेतून चालू केलेला कारखान्याची ३०० कोटी संपत्ती झाली आहे. आपल्याला आवर्षण काळात पाण्याची गरज भासल्याने आपण ३-३ कोटीची दोन मोठी शेततळी निर्माण केली, तसेच ऊसापासून मिळणाऱ्या पाण्यावर कारखाना चालवला. एखाद्या वर्षी कमी पाणी असताना आपण ऊस तुटून गेल्यावर फक्त पावसाच्या पाण्यावर ऊस जगवला, तसेच पाचट जाळण्याचे प्रमाण कमी होऊन त्याचे महत्य लोकांना सांगीतले. आपल्यापुढील निसर्ग आणि सरकारचे धोरण ही दोन संकटे आहेत. इथेनॉल बंदच्या धोरणामुळे कारखान्यास मोता आर्थिक तोटा सहन करावा लागला. या अशा सरकारच्या बदलत्या धोरणामुळे बँका कर्ज देण्यास तयार नाहीत. त्यामुळे सरकारने थकहमी घेऊन कारखान्यास कर्ज वाटप केले. परंतू आपणास सरकारची मदत घेण्याची गरज पडली नाही, तसेच यंत्रणेमुळे आपणास मोठे धोके निर्माण झाल्यामुळे हार्वेस्टर वाढवण्याचा आपला मानस असल्याचे सांगीतले.

## श्रीक्षेत्र वाशी येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**वाशीं, दि.२२ नोव्हेंबर -**
श्री क्षेत्र वाशी यांचा पारंपारिक श्री सद्गुरु कै. हभप. तात्यासाहेब (आबा) वास्कर तसेच सद्गुरू संत ज्ञानेश्वर माऊली महाराज श्री क्षेत्र चाकरवाडी व वै. हभप. साताप्पा महाराज थोबडे कृपा आशीर्वादाने अखंड हरिनाम सप्ताह श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण ज्ञान यज्ञ सोहळा मिती मार्गशीर्ष शुद्ध एक सोमवार दि.२ ते मार्गशीर्ष अष्टमी सोमवार ९ डिसेंबर या कालावधीत गुरुवर्य हभप. नामदेव महाराज वासकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमासाठी पहाटे ४ ते ६ काकडा आरती सकाळी ७:३० ते ९:३० पारायण सकाळी ९:३० ते १० अल्पोपहार १० ते ११:३० ज्ञानेश्वरी पारायण दुपारी १२ ते १ भोजन नंतर २ ते ४ गाथा भजन सायंकाळी ५: ते ६ हरिपाठ रात्री ९ ते ११ किर्तन व रात्री १२ ते ४ हरी जागर असे कार्यक्रम होणार आहेत. सोमवार दि.२ रोजी हभप. भिकाजी महाराज शिंदे, कोल्हापूर मंगळवार हभप. प्रमोद महाराज जगताप पुणे, बुधवार हभप. तुमो निधी शांती ब्रह्म गुरुवर्य महादेव महाराज चाकरवाडी कर गुरुवार हभप. भागवताचार्य

पोपट महाराज चकणे घाटकोपर मुंबई शुक्रवार हभप. ॲड. जयवंत महाराज बोधले श्रीक्षेत्र पंढरपूर शनिवार हभप. केशव महाराज उखळीकर परळी रविवार हभप. गुरुवर्य विठ्ठल महाराज वासकर वाशीकर सोमवार हभप. देवेंद्र निढळकर महाराज यांचे सकाळी १० ते १२ काल्याचे किर्तन व नंतर हभप. गुरुवर्य नामदेव महाराज वासकर यांचे काला अभंग व काला वाटप व त्यानंतर महाप्रसादाणे सांगता होणार आहे.

या सप्ताहात अन्नदाते म्हणून विठ्ठल साळुंखे, गणपत चौधरी, पद्मराज गपाट, भारत कवडे, शहाजी कागदे, भाऊसाहेब जगताप, श्रीधर पवार, देविदास मस्कर, अशोक थोरबोले, गुरुलिंग नगरे, किशोर भांडवले, संतोष ढवळे, ॲड. परमेश्वर कोठावळे, किशोर भांडवले, डॉ. दत्तात्रय कवडे, किशोर माने, आधी अन्नदान करणार आहेत.

## दोनशे रुपये लाच घेतल्याप्रकरणी दुकाने निरीक्षकाला तीन वर्षांचा कारावास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**
धाराशिव शहरातील सरकारी कामगार अधिकारी कार्यालयातील दुकाने निरीक्षक विवेक वासुदेव हेडाऊ यांना लाचखोरी प्रकरणी धाराशिवच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाने ३ वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. हेडाऊ यांनी २०१२ मध्ये राज ऑफसेट व स्टेशनरी सप्लायर्स या दुकानाचा परवाना नूतनीकरण करण्यासाठी दुकानाच्या मालकाकडून २०० रुपयांची लाच मागितली होती.

याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. याबाबत माहिती अशी की, हेडाऊ यांनी पंचासमक्ष २०० रुपयांची लाच मागितली होती आणि ती रक्कम खाजगी लेखनिक दत्तात्रय आनंदराव दाने यांच्याकडे दिली होती. दाने यांनी ही रक्कम त्यांच्या शर्टच्या खिशात ठेवली होती. न्यायालयाने हेडाऊ यांना कलम ७ आणि १३ (१) (ड), १३ (२) अन्वये ३ वर्षांचा कारावास आणि १००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. दंड न भरल्यास त्यांना १ महिन्याचा अतिरिक्त कारावास भोगावा लागेल. या प्रकरणाचा तपास अश्विनी भोसले, तत्कालीन पोलीस उप-अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव यांनी केला होता.

## धाराशिव जिल्ह्यात विधानसभा मतमोजणी अनुषंगाने वाहतुक मार्गात बदल




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**
विधानसभा सार्वत्रिक निवडणुक-२०२४ करिता दिनांक २३.११.२०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया आयोजित असुन उमरगा- २४०, विधानसभा मतदार संघाची मतमोजणी पंचायत समिती मिटींग हॉल, उमरगा येथे, तुळजापूर-२४१ मतदार संघाची मतमोजणी स्पोटर्स हॉल, श्री तुळजाभवानी इंजिनिअरींग कॉलेज, तुळजापूर, उस्मानाबाद- २४२ मतदार संघाची मतमोजणी शासकीय ओध्योगिक ट्रेनिंग इन्स्टिट्युट(आयटीआय), तुळजापूर रोड धाराशिव व परंडा-२४३ मतदार संघाची मतमोजणी अनुसुचित जातीच्या मुलांची शासकीय निवासी शाळा गोळेगाव ता. भुम या मतमोजणी ठिकाणी पार पडणार आहे.

जिल्हादंडाधिकारी धाराशिव यांचे आदेशनुसार विधानसभा मतमोजणी दि.२१ नोव्हेंबर अन्वये धाराशिव जिल्ह्यातील सर्व मतमोजणी केंद्रावर व परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा सहिंता २०२३ चे कलम १६३ अन्वये मतमोजणी ठिकाणापासुन २०० मिटर परिघाच्या परिसरामध्ये (निवडणुकीच्या अनुषंगाने वापरात असलेली शासकीय वाहने वगळुन) मोटारगाड्या, वाहनांचा वापर करणे अथवा थांबविणेस मनाई करण्यात आली आहे.

विधानसभा मतदार संघ २४० उमरगा,२४१- तुळजापूर, २४२- उस्मानाबाद व २४३ परंडा साठीच्या मतमोजणी कामी दि.२३ नोव्हेंबर रोजी नमुद मतमोजणी ठिकाणी येणाऱ्या उमेदवारांचे सोबत त्यांचे समर्थक, कार्यकर्ते, वाहने हे मोठ्या संख्येने उपस्थित असण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशा वेळी वाहतुकीची कोंडी हावु नये. तसेच मतमोजणी निकाल ऐकण्यासाठी येणारे लोकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारचा अपघात होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये या करीता मतमोजणी ठिकाणा समोरुन, जवळून, मार्गे होणारी वाहतुक अन्य मार्गाने वळविणे सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने पोलीस अधिक्षक संजय जाधव यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३(१) (ब) अन्वये अधिकाराचा वापर करुन मतमोजणी निकाल ऐकण्यासाठी येणारे लोकांचे सुरक्षीततेच्या कारणावरुन दि.२३ नोव्हेंबरपासून सकाळी ६. वा. ते मतमोजणी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मतदार संघ निहाय मतमोजणी ठिकाणांच्या अनुषंगाने वाहतुक मार्गात बदल करण्यात आले आहेत.

**नावात बदल**

मी कोंडाबाई मधुकर बंडगर मौजे इटकळ ता. तुळजापुर येथील रहिवाशी असुन माझे पहिलेच नाव छायाबाई मधुकर बंडगर हे होते पण माझे आत्ताचे नाव कोंडाबाई मधुकर बंडगर हेच माझ्या कागदपत्रानुसार बरोबर व सत्य आहे व मला कोंडाबाई मधुकर बंडगर याच नावाने ओळखतात.

**कोंडाबाई मधुकर बंडगर**
मु. पो. इटकळ, ता. तुळजापुर

## माध्यमांच्या प्रतिनिधीसाठी मतमोजणी कक्षात मोबाईल नेण्यास प्रतिबंध

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**
विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या मतमोजणीचे २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी केंद्रावर वृत्त संकलन करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रादेशिक व जिल्ह्यातील शासनमान्य वृत्तपत्रांचे संपादक, त्यांचे प्रतिनिधी, उपग्रह वाहिन्यांचे प्रतिनिधी व त्यांचे कॅमेरामन आणि अधिस्वीकृतीधारक यांना हिरव्या रंगाची प्राधिकार पत्र दिले आहे. अशाच माध्यमांच्या प्रतिनिधींना मतमोजणी कक्षात प्रवेश दिला जाणार आहे.



माध्यम कक्षात माध्यम प्रतिनिधीना संपर्क करण्यासाठी इंटरनेट, संगणक, टिव्हीची व चहापानाची व्यवस्था करण्यात आली आहे. माध्यमांच्या प्रतिनिधींना माध्यम कक्षापर्यतच आपला मोबाईल वापरता येईल. मतमोजणी केंद्राच्या दारावरून निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ठरवून दिलेल्या जागेवरूनच स्टील कॅमेरा किंवा मुव्हीज कॅमेरा वापरता येईल. आक्षेपार्ह कोणतेही चित्रण करता येणार नाही. मात्र कोणत्याही परिस्थितीत मतमोजणी कक्षाच्या आतमध्ये मोबाईल घेवून जाण्यास परवानगी असणार नाही. याठिकाणी माध्यम कक्षाच्या नोडल अधिकाऱ्यांसोबत पाच किंवा त्यापेक्षा मर्यादित माध्यमांच्या प्रतिनिधींचा गट करुन पाहणी करता येईल.

माध्यम कक्षातून फेरीनिहाय माहिती, परवानगी मिळालेले छायाचित्र माध्यम कक्षाच्या नोडल अधिकाऱ्यांच्या माध्यमातून माध्यम प्रतिनिधींच्या व्हॉटसअप ग्रुपवर प्रसिध्दीसाठी देण्यात येईल, असे जिल्हा निवडणूक विभागाने कळविले आहे.

### निवडणुक संपली आणि उमेदवार लागले कामाला...

## आठ महिन्यापासून बंद असलेला डीपी तीन तासात सुरू

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ नोव्हेंबर -**
हगलुर (ता. तुळजापुर) येथील शिवारामध्ये एका डीपीवर लोड येत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रयत्नांतून १०० चा डीपी आठ महिन्यापुर्वी बसवण्यात आला होता परंतु त्याला कनेक्शन दिले गेले नाही.


तत्कालीन वायरमन भोसले यांनी सदर कनेक्शन जोडण्यासाठी शेतकऱ्यांच्या कडुन ५१ हजार रुपये घेतले एकुण १७ शेतकरी एकत्र येऊन प्रत्येकी तीन हजार रुपये प्रमाणे भोसले यांना ५१ हजार रुपये देण्यात आले तरीसुद्धा डीपी कनेक्शन देऊन सुरू करण्यात आला नाही. त्यानंतर भोसले यांची बदली झाली व त्यांच्या जागी पटेल हे नवीन वायरमन नियुक्त झाले. त्यांच्याकडे शेतकऱ्यांनी डीपी सुरू करण्यासाठी विनंती केली असता त्यांनी वरिष्ठाकडून आदेश मिळाल्याशिवाय डीपी चालु करता येणार नाही असे सांगितले.

त्यामुळे शेतकऱ्यांनी पुन्हा पुर्वीचे वायरमन ज्यांना ५१ हजार रुपये दिले होते त्यांच्याकडे डीपी जोडण्या संदर्भात विनंती केली. भोसले यांनी डीपी सुरू करण्यासाठी पुन्हा तीस हजार रुपये द्यावे लागतील असे शेतकऱ्यांना सांगितले.

यामुळे हवालदीप झालेले शेतकरी अण्णासाहेब दराडे यांना भेटुन त्यांची अडचण मांडली.

यानंतर अण्णासाहेब दराडे यांनी संबंधित महावितरण विभागाचे सहाय्यक अभियंता यांच्याकडे लेखी निवेदन देऊन डीपी तात्काळ सुरू नाही झाल्यास चालु डीपीवर चढुन आत्मदहन करण्याचा इशारा दिला असता सदरील डीपी जोडण्याचे काम तीन तासांमध्ये पुर्ण करण्यात आले.

गेल्या तीन महिन्यापासुन प्रचारामध्ये व्यस्त असलेले अण्णासाहेब दराडे यांनी कालच मतदान झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी कामाचा सपाटा सुरू केलेला असुन येणाऱ्या काळात रात्र दिवस सर्वसामान्यांसाठी शेतकऱ्यांसाठी ते कायमस्वरूपी जनतेच्या सेवेत रुजु झाल्याचे त्यांनी सांगितले.



तुळजापूर मतदारसंघातील तसेच धाराशिव जिल्ह्यातील सर्वसामान्यांच्या कोणत्याही अडचणी असतील तर त्यांनी माझ्याशी थेट संपर्क करावा, असे आवाहन दराडे यांनी केले आहे.

# विद्यापीठात आज ६ विधानसभा व लोकसभेसाठी मतमोजणी

## किनवट, हदगाव व लोहा येथे त्या-त्या ठिकाणी मतमोजणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ नोव्हेंबर**

नांदेड जिल्ह्यात लोकसभा पोटनिवडणूक व ९ विधानसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान झाले. निवडणूक आयोगाने २१ तारखेला दुपारी जाहिर केलेल्या अंतिम आकडेवारी नुसार नांदेड जिल्ह्याने यावेळी २०१९ च्या तुलनेने विक्रमी मतदान केले असून यावेळी विधानसभेसाठी ६९.४५ टक्के मतदान झाले आहे. तर लोकसभा पोटनिवडणुकीतही गेल्या वेळेच्या तुलनेत ७ टक्के अधिक मतदान झाले असून ही टक्केवारी ६७.८१ आहे. उद्या शनिवार २३ नोव्हेंबर रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये ज्ञान स्त्रोत केंद्र ( नॉलेज रिसोर्स सेंटर ) येथे सकाळी ७ वाजल्यापासून मतमोजणी सुरु होणार आहे.

पहिल्या व दुसऱ्या माळ्यावर विधानसभा व लोकसभा निवडणुकीची मतमोजणी होणार आहे. पहिल्या माळयावर खोली क्रमांक १०२ व खोली क्रमांक ६ याठिकाणी सहा विधानसभा क्षेत्राची मतमोजणी होणार असून सर्व मतयंत्र



याठिकाणच्या स्ट्रॉंगरुममध्ये पोहोचले आहे. तसेच दुसऱ्या माळ्यावर खोली क्रमांक २०२ ते २०६ मध्ये लोकसभा पोटनिवडणुकीची मतमोजणी होणार आहे. याठिकाणच्या स्ट्रॉंगरुममध्ये मतयंत्र पोहोचली आहेत. उमेदवारांच्या उपस्थितीत सर्व मतपेट्या स्ट्रॉंगरुममध्ये बंद झाल्या असून सीसीटीव्हीच्या निगराणीत ठेवण्यात आल्या आहेत. २३ नोव्हेंबरला सकाळी उमेदवारांच्या व त्यांच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत मतदान यंत्र बाहेर काढले जातील व त्यानंतर मतमोजणीला सुरुवात होईल. याठिकाणी वेगवेगळे कक्ष करण्यात आले असून उमेदवारांचे प्रतिनिधींसाठी देखील थांबण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. विधानसभेची १४ टेबलावर मोजणी होणार आहे. लोकसभा व विधानसभेसाठी १४ गुन्हीले ६ असे ८४ टेबल लोकसभा आणि विधानसभासाठी असणार आहे. अंदाजे २४ ते २८ फेऱ्यांमध्ये मतमोजणी होणार आहे.

**किनवट, हदगाव व लोहा येथे त्या-त्या ठिकाणी मतमोजणी**

किनवटला आयटीआय कॉलेजमध्ये तर हदगावला समाज कल्याण भवन येथील अनुसूचित जातीचे मुलींचे शासकीय वसतीगृह तर लोहा येथे महसूल हॉल, तहसिल कार्यालयाच्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे.

**सुसज्ज मीडिया कक्ष**

भारत निवडणूक आयोगाने ज्यांना हिरव्या रंगाची प्राधिकार पत्र दिले अशा पत्रकारांना मतमोजणी कक्षात प्रवेश दिला जाणार आहे. याठिकाणी माध्यम प्रतिनिधींना संपर्क करण्यासाठी इंटरनेट, संगणक, टिव्हीची व खानपानाची व्यवस्था करण्यात आली आहे. पत्रकारांना माध्यम कक्षापर्यंत आपला मोबाईल वापरता येईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत मतमोजणी कक्षाच्या आतमध्ये मोबाईल घेवून जाण्यास परवानगी असणार नाही. याठिकाणी जिल्हा माहिती अधिकाऱ्यांसोबत पाच किंवा त्यापेक्षा मर्यादित पत्रकारांचा गट करुन पाहणी करता येईल. माध्यम कक्षातून फेरीनिहाय माहिती, परवानगी मिळालेले छायाचित्र ई-मेल व व्हॉटसअप ग्रुपवर प्रसिध्दीसाठी देण्यात येईल.

# विष्णुपुरी प्रकल्पाच्या कालव्याची व रस्त्याची दुरुस्ती करून नऊ पाणी पाळ्या देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ नोव्हेंबर**

आशिया खंडातील सर्वात मोठ्या विष्णुपुरी प्रकल्प डेरलां लिफ्ट यांच्या कालव्याची व रस्त्याची दुरुस्ती यांत्रिकी विभागामार्फत करून नऊ पाणी पाळ्या सोडण्याचे नियोजन करण्यासाठी कालवा सल्लागार समितीची सचिव, अधीक्षक अभियंता यांना शेतकऱ्यांच्या उपस्थित बैठक घेण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर यांनी केली आहे.

आशिया खंडातील सर्वात मोठा उपसा जलसिंचन प्रकल्प म्हणून विष्णुपुरी डेरला ओळखले जाते. विष्णुपुरी प्रकल्प हा पूर्ण क्षमतेने भरला असून जायकवाडी प्रकल्पसुद्धा भरलेला आहे व गोदावरी नदीवरील नऊ बंधारेही भरलेले आहेत. खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे, त्यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या हलाकीचा झालेला आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी रब्बी हंगाम महत्त्वाचा आहे. या रब्बी हंगामासाठी विष्णुपुरी प्रकल्प डेरला लिफ्टच्या कालव्याद्वारे लोहा, कंधार, नांदेड तालुक्यातील परिसरामध्ये अनेक गावांना रब्बी सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे, परंतु निवडणुकीमुळे कालवा सल्लागार बैठक झाली नाही.

विष्णुपुरी डेरला प्रकल्पाची कालव्यांना रब्बी व उन्हाळी पाण्याचे नियोजन करण्याचा अधिकार कायद्याने २००५ जलसंपदा कालवा सल्लागार समितीला मिळतो. या कालवा सल्लागार समितीचे अध्यक्ष पदसिद्ध हे महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री असतात, परंतु सध्या महाराष्ट्रात निवडणुका चालू असल्यामुळे त्या संदर्भात बैठक घेण्यात आली नाही. या समितीचे सचिव अधीक्षक अभियंता असतात. त्यांच्या अध्यक्षेखाली बैठक घेऊन रब्बी व उन्हाळी हंगामासाठी नऊ पाणी पाळ्यांचे नियोजन करण्याचे आदेश संबंधित अधीक्षक अभियंता सर्कल नांदेड पाटबंधारे यांना द्यावेत व शेतकऱ्याला न्याय द्यावा. तसेच कालव्याची दुरुस्ती करण्यासाठी व कॅनलवरील रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी यांत्रिकी विभागाला आदेशित करावे, असेही राज्याचे मुख्य सचिव यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

या निवेदनावर मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर, लिंगोजी पाटील हरबळकर, खुशाल पाटील दगडगावकर, त्र्यंबक पाटील जानापुरीकर, जाधव पिपरणवाडीकर माधवराव देसाई, गोविंदराव मुकादम, नवनाथराव मोरे, शंकरराव मोरे, अंबादासराव देशमुख जवळेकर, विजयकुमार बोरगावकर, ज्ञानोबा टोणगे दापसेडकर, बळी पाटील मडकीकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### तेलंगाना भैंसा डिपो मॅनेजर यांची कालावधीची मुदत संपली



**धर्माबाद**-महाराष्ट्र शासनाचा व राष्ट्रीय परिवहन महामंडळ यांचा महसूल बुडत आहे. तहसीलदार यांनी दिलेल्या पत्राची अंमलबजावणी होत नसून अनाधिकृत आंध्रा बस स्टॉप हे महर्षी वाल्मिकी चौक येथे राष्ट्रीय राष्ट्रीय परिवहन महामंडळ विभागासोबत कसलाही करार तेलंगाना येथील आगारप्रमुखांनी न करता तेलंगणातील बसेस चालूच ठेवल्या. सविस्तर वृत्त असे की धर्माबाद ही एक मोठी बाजार पेठ असून दररोज आंध्रा प्रदेश व तेलंगणा आणि महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातून हजारो लोक विविध कामांच्या निमित्ताने धर्माबाद शहरात येत असतात. तालुक्यात महाराष्ट्र बस स्थानक आहे तेलंगणातील काही बस सेवा फक्त महर्षी चौक पर्यंतच येऊन तिथून परतत होतात त्यामुळे इतर नागरिकांना चक्क महाराष्ट्र बस स्थानकापासून महर्षी चौक पर्यंत पायी चालत जावे लागते किंवा ऑटो ने तीस रुपये देऊन जावे लागत असे याचा त्रास महाराष्ट्रातून आंध्र प्रदेश व तेलंगणा राज्यात जाणाऱ्या महाराष्ट्रीयन प्रवाशांना होत होता म्हणून रिपब्लिकन सेनेचे तालुका अध्यक्ष साहेबराव दुगाने, डी के पाटिल व वंचित बहुजन आघाडी चे शहर उपाध्यक्ष किरण गजभारे, राहुल शिरसे यांनी व सहकार्यांनी दिनांक १३ सप्टेंबर रोजी रिपब्लिकन सेनेचे धर्माबाद तालुकाध्यक्ष साहेबराव दुगाने यांच्या नेतृत्वात महर्षी चौक येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाची दखल घेत धर्माबाद तहसीलदार यांनी भैसा व निर्मल वाहतूक नियंत्रण अधिकाऱ्यांना पत्र देऊन सदर आंदोलनांची माहिती देत तेलंगणा राज्यातून येणाऱ्या बसेस महर्षी चौक अनधिकृत (आंध्रा बस स्टॉप) येथे थांबवण्या ऐवजी ते अधिकृत महाराष्ट्र बसस्थानकात थांबवण्यात यावेत अन्यथा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो अशी लेखी विनंती वजा सल्ला दिला होता. या रास्ता रोको आंदोलनाच्या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी मा. अभिजीत राऊत, पोलीस अधीक्षक नांदेड, धर्माबाद तहसीलदार व पोलीस निरीक्षक व तेलंगणा राज्याच्या आगार प्रमुख यांना देण्यात आले होते. या दरम्यान सर्व बाबींची चौकशी करून नायब तहसीलदार गावंडे यांनी तोंडी व लेखी आश्वासन दिले व सदरील विभागाला पत्रव्यवहार केला त्यामुळे आज पासून (आंध्रा बस स्टॉप) च्या ऐवजी महाराष्ट्र व स्थानक या ठिकाणी तेलंगणातील सर्व बसेस थांबण्यात येणार आहे. त्यामूळे महाराष्ट्रातून आंध्र व तेलंगणा राज्यात जाणाऱ्या धर्माबाद तालुका वाशीयांसाठी व महाराष्ट्र राज्याच्या विविध भागांतून धर्माबाद शहरात ये जा करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय या पुढे होणार नसल्याने समाधान व्यक्त केल्या जात आहे. परंतु तहसीलदारांचा आदेश तेलंगानातील आगार प्रमुख यांनी कचऱ्याच्या डब्यात टाकून आपला मनमानी कारभार सुरूच ठेवला आहे. याकडे वाहतूक शाखेने सुद्धा कानाडोळा केला आहे. अनधिकृत आंध्रा बस स्टॉप या ठिकाणी बसेस थांबून विद्यार्थी नागरिक व्यवसायिक यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

### विनापरवाना शुभेच्छा फलक, बॅनर लावल्यास कारवाई..!

**नांदेड**-संपूर्ण महाराष्ट्रात शनिवारी विधानसभा निवडणुकीचा निकाल लागणार आहे. त्याचवेळी नांदेडमध्ये विधानसभेसह नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचाही निकाल लागणार आहे. या निवडणूक निकालानंतर विनापरवानगी शुभेच्छा बाबतचे जाहिरात फलक, पोस्टर, किऑस, झेंडे, भित्तीपत्रके लावू नयेत, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे या आदेशाची नांदेडात काटेकोरपणे अंमलबजावणी होईल, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे. नांदेड शहरात कोणीही विनापरवानगी बॅनर, पोस्टर लावल्यास कारवाई केली जाईल, असा इशारा नांदेड महापालिकेचे उपायुक्त स. अजितपालसिंघ संधू यांनी दिला आहे. याबाबत संपूर्ण क्षेत्रिय अधिकाऱ्यांनाही निर्देश दिले आहेत. कुठेही विनापरवानगी बॅनर, पोस्टर लावल्यास तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना दिल्या असल्याचे उपायुक्त संधू यांनी सांगितले.

### निवडणुकीतील स्त्री-पुरुषनिहाय मतदान

**नांदेड**-लोकसभा पोटनिवडणूकीसाठी भोकर मतदारसंघात पुरुष १ लाख २० हजार ११७ तर महिला १ लाख ११ हजार २३६ व इतर ३ असे एकूण २ लाख ३१ हजार ३५६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. नांदेड उत्तर मतदारसंघात पुरुष १ लाख १३ हजार ५२४ तर महिला १ लाख ३ हजार ९८३ तर इतर १५ असे एकूण २ लाख १७ हजार ५२२ तर नांदेड दक्षिण मतदारसंघात पुरुष १ लाख ६ हजार ३९० व महिला ९६ हजार ३२६ व इतर २ असे एकूण २ लाख २ हजार ७१८ मतदारांनी आपला हक्क बजावला. नायगाव मतदारसंघात पुरुष १ लाख १९ हजार ६३७ तर महिला १ लाख १० हजार ११४ व इतर १ असे एकूण २ लाख २९ हजार ७५२ मतदारांनी मतदान केले. देगलूर मतदारसंघात पुरुष १ लाख २ हजार २९० महिला ९५ हजार १११ व इतर ८ असे एकूण १ लाख ९७ हजार ४०९ मतदारांनी मतदान केले. मुखेडमध्ये पुरुष १ लाख ११ हजार ८७६ तर महिला १ लाख ३ हजार ५२४ व इतर २ असे एकूण २ लाख १५ हजार ४०२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

# थडीसावळी, गळेगांव शिवारात हरभऱ्यास तुषारने पाणी सुरू

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. २२ नोव्हेंबर**

थडीसावळी,गळेगांव परिसरातील शेत शिवारात हरभरा या पीकास शेतकरी तुषार सिंचनाने पाणी देण्यात मग्न आहेत. एकंदरीत परिसरातील पीक पेरणी होऊन एक महिना जवळपास उलटला आहे. महिन्याचे हरभरा पीक शेता शेतात डोलू लागले आहे. वातावरणात थोडासा गारठाही वाढलेला दिसून येत आहे.पहिली फवारणी देखील पुढेमागे शेतकरी करीत आहेत. आया बायांची पीकात निंदणी देखील सुरू झाली आहे.काही शेतकरी धनियाचे पीक घेतल्याचे पहायला मिळाले.

रात्री अपरात्री शेत शिवारात शेतकरी आपल्या हरभरा पीकास तुषार सिंचनाने पाणी देत असल्याचे चित्र सध्या थडीसावळी, गळेगांव परिसरात पहायला मिळत आहे.शेताच्या उशाला,पायथ्याला,धुऱ्याला बोअरवेल असलेल्या शेजारील शेतकऱ्यांना थोड्या कष्टाने सहजासहजी पाणी, पाईप मिळत



आहे,मात्र बोअरवेल पासून दूरदूर असलेल्या शेतांना पाण्यासाठी अतिरिक्त पाईपांची तडजोड करावी लागत आहे. कारण सगळेच शेतकरी पाणी देण्यात जिकडेतिकडे व्यस्त आहेत. त्या उपरही जाऊन विजेचा सिंगल फेज आणि थ्री फेज पुरवठा असल्याने अधेमधे वीजही गुल होत राहते.त्याचाही सामना शेतकरीवर्गास करावा लागतो.

थडीसावळी, गळेगांव परिसरातील हरभरा पीकास सद्यस्थितीत जोमदार उगवण क्षमता लाभल्याने शेतकरी समाधानी आहेत. मात्र, पाणी देण्यासाठी राना शिवारात रात्री अपरात्री शेतात ठाण मांडून असल्याचे चित्र आहे.

## शकुंतलाबाई चन्नावार यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ नोव्हेंबर**

येथील डॉक्टर्स लेन परिसरातील प्रतिष्ठित श्रीमती शकुंतलाबाई गोविंदराव चन्नावार (वय ८० वर्षे) यांचे दि. १८ नोव्हेंबर रोजी रात्री १.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात कापड व्यापारी दीपक, संतोष व कृष्णा अशी तीन मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. श्रीमती शकुंतलाबाई चन्नावार यांच्या पार्थिवावर दि. १९ नोव्हेंबर रोजी दुपारी शांतीधाम गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व स्तरातून मोठा जनसमुदाय उपस्थित होता. श्रीमती शकुंतलाबाई चन्नावार यांचा स्वभाव मनमिळावू होता. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते स्व. नारायणराव पांडुरंग चन्नावार यांच्या त्या स्नुषा होत.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी राजाराम काकानी सहकार विद्या मंदिरच्या सोनाक्षी गिरीची निवड

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. २२ नोव्हेंबर**

नांदेड येथे नुकतेच राज्यस्तरीय हॉकीच्या स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धेत राजाराम काकांनी सहकार विद्या मंदिरच्या विद्यार्थ्यांनी १७ वर्षाखालील मुलींच्या स्पर्धेत सहभाग घेतला होता. स्पर्धा संपन्न झाल्यानंतर राज्य निवड समिती आयोजित निवड चाचणीत आर के एस व्ही एम या शाळेतील सोनाक्षी गिरी हिचे १७ वर्षाखालील मुलींच्या संघात निवड करण्यात आली.

दिनांक २१ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर दरम्यान हरियाणा येथील



रोहतक येथे संपन्न होणारे राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सोनाक्षी महाराष्ट्राचा प्रतिनिधित्व करणार आहे. सोनाक्षीच्या निवडीसाठी शाळेचे क्रीडा शिक्षक तथा हॉकी प्रशिक्षक श्रीनिवास कांबळे यांनी परिश्रम घेतले तर सोलापूरचे क्रीडा अधिकारी श्री कुरेशी सर, क्रीडा प्रबोधनी पूनेचे सागर करांदे, सोलापूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी श्रुत पवार सर, नांदेड चे श्री सरदार हरविंदर सिंग कपूर आणि सचिन कांबळे या अधिकाऱ्यांनी सोनाक्षीचे निवड केली. सोनाक्षीचे निवड झाल्याबद्दल शाळेचे व्यवस्थापकीय संचालक श्री सुबोध काकांनी यांनी शाळेच्या क्रीडा अनुकूल धोरण व विद्यार्थ्यांना मिळणारे प्रोत्साहनामुळे हे यश प्राप्त झाले आहे असे म्हटले, सोनाक्षी गिरी चे अभिनंदन करत राष्ट्रीय स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा दिले तसेच शाळेतील प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक पालकांकडूनही कौतुक होत आहे.

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख गणेश गिरी महाराज यांची मुलगी आहे.

सोनाक्षी गिरी सध्या जळगाव येथे प्रशिक्षण घेत असून तिला देण्यात आलेल्या प्रोत्साहनाबद्दल तिने शाळेचे व्यवस्थापकीय संचालक श्री सुबोध काकानी, क्रीडा शिक्षक श्रीनिवास कांबळे, प्राचार्य व सर्व शिक्षकांचे व पालकांचे आभार मानले.

## धर्मगुरु बाबुसिंगजी महाराज यांची वामनराव विष्णुपूरीकर यांनी घेतली भेट

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ नोव्हेंबर**



धर्मगुरु प.पू. बाबुसिंगजी महाराज गादीपती बंजारा काशी पोहरादेवी शक्तीपिठ (धाम) ता. मानोरा जि. वाशिम (महाराष्ट्र) यांची त्यांच्या पोहरादेवी येथील निवासस्थानी श्री संत रोहिदास महाराज मंदिर प्रस्तावित तिर्थक्षेत्र वर्ग ब एमआयडीसी एरिया बळीरामपूर नांदेड चे संस्थापक वामनराव मे. विष्णुपूरीकर यांनी सदिच्छा भेट घेऊन दि. १५ ऑक्टोंबर २०२४ रोजी त्यांची विधान परिषदेवर सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार, स्मृतीचिन्ह, नऊ भाषेतील गुरु महाराज यांचा ग्रंथ भेट देऊन सहृदय सत्कार करण्यात आला.

यावेळेस चर्चेअंती सदरील तिर्थक्षेत्राचा मागील ४०-४१ वर्षाचा इतिहास व प्रगतीचा उलगडा त्यांच्यासमोर करण्यात आला. याप्रसंगी बसव संघटनेचे कार्यकर्ते गुंडप्पा बसलिंगप्पा बारोळे हे आवर्जुन उपस्थित होते.

# लोहा नगरपालिकेने काढले स्वच्छतेचे धिंडवडे

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. २२ नोव्हेंबर**

शहरात सध्या प्रशासकराज चालू असून त्यांचे शहराकडे दुर्लक्षच अधिक दिसत आहे. शहरातील जिकडे तिकडे नाल्या तुडुंब कचऱ्याने, घाणीच्या पाण्याने भरभरून वाहत आहेत. रस्त्यावर घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे नागरिकांना दुर्गंधीचा नाहक त्रास सहन करावा लागतो आहे. स्वच्छता विभाग प्रमुख यांचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्यामुळे आजही लोहा शहरात घाणीचा सामना करावा लागत आहे. शहरातील स्वच्छता ठेवणे हे नगरपालिकेच्या स्वच्छता विभागाचे आद्यकर्तव्य असताना मुख्य रस्त्याने जुन्या गावात जाणाऱ्या रस्त्यावरील नालीतील पाणी कचरा घाणीने ओसंडून वाहत आहे, पोस्टामागील परिसर हा घाणीने (नालीच्या पाण्याने) वेढला आहे. त्यामुळे डासाचा प्रादुर्भाव वाढला आहे. असे चित्र सर्वच प्रभागात दिसून येत आहे.

कचऱ्याचे ढीग तर विचारूच नका, प्लास्टिक बंदीचे नियम तर नगरपालिकेने बासणात गुंडाळून ठेवले आहे. मोकाट जनावरांचा देखील त्रास होत आहे. शहराची स्वच्छता होत नसल्याने नागरिकांना दुर्गंधीयुक्त वासावर आणि नाल्याच्या घाण पाण्यातून रस्ते पार करावे लागत आहे. स्वच्छता विभागाच्या नाकर्तेपणामुळे शहरातील अस्वच्छतेचा कळस गाठला गेल्याचे दिसून येत आहे. ज्येष्ठ नागरिकांना साथीच्या रोगाचा सामना करण्याची वेळ आली आहे. मुख्याधिकारी यांचे दुर्लक्ष होत असल्यामुळे स्वच्छता विभागाच्या कारभाराबाबत नियमानुसार कर भरणाऱ्या नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. प्रशासनाचे माणसं नाल्या साफ करण्यासाठी जवळपास सहा महिन्यापासून नाली साफ करायला आलेच नाहीत. त्यामुळे तुडूंब भरल्या आहेत. घरावर लावलेल्या स्टिकर चा काहीच उपयोग होत नसल्याचे दिसून येत आहे. त्याचे स्कॅनिंगपण होत नाही. सध्या ते ऍक्टिव्ह झाल्याचे दिसून येत नाही. स्वच्छता विभागाचे काम एखाद्या चांगल्या जबाबदार व्यक्तींना देऊन महिन्याला स्वच्छतेचा कर भरणाऱ्या नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी नागरिकातून होत आहे.

# देगलूर-बिलोली विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत माध्यम कक्षाने केले उत्तम नियोजन

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. २२ नोव्हेंबर**

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक, देगलूर- बिलोली विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी देगलूर तहसील कार्यालयाने माध्यम कक्षाची निर्मिती केली यामुळे देगलूर - बिलोली सार्वत्रिक निवडणुकीच्या विविध कार्यक्रमाची माहितीला प्रसिद्धी मिळाल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली देगलूर बिलोली विधानसभा सार्वत्रिक निवडणूक निर्णय निवडणूक अधिकारी तथा बिलोली उपविभागीय अधिकारी श्रीमती क्रांती डोंबे यांनी येथील तहसील कार्यालयात माध्यम कक्षाची निर्मिती केली. यामध्ये बिलोली तहसीलदार गजानन शिंदे यांना माध्यम नोडल अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली बिलोली नायब तहसीलदार पुरवठा सुषमा मोहोड यांना सहाय्यक मीडिया कक्षाची जबाबदारी सोपविली यांच्या अंतर्गत



सहाय्यक नरहरी कोलगाणे, प्रा.महेश कुलकर्णी विठ्ठल चंदनकर, विजय शिकारे यांनी काम पाहिले. विधानसभा तसेच लोकसभा पोट निवडणुकीसाठी स्थापन झालेल्या माध्यम कक्षाने कामाचे उत्तम नियोजन करत जिल्हास्तरावर संपर्क ठेवून माध्यमांना प्रसिद्धीस येणाऱ्या मजकुरावर नजर ठेवली वर्तमानपत्रात देखील प्रसिद्ध होणाऱ्या मजकुरावर ,वृत्तावर बारकाईने लक्ष ठेवले सुषमा मोहोळ यांच्या टीमने काम करून प्रशासकीय कामासाठी सहकार्य केले आहे .

माध्यम कक्षाने दिवसभरात घडलेल्या प्रशासनातील घटना घडामोडींना प्रसिद्धीसाठी वर्तमानपत्रांच्या वृत्त संकलन करणाऱ्या वार्ताहरांना बातम्या प्रसिद्धीला दिल्या.निवडणूक कार्यालयावर एक वेगळी छाप करूनदिलीआहे. नायबतहसीलदार सुषमा मोहोड, नरहरी कोलगाने, प्रा. महेश कुलकर्णी, विठ्ठल चंदनकर, विजय शिकारे यांनी लक्षवेधी काम केल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

लातूर
# दिनांक

**लातूर तरुण भारत,** सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल




## विद्यापीठ क्रॉस कंट्री संघात पिराजी गित्तेची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २२ नोव्हेंबर-**



महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर येथील पिराजी गित्ते या खेळाडूची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या क्रॉस कंट्री संघात निवड झालेली आहे.

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉस कंट्री स्पर्धा दिनांक १९ ते २० नोव्हेंबर २०२४ या कालावधीमध्ये मेंगलोर युनिव्हर्सिटी, मेंगलोर अंतर्गत अलवाज एज्युकेशन फाउंडेशन ,मूडबिद्री (कर्नाटक ) येथे होत आहेत.या स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी गित्ते पिराजी या खेळाडूची विद्यापीठ संघात निवड झाली आहे. या खेळाडूस क्रीडा संचालक प्रा. सतीश मुंढे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के व सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### राज्यस्तरीय उंच उडी स्पर्धेस जयहिंद स्कूलच्या अंजली नाईकची निवड

**उदगीर, दि. २२ नोव्हेंबर-**

जय हिंद पब्लिक स्कूल व ज्युनियर कॉलेज उदगीर मधील क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेड यांच्या वतिने पोलीस मुख्यालय परेड मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या १९ वर्ष वयोगटातील विभागीय शालेय मैदानी उंच उडी स्पर्धेत अंजली नाईक द्वितीय क्रमांक मिळवून राज्यस्तरीय शालेय मैदानी उंच उडी स्पर्धेस निवड झाली आहे. तसेच १७ वर्ष वयोगटातील विभागीय शालेय मैदानी उंच उडी स्पर्धेत गोरखनाथ सुभाष बोलके तृतीय क्रमांक मिळवला. स्पर्धेत मिळवलेल्या यशाबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. सुधीर जगताप यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य खेळाडूंना मिळाले. व स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळच्या प्रशासकीय अधिकारी ज्योती स्वामी, प्राचार्य संजय हट्टे, नॉबेट समन्वयक मनोरमा शास्त्री, उपप्राचार्य सतिश वाघमारे, आणि नांदेड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील राज्य क्रीडा मार्गदर्शक शिवकांत देशमुख यांनी सत्कार केला आणि क्रिडा विभाग प्रमुख व राष्ट्रीय पंच - संदीप पवार यांचे प्रशिक्षण मार्गदर्शन लाभले आणि क्रीडा शिक्षक सोमेश्वर सूर्यवंशी, अशलेशा गडदे, अतार इस्माईल, राहुल गुड़े, व स्नेहा लांडगे, राकेश अंबरखाने, सोमनाथ झरकुंटे, विजय सपाटे, रत्नदीप मोरे, सुशांत जाधव यांनी शुभेच्छा दिल्या.



### महाराष्ट्र उदयगिरीच्या छात्र सैनिकांचे निवडणूक बंदोबस्त कार्यात सहकार्य

**उदगीर, दि. २२ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेतील छात्रसैनिकांनी दिनांक २० नोव्हेंबर रोजी झालेल्या विधानसभा निवडणुकीत उदगीर येथील विविध मतदान केंद्रावर पोलीस बंदोबस्ताच्या कार्यात पोलीस यंत्रणेला सहकार्य व मदत करण्याचे कार्य केले आहे. यावेळी मतदान केंद्रावर आलेल्या अपंग, वृद्ध मतदारांना मदत करणे तसेच मतदान केंद्रा बाहेरील शांतता व शिस्त निर्माण करणे बाबत पोलीस यंत्रणेला सहकार्य करण्याचे कार्यही राष्ट्रीय छात्र सेनेच्या छात्र सैनिकांनी केले आहे. या कार्यासाठी छात्र सैनिकांना ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी चे प्रभारी कमांडिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल वाय.बी. सिंग, कंपनी कमांडर कॅप्टन डॉ. राम साबदे तसेच पोलीस यंत्रणेचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या छात्र सैनिकांनी योगदान दिल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. मस्के आणि उपप्राचार्य डॉ. एस. जी. पाटील यांनी अभिनंदन केले आहे.


### गोपाळबुवा ग्रंथालयात उद्या दिवाळी अंकांचे प्रदर्शन, गुणवंतांचा सत्कार

लातूर, दि. २२ नोव्हेंबर-

औसा तालुक्यातील मौजे माळकोंडजी येथील गोपाळबुवा सार्वजनिक ग्रंथालयाच्यावतीने रविवार, दि.२ ४ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाळी अंकांचे प्रदर्शन आणि गुणवंतांचा सत्कार समारंभ आयोजिला असून, दिवाळी अंक प्रदर्शनाचे साहित्यिक मोहीब कादरी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षणाधिकारी राम गारकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय डॉ.एस.आर.रंगनाथन ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त तुळजापूरच्या विजय वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश जोशी, राज्य शासनाचा विभागीय डॉ.एस. आर. रंगनाथन् ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालयाचे उपाध्यक्ष तथा शिवणीच्या लोकमान्य सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव, रोटरी क्लबचा व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार प्राप्त कर्करोगतज्ञ डॉ. ब्रिजमोहन झंवर,माळकोंडजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा तालुकास्तरीय दोन लाखांचा पुरस्कार मिळवून देणाऱ्या मुख्याध्यापिका अर्चना पूरी, आलमलाच्या शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.विश्वेश्वर धाराशिवे यांना पीएचडी मिळाल्याबद्दल, तसेच गोपाळबुवा माध्यमिक विद्यालयातून विशेष प्राविण्याने दहावी उत्तीर्ण झालेले दोन विद्यार्थी, सन २०२३-२४ मध्ये सेवेत रुजू झालेल्या नोकरदारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

### रामराव घोनसे यांचे निधन

**उदगीर, दि. २२ नोव्हेंबर-**



तालुक्यातील तळेगाव (भो) येथील कर्तबगार शेतकरी, जेष्ठ नागरिक रामराव मालबा घोनसे वय ८८ वर्षे यांचे गुरुवारी दि. २१ रोजी रात्री वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्यावर तळेगाव (भो) ता. देवणी येथील त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार असून अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पार्टीचे लातूर जिल्हा उपाध्यक्ष मालबा घोणसे पाटील यांचे ते वडील होत.

## मतदानाचा हक्क बजावण्यात लाडक्या बहिणींची आघाडी

**पाच वर्षांत उदगीरमध्ये वाढले २४ हजार ८२२ मतदार**

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २२ नोव्हेंबर-**

सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत उदगीर विधानसभा मतदार संघाची एकूण मतदार संख्या दोन लाख ९८ हजार ४३९ इतकी होती. तर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत २४ हजार ८२२ मतदार वाढले असून आता एकूण मतदार संख्या तीन लाख २३ हजार २६१ इतकी झाली आहे.

संख्येत ९३७८ इतके मतदार वाढले असून एक लाख ६७ हजार ६३८ इतकी मतदार संख्या झाली आहे. स्त्री मतदारांमध्ये १५ हजार ४२५ इतकी वाढ होऊन आता एक लाख ५५ हजार ६०४ मतदार झाले आहेत. तर इतर मतदार १९ ने वाढले आहेत. उदगीर विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी मतदान पार पडले. या निवडणुकीत पुरुषांचे ६७.०२ टक्के आणि



स्त्रियांचे ६७.२२ टक्के मतदान झाले. एकंदरीत पुरुषांच्या बरोबरीने पुढे येऊन पुरुषांपेक्षा अधिक स्त्री मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावल्याचे दिसून येते.

२०१९ मध्ये उदगीर विधानसभा मतदारसंघात पुरुष मतदार संख्या एक लाख ५८ हजार २६० तर स्त्री मतदार संख्या एक लाख ४० हजार १७९ इतकी होती. मागच्या पाच वर्षात पुरुष मतदार होते २०१९ च्या तुलनेत ७.४७ टक्क्यांनी मतदान वाढले सन २०१९च्या विधानसभा निवडणुकीत उदगीर विधानसभा मतदारसंघात ३२१ मतदान केंद्रावर ५९.६४ टक्के इतके मतदान झाले होते. मागच्या पाच वर्षात मतदारसंघात २४८२२ मतदार वाढलेले आहेत. तर बुधवारी (दि. २०) झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदारसंघातील एकूण ३५९ मतदान केंद्रावर ६७.११ टक्के इतके मतदान झाले आहे. २०१९ च्या तुलनेत या निवडणुकीत ७.४७ टक्क्यांनी मतदान वाढलेले आहे. निवडणूक विभाग व प्रशासनाच्या वतीने लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी अभियान राबविण्यात आले. या अभियानाअंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावला पाहिजे असे आवाहन करण्यात आले होते.

## जानेवारीमध्ये महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक संघाचे फेस कॉमचे राज्यस्तरीय अधिवेशन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २२ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ फेस्कॉम चे ३४ वे राज्यस्तरीय अधिवेशन दिनांक ११ व १२ जानेवारी २०२५ ला लातूर नगरीत दिवाणजी व श्याम मंगल कार्यालयात होणार आहे या संदर्भात लातूर येथे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. (फेस्कॉम)चे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे मुंबई, उपाध्यक्ष अशोक तेरकर नांदेड, मुख्य सचिव चंद्रकांत महामुनी पुणे, माजी अध्यक्ष अरुण रोडे पुणे, डॉ. दामोदर थोरात अंबाजोगाई अध्यक्ष दक्षिण मराठवाडा विभाग, डॉ. माया कुलकर्णी, डॉक्टर बी.आर. पाटील, संघटक सचिव प्रभाकर कापसे, महिला संघाच्या अध्यक्षा व सचिव व ज्येष्ठ नागरिक संघाचे सर्व पदाधिकारी यांच्या सोबत बैठक घेण्यात आली. अधिवेशनात मान्यवरांची भाषणे, उद्घाटनसत्र, परिसंवाद, फेस्पुकाम पुरस्कार वितरण, स्मर्णीका प्रकाशन, व समारोप कार्यक्रम यात काही ठराव संमत होणार आहेत अधिवेशन यशस्वी करण्याकरिता सर्वांनी सहकार्य करावे असे आव्हान आण्णासाहेब टेकाळे ,चंद्रकांत महामुनी डॉक्टर बी.आर.पाटील, प्रभाकर कापसे, डॉक्टर दामोदर थोरात, जगदीश जाजू, डॉ. निर्मला कोरे, आर.बी.जोशी, प्रकाश नीला, रमेश भोयरेकर ,शहाजी घाडगे, डॉक्टर भास्कर बोरगावकर, अधिवेशनाचे कार्यवाह प्रकाश घादगिने आदींनी केले. अधिक माहितीसाठी प्रकाश घादगिने ९४२१६९५४५४ वर संपर्क साधावा.

## रेणा कारखान्याने कधीच भेदभाव केला नाही

**माजी मंत्री संस्थापक दिलीपराव देशमुख**

**१९ वा गळीत हंगामाचा शानदार शुभारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २२ नोव्हेंबर-**

देशात नावलौकिक असलेल्या मांजरा साखर परिवारातील रेणा साखर कारखान्याने सुरवाती पासून शेतकरी सभासदांना अधिक भाव देत राज्यात व आपल्या कार्यक्षेत्रात वेगळेपण जपलेले असून सभासद व बिगर सभासदांचा विश्वास संपादन केला आहे मात्र काही विरोधक काटा मारत असल्याचे बिनबुडाचे आरोप करत असल्याचे निदर्शनास आले असून दवंडी द्यावी विरोधकांनी बघावे उगीच बिनबुडाचे आरोप करू नये असा इशारा देत विरोधकांना फटकारले आमच्या परिवारातील संस्थांनी कधीही काटा मारला नाही मारणार नाही असा पलटवार राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी येथे बोलताना व्यक्त केला तसेच आगामी गाळप हंगामात पाच लाख मेट्रिक टन उसाचे गाळप करण्याचे उद्दिष्ठ असून रेणा साखर कारखाना सर्वाधिक भाव देणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

ते रेणापूर तालुक्यांतील निवाडा दिलीपनगर येथील रेणा सहकारी साखर कारखान्याच्या १९ वा गळीत हंगामाचा शुभारंभ माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब व आमदार धीरज देशमुख व इतर मान्यवर व संचालक मंडळाच्या हस्ते करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी लातूर ग्रामीणचे आमदार तथा जिल्हा बँकेचे चेअरमन आमदार धीरज देशमुख, माजी आमदार ॲड. त्रिंबक भिसे, रेणा साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, रेणा साखर कारखान्याचे माजी चेअरमन यशवंतराव पाटील, माजी चेअरमन आबासाहेब पाटील, कारखान्याचे उपाध्यक्ष अनंतराव देशमुख, कार्यकारी संचालक बी. व्ही. मोरे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष ॲड. प्रमोद जाधव, लातूर बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, उमाकांत खलंग्रे, चंद्रचूड चव्हाण, लालासाहेब चव्हाण, सुरेश लहाने, ॲड. शेषराव हाके, बाळासाहेब कदम, सचिन दाताळ, हरिराम कुलकर्णी, प्रभाकर केंद्रे, मकबूल वलांडीकर, हरिभाऊ गायकवाड, उपस्थित होते.

यावेळी प्रास्ताविक रेणा साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे यांनी केले. आभार कार्यकारी संचालक बी.व्ही. मोरे यांनी मानले. कार्यक्रमास रेणा साखर कारखान्याचे संचालक संचालक चंद्रकांत सूर्यवंशी धनराज देशमुख प्रेमनाथ आकनगीरे, शहाजीराव हाके, संजय हरिदास, अनिल कुटवाड, तानाजी कांबळे, संचालिका वैशाली माने, संचालिका अमृता देशमुख, सतीश पाटील स्नेहल देशमुख पंडितराव माने, रमेश सूर्यवंशी, प्रदीप राठोड, दिलीप गोटके, ॲड. शिरीष यादव, तुकाराम कोल्हे, निवाडाचे सरपंच दिनेश साळुंखे, शेतकरी सभासद उपस्थित होते.



### नूतन १० हार्वेस्टरचे मान्यवरांच्या हस्ते पूजन

यावेळी रेणा साखर कारखान्याकडून नूतन खरेदी केलेल्या १० हार्वेस्टरचे पूजन माजी मंत्री दिलीपराव देशमुख, आ. धीरज देशमुख यांच्यासह मान्यवर सन्माननीय संचालक मंडळांच्या हस्ते करण्यात आले.

### मांजरा परिवारातील संस्थांनी शेतकऱ्यांना न्याय दिला : आ. देशमुख

राज्यात नावलौकिक असलेल्या मांजरा साखर परिवाराने केवळ उस गाळप यावर न थांबता वेगवेगळे उपपदार्थ प्रकल्प कार्यान्वित झाल्याने शेतकऱ्यांना अधिक भाव देण्याचा प्रयत्न होतोय यासाठी आदरणीय दिलीपराव देशमुख यांचे मार्गदर्शन सूक्ष्म नियोजन पारदर्शकता ठेवून सगळ्या संस्था काम करीत असून यामुळे जिल्ह्यातील शेतकरी आर्थिक दृष्ट्या सक्षम झालेले दिसत आहेत याचे सर्व श्रेय आदरणीय साहेब यांच्या कडे जाते लवकरच रेनाकडून बायो सीएनजी प्रकल्प सुरू होईल त्यामधून एक नवे पर्व सुरू होईल, असा विश्वास आमदार धीरज देशमुख यांनी व्यक्त केले.

## लातूरमधील मतमोजणी केंद्रांमध्ये प्रतिबंधात्मक आदेश लागू

**सहाही मतदारसंघात आज होणार मतमोजणी**

लातूर, दि. २१ :

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यातील २० लाख ४२ हजार ७४७ मतदारांपैकी १३ लाख ६९ हजार २४५ म्हणजेच ६७.०३ टक्के मतदारांनी आपला हक्क बजाविला. जिल्ह्यात सर्वत्र शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली असून शनिवारी (दि. २३) मतमोजणी होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिली.

गतवेळच्या तुलनेत या विधानसभा निवडणुकीत सुमारे ५ टक्के अधिक मतदान झाले असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाल्या. लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात ६९.९२ टक्के, लातूर शहर विधानसभा मतदारसंघात ६२.७४ टक्के, अहमदपूर विधानसभा मतदारसंघात ६८.७१ टक्के, उदगीर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघात ६७.११ टक्के, निलंगा विधानसभा मतदारसंघात ६५.७५ टक्के आणि औसा विधानसभा मतदारसंघात ६८.८८ टक्के मतदान झाले, असल्याचे त्यांनी सांगितले.

लातूर जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघात २३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ८ पासून मतमोजणी सुरु होणार आहे. लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ आणि लातूर शहर विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी लातूर शहरातील बार्शी रोडवरील शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन येथे होईल, तर अहमदपूर विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी अहमदपूर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे होणार आहे. उदगीर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी उदगीर शहरातील देगलूर रोडवरील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे होणार असून निलंगा विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी निलंगा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे होईल. तसेच औसा विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी औसा तहसील कार्यालयाजवळील प्रशासकीय इमारतीमध्ये होणार आहे.

**मतमोजणी केंद्राच्या २०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू**

लातूर जिल्ह्यात २३ नोव्हेंबर रोजी लातूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा आणि औसा येथे विधानसभा निवडणुकीची मतमोजणी होत आहे. या मतमोजणी केंद्रांच्या २०० मीटर परिसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार मतमोजणी केंद्रापासून २०० मीटर परिसरात मंडपे, दुकाने उभारणे, तसेच मोबाईल फोन, स्मार्ट फोन, कॉर्डलेस फोन, पेंजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे बाळगण्यास तसेच निवडणूकीच्या कामाव्यतिरिक्त खाजगी वाहन, संबंधीत पक्षाचे चिन्हाचे प्रदर्शन व निवडणुकीच्या कामा व्यतिरिक्त व्यक्तीस प्रवेश करण्यासाठी प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी करण्यात आले आहेत.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ कार्यक्रमानुसार लातूर जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघातील मतमोजणी २३ नोव्हेंबर २०२४ रोजी होणार आहे. यादिवशी मतमोजणी प्रक्रिया संपेपर्यंत लातूर जिल्ह्यातील मद्यविक्री बंद राहणार आहे.

## औसामध्ये ग्रीन, सखी मतदान केंद्र ठरले आकर्षण

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. २२ नोव्हेंबर-**

औसा विधानसभा मतदान केंद्रातील ३०९ बुथमध्ये ३लाख ४ हजार ३०७ मतदारांपैकी २ लाख ९ हजार ५९३ मतदारांनी मतदान केले. यामध्ये १ लाख ११ हजार १५० पुरुष तर ९८ हजार ४४२ स्त्री मतदारांनी ६८.८८ टक्के मतदान केले असून उंबडगा येथे ८४.१९ टक्के ची सर्वाधिक नोंद झाली आहे. तर या निवडणुकीत निवडणूक विभागाच्यावतीने सुरु करण्यात आलेले ग्रीन, सखी मतदान केंद्र मतदारांचे प्रमुख आकर्षण ठरले आहे.

औसा विधानसभेच्या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी निवडणुक विभागाच्या वतीने निवडणुक अधिकारी अविनाश कोरडे व सहाय्यक निवडणुक अधिकारी घनशाम अडसुळ यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रीन औसा मतदान केंद्र या वैशिष्टपुर्ण अभिनव मतदान केंद्राची निमिर्ती करण्यात आली .याचा मतदान करणाऱ्यांनी तर लाभ घेतलाच पण इतर मतदारांनीही या केंद्रास भेट दिली.

औसा विधानसभा मतदार संघातील औसा व निलंगा तालुक्यातील ३०९ मतदान केंद्रात १ लाख ६०हजार ७३२ पैकी १ लाख ११हजार १५० पुरुषांनी मतदान करुन ६९.१५ टक्के नोंद केली. तर १ लाख ४३ हजार ५७१ पैकी ९८ हजार ४४२ स्त्री यांनी मतदान करुन ६८.५७ टक्के ची नोंद केली आहे. या मतदार संघातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंबडगा खुर्द येथील केंद्रात ८४.१९ टक्के ची सर्वाधिक मतदानाची नोंद झाली आहे. यानंतर अंगणवाडी सेलू येथे ८४.०८ टक्के , जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डावी बाजू सेलू येथे ८३. ९३ %, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कासारशिरशी येथे ८३.५० टक्के व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा औसा तांडा येथे ८२.९८ टक्के ची नोंद झाली आहे.तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वासका केंद्रात मतदार संघात सर्वात कमी ४६. ९९टक्के व जिल्हा परिषद हायस्कुल माळेगाव केंद्रात ४९.६४ टक्के नोंद झाली आहे. या दोन मतदान केंद्राशिवाय इतर ३०७ केंद्रात जवळपास ५० टक्के पेक्षा अधिक मतदान झाले आहे.

**शहरात ग्रीन मतदान केंद्र**

या निवडणुकीत औसा विधानसभा मतदारसंघात वैशिष्टपुर्ण आदर्श मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली. यामध्ये 'ग्रीन औसा मतदान केंद्र' मतदारांसाठी आकर्षण ठरल आहे. या मतदार केंद्रामुळे मतदारांमध्ये उत्साह दिसून आला. औसा येथील पंचायत समिती कार्यालयात वृक्ष लागवड, वृक्ष संगोपन व वन्यजीव संरक्षण या संकल्पनेतून 'ग्रीन औसा मतदान केंद्र' या वैशिष्ट्यपूर्ण अभिनव मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली होती. या मतदान केंद्राच्या दर्शनी भागात मंडप व सेल्फी पॉईंटसह आकर्षक सजावट करण्यात आली होती. मतदान केंद्राच्या प्रवेशदारापासून वृक्ष लागवड व संगोपनामुळे पर्यावरणात होणारे वातावरणीय बदल, पर्जन्यमानात होणारी वाढ, तापमानातील घट, जमिनीची होणारी धूप थांबविणे. यासह वृक्षतोडीच्या दुष्परिणामाबाबत व वनस्पती व नैसर्गिक अधिवास संरक्षण कायमस्वरुपी टिकवून ठेवणे. निसर्गाचे संतुलन टिकविण्यासाठी वन्यजीव संरक्षण व संरक्षणासाठीच्या उपायाबाबत आकर्षक फलकाद्वारे माहिती देण्यात आली. याच मतदान केंद्रात मतदारांना उन्हापासून संरक्षण मिळावे म्हणून विशेष व्यवस्था करण्यात आली होती. तसेच स्तनादा मातेसाठी हिरकणी कक्षाचीही निर्मिती करुन महिला मतदारांनाही सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

### सखी मतदान केंद्रात मार्गदर्शन

औसा येथील मुक्तेश्वर माध्यमिक विद्यालयात सखी मतदान केंद्र स्थापन करुन देशातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, रमाई आंबेडकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, सिंधुताई सपकाळ, कल्पना चावला यांच्या कार्याची कार्याची माहिती देण्यात आली होती.

### लोदगा केंद्रावर बांबूचे प्रदर्शन

औसा विधानसभा मतदारसंघातील लोदगा येथील बांबू मतदान केंद्रावर मतदान केंद्राच्या दर्शनी भागात बांबूची लागवड, बांबू लागवडीचे फायदे, बांबूच्या विविध जाती, बांबूपासून बनविण्यात येणाऱ्या विविध वस्तूंची माहिती फलकाद्वारे मतदारांना देण्यात आली होती. तसेच बांबूपासून बनविलेले खुर्ची, टेबल, कापड, बडस, विविध प्रतिकृती आदी वस्तूंचे प्रदर्शन या मतदान केंद्राच्या प्रवेशद्वारात मांडण्यात आले होते.

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, २३ नोव्हेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक १७ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

दर्बी
क्लॉथ मार्केट
(नवी पेठ)
सुटींग, शर्टिंग, लिनन, खादी, कॉटन, सिल्क
प्रीमियम व एक्सुक्लुझिव्ह शुटिंग आणि शर्टिंग साठी एकदा आवश्य भेट द्या...!
१०६, गोल्डफिंच पेठ, (नवी पेठ), सोलापूर - ४१३००७
9422459645 | 9130008644



**सोलापूर – भवानी पेठ** – राठी सिमेंट, **नई जींदगी** – एस.ए.बडेपीर, **वि.डी घरकुल** – वैष्णवी स्टील, **न्यु पाच्चा पेठ** – हारूण स्टील, **होटगी रोड** – एम.आर.सेल्स, **शेळगी** – शहा ट्रेडर्स, **सिध्देश्वर पेठ** – बेसकर ॲण्ड कंपनी, **कुर्डुवाडी** – श्री.गणेश स्टील, **सांगोला** – महालक्ष्मी स्टील सेंटर, **माढा** – तांबोळी स्टील ॲण्ड हार्डवेअर, **पिंपळनेर** – डिमांड ट्रेडर्स, **नातेपुते** – पोतेकर एंटरप्रायजेस, **पंढरपूर** – दुर्गा स्टील, **मांडवे** – बालाजी ट्रेडर्स, **टेभुंर्णी** – श्री साई ट्रेडर्स, **बार्शी** – भराडीया स्टील, **करमाळा** – शिवम स्टील, **अक्कलकोट** – माशाळे स्टील, **मोहोळ** – तलफदार स्टील, **कुरूल रोड** – श्री.भैरवनाथ स्टील ट्रेडर्स, **अकलुज** – चकेंश्वरा स्टील, **वैराग** – गांधी एजन्सी, **दहिताने** – एस. एस. मकंदर स्टील कॉर्पोरेशन, **जेऊर** – तांबोळी सिमेंट ॲण्ड मार्बल, **मरवडे** – सह्याद्री ट्रेडर्स, **मोडलिंब** – शिवाई ट्रेडर्स, **करकंब** – लक्ष्मी स्टील, **मंगळवेढा** – महालक्ष्मी ट्रेडर्स, **बेगमपूर** – सिध्दनाथ ट्रेडर्स, **वेळापूर** – रॉयल बिल्डींग सोल्युशन, **टाकळी** – गुरूकृपा ट्रेडर्स, **कंदलगाव** – श्री.केदारेश्वर हार्डवेअर ॲण्ड सिमेंट, **मुळेगाव** – आदित्य ट्रेडर्स, **महुद** – शेवाळे हार्डवेअर, **हुन्नूर** – लक्की ट्रेडर्स, **साळमुख** – त्रिमूर्ति स्टील, **माळसिरश** – अभिनंदन टाईल्स्, **मैंदर्गी** – खलील ट्रेडर्स, **वसंत विहार** – पूजा स्टील, **श्रीपुर** – शक्ती स्टील अँड किसान मॉल, **भोसे (क)** – पटेल स्टील, **कुरुल** – जगदंबा हार्डवेअर, **सोड्डी** – ओम ट्रेडर्स, **तडवळ** – स्वामी समर्थ ट्रेडर्स, **टाकळी सिकंदर** – लक्ष्मी टाईल्स, **नारखेड** – राहुल एंटरप्रायझेस.

आयकॉन स्टील
टीएमटी बार

## महत्त्वाचे

### निवडणूक निकालापूर्वीच बाजारात तुफान उसळी

**मुंबई :** बँक शेअर्समधील तेजीने देशांतर्गत शेअर बाजाराला आठवड्याच्या शेवटच्या सत्रात एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले. भारतीय बाजारातील निर्देशांकात



१,९६१ तर निफ्टीत ५५७ अंकांची वाढ झाली.

अमेरिकेत अदानी समूहावर लाचखोरी, फसवणुकीचे आरोप झाल्यानंतरही आज अदानींच्या शेअर्समध्ये सुधारणा दिसून आली आणि त्यांच्या कंपन्यांच्या शेअर्समध्येही वाढ झाली. शुक्रवारी निर्देशांकातील ३० पैकी २९ शेअर्स तेजीत होते. केवळ एका कंपनीचा शेअर्स किंचित घसरणीसह बंद झाला. निफ्टीतील ५० पैकी ४९ शेअर्स वाढले होते. निर्देशांकात एसबीआयचे शेअर्स सर्वाधिक ४.३४ टक्क्यांच्या वाढीसह बंद झाले. वाढलेल्या शेअर्समध्ये बजाज फायनान्स, आयटीसी, टायटन, टीसीएस, लॉर्सन ॲण्ड टुब्रो, रिलायन्स इंडस्ट्रीज, एचसीएल टेक, जेएसडब्ल्यू स्टील, अल्ट्राटेक सिमेंट, टाटा मोटर्स, महिंद्रा, एनटीपीसी, आयसीआयसीआय बँक यांचा समावेश होता.



# आज महानिकाल

◆ **मुंबई, २२ नोव्हेंबर**

राज्यात सध्या लोकशाहीचा उत्सव सुरू आहे. १५ व्या विधानसभेची निवडणूक २० तारखेला पार पडली. शनिवारी मतमोजणी असून, महाराष्ट्रातील जनतेने महायुती की महाविकास आघाडीला आपला कौल दिला आणि गुलाल कोण उधळणार, हे स्पष्ट होणार आहे.

शनिवारी सकाळी ८ वाजता सर्व केंद्रांवर मतमोजणी सुरू होईल. या प्रक्रियेदरम्यान पोस्टल मतपत्रिकांची मतमोजणी सकाळी ८ वाजता सुरू होईल, त्यानंतर ईव्हीएमवरील मतांची मोजणी सकाळी साडेआठ वाजता सुरू होईल. यासाठी प्रशासनाची तयारी पूर्ण झाली आहे. २८८ विधानसभा मतदारसंघांसाठी २८८ मतमोजणी केंद्रे आणि नांदेड लोकसभा मतदारसंघासाठी १ मतमोजणी केंद्र स्थापन करण्यात आले आहे. निरीक्षक व उपस्थित उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या समोर सीलबंद स्ट्राँग रूम्स उघडण्यात येतील व ईव्हीएम मतमोजणी केंद्रावर नेण्यात येतील. सर्व कार्यवाही सीसीटीव्हीद्वारे चित्रित केली जाईल.

**ऑनलाईन पाहता येणार निकाल**

निवडणूक आयोगाने मतमोजणीसाठी तयारी पूर्ण केली आहे. तब्बल २८८ मतदारसंघांचे निकाल निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर अपडेट केले जाणार आहेत. त्यामुळे निकालाची अधिकृत आकडेवारी निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर पाहता येणार आहे. *(तभा वृत्तसेवा)*

### महायुती की महाविकास आघाडी?

#### सत्ता स्थापनेसाठी ४८ तास, धाकधूक वाढली

निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर महायुती किंवा महाविकास आघाडीकडे केवळ ४८ तासांचा कालावधी आहे. २६ नोव्हेंबर रोजी विधानसभेचा कार्यकाळ संपत असल्याने, ज्या कोणाला बहुमत किंवा बहुमताजवळचे संख्याबळ असेल, त्याला २६ नोव्हेंबरला सत्ता स्थापनेचा दावा करावा लागेल. तसे न झाल्यास राष्ट्रपती राजवट लावणे किंवा राज्यपाल सर्वांत मोठ्या पक्षाला सत्ता स्थापनेचे निमंत्रण देऊन सरकार स्थापन करण्यास सांगू शकतात. मात्र, बहुमताचा आकडा गाठता आला नाही तर, एवढ्या कमी कालावधीत विधिमंडळ गटनेता कसा ठरणार, मुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्यावर तीन-तीन पक्षांत एकमत कसे होणार, या चिंतेने राजकीय पक्षांची धाकधूक वाढलेली आहे.


## श्रीनगर गारठले, उणे १.२ अंश

◆ **श्रीनगर, २२ नोव्हेंबर**

संपूर्ण काश्मीर खोऱ्यात थंडीची प्रचंड लाट आली असून, श्रीनगरची या मोसमातील सर्वाधिक थंड शहर म्हणून नोंद झाली आहे. खोऱ्यातील बहुतांश भागांमध्ये शून्याच्या खाली तापमान नोंदविण्यात आले.

श्रीनगरमध्ये उणे १.२ अंश सेल्सियस इतक्या कमी तापमानाची नोंद करण्यात आली. त्यापूर्वीच्या रात्री या शहरात उणे ०.४ तापमान होते. काश्मिरातील बहुताश भागांमध्ये पारा झपाट्याने खाली आला आहे.

काझिगुंड येथे उणे १.४ अंश, पहलगाममध्ये उणे २.३ अंश, जगभरातील पर्यटकांचे आकर्षण असलेल्या गुलमर्ग येथे उणे ०.६ आणि कुपवाड्यात उणे ०.८ अंश इतक्या कमी तापमानाची नोंद झाली. *(वृत्तसंस्था)*



## छत्तीसगडमधील चकमकीत १० नक्षल्यांचा खात्मा

### सुरक्षा दलाचे मोठे यश

◆ **सुकमा, २२ नोव्हेंबर**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात शुक्रवारी सकाळी झडलेल्या भीषण चकमकीत सुरक्षा दलाच्या जवानांनी १० नक्षलवाद्यांना ठार मारले. मुख्यमंत्री विष्णुदेव साय यांनी या कामगिरीसाठी जवानांचे अभिनंदन केले आहे.

भेज्जी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जंगलात काही नक्षलवादी आले असल्याची माहिती सुरक्षा दलांना गुप्तचर यंत्रणांकडून मिळाल्यानंतर राज्य राखीव गार्ड आणि सीआरपीएफच्या जवानांनी आज पहाटेलाच या भागात संयुक्त मोहीम उघडली. कोराजगुडा, दंतेसपुरम्, नागाराम आणि भांदरपाडा या चार गावांना लागून असलेल्या जंगलाला जवानांनी चहूबाजूंनी वेढा दिला. जवानांना पाहताच नक्षल्यांनी गोळीबार केला. जवानांनी तितक्याच प्रखरपणे प्रत्युत्तर दिल्यानंतर चकमक झडली. सुमारे दोन तासांनंतर गोळीबार शांत झाला. यानंतर जवानांनी जंगलात शोधमोहीम हाती घेतली असता, १० नक्षलवाद्यांचे मृतदेह आढळून आले, अशी माहिती बस्तरचे पोलिस महानिरीक्षक सुंदरराज पी. यांनी वृत्तसंस्थेला दिली.

सर्व नक्षल्यांचे मृतदेह ताब्यात घेण्यात आले असून, घटनास्थळावरून इन्सास रायफल, एके-४७ रायफल, सेल्फ लोडिंग रायफल आणि स्फोटकांचा मोठा साठा जप्त करण्यात आला. हे सर्व नक्षलवादी कोंटा आणि किस्तराम एरिया कमिटीचे सदस्य होते, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री विष्णुदेव साय यांनी आपल्या समाजमाध्यमावर पोस्ट करून या चकमकीची माहिती दिली. आपल्या बहादूर जवानांनी आज १० नक्षलवाद्यांना ठार मारले. बस्तर जिल्ह्याची वाटचाल आता शांततेकडे सुरू झाली आहे. नागरिकांची सुरक्षा आणि बस्तर प्रांतात शांतता प्रस्थापित करण्यासाठी माझ्या सरकारने नक्षल्यांविरोधात कठोर मोहीम हाती घेतली आहे. शस्त्र खाली ठेवून शरण येणे हाच त्यांच्यापुढे पर्याय उरला आहे, असे त्यांनी या पोस्टमध्ये म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*

#### वर्षभरात २०७ नक्षलवादी ठार

यावर्षीच्या जानेवारी महिन्यापासून आतापर्यंत सुरक्षा दलाच्या जवानांनी सात जिल्ह्यांचा समावेश असलेल्या बस्तर प्रांतात विविध चकमकींमध्ये २०७ नक्षलवाद्यांना ठार केले आहे, अशी माहिती सुंदरराज यांनी दिली.



72198 21111
BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE
अतिरिक्त ऑफर्स उपलब्ध Flipkart आणि amazon.in वर
*नियम आणि अटी लागू. *एक्स–शोरुम किंमत पल्सर 125 CF सिंगल सीट वेरिएंटसाठी. ऑफर फक्त निवडक वेरिएंट्सवर. ऑफर 31 डिसेंबर 2024 पर्यंत उपलब्ध. बजाज ऑटोने पूर्वसूचना न देता कोणतीही किंवा सर्व ऑफर्स काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. साहसी दृश्य एक्सपर्ट्सने प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून वेगळ्या स्थानावर केली आहेत. ह्या दृश्यांचं अनुकरण करण्याचा प्रयत्न करू नका आणि नेहमी रहदारीचे व सुरक्षिततेचे नियम पाळा. एएमसी विशिष्ट मॉडेल्सवर आणि विशिष्ट राज्यात उपलब्ध आहे. अधिक माहिती बजाज डीलरकडे मिळवा. रस्त्यावरील मदत तृतीय पक्षांकडून दिली जाते आणि ती त्यांच्या नियम व अटींच्या अधीन आहे. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवरील ऑफर्स त्यांच्या नियम आणि अटींच्या अधीन आहेत.
**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Solapur • Station Road** AHERKAR BAJAJ 9689899840 • **Hotgi Road** AHERKAR BAJAJ 8956 069 355 • **Akkalkot Road** AHERKAR BAJAJ 8956 320 060 • **Pandharpur** PANDURANG BAJAJ 8600024805 • **Jeur** SHIVRATNA BAJAJ 9922044676 • **Barshi** AHERKAR BAJAJ 8308004007.
**Authorised Service Centre: Mangalwedha** 9890214155, **Marwade** 9028703555, **Akkalkot** 9011556800, **Sangola** 8888109109, **Karkamb** 7057447777, **Vairag** 8308006007, **Karmala** 8888984084, **Kandar** 9673005524, **Rashin** 9975704778, **Mirajgaon** 7774826060, **Akluj** 7756999799, **Temburni** 9552679777, **Natepute** 9850738876, **Mohol** 8830070701.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### मणिपूर हायकोर्टाच्या न्यायाधीशपदी कृष्णकुमार

**इम्फाळ** : न्या. डी. कृष्णकुमार यांनी शुक्रवारी मणिपूर उच्च न्यायालयाचे आठवे मुख्य न्यायाधीश म्हणून शपथ घेतली. इम्फाळ येथील राजभवनात झालेल्या शपथविधी समारंभात राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांनी नवीन मुख्य न्यायाधीशांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. न्या. कृष्णकुमार यांनी यापूर्वी मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून काम केले आहे. मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी नवीन सरन्यायाधीशांचे अभिनंदन केले. एक्सवरील एका पोस्टमध्ये ते म्हणाले की, न्यायाचे कारण पुढे नेण्यासाठी आणि प्रत्येक नागरिकाच्या हक्कांचे रक्षण आणि आदर केला जाईल, याची खात्री करण्यासाठी मी तुमच्यासोबत काम करण्यास उत्सुक आहे.

### प्रदूषणावरून सुप्रीम कोर्टाने दिल्ली सरकारला फटकारले

**नवी दिल्ली** : दिल्लीतील प्रदूषणावरून सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिल्लीतील आप सरकारला फटकारले. न्यायालयाने म्हटले की, दिल्ली सरकारच्या प्रयत्नांवर आम्ही समाधानी नाही. ट्रक प्रवेश बंद करण्यासाठी सरकारने काहीच केले नाही. ११३ एंट्री पॉईंटवर फक्त १३ सीसीटीव्ही का आहेत, सरकारने या सर्व प्रवेश स्थळांवर पोलिस तैनात करावे. वाहनांच्या प्रवेशावर खरोखरच बंदी आहे की नाही, हे पाहण्यासाठी कायदेशीर पथक तयार केले पाहिजे. त्यासाठी बार असोसिएशनमधील तरुण वकील तैनात करावे. न्या. अभय एस. ओक आणि न्या. ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांच्या न्यायासनाने प्रदूषण नियंत्रणासाठी दिल्ली सरकारच्या पावलांवर आक्षेप घेतला. आदेश असूनही दिल्ली पोलिस स्टेज ४ निर्बंध वेळेवर लागू करण्यात अयशस्वी झाले. या प्रकरणाची पुढील सुनावणी २५ नोव्हेंबरला होणार आहे.

### खत कारखान्यात गॅस गळतीमुळे तिघांचा मृत्यू

**मुंबई** : महाराष्ट्राच्या सांगली जिल्ह्यातील खत निर्मिती प्रकल्पात रिॲक्टरमध्ये झालेल्या स्फोटानंतर गॅस गळतीमुळे दोन महिलांसह तीन जणांचा मृत्यू झाला असून, नऊ जण जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही घटना कडेगाव तालुक्यातील शालगाव एमआयडीसीमधील म्यानमार केमिकल कंपनीत गुरुवारी सायंकाळी घडली. खत कंपनीत अणुभट्टीचा स्फोट होऊन रासायनिक धूर निघाला. १२ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असता, उपचारादरम्यान तिघांचा मृत्यू झाला.

### बिष्णुपूरला भूकंपाचा धक्का

**इम्फाळ** : मणिपूरच्या बिष्णुपूर जिल्ह्यात शुक्रवारी पहाटे ३.६ रिश्टर स्केलचा भूकंप झाला. यात कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्याचे वृत्त नाही, असे पोलिसांनी सांगितले. हा भूकंप पहाटे ४.४२ वाजता झाला.

### चोऱ्या करणाऱ्या महिला टोळीचा पर्दाफाश

**वाराणसी** : येथील रामनगर पोलिस स्टेशन हद्दीतील डोमरी येथे धार्मिक कथा कार्यक्रमात दागिने चोरांच्या टोळीत सहभागी असलेल्या १५ महिलांना पोलिसांनी अटक केली, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली. प्रसिद्ध कथावाचक पंडित प्रदीप मिश्रा यांच्या कथाकथना कार्यक्रमात पकडलेल्या महिलांकडून अंदाजे १० लाख रुपयांचे दागिने जप्त करण्यात आले. सर्व महिलांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

#### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ७९,११७.११ (+१,९६१.३२) |
| निफ्टी | २३,९०७.२५ (+५५७.३५) |

#### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | ७८,८२० रु. |
| चांदी (प्रतिकिलो) | ९२,००० रु. |

#### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३२.३ | १७.४ |
| अमरावती | २९.६ | १६.७ |
| भंडारा | ३०.० | -.- |
| बुलडाणा | २७.० | १५.२ |
| चंद्रपूर | २८.६ | १५.२ |
| गडचिरोली | २८.६ | १३.० |
| गोंदिया | २८.२ | १२.८ |
| नागपूर | २९.१ | १५.१ |
| वर्धा | २९.१ | १५.२ |
| वाशीम | २९.० | -.- |
| यवतमाळ | ३०.० | -.- |

# काँग्रेस व मित्रपक्षांच्या सरकारांनीच घेतली अदानींकडून लाच

## फेडरल कोर्टातील दस्तावेजांमधून समोर आले सत्य

◆ **नवी दिल्ली, २२ नोव्हेंबर**

भारतातील उद्योगपती गौतम अदानी यांनी त्यांच्या वीज वितरण कंपन्यांसाठी सौर ऊर्जा करार प्राप्त करण्याकरिता भारतातील काही राज्य सरकारांना २,११० कोटी रुपयांची लाच दिल्याचा गंभीर आरोप अमेरिकेने नुकताच केला. यावरून अपेक्षेप्रमाणे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. मात्र, या प्रकरणी न्यू यॉर्क येथील फेडरल कोर्टात जे दस्तावेज सादर करण्यात आले आहेत, ते राहुल गांधी यांनाच तोंडघशी पाडणारे आहेत. कारण, अदानी यांनी ही लाच काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांचे सरकार असलेल्या राज्यांमधील अधिकाऱ्यांना दिली असल्याचे यात स्पष्टपणे नमूद आहे.




गौतम अदानी यांच्यासोबतच त्यांचा भाचा सागर याशिवाय विनीत जैन, रंजीत गुप्ता, सायरिल कॅबेनिस, सौरभ अग्रवाल, दीपक मल्होत्रा आणि रूपेश अग्रवाल यांच्यावरही अमेरिकेने लाचखोरीचा आरोप केला आहे. ही लाच २०२० ते २०२४ या काळात देण्यात आली होती.

अमेरिकेच्या सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज कमिशनच्या (एसईसी) याचिकेवर न्यू यॉर्क येथील फेडरल कोर्टात सुनावणी झाली. यात गौतम अदानी यांच्यासह आठ जणांवर लाच देण्याचा आरोप ठेवण्यात आला. यानंतर लगेच राहुल गांधी यांनी पत्रपरिषद घेत, पंतप्रधान मोदी यांच्यावर थेट हल्ला केला. पंतप्रधान मोदी या प्रकरणी काहीच करू शकत नाही. कारण, चौकशीचा आदेश दिला तर आपणच त्यात अडकू, याची भीती त्यांना आहे, असे राहुल गांधी यांनी नेहमीच्या शैलीत सांगितले. त्यानंतर आता फेडरल कोर्टातील दस्तावेजांमध्ये नमूद असलेली लाचखोरांची नावे समोर आली आहेत. यात प्रामुख्याने काँग्रेसची सत्ता असलेले तेलंगणा राज्य, मित्रपक्ष द्रमुकची सत्ता असलेले तामिळनाडू, जगनमोहन रेड्डी यांची सत्ता असलेले आंधप्रदेश आणि नवीन पटनायक यांच्या ओडिशा राज्यातील अधिकाऱ्यांना अदानी यांच्या समूहाने लाच दिली असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. (वृत्तसंस्था)

### भाजपाचा जोरदार पलटवार

हाच धागा पकडून भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते संबित पात्रा यांनी राहुल गांधी आणि काँग्रेसवर जोरदार पलटवार केला. भारत आणि देशाची सुरक्षा करणाऱ्या उद्योगांवर गंभीर आरोप करण्याची काँग्रेसची जुनी सवय आहे. त्यांच्या रणनीतीचा तो एक भागच आहे. राहुल गांधी यांनी २०१९ मध्ये राफेलचा मुद्दा असाच उपस्थित केला होता. कोरोना महामारीच्या काळातही ते लसींच्या मुद्यावर अशाच प्रकारे पत्रपरिषद घ्यायचे. यानंतर त्यांना सर्वोच्च न्यायालयात माफी मागावी लागली, हा भाग वेगळा.

# गोंदियात शुक्रवारी यंदाचे नीचांकी तापमान

## विदर्भात सर्वात थंड




◆ **गोंदिया, २२ नोव्हेंबर**

गत आठवड्यापासून जिल्ह्याचा पारा सातत्याने घसरत चालला आहे. शुक्रवार, २२ नोव्हेंबर रोजी गोंदिया जिल्ह्यात यंदाच्या मोसमातील सर्वात कमी तापमानाची नोंद करण्यात आली. आज जिल्ह्यातील किमान तापमान थेट १२.८ अंश सेल्सिअस व कमाल तापमान २८.१ अंश सेल्सिअस नोंदले गेले आहे.

नोव्हेंबरच्या पंधरवड्यानंतर तापमानात सातत्याने घट होत आहे. बुधवार, १३ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील तापमान १६.२ अंश सेल्सिअस नोंदले गेले होते, तर गुरुवारी किमान तापमान घसरून १४.८ अंश सेल्सिअसवर आले होते. शुक्रवारी १४.६ अंश सेल्सिअसवर आले. त्यानंतर आठवडाभर जिल्ह्यातील तापमान १४ अंश सेल्सिअसच्या खालीच राहिले. त्यामुळे जिल्हावासीयांना थंडीचा सामना करावा लागत आहे. त्यातच आज, शुक्रवार २२ नोव्हेंबर रोजी तापमान १३ अंश सेल्सिअसच्या खाली गेले असून १२.८ अंश सेल्सिअसची नोंद घेण्यात आली. यंदाच्या मोसमातील ही नीचांकी नोंद असून विदर्भात सर्वात थंड वातावरण गोंदियात आहे. (तभा वृत्तसेवा)



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी आपल्या तीन देशांच्या पाच दिवसीय दौऱ्याचा समारोप गयानाच्या जॉर्जटाऊन शहरात केला. या शहरातील सरस्वती विद्या निकेतन शाळेला त्यांनी भेट दिली आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधल्यानंतर भगवान शिवशंकराच्या पिंडीचे दर्शन घेतले

# हरयाणात होणाऱ्या गीता महोत्सवात टांझानियाची भागीदारी

◆ **चंदीगड, २२ नोव्हेंबर**

वार्षिक आंतरराष्ट्रीय गीता महोत्सव हे जागतिक सौदार्य आणि परस्पर समंजसपणाला चालना देण्यासाठी एकत्र आणू शकते. गीता महोत्सव हा असा पूल आहे, जो आपल्याला जोडतो आणि सांस्कृतिक वारशाचे सखोल संबंध वाढवते, असे भारतातील उच्चायुक्त अनिसा म्बेगा यांनी पत्रपरिषदेत सांगितले.

२८ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर दरम्यान कुरूक्षेत्र हरयाणात साजऱ्या होणाऱ्या या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय गीता महोत्सवासाठी टांझानिया हा भागीदार देश आहे, तर ओडिशा भागीदार राज्य आहे. या महोत्सवातील मुख्य कार्यक्रम ५ ते ११ डिसेंबर दरम्यान होणार आहेत. आंतरराष्ट्रीय गीता महोत्सव दोन प्रदेशांमधील आकर्षक भागीदारी प्रतिबिंबित करतो. सांस्कृतिक परंपरा आणि चिरस्थायी संबंध कसे निर्माण करू शकतात, हे या माध्यमातून दर्शवते. (वृत्तसंस्था)

# नवतरुणाईचे राजकीय भवितव्य आज ठरणार

◆ **मुंबई, २२ नोव्हेंबर**



महाराष्ट्राच्या पंधराव्या विधानसभेसाठी राज्यात निवडणूक पार पडली. या निवडणुकीत नव्या दमाच्या १७ तरुण उमेदवारांनी राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवले आहे. त्यामुळे शनिवारी होणाऱ्या मतमोजणीत मतदारांनी नव तरुणाईचे राजकीय भवितव्य काय ठरवले आहे, हे स्पष्ट होणार आहे.

मतदारांनी कोणत्या उमेदवाराच्या पदरात आपला कौल दिला, हे शनिवारी स्पष्ट होणार आहे. या निवडणुकीत २८८ मतदारसंघांपैकी १७ मतदारसंघांत १७ नव्या दमाच्या तरुणाईने राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवत भवितव्याची सुरुवात केली आहे. मात्र, यापैकी किती उमेदवारांना जनतेने विधानसभेत जाण्यासाठी कौल दिला, हे शनिवारी दिसणार आहे.

**१७ उमेदवार पुढीलप्रमाणे**

सलीम अनिल देशमुख, काटोल, अमित राज ठाकरे, माहीम, योगेंद्र श्रीनिवास पवार, बारामती, श्रीजया अशोक चव्हाण, मुखेड, संजना रावसाहेब दानवे, कन्नड, स्नेहल माणिकराव जगताप, महाड, राहुल प्रकाश आवडे, इचलकरंजी, मंदा बाबुळकर-कुपेकर, चंदगड, रोहित रावसाहेब पवार, कवठेमहांकाळ, अर्चना चाकूरकर पाटील, लातूर शहर, सना मलिक, अनुशक्ती नगर, फहाद अहमद, नगर, केदार दिघे, पाचपखाडी कोपरी, दीपेश म्हात्रे, डोंबिवली, वरुण सरदेसाई, वांद्रा, करण संजय देवतळे, वरोरा, बंटी शेळके, नागपूर मध्य, भाग्यश्री आत्राम, अहेरी. (तभा वृत्तसेवा)

# माफी मागा, अन्यथा १०० कोटींची नुकसानभरपाई द्या

### विनोद तावडे यांची खडगे, राहुल गांधी यांना नोटीस

◆ **नवी दिल्ली, २२ नोव्हेंबर**

५ कोटींच्या केलेल्या आरोपांवर भाजपा महासचिव विनोद तावडे यांनी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना १०० कोटी रुपयांच्या मानहानीनीची नोटीस पाठवली आहे.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या आधी विनोद तावडे मतदारांना वाटण्यासाठी ५ कोटी रुपये घेऊन मुंबईतील एका हॉटेलमध्ये पोहोचले होते, असा आरोप काँग्रेसने करीत राज्यात खळबळ उडवली होती. या आरोपांसाठी खडगे, राहुल गांधी तसेच काँग्रेस प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत यांनी माफी मागावी, अशी मागणी तावडे यांनी या नोटिसीतून केली आहे. माफी मागितली नाही, तर १०० कोटी रुपयांच्या नुकसान भरपाईची मागणीही तावडे यांनी केली. खडगे आणि राहुल गांधी यांना एकतर माफी मागावी लागेल, वा मानहानीच्या खटल्याला सामोरे जावे लागेल, असा इशारा या नोटिसीतून देण्यात आला आहे.

विनोद तावडे यांनी आज एक्स या समाजमाध्यमातून या नोटिसीची माहिती दिली. जनतेची दिशाभूल करणाऱ्या बातम्या पसरवणे एवढे एकच काँग्रेसचे काम आहे. नालासोपारा प्रकरणी मी खडगे, राहुल गांधी आणि सुप्रिया श्रीनेत यांच्यावर नोटीस बजावली आहे. मतदारांना पैसे वाटण्यासाठी मी ५ कोटी रुपये घेऊन आलो होतो, असा आरोप करून त्यांनी माझी आणि भाजपाची बदनामी केली. निवडणूक आयोग आणि पोलिसांना कुठेच ५ कोटी रुपये सापडले नाही, ही वस्तुस्थिती सर्वांसमोर आहे. हे प्रकरण म्हणजे काँग्रेसच्या निम्नदर्जाच्या राजकारणाचा धडधडीत पुरावा आहे, असे तावडे म्हणाले. या आरोपाबाबत काँग्रेस नेत्यांनी केलेल्या टि?टमुळे त्यांना मानहानीच्या खटल्याची ही नोटीस देण्यात आली आहे, असे ते म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

# वानखेडे निवडून येतील; पण आपला राजकीय संन्यास!

### आ. दादाराव केचे यांची भूमिका

◆ **आर्वी, २२ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीचा प्रचार संपल्यानंतर आपण भाजपा उमेदवार सुमित वानखेडे यांच्या विरोधात काम केल्यासंबंधी अफवा मतदारसंघात पसरवण्यात आल्या. त्यामुळे आपण व्यथित झालो. त्यामुळेच आपण राजकीय संन्यास घेण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती आ. दादाराव केचे यांनी आज पत्रपरिषदेत दिली.

आ. दादाराव केचे म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत भाजपाने आर्वी विधानसभेत उमेदवारी देण्याचे पक्षश्रेष्ठींनी आश्वासन देऊनही आपल्याला उमेदवारी न देता सुमित वानखेडे यांना उमेदवारी दिली. आपण अपक्ष व भाजपाकडून उमेदवारी अर्ज भरला होता. परंतु, गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्याला बोलावून समजावल्यावर अर्ज मागे घेतला. निवडणूक प्रचारात मतदारसंघात भाजपाचे अधिकृत उमेदवार सुमित वानखेडे यांच्यासाठी २७ प्रचार सभा, अनेक समाजाचे मेळावे, मोठ्या सभांमध्ये स्वतः उपस्थित राहून भाषण देत सुमित वानखेडे यांना विजयी करण्याचे आवाहन केले. काही मेळावे स्वत: लावून घेतली व पक्षनिष्ठेने काम केले. मात्र, प्रचार संपल्यानंतर दोन दिवसांत आपल्याविरुद्ध षडयंत्र रचून सुमित वानखेडे यांच्या विरोधात काम केले, अशा अफवा पसरवण्यात आल्या.



आपण आर्वी विधानसभा मतदारसंघात कार्यकर्ते निर्माण करून कमळ फुलवले. असे असतानाही पक्षविरोधी काम केल्याचा आरोप होत असल्यामुळे आपण व्यथित झालो असल्याचे त्यांनी सांगितले.

पक्षातर्फे संधी मिळू नये, याकरिता पक्षातीलच चार-पाच कार्यकर्त्यांनी कट रचला आहे. परंतु, आपली भूमिका ठाम होती. वानखेडे ११० टक्के निवडून येणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यापुढे राजकारणात भाग घेणार नाही. परंतु, कार्यकर्त्यांवर प्रेम ठेवून त्यांची कामे व सामाजिक कार्य करीत राहील, असेही केचे यांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

# आ. बच्चू कडू यांची निर्दोष मुक्तता

### मंत्रालयात लिपिकाला मारहाण प्रकरण

◆ **मुंबई, २२ नोव्हेंबर**

येथील विशेष न्यायालयाने शुक्रवारी राज्याचे माजी मंत्री आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष, आमदार ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू यांची २०११ च्या दक्षिण मुंबईतील राज्य सचिवालयातील मंत्रालयातील लिपिकाला थापड मारल्याच्या खटल्यातून निर्दोष मुक्तता केली.

विशेष न्यायालयाचे न्या. ए. यू. कदम यांनी खासदार आणि आमदारांशी संबंधित खटल्यांची सुनावणी करताना अमरावती जिल्ह्यातील अचलपूरचे अपक्ष आमदार कडू यांची निर्दोष मुक्तता केली. आदेशाचे तपशील अद्याप उपलब्ध नाहीत.

तक्रारीनुसार, बच्चू कडू यांनी जानेवारी २०११ मध्ये मंत्रालयात सार्वजनिक आरोग्य विभागात काम करणाऱ्या एका लिपिकाला वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यासाठी निवडलेल्या एका व्यक्तीकडून पैशाची मागणी केल्याप्रकरणी मारहाण केली होती.

बच्चू कडू यांनी कर्मचाऱ्याला थापड मारली आणि तत्कालीन आरोग्य मंत्री सुरेश शेट्टी यांच्या स्वीय सहायकाच्या केबिनमध्ये हात धरून ओढले. डॉक्टरांच्या नियुक्तीशी आपला काहीही संबंध नाही, असे तक्रारीत म्हटले आहे. तक्रारीच्या आधारे आमदार बच्चू कडूंविरुद्ध मरिन ड्राईव्ह पोलिस ठाण्यात संबंधित कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. (वृत्तसंस्था)

# राज्यात सर्वाधिक मतदान चिमूर व ब्रह्मपुरीत!

◆ **चंद्रपूर, २२ नोव्हेंबर**

राज्य निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील मतदानाची अधिकृत आकडेवारी जाहीर केली असून राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघात झालेल्या मतदानात चंद्रपूर जिल्ह्यातील दोन विधानसभा मतदारसंघ अग्रेसर ठरले आहे. चिमूर आणि ब्रह्मपुरी हे दोन विधानसभा मतदारसंघ अनुक्रमे पहिल्या व दुसऱ्या क्रमांकावर आहेत. २०१९ च्या निवडणुकीतही चंद्रपूर जिल्ह्यात चिमूर विधानसभेतच सर्वाधिक मतदान झाले होते. यंदा तर या मतदारसंघाने अवघ्या राज्यात आपले नाव नोंदविले आहे.

तिसऱ्या क्रमांकावर छत्रपती संभाजीनगरचा सिल्लोड विधानसभा मतदारसंघ आहे. चिमूर व ब्रह्मपुरी हे दोन विधानसभा मतदारसंघ राज्यात मतदानाच्या टक्केवारीत अव्वल ठरण्याची ही बहुधा पहिलीच वेळ असावी.

निवडणूक आयोगाच्या आकड्यानुसार, राज्यात पहिल्या क्रमांकावर चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर मतदारसंघ आहे. या मतदारसंघात विक्रमी ८१.९५ टक्के मतदान झाल्याची नोंद आहे, तर ब्रह्मपुरी विधानसभा मतदारसंघ दुसऱ्या क्रमांकावर आहे, जेथे ८०.५४ टक्के मतदान झाले आहे.

चिमूर विधानसभा मतदारसंघात भाजपाचे बंटी भांगडिया हे अधिकृत उमेदवार असून त्यांची लढत काँग्रेसचे उमेदवार सतीश वारजुकर यांच्याशी होत आहे. ही लढत चुरशीची ठरली असून शनिवारी या मतदारसंघातून कोण निवडून येईल याचा निकाल लागेल, तर ब्रह्मपुरी विधानसभा मतदारसंघात राज्याचे विरोधी पक्षनेता विजय वडेट्टीवार यांनी काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढवली. त्यांच्या विरोधात नवा चेहरा म्हणून भाजपाने क्रिष्णालाल सहारे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले होते.

त्यांनीही चांगली लढत दिली. याही मतदारसंघाच्या निकालाची सर्वांना उत्सुकता आहे. मतदानाच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड विधानसभा मतदारसंघात ८० टक्के मतदान झाले आहे. येथील निवडणुकीसाठी महायुतीतील शिवसेनेने अब्दुल सत्तार यांना उमेदवारी दिली आहे, तर महाविकास आघाडीतील उबाठाने सुरेश बनकर यांना उमेदवार केले आहे. (तभा वृत्तसेवा)



गुजरातच्या सुरत येथील नॅचर पार्कमध्ये सिंहिणीचे ही दोन छावे शुक्रवारी सकाळच्या कोवळ्या उन्हात मस्ती करताना दिसत आहेत

## इति-उवाच...




अजून निकाल लागायचा आहे आणि संजय राऊतांना सत्तास्थापनेची घाई झाली आहे. नवरीचा पत्ता नाही आणि हॉल घेतला, बॅण्डबाजा आला. सगळे आहे पण सत्ता कुठे आहे?

**नारायण राणे,** भाजपा



आतापासूनच एकनाथ शिंदे व इतर नेत्यांनी उमेदवारांना ५०-५०, १००-१०० कोटी रुपयांची ऑफर द्यायला सुरुवात केली आहे. कारण, त्यांना जिंकण्याची खात्री नाही. ज्यांना जिंकण्याची खात्री नसते, तेच पैसे द्यायला तयार होतात.

**संजय राऊत,** उबाठा



राजकारणात सीमा ठेवून वागता यायला हवे. एकमेकांचा विरोध करताना अलिकडच्या काळात एकमेकांना नावे ठेवण्याची स्पर्धा सुरू आहे. गेल्या निवडणुकीत हे दिसून आले. हे व्हायला नको.

**राम नाईक,** भाजपा



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत अपक्ष आणि छोट्या पक्षांची भूमिका महत्त्वाची ठरू शकते. आमचा पक्ष सत्ता स्थापन करणाऱ्यांसोबत जाईल, हे स्पष्टच आहे.

**प्रकाश आंबेडकर,** वंचित बहुजन आघाडी

# बहुमत न मिळाल्यास भाजपाचा 'प्लॅन बी'

## सहा नेत्यांवर सोपवली महत्त्वाची जबाबदारी

◆ **मुंबई, २२ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीची मतमोजणी शनिवारी होणार आहे. दुपारपर्यंत राज्यातील चित्र स्पष्ट होणार आहे. अर्थात्, राज्यात महायुतीची सत्ता येणार की महाविकास आघाडीची, याचे उत्तर मिळणार आहे. तथापि, महायुतीला पूर्ण बहुमत मिळाले नाही तर काय करायचे, याची ठोस योजना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शासकीय निवासस्थानी आज झालेल्या बैठकीत निश्चित करण्यात आली आहे. अशा स्थितीत अपक्ष आणि बंडखोरांना महायुतीकडे आणण्याची जबाबदारी सहा नेत्यांवर सोपविण्यात आली आहे.



राज्य विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होण्यासाठी अवघे काही तास उरले आहेत. बहुतेक सर्वच जनमत चाचण्यामधून राज्यात महायुतीचे सरकार येणार असल्याचे भाकीत करण्यात आले आहे. तथापि, अंतिम निकाल काय असणार, हे सध्या तरी अस्पष्ट असल्याने महायुती आणि महाविकास आघाडीच्या गोटात हालचालींना वेग आला आहे. अपक्ष आणि बंडखोर उमेदवारांना आपल्याकडे व:ळविण्याचे प्रयत्न महाविकास आघाडी आणि महायुतीकडून करण्यात येत आहेत.

त्यातच, देवेंद्र फडणवीस यांनी आज सकाळी आपल्या सागर बंगल्यावर काही महत्त्वाच्या नेत्यांची बैठक बोलावली होती. विजयी होणाऱ्या बंडखोर आणि अपक्ष उमेदवारांवर भाजपाची नजर आहे. या आमदारांशी संपर्क करण्यासाठी भाजपाने सहा नेत्यांवर जबाबदारी सोपवली आहे. यात रवींद्र चव्हाण, प्रवीण दरेकर, संजय कुटे, मोहित कंबोज, नितेश राणे आणि निरंजन डावखरे यांचा समावेश आहे. ◂*(तभा वृत्तसेवा)*

# सरकार कोणाचे, महायुतीचे की महाविकास आघाडीचे

## २०१९ मधील चुकांची पुनरावृत्ती टाळण्याचे भाजपाचे प्रयत्न

**श्यामकांत जहागीरदार**



◆ **नवी दिल्ली, २२ नोव्हेंबर**

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत झालेल्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही, याची काळजी यावेळी भाजपा घेत आहे. त्यावेळी भाजपा सर्वांत जास्त म्हणजे १०५ जागा जिंकणारा पक्ष असतानाही सत्तेपासून वंचित राहिला होता. २०१४ च्या निवडणुकीत राज्यातील दोन्ही आघाड्या तुटल्या होत्या. भाजपा, शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढवली होती. नंतर शिवसेना भाजपासोबत आली होती, हा भाग वेगळा.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपा आणि शिवसेना यांनी एकत्रित निवडणूक लढवली होती. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचीही आघाडी होती. भाजपाने १६४ जागा लढवत १०५ जागा जिंकल्या होत्या, शिवसेनेने १२४ जागा लढवत फक्त ५६ जागा जिंकल्या होत्या. काँग्रेसने १४७ जागा लढवत ४४, तर राष्ट्रवादी काँग्रेसने १२१ जागा लढवत ५४ जागा जिंकल्या होत्या. निवडणुकीचे निकाल लागण्याआधीच उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाची स्वप्ने पडू लागली. या मुद्यावरून शिवसेनेने भाजपावर दबाव आणायला सुरुवात केली होती. भाजपाला बहुमत न मिळाल्यामुळे शिवसेनेने मुख्यमंत्रिपदाची मागणी लावून धरली. त्यामुळे भाजपा-सेना युतीत तणाव निर्माण झाला, त्याची परिणती युती तुटण्यात झाली. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस राज्यात सरकार स्थापन करण्याच्या स्थितीत नव्हते. राज्यात अस्थिर राजकीय परिस्थिती निर्माण झाल्यामुळे राष्ट्रपती राजवट लावावी लागली.



२३ नोव्हेंबरला पहाटे भाजपाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्याने सरकार स्थापन केले. देवेंद्र फडणवीस यांनी दुसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. अजित पवार उपमुख्यमंत्री झाले. पण अचानक अजिदादांसोबत आलेले आमदार परत शरद पवारांकडे गेल्यामुळे नवे सरकार बहुमत सिद्ध करण्याच्या स्थितीत नव्हते. त्यामुळे तीन दिवसांतच या सरकारला राजीनामा द्यावा लागला. नंतर शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची महाविकास आघाडी तयार झाली आणि त्यांनी सरकार स्थापन केले. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. अजित पवार नेहमीप्रमाणे उपमुख्यमंत्री झाले. काँग्रेसचे नाना पटोले यांच्याकडे विधानसभेचे अध्यक्षपद आले. भाजपा आणि शिवसेना तसेच काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस अशा आघाड्या विचारधारेच्या दृष्टीने नैसर्गिक मानल्या जात होत्या. हिंदुत्ववादी शिवसेना हिंदुत्वविरोधक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत गेल्यामुळे ही आघाडी अनैसर्गिक म्हटली जाऊ लागली. उद्धव ठाकरे यांच्या या भूमिकेवरून जनतेतच नाही तर शिवसेनेचे आमदार आणि शिवसैनिकांमध्येही असंतोष निर्माण झाला.

उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री म्हणून राज्यातील जनतेने मनापासून स्वीकारलेच नाही. त्यामुळे ठाकरे यांचीही मंत्रालयात जाण्याची आणि सहाव्या मजल्यावरील मुख्यमंत्री कार्यालयातील खूर्चीवर बसण्याची हिंमत झाली नाही. याची परिणती अखेर शिवसेनेत बंड होण्यात झाली. एकनाथ शिंदे जवळपास ४० अपक्ष आमदारांसह शिवसेनेतून बाहेर पडले. दहा अपक्ष आमदारांनीही त्यांना पाठिंबा दिला. शिंदे गटासोबत भाजपाने सरकार स्थापन केले. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले, तर आधी मुख्यमंत्री असणारे देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. काही महिन्यांतच राष्ट्रवादी काँग्रेसमधून अजित पवार समर्थक आमदारांसह बाहेर पडले आणि आणि या सरकारमध्ये सहभागी झाले. अजित पवार यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यामुळेच यावेळी निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडी अशी झाली. दोन्ही आघाड्यांमध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस आहे. त्यामुळे महायुतीला बहुमत मिळो की महाविकास आघाडीला, नवीन सरकारमध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस कायम राहणार आहे.

कोणत्याच आघाडीला बहुमत मिळाले नाही, तर मात्र राज्यात काही धक्कादायक नवी राजकीय समीकरणे आकारला येतील, अशी चर्चा आहे. महाविकास आघाडीला बहुमतासाठी काही जागा कमी पडल्या तर अजित पवार आपल्या काकांकडे परत जाऊ शकतात. भाजपाला म्हणजे महायुतीला बहुमतासाठी काही जागा कमी पडल्या तर उद्धव ठाकरे परत भाजपासोबत येऊ शकतात. उद्धव ठाकरे भाजपासोबत आले नाही, तर शरद पवारही भाजपा सरकारला पाठिंबा देण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही आमदार निवडून आले तर राज ठाकरे यांची मनसे महायुतीला पाठिंबा देऊ शकते ■

# ओझरला रात्री साडेदहापर्यंत मतदान

## सुरगाणा, त्र्यंबकेश्वर, इगतपुरीच्या मतपेट्या मध्यरात्री जमा



◆ **नाशिक, २२ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीत मतदानाच्या दिवशी निफाड मतदारसंघातील ओझर टाऊनशिप येथे रात्री साडेदहापर्यंत मतदान सुरू राहिले. मनमाड शहरात ९.५० पर्यंत मतदान चालले. मतदान झाल्यावर येथील मतपेट्या 'सील' करून मतमोजणीच्या ठिकाणी जमा करण्यात आल्या.

जिल्ह्यात सुरगाणा तालुक्यातील मतपेट्या मध्यरात्री प्राप्त झाल्या. त्र्यंबकेश्वर व इगतपुरी तालुक्यांतील दुर्गम भागातील मतपेट्या येण्यासाठी पहाटेचे तीन वाजल्याचे जिल्हा प्रशासनाने सांगितले. त्यामुळे मतदान झाल्यावर ईव्हीएम 'सील' करण्याची प्रक्रिया पार पाडून शासनाने दिलेले अहवाल पूर्णत: भरल्यावर केंद्रप्रमुखांना गाडीबरोबर यावे लागले. त्र्यंबकेश्वर आणि इगतपुरी येथील केंद्रांवरील कर्मचाऱ्यांना सर्वाधिक प्रवास करावा लागला.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील शासकीय कन्या शाळेत त्यांनी मतदान यंत्रे जमा केली आहेत. निफाड तालुक्याचे मतदान घटले, तरी रात्री उशिरापर्यंत मतदान सुरू होते. ओझर टाऊनशिप येथील १४९ क्रमांकाच्या बुथवर रात्री साडेदहापर्यंत मतदान झाले. मतदानाची वेळ सायंकाळी सहापर्यंत असताना त्यापूर्वीच एकगठ्ठा लोक मतदान केंद्रात आले. त्यांना टोकन वाटप करण्यात आले. ज्या मतदारांना वेळीच टोकन प्राप्त झाले, त्यांचे मतदान होईपर्यंत ही प्रक्रिया सुरू राहिली. ◂*(वृत्तसंस्था)*

# इम्तियाज जलीलांवर ॲट्रॉसिटी गुन्हा दाखल

### मतदानाच्या दिवशी झाला होता वाद

◆ **छ. संभाजीनगर, २२ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या दिवशी भाजपाचे कार्यकर्ते आणि पूर्व विधानसभा मतदासंघातील एमआयएमचे उमेदवार इम्तियाज जलील यांच्यात वाद झाला होता. याप्रकरणी भाजपा पदाधिकाऱ्यांच्या तक्रारीनुसार, जलील यांच्यावर ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. यामुळे राजकीय वाद पुन्हा उफाळून येण्याची शक्यता वर्तवली जात आहे



विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी जलील आणि भाजपाचे सरचिटणीस जालिंदर शेंडगे पंडित नेहरू महाविद्यालयातील बूथवर आपसात भिडले होते. यानंतर शेंडगे यांनी गुरुवारी रात्री उशिरा पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. यानुसार जलील यांच्यावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारीत म्हटले आहे की, भारतनगर परीसरात केंद्रावर मतदान सुरू असताना जलील १५ ते २० जणांसह तेथे आले. ◂*(वृत्तसंस्था)*

### बूथ कॅप्चर भाजपाने केले : जलील

भाजपा आणि शिवसेना लढत असलेल्या विधानसभा मतदारसंघात पैशांचा पाऊस पाडला गेला. मुख्यमंत्री, गृहमंत्र्यांकडून कारवाई न करण्याचा आदेश असल्याने भाजपाचे मंत्री अतुल सावे यांच्या कार्यकर्त्यांनी पैसे वाटले. अनेक ठिकाणी बुथ कॅप्चर केले. असे असतानाही माझ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. मतदान काळातील गैरप्रकाराचे व्हिडीओसह पुरावे आणि कारवाईची मागणी करणारे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांपासून केंद्रीय निवडणूक आयोगाला देत असल्याची माहिती जलील यांनी पत्रपरिषदेत दिली. माझ्याविरोधात उभे भाजपाचे मंत्री अतुल सावे यांच्या कार्यकर्त्यांनी गरीब, मुस्लिम वस्त्यांमध्ये इलेक्शन कार्ड आणि आधार कार्ड घेऊन पैसे देऊन शाई लावल्या जात होती. तीन मुस्लिम उमेदवारांना पैसे दिले गेले. या सर्व प्रकाराचे व्हिडीओ त्यांनी पत्रपरिषदेत दाखवले. अतुल सावे यांनी शेंडगे, सोनवणे यांना दलित वसाहतीत वाटण्यासाठी बुधवारी दुपारी चार वाजता २ कोटी रुपये दिले. त्यांच्यावर निवडणूक विभाग कारवाई का करीत नाही, असा सवाल इम्तियाज जलील यांनी केला. ■

# ४९ मतदारसंघ ठरवणार खरी शिवसेना कोणाची!

### ठाकरे-शिंदेंची प्रतिष्ठा पणाला

◆ **मुंबई, २२ नोव्हेंबर**

एकनाथ शिंदेंबरोबर जास्त आमदार असल्याने निवडणूक आयोगाने त्यांच्या गटाला खरी शिवसेना म्हणून मान्यता दिली. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या गटाला नवे नाव आणि नवे निवडणूक चिन्ह घेऊन ही निवडणूक लढवावी लागली. मात्र, निवडणुकीत मतदार कोणत्या शिवसेनेची निवड करणार, जनतेच्या न्यायालयात खरी शिवसेना म्हणून कुणाला मान्यता मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शिवसेनेचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या मुंबई महानगर प्रदेशात १९ जागांवर आणि एकट्या मुंबईत १२ मतदारसंघात ठाकरेंची शिवसेना विरुद्ध शिंदेंची शिवसेना असा थेट सामना होत आहे. मराठवाडा आणि कोकणात आठ, विदर्भात सहा, उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्रात प्रत्येकी चार जागांवर शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत झाली. मतदारांच्या नजरेतील बाळासाहेबांचा खरा वारसदार कोण, याचा निकाल या शनिवारी मतमोजणीनंतर लागणार आहे.

यावेळची विधानसभा निवडणूक ही उद्धव ठाकरे आणि त्यांच्या गटासाठी लिटमस टेस्टसारखी आहे. आपल्या वडिलांचा खरा वारसदार कोण, हे सिद्ध करण्याची संधी त्यांच्याकडे चालून आली आहे. दुसऱ्या बाजूला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोरही शिवसेनेचे जास्तीत जास्त आमदार निवडून आणण्याचे आव्हान आहे. ◂*(वृत्तसंस्था)*

### आमचा पक्ष खरा असल्याचा दावा

राज्यातील एकूण ४९ मतदारसंघांमध्ये शिवसेना (ठाकरे) विरुद्ध शिवसेना (शिंदे) पक्षाचे उमेदवार आमने-सामने उभे ठाकले आहेत. या ४९ मतदारसंघांवर संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. यातील जास्त जागा जो पक्ष जिंकेल, तो बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांवर चालणारा पक्ष आमचाच आणि आम्हीच मूळ शिवसेना आहोत, असा दावा करू शकेल. त्या ४९ मतदारसंघांमध्ये मागाठाणे, भांडुप पश्चिम, जोगेश्वरी पूर्व, दिंडोशी, चेंबूर, माहीम, भायखळा, वरळी, विक्रोळी, कुर्ला, अंधेरी पूर्व, कुडाळ, रत्नागिरी, राजापूर, सावंतवाडी, महाड, दापोली, गुहागर, कर्जत, पालघर, अंबरनाथ, भोईसर, भिवंडी ग्रामीण, कल्याण पश्चिम, ओवळा माजिवडा, कोपरी पाचपाखाडी, छ. संभाजीनगर पश्चिम, मध्य, परभणी, सिल्लोड, पैठण, कन्नड, वैजापूर, धाराशिव, उमरगा, कळमनुरी, चोपडा, नांदगाव, मालेगाव बाह्य, बार्शी, सांगोळा, राधानगरी, नेवासा, बुलढाणा, मेहकर, बाळापूर, रामटेक, दर्यापूर आदींचा समावेश आहे. ■

# ठाकरेंच्या उमेदवाराने निकालाआधीच काढली 'विजय रॅली'



◆ **रत्नागिरी, २२ नोव्हेंबर**

अवघ्या कोकणचे लक्ष लागून राहिलेल्या दापोली विधानसभा मतदारसंघात 'कॉंटे की टक्कर' होणार असल्याचे संकेत आहेत. शिवसेनेचे नेते, माजी पर्यावरण मंत्री रामदास कदम यांचे पुत्र व विद्यमान आमदार योगेश कदम यांच्यासमोर ठाकरे गटाचे उमेदवार संजय कदम यांनी मोठे आव्हान उभे केले आहे. या मतदारसंघात योगेश कदम यांचा विजय निश्चित मानला जात असतानाच ठाकरे गटाचे उमेदवार संजय कदम यांनी निकालाआधीच विजय रॅली काढून आपला विजय निश्चित असल्याचे जाहीर केले.

कोकणात दापोली मतदारसंघात शिवसेना-भाजपामधील वाद सर्वश्रुत होता. मात्र, निवडणुकीच्या दरम्यान मुख्यमंत्र्यांच्या सभेआधी तो मिटवण्यात आला होता. त्यामुळे महायुतीने एकत्र काम केले होते. असे असले तरी महायुतीमधीलच भाजपाच्या एक महिला पदाधिकाऱ्याने मात्र दाभोळ गटात आमदार योगेश कदम यांच्या विरोधात भूमिका घेतल्याची उघड चर्चा दापोलीत सुरू आहे. त्या महायुतीच्या एकाही बैठकीला उपस्थित राहिल्या नाहीत. त्यामुळे दाभोळ जिल्हा परिषद गटात महाविकास आघाडीच्या संजय कदम यांना बळ मिळाले. इतकेच नाही, तर काही गणिते फिरवण्यात आल्याचीही दापोलीत जोरदार चर्चा आहे. त्यामुळे दापोली विधानसभा मतदारसंघ हा अचानक चर्चेत आला आहे. ◂*(वृत्तसंस्था)*

# राज्यभरात निवडणुकीशी संबंधित १५९ गुन्हे

## 'ईव्हीएम' मोडतोड, आचारसंहितेचा भंग

◆ **मुंबई, २२ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी राज्यभरात कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. निवडणुकीदरम्यान १५९ गुन्हे दाखल करण्यात आले. त्यात अदखलपात्र गुन्ह्यांचाही समावेश असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. निवडणुकीशी संबंधित मुंबईत दोन, ठाण्यात चार गुन्हे, नवी मुंबईत तीन गुन्ह्यांचा समावेश आहे. परळी येथे ईव्हीएम मोडतोडप्रकरणी तीन गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यात ११ जणांना अटक करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.



निवडणुकीच्या काळात मुंबईत दोन गुन्हे व दोन अदखलपात्र गुन्ह्यांची नोंद करण्यात आली. त्यापैकी पहिला गुन्हा आग्रीपाडा पोलिसांनी दाखल केला. त्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नावाचे बनावट पत्र प्रसारित केल्याप्रकरणी शिंदे गटाच्या माजी शाखाप्रमुखाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याशिवाय मुंबईत मुंबादेवी व मलबार हिल येथील मतदारयादीसह गुजरातमधील दोन व्यक्ती सापडल्या. त्यांच्याविरोधात व्ही. पी. रोड पोलिसांनी आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

याशिवाय नाशिक, पुणे, नागपूर, सोलापूर नगर, चंद्रपूर, पालघर, हिंगोली येथे गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. सर्वाधिक गुन्हे नाशिक जिल्ह्यात दाखल झाल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

### बीडमध्ये ईव्हीएम फोडण्याचा प्रयत्न

बीड जिल्ह्यातील घाटनांदूर येथे मतदान यंत्र फोडण्याचा प्रयत्न झाला तसेच दोन गट एकमेकांसमोर आले. याप्रकरणी तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यात ११ जणांना अटक करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. याप्रकरणी जवळपास ४० जणांवर अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात अतिशय गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले. ◂*(वृत्तसंस्था)*

# भाजपा कार्यकर्त्यांचा वॉर रुममध्ये घुसण्याचा प्रयत्न : रोहित पवार

◆ **नगर, २२ नोव्हेंबर**

भाजपाच्या सुमारे २५-३० कार्यकर्त्यांनी कर्जत-जामखेड मतदारसंघात मध्यरात्री ईव्हीएम ठेवलेल्या स्ट्रॉंग रूममध्ये घुसण्याचा प्रयत्न केला, असा आरोप शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी एक्सवर पोस्टवर केला.

सीआरपीएफ आणि माझ्या कार्यकर्त्यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. भाजपा कार्यकर्त्यांचा हा प्रयत्न म्हणजे पराभवाच्या भीतीने सुरू असलेली गुंडागर्दी आहे, असा आरोप त्यांनी केला.

रोहित पवार यांनी ट्विटमध्ये म्हटले की, भाजपाच्या कार्यकर्त्यांनी मध्यरात्री ईव्हीएम ठेवलेल्या स्ट्रॉंग रुममध्ये घुसण्याचा प्रयत्न केला, परंतु माझे कार्यकर्ते आणि सीआरपीएफच्या जवानांनी संयमाने परिस्थिती हाताळत हा प्रयत्न हाणून पाडल्याबाबत त्यांचे आभार! याबाबत गुन्हा दाखल करताना भाजपाच्या दबावाखाली असलेल्या स्थानिक पोलिस प्रशासनाने मात्र सहकार्य करण्याऐवजी त्रास देण्याची भूमिका घेतली, याची निवडणूक आयोगाने योग्य दखल घ्यावी. भाजपा कार्यकर्त्यांना आता पराभव दिसत आहे. त्यामुळे ते गुंडागर्दी करीत आहे. ◂*(वृत्तसंस्था)*

# आघाडी, महायुतीकडून बच्चू कडूंना फोन

◆ **मुंबई, २२ नोव्हेंबर**

परिवर्तन महाशक्तीचे घटक असलेले आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांना महाविकास आघाडी आणि महायुतीसोबत येण्यासंदर्भात फोन आल्याची माहिती पुढे आली आहे.

बच्चू कडू यांनी स्वत: याबाबत माहिती दिली. शनिवारी निकाल लागल्यावर आम्ही पुढील निर्णय घेणार असल्याचे बच्चू कडू म्हणाले. बच्च कडू सध्या मुंबईतच आहेत. त्यामुळे ते नेमकी काय भूमिका घेतात आणि मविआ की महायुतीची साथ देतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



शनिवारी सकाळी ८ वाजता राज्यातील सर्व मतदारसंघांमध्ये मतमोजणीला सुरुवात होईल. या पृष्ठभूमीवर महायुती आणि महाविकास आघाडीच्या गोटात हालचालींना प्रचंड वेग आला आहे.

### माढा, करमाळ्यावर विशेष लक्ष


निकालाआधीच महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांनी अपक्ष निवडणूक लढवलेल्या संभाव्य विजयी उमेदवारांना फोन करण्यास सुरुवात केली आहे. यात माढा मतदारसंघातून आमदार बबन शिंदे यांचे पुत्र रणजीत शिंदे यांनी अपक्ष निवडणूक लढवली होती. त्यांच्याकडे संभाव्य विजयी उमेदवार म्हणून बघितले जात आहे. तर करमाळा विधानसभा मतदारसंघात त्यांचे चुलते संजयमामा शिंदे यांनी देखील अपक्ष निवडणूक लढवली होती. या दोन्ही नेत्यांना महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांचे फोन येत आहेत. ◂*(वृत्तसंस्था)*

# कुणी पत्नी, आईला गमावले; पण आधी मतदान मग अन्त्यसंस्कार!

◆ **जळगाव, २२ नोव्हेंबर**

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी राज्यभरात मतदान पार पडले. जळगाव जिल्ह्यात दोन कुटुंबातील सदस्यांचे निधन झाल्यानंतर त्यांचा मृतदेह घरात असताना दोघांनी मतदानाचे कर्तव्य बजावल्याचे आदर्श उदाहरण समाजासमोर ठेवले. पहिल्या घटनेत एका व्यक्तीच्या पत्नीचा मृत्यू झाला. दुसऱ्या घटनेत आईचे निधन झाले असताना मुलाने आईवर अन्त्यसंस्कार करण्यापूर्वी मतदानाचे कर्तव्य बजावत समाजासमोर आदर्श ठेवला.

जळगाव जिल्ह्यातील कळमडू येथील छायाबाई बच्छे यांचे मतदानाच्या दिवशी आकस्मिक निधन झाले. त्यानंतरही पती राजेंद्र नामदेव बच्छे यांनी भावांसह मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचे कर्तव्य पार पाडले.



राजेंद्र बच्छे हे शेतमजूर आहेत. घरात पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे. मुलगा अंकुश याची चार महिन्यांपूर्वी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या अग्निवीर प्रशिक्षणासाठी निवड झाली होती. तो प्रशिक्षणासाठी बेळगाव येथे गेला आहे. त्यामुळे तो आईच्या अन्त्यविधीसाठी येऊ शकला नाही. मुलगी रोहिणीने आईला अग्नी दिला.

### आई गेल्याचे दु:ख, तरी राष्ट्रीय कर्तव्य निभावले

दुसऱ्या घटनेत एरंडोल शहरात किराणा दुकानदार विशाल राजेंद्र येवले यांच्या आई सुनीता यांचे बुधवारी पहाटे सहा वाजता निधन झाले. संपूर्ण परिवार दु:खात बुडालेला असताना, विशाल याने आई गमावल्याचे दु:ख बाजूला सारून राष्ट्रीय कर्तव्याचा विचार केला. आधी मतदान केले आणि नंतर आईवर अन्त्यसंस्कार केला. ◂*(वृत्तसंस्था)*

## अग्रलेख...

# प्रतीक्षा संपली; आज निकाल

झारखंड आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची मतमोजणी आज होत असून, या दोन्ही राज्यांचा कौल कुणाला मिळाला, याचे उत्तर यातून मिळणार आहे. झारखंडमध्ये एनडीए आणि इंडिया आघाडी, तर महाराष्ट्रात महायुती आणि महाविकास आघाडी अशी लढत आहे. बहुतांश एक्झिट पोलने या दोन्ही राज्यांत एनडीएला म्हणजे रालोआला बहुमत दाखवले आहे. एक्झिट पोलचे निष्कर्ष खरे ठरले तर भाजपा झारखंडमधील सत्ता झारखंड मुक्ती मोर्चाकडून हिसकावून घेईल, तर महाराष्ट्रातील आपली सत्ता कायम ठेवल. अपेक्षेप्रमाणे निकाल लागला तर या दोन्ही राज्यांना डबल इंजिनच्या सरकारचे फायदे मिळतील. केंद्रात आणि राज्यात एकाच पक्षाचे सरकार असले तर राज्याच्या विकासाला गती मिळते, याचा अनुभव आपण आतापर्यंत भाजपाशासित राज्यांच्या विकासावरून घेतला आहे. अशा राज्यांना निधीची अडचण येत नाही. यावेळच्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात विक्रमी मतदान झाले आहे. याआधी १९९५ मध्ये राज्यात विक्रमी मतदान झाले होते; त्यानंतर ३० वर्षांनंतर मतदारांनी भरभरून मतदान करत लोकशाहीवरील आपली अढळ निष्ठा प्रकट केली आहे. लोकसभा निवडणुकीत राज्यात जवळपास ६१ टक्के मतदान झाले होते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीतही एवढेच मतदान झाले होते. यावेळी मात्र ६६ टक्के मतदान राज्यात झाले. मतदानातील ५ टक्क्यांची वाढ हे चांगले लक्षण म्हटले पाहिजे. सुरुवातीला मतदानाची गती संथ होती, त्यामुळे ५० टक्के मतदान तरी होईल की नाही, अशी चिंता वाटत होती. पण दुपारनंतर मतदार घराबाहेर पडला आणि मतदान केंद्रावर पोहोचला; त्याचा हा परिणाम म्हणायला हरकत नाही. या वाढीव मतदानाचा फायदा कुणाला मिळणार त्यावर निवडणुकीचा निकाल अवलंबून आहे. मात्र सध्या वाढीव मतदानाने महायुती आणि महाविकास आघाडी या दोघांच्याही चिंता वाढवल्या आहेत. आपल्या विजयाबाबत महायुतीचे नेते जेवढे आश्वस्त आहेत, तेवढे महाविकास आघाडीचे नेते दिसत नाही. उसने अवसान आणून बोलायचे तसे आघाडीचे नेते बहुमताचे दावे करताना दिसत आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपाला स्वबळावर बहुमत मिळविता आले नव्हते. त्यामुळे भाजपाला जनतेने नाकारले, असा सोयीस्कर अपप्रचार विरोधी पक्षांनी सुरू केला होता. भाजपाने संयुक्त जनता दल आणि तेलगू देसम या दोन मित्रपक्षांच्या पाठिंब्यावर सरकार स्थापन केले तरी भाजपाच्या नेतृत्वाच्या मनात एक रुखरुख लागून गेली होती. भाजपाचा आत्मविश्वासही काही प्रमाणात डगमगला होता.

हरयाणा विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे भाजपात नवचैतन्य आले, आत्मविश्वास निर्माण झाला. झारखंड आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपाला यश मिळाले तर येथून पुढे भाजपाच्या विजयाचा रथ भरधाव निघेल, यात शंका नाही. लोकसभा निवडणुकीच्या निकालाने काही प्रमाणात आलेले औदासीन्य या दोन राज्यांतील निकालाने पूर्णपणे निघून जाणार आहे. भाजपा नेत्यांचा आत्मविश्वास वाढणार आहे. झारखंडमध्ये कोणाला बहुमत मिळाले याचा राष्ट्रीय राजकारणावर फारसा परिणाम होणार नाही; मात्र महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक निकालाचा राष्ट्रीय राजकारणावर दूरगामी परिणाम होणार आहे. याचे कारण महाराष्ट्र हे राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे राज्य आहे. लोकसभेच्या देशातील दुसऱ्या क्रमांकाच्या म्हणजे ४८ जागा महाराष्ट्रात आहेत. लोकसभेच्या ८० जागा असलेले उत्तरप्रदेश देशात पहिल्या क्रमांकावर आहे. झारखंडमध्ये विधानसभेच्या ८१ जागा आहेत, तर महाराष्ट्रात २८८. त्यामुळे महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निकालाकडे संपूर्ण राज्याचेच नाही तर देशाचेही लक्ष लागणे स्वाभाविक आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात ज्या नाट्यपूर्ण राजकीय घटना घडल्या, त्यामुळे यावेळची निवडणूक अतिशय चुरशीची आणि थरारक झाली. निवडणूक विधानसभेची असली, तरी प्रत्येक राज्यातील निवडणूक तेथील राजकीय परिस्थिती, समस्या, लोकांचे प्रश्न यानुसार वेगळी असते, निवडणुकीचे मुद्दे वेगळे असतात. त्यामुळे दोन राज्यांत एकाच वेळी होणाऱ्या निवडणुकीची तुलना करता येत नाही. महाराष्ट्रात यावेळी दोन्ही बाजूने झंझावाती प्रचार केला. मतदारांवर लोकप्रिय आश्वासनांचा वर्षाव करण्यात आला. आरोप-प्रत्यारोप झाले. काही वेळेला यात दोन्ही बाजूने पातळीही सुटली. दोन्ही बाजूचे कार्यकर्ते प्रसंगी हाणामारीवरही आले. पैसा तर पाण्यासारखा खर्च झाला. युद्धात आणि प्रेमात सर्व माफ असते, असे म्हणतात, त्यात आता राजकारण आणि निवडणूकही जोडायला हरकत नाही. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे बदलून गेली. राज्यात आधी चार प्रमुख पक्षांच्या दोन आघाड्या होत्या. भाजपा, शिवसेना आणि काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे राज्यातील चार प्रमुख पक्ष होते. पण नंतर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली. शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या हिंदुत्वविरोधी भूमिकेमुळे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात हिंदुत्वाच्या मुद्यावर आमदारांचा एक गट शिवसेनेतून बाहेर पडला आणि त्याने भाजपासोबत सरकार स्थापन केले. काही काळाने राष्ट्रवादी काँग्रेसमधून अजित पवारही या सरकारमध्ये सामील झाले. विशेष म्हणजे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या दोन्ही गटांनी आपली वैधानिकता सिद्ध केली, त्यामुळे त्यांना मूळ पक्ष म्हणून मान्यता मिळाली. त्यामुळे यावेळची निवडणूक दोन आघाड्यांतील सहा पक्षांत झाली. भाजपाच्या नेतृत्वातील युतीत भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस, तर काँग्रेसच्या नेतृत्वातील आघाडीत काँग्रेससोबत शिवसेना उबाठा तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आहे. विशेष म्हणजे यावेळी कोणत्याच आघाडीने आपला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केला नाही. निकालानंतर आम्ही मुख्यमंत्रिपदाबाबात विचार करू, अशी सावध भूमिका दोन्ही आघाड्यांनी घेतली आहे; जी स्वाभाविक म्हणावी लागेल. कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील, त्यावरून मुख्यमंत्रिपदाचा निर्णय दोन्ही आघाड्यांना करावा लागणार आहे. महायुती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात निवडणूक लढवत असली, तरी निकालानंतर तेच मुख्यमंत्री होतील, याची जशी खात्री देता येत नाही तसेच ते होणारच नाही, हेही छातीठोकपणे सांगता येणार नाही.

महाविकास आघाडीत तर 'बाजारात तुरी...'प्रमाणे मुख्यमंत्रिपदावरून आतापासूनच कलगीतुरा सुरू झाला आहे. काँग्रेस आणि उबाठा गटाचे नेते निकाल लागला नसताना नळावर बायका भांडतात, त्याप्रमाणे मुख्यमंत्रिपदासाठी एकमेकांचे कपडे फाडू लागले आहेत. त्या तुलनेत महायुतीत मुख्यमंत्रिपदावरून कोणतेच मतभेद दिसत नाहीत. राज्यात आधी सत्ता येणे म्हणजे बहुमत मिळणे आवश्यक आहे. त्यानंतर या पदाबाबत निर्णय घेता येईल, अशी समजूतदारीची भूमिका महायुतीतील तिन्ही पक्षांच्या नेत्यांनी घेतली आहे. महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर तिन्ही पक्षांचे नेते एकत्र बसून याबाबतचा निर्णय सर्वसहमतीने घेतील, यात शंका नाही. भाजपा संसदीय मंडळाची यात मोठी भूमिका राहू शकते. एखादवेळी महाविकास आघाडीला बहुमत मिळाले तरी मुख्यमंत्रिपदावरून त्यांच्यात तीव्र स्वरूपाचे मतभेद झाल्याशिवाय राहणार नाही. शिवसेना उबाठा काँग्रेसला मुख्यमंत्रिपदावर बसू देणार नाही आणि काँग्रेस उबाठाला. या वादात दोन मांजरांच्या भांडणात बोका लोण्याचा गोळा पळवतो, तशी स्थिती महाविकास आघाडीत झाली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. यात बोका कोण राहू शकतो, हे वेगळे सांगायची गरज नाही. कोणालाही बहुमत मिळाले आणि कोणीही मुख्यमंत्री झाला तरी त्याने राज्यातील लोकांचे प्रश्न सोडविले पाहिजे. आपले प्रश्न सोडविण्यासाठी जनतेने आपल्याला निवडून दिले, याचे भान ठेवले पाहिजे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे बहुमत मिळाल्यामुळे कोणी उतू नये आणि पराभवामुळे कोणी खचू नये. लोकशाहीतील लोकांचा जो कौल असेल त्याचा आदरपूर्वक स्वीकार केला पाहिजे.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# राज ठाकरे ००७?



आज महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल घोषित होईल. साधारण दुपारनंतर महाराष्ट्राच्या जनतेचा कौल कोणाला आहे, हे स्पष्ट होईल. महायुती आणि महाविकास आघाडी हे दोन प्रमुख संघ एकमेकांविरोधात उभे ठाकले आहेत. विशेष म्हणजे शिवसेना आणि राष्ट्रवादीचे दोन गट परस्परविरोधी संघात असून, त्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. एकनाथ शिंदे यांचे म्हणणे आहे की, गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्राच्या जनतेने आघाडी आणि युती दोन्ही सरकारचा कारभार पाहिला आहे; दोन्ही सरकारे सुमारे अडीच वर्षे सत्तेवर होती. त्यामुळे महाराष्ट्राची जनता युतीलाच बहुमत देईल. दुसरीकडे वंचित बहुजन आघाडी कोणाची मते खाणार, हेसुद्धा लवकरच कळेल. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रात राष्ट्रीय पक्षांची जादू चालणार नाही; मात्र स्थानिक पक्ष चांगली कामगिरी करू शकतात. दोन्ही शिवसेना आणि दोन्ही राष्ट्रवादी असे स्थानिक पक्ष सोडले तर कोणाचीही इतकी क्षमता नाही की, ते महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी कामगिरी करू शकतील.

अजित पवार आघाडीतून युतीत आले आणि उद्धव ठाकरे युतीतून आघाडीत गेले. मात्र दोन्ही नेत्यांमध्ये फरक आहे. अजित पवार जरी युतीत आले असले, तरी त्यांनी त्यांची सेक्युलर इमेज जपली आहे. 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेवरही त्यांनी आक्षेप घेतला होता. त्यांनी हिंदुत्वासाठी कोणतीही सकारात्मक विधाने केली नाहीत. त्यामुळे युतीत त्यांच्याविषयी नाराजी आहे. पण एक स्वतंत्र पक्ष म्हणून त्यांनी त्यांची ओळख कायम ठेवली. दुसरीकडे उद्धव ठाकरे मात्र आघाडीला पूर्णपणे शरण गेले. उलट आघाडीतले नेते जितके सेक्युलर नसतील, त्याहीपेक्षा आपण मोठे सेक्युलर आहोत हे दाखवण्याचा अट्टहास उद्धव ठाकरेंनी केला आणि त्यांनी परतीचे सगळे मार्ग बंद करून टाकले. बाळासाहेबांच्या अगदी विपरीत राजकारण ते करीत आहेत. या अट्टहासापोटी त्यांना त्यांचा पक्ष गमवावा लागला आणि उबाठा गट म्हणून मिरवावे लागत आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात असे म्हणतात की, शरद पवारांच्या गळाला लागलेल्या कोणत्याही माश्याचे भवितव्य चांगले नसते. असो...

उद्धव ठाकरेंच्या तुलनेत राज ठाकरेंचा विचार केला तर राज यांनी व्यवस्थित माघार घेत आपलं स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवलं. २०१९ मध्ये ते पवारांसाठी प्रचार करीत आहेत की काय, अशी शंका महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात निर्माण झाली होती. पण ते वेळीच सावरले. त्यानंतर त्यांनी पक्षाचे धोरण म्हणून हिंदुत्व हाती घेतलं. लगेच 'हिंदुजननायक' ही उपाधीही पदरात पाडून घेतली आणि हिंदुत्वाचा आणखी एक नवा चेहरा समोर आला. त्यांचा प्रवास अगदी बाळासाहेबांसारखा आहे. आधी मराठी आणि मग हिंदुत्व. दुर्दैवाने त्यांना बाळासाहेबांसारखे यश लाभले नाही. शिंदेंनी उठाव केल्यानंतर शिंदे, फडणवीस आणि राज ठाकरे एकत्र येतील असे वातावरण होते. भेटीगाठीही होत होत्या. पण अजित पवार बंड करून युतीत सहभागी झाल्यामुळे मनसेला कोणते स्थान द्यायचे हा मुद्दा होता. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत राज ठाकरेंनी युतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला; पण शिवसेनेच्या चिन्हावर निवडणूक लढण्यास ठाकरेंनी नकार दिला. आपला पक्ष वेगळा आहे आणि आपला उमेदवार मनसेच्याच चिन्हावर निवडणूक लढेल, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. आता विधानसभेच्या निवडणुकीतही काही अंशी त्यांनी शिंदे व भाजपावर टीका करून आपलं स्वतंत्र अस्तित्व अबाधित ठेवलं. मात्र त्यांचं मुख्य लक्ष्य होतं शरद पवार आणि उद्धव ठाकरे. राज ठाकरेंनी पवारांना नास्तिक म्हटल्यावर पवार आपण आस्तिक आहोत, हे दाखवण्यासाठी पुढे सरसावले. महाराष्ट्रात पवारांनी जातीयवाद रुजवला अशी राज यांनी केलेली टीकादेखील पवारांना झोंबली. या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान उद्धव ठाकरेंचा त्यांनी कठोर समाचार घेतला. शिवसेना उद्धव ठाकरेंमुळेच फुटली असं त्यांनी जाहीरपणे सांगितलं. अमित ठाकरे यांनीही आपल्या काकांवर टीका केलेली आहे. त्यामुळे आपलं युद्ध हे शरद पवार आणि उद्धव ठाकरेंविरोधात आहे हे त्यांनी घोषित केलं आहे.

या निवडणुकीत मनसेने १३५ उमेदवार उभे केले आहेत. २५ उमेदवार तर मुंबईत दिले आहेत. राज ठाकरे गेली दोन महिने ते सत्तेत बसणार असं आत्मविश्वासाने म्हणत आहेत. या आत्मविश्वासामागचं कारण आपण शोधलं पाहिजे. अजित पवार हे दीर्घकाळ युतीत राहू शकत नाहीत. आज निकाल लागला आणि महायुतीचं सरकार स्थापन होणार आहे, असं स्पष्ट झालं आणि उद्या हिंदुत्वाच्या मुद्यावर आक्षेप घेत अजित पवार बाहेर पडले तर सरकार पडेल, अशी शंका भाजपाला असू शकते. म्हणूनच राज ठाकरे जरी प्रत्यक्षात युतीत नसले आणि एक पक्ष म्हणून स्वतःची वेगळी ओळख जरी त्यांनी कायम ठेवली असली, तरी ते युतीबाहेरील युतीचे हितचिंतक म्हणून काम करीत आहेत. त्यामुळे अजित पवारांशिवाय सत्ता स्थापन होऊ शकते याची पूर्वतयारी आधीच झालेली असू शकते. १३५ उमेदवारांपैकी राज ठाकरे यांनी सुमारे ३०-३५ जागांवर जोर लावला आहे. यापैकी ८ ते १० जागा जरी त्यांना जिंकता आल्या तरी सत्तेत बसण्याचा त्यांचा मार्ग मोकळा होईल. मात्र, किमान ८ जागा तरी त्यांना जिंकाव्या लागणार आहेत. असे झाले तर त्यांच्या पक्षाला नवी भरारी मिळेल. केवळ निवडणुकीच्या वेळीच चार्ज होणारा पक्ष अशी नकारात्मक ओळख त्यांना पुसावी लागणार आहे आणि या निवडणुकीनंतर पक्ष बांधणी, संघटनेवर लक्ष केंद्रित करावे लागणार आहे. राज ठाकरे यांचे भवितव्य काय असेल हे आज स्पष्ट होईलच. मात्र राज हे युतीचे हितचिंतक आहेत आणि त्यांना युतीच्या सरकारमध्ये बसण्याची इच्छा व खात्री आहे तसेच त्यांना शिंदे व फडणवीसांचा पाठिंबा आहे, असेही वरवर पाहता दिसून येते. म्हणूनच 'राज ठाकरे ००७?' हे या लेखासाठी योग्य शीर्षक आहे. तुम्हाला काय वाटते?

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# विदर्भातील काश्मीरची संपावी आता उपेक्षा!

काश्मीरचे नाव काढताच निसर्गरम्य वातावरण डोळ्यांपुढे येते. त्या खऱ्या जम्मू-काश्मिरात जाण्याची बहुतांश लोकांची मनोमन इच्छा असते. याकरिता ते लोक लाखो रुपये खर्च करून आपली इच्छा पूर्णही करतात. पण हीच मंडळी विदर्भातील काश्मीरकडे भटकतही नाही. असे का व्हावे? याचा विचार करण्याची वेळ प्रत्येकावर आली आहे. नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी आणि रामटेक तालुक्यात विदर्भातील काश्मीर वसले आहे. या काश्मीरचा नियोजित विकास करून येथे आपण डॉलरचा पाऊस पाडू शकतो, एवढी ताकद या भागाची आहे. पण सातत्याने होत असलेली उपेक्षा आणि स्थानिकांची निराशा यामुळे विदर्भातील काश्मीर निसर्गसंपन्न असतानाही मागे पडले आहे. पेंच व्याघ्र प्रकल्पातील कोलितमारा, कुंवारा भिवसेन, कामठी खैरी येथील पेंच प्रकल्प जलाशय, तोतलाडोह येथील मेघदूत जलाशय, अंबाखोरी, खिंडसी, रामटेक गडमंदिर, नगरधनचा किल्ला, मनसर येथील स्तूप, पारशिवनी येथील ऐतिहासिक तलाव, घोगरा महादेव, कालभैरव पेठ येथील ऐतिहासिक मंदिर, घाटकुकडा, धवलापूर, देवलापार या भागातील निसर्गसौंदर्य डोळे दीपवून टाकणारे आहे. ज्या व्यक्तीला रामटेक गडमंदिरावर सकाळ पाहायला मिळाली, त्याला येणारी अनुभूती स्वर्गसुख देणारी असते. एवढे तेथील वातावरण आल्हाददायक आहे. मग आपण मागे का पडलो याचे मंथन करायला हवे. पहिले कारण येथील वाहतूक व्यवस्था मजबूत नाही. याकरिता रेल्वे मंडळाशी बोलून तातडीने सेवाग्राम एक्सप्रेस, पॅसेंजर गाड्या आणि इतरही गाड्या रामटेक येथून सुरू करायला हव्यात. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मनावर घेतले तर पारशिवनीपर्यंत महामेट्रो येऊ शकते. ती मेट्रो रेल्वे आल्यास पर्यटक वाढतील, पर्यायाने लोकांना जाणे-येणे सोपे होईल. समजा मेट्रो आणणे खर्चीक असल्यास मनसर डुमरी येथून पारशिवनीपर्यंत रेल्वे मार्ग टाकण्यात यावा; जेणेकरून पारशिवनी रेल्वे मार्गाशी जुळेल. त्यात अडचणी आल्यास खापरखेडा येथून पारशिवनीपर्यंत रेल्वे मार्ग आणता येईल. पाहा, इच्छा असेल तर कुठूनही रेल्वे पारशिवनीत येऊ शकते. इच्छा नसेल तर मग काहीच होणार नाही. तसे पाहता पारशिवनी तालुका सन १९८० मध्ये उदयास आला, पण इतरांच्या तुलनेत मागेच पडला. पारशिवनी येथील साधा बसस्थानकाचा विषय वर्षानुवर्षे रखडला होता. पण आता दिवस बदलले आहेत. लोकांना झटपट विकास हवा आहे. कुठलीही व्यक्ती प्रतीक्षा करायला तयार नाही.

ही नव्या युगातील मंडळी वायुवेगाने समोर जाण्यासाठी आसुसलेली आहे. अशा नव्या युगाचा विचार करता सरकारनेही पुढाकार घ्यावा. सरकार समजा तयार नसेल तर त्यांनी खाजगी विश्वासू कंपन्यांना याकरिता नेमावे. रामटेक तालुक्यातील मनसर येथे पर्यटक महर्षी चंद्रपाल चौकसे यांनी स्वबळावर रामधामची निर्मिती करून लिम्का बुकमध्ये आपले नाव सुवर्ण अक्षराने नोंदविले. त्यांनी तर सरकारकडून मदतही घेतली नाही. मग एक व्यक्ती स्वबळावर एवढे काही करू शकते, तर सरकारने समजा विचार केल्यास चमत्कार घडू शकतो, नाही का? ही सर्व चर्चा करण्याची गरज म्हणजे या भागातील खनिज संपत्ती, वनसंपदा, वनसौंदर्य, वन्यप्राण्यांची वाढलेली संख्या पाहता येथे पर्यटन वेगाने वाढू शकते. मागे जलसंपदा विभागाने पारशिवनी तालुक्यातील कामठी खैरी येथील पेंच प्रकल्प धरणाच्या सुशोभीकरणाचे काम हाती घेतले होते. तेव्हा त्यांनी आहे त्याला विकसित न करता सर्व तोडून धरणासह पिंपळाच्या आकारातील उद्यानाचा सत्यानाश केला. ज्यांनी पिंपळाचे उद्यान पाहिले होते, ती मंडळी आज धरण भागात गेल्यावर अक्षरशः रडतात. एवढी विदारक परिस्थिती धरणासह पिंपळाच्या आकारातील उद्यानाची केली आहे. ज्या सुपिक डोक्यातून ही कल्पना आली होती आणि ज्यांनी हे काम केले त्यांच्याकडून या नुकसानीची भरपाई करायला हवी. विकास म्हणजे भकास करणे होत नसते. कदाचित त्यांनी तोच विचार केला आणि होतकरू अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी केलेल्या मेहनतीवर पाणी फेरले. विदर्भातील काश्मीरमध्ये वन उपज संपदा भरपूर आहे. पण त्यावर प्रक्रिया करणारा उद्योगच नाही. नाशिकमध्ये द्राक्षापासून वाईन काढली तर जगमान्यता मिळते. पण विदर्भाच्या काश्मीरमधील लोकांवर मात्र मोहफुलापासून दारू काढल्यास गुन्हा दाखल होतो. यावर गांभीर्याने विचार करून त्यांनाही सनदशीर मार्गाने मोहफुलापासून अर्क काढण्याची परवानगी शासनाने द्यायला हवी. कदाचित तोही चांगला उद्योग या क्षेत्रातील लोकांना लाभदायक ठरेल.

९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# गुडघ्याला बाशिंग...!



एका मुख्यमंत्रिपदासाठी भाजपाच्या पाठीत खंजीर खुपसून काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या मांडीवर जाऊन बसणारे उद्धव ठाकरे यावेळी पुन्हा गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असल्याचे दिसते. अर्थात हा चर्चा किंवा अंदाज नव्हे, तर प्रत्यक्षात त्यांच्या घरगड्याने याबाबतचा दावा केलाय्. दुसरीकडे महाविकास आघाडीतला मोठा भाऊ असलेल्या काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेदेखील गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असल्याचं त्यांच्या वक्तव्यातून दिसले. बरं; अद्याप निकालाचा पत्ता नाही. वेगवेगळ्या सर्व्हेमधून महायुतीला झुकतं माप देण्यात आलं आहे. तर, सट्टेबाजाराने महायुतीला फेव्हर केल्याचे दिसते. अशात कुठूनही सत्ता येण्याची चिन्हे नसताना, मुख्यमंत्रिपदासाठी दावे-प्रतिदावे, मारामारी करून गुडघ्याला बाशिंग बांधून फिरण्याच्या प्रकाराला 'उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग' असे म्हणतात.

राज्यात कुणाची सत्ता येणार हे आज स्पष्ट होणार आहे. मात्र, त्याआधीच काँग्रेस आणि उबाठा गटाला मुख्यमंत्रिपदाची स्वप्ने पडू लागली आहेत. यात सर्वांत चतुर पक्ष हा शरद पवारांचा आहे. नेहमी एकदम सेफ खेळी करत असतात. शरद पवार, सुप्रिया सुळे आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे सातत्यानं सांगताहेत की, आम्ही मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत नाही. अर्थात संख्याबळ साजेसं मिळालं, तर शरद पवार आपल्या हयातीत मुलीला मुख्यमंत्री बनविल्याशिवाय राहणार नाहीत; किंबहुना त्यांची हीच शेवटची इच्छादेखील म्हणता येईल. पण माणसाच्या सर्वच इच्छा एका जन्मात पूर्ण होत नसतात, ही दुसरी बाजूदेखील असल्याने व जनता आपल्या पदरात सत्तास्थापनेसाठी लागणारी मॅजिक फिगर टाकते किंवा नाही याबाबत कदाचित शरद पवारांच्या मनात संभ्रम असल्याने ते सावध पावलं टाकत असल्याचे दिसत आहे. तसे शरद पवारांइतकं महाराष्ट्राला कोणी ओळखून नाही, असे म्हणतात. त्यामुळे शरद पवारांना महाराष्ट्राच्या मनात काय आहे, याची कुणकुण लागली असावी; त्याहीमुळे कदाचित पवार आणि त्यांचे नेते दूर बसून काँग्रेस आणि उबाठामध्ये चाललेला तमाशा बघत बसले असावेत. बरं; यात दोन्ही घरचा घरगडी आपल्या मालकाच्या नावासोबत दुसऱ्या मालकाच्या मुलीचे नाव चालविण्याऐवजी जयंत पाटलाचे नाव पुढे करू लागला आहे. महत्त्वाचं म्हणजे जयंत पाटलासाठी ठाकरे गटाचा पाठिंबा असल्याचेदेखील जाहीर करून टाकले घरगड्याने. आता हा सर्व प्रकार मालकाला विचारून केलाय् की दुसऱ्या मालकाच्या इशाऱ्यावर करताय् हा मात्र गुलदस्त्यातला विषय आहे. पवार गट स्वतः मुख्यमंत्रिपदावर दावा करत नसताना, घरगड्याला नसता उपद्रव करायला सांगितलं तरी कोणी, असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. कदाचित काँग्रेसवर कुरघोडी करण्याचा हा प्रयत्न असण्याची शक्यता नाकारता येत नाही. आम्हाला नाही तर तुम्हालाही नाही... या सूत्रावर आधारित हा प्रकार उबाठाकडून सुरू केला असण्याची शक्यता आहे. काही का असेना, पण मुख्यमंत्रिपदाच्या लोभात आंधळे झालेल्या काँग्रेस आणि उबाठाला कळत नाही आहे की, अद्याप जनादेश आपल्या बाजूला आलेला नाही. सगळे सर्व्हे आणि एक्झिट पोल हे महायुतीच्या बाजूने दाखविले जात आहेत. सट्टाबाजारात दिलेले दर हे कुठेही जुळत नाहीत; त्यात जमीन-आसमानचा फरक आहे. त्यामुळे काटेकी टक्कर आहे असे म्हणता येईल, अशातला भागदेखील नाही. त्यात फार मोठी तफावत आहे. महायुतीला ते केवळ १५ पैसे तर आघाडीला ६ रुपये देत आहेत. सगळ्या शक्यता आणि संकेतांकडे कानाडोळा करत महाविकास आघाडीतील तीन पक्षांपैकी दोन म्हणजे काँग्रेस आणि उबाठा हे बैठका काय घेत आहेत, रणनीती काय बनवत आहेत, मुख्यमंत्रिपदाचे चेहरे घोषित करण्याची चढाओढ काय चालली आहे, आमदार सुरक्षित ठेवण्याची रणनीती काय आखली जात आहे, नवनियुक्त आमदार कुणाच्या संपर्कात येणार नाही, याची काळजी काय घेतली जात आहे, सारं काही हास्यास्पद.

बरं; या सगळ्या सर्कसजन्य वागणुकीत काँग्रेस तर उबाठापेक्षा दोन पावलं पुढे निघाली आहे. त्यांनी राष्ट्रीय पातळीवरून उपाययोजना आखण्याची व्यवस्था करणे, तेलंगणाचे मुख्यमंत्री आणि कर्नाटकचे उपमुख्यमंत्र्यांची आमदारांच्या सुरक्षेसाठी नेमणूक करणे आणि विजयी आमदारांना विशेष विमानाने सुरक्षित स्थळी हलवण्याची योजना आखणे, आमदारांसाठी सुरक्षितस्थळ निवडणे, कदाचित यालाच 'मुंगेरीलाल के हसीन सपनें' असे म्हणत असावेत.

राज्यात मतदान झाल्यानंतर विविध वृतवाहिन्यांनी एक्झिट पोलचे निष्कर्ष जाहीर केले आहेत. त्यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळत असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. तर, सर्वाधिक जागा भाजपाला दाखवण्यात आल्या आहेत. त्यामुळे भाजपा आणि महायुतीच्या घटक पक्षांच्या गोटात सध्या 'फिल गुड'चे वातावरण आहे. शिवाय तसाच काहीसा ग्राऊंड रिपोर्ट येत आहे. जेथे लोकसभेत भाजपाचा दारुण पराभव झाला, त्या लोकसभा मतदारसंघातही भाजपा-महायुतीचे घटक पक्ष चांगली कामगिरी करताना दिसत आहेत. सर्व स्तरावरून चांगले संकेत येत असताना महायुतीतील घटक पक्ष मुख्यमंत्रिपदावरून मारामारी तर सोडा; साधी चर्चादेखील करण्यात स्वारस्य दाखवताना दिसत नाही. खऱ्या अर्थाने ज्यांना महाराष्ट्रातील जनता संधी देत असल्याचे सबळ संकेत मिळत असताना, महायुतीचे घटक पक्ष काँग्रेस आणि उबाठासारखा आततायीपणा करताना दिसत नाहीत. भाजपाचे देवेंद्र फडणवीस तर सध्याच्या राजकारणातील चाणक्यच आहेत. ते आपली रणनीती प्रत्यक्षात अमलात येईपर्यंत माहिती होऊ देण्यात माहीर आहेत. पण शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार यांनीदेखील कमालीची परिपक्वता दाखविली आहे. या संयमाला आणि राजकीय चातुर्यालाच परिपक्वता म्हणतात. जी महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये दिसली नाही; किंबहुना त्यांच्यात नाहीच. त्यामुळेच कशात काही नसताना नाना पटोले, उद्धव ठाकरे गुडघ्याला बाशिंग बांधून फिरताना दिसत आहेत. शिवाय सार्वजनिकपणे स्वतःच्याच अब्रूचे धिंडवडे काढत निघाल्याचे दिसत आहे. उद्या दुपारपर्यंत बेस्ट सीएम व त्यांच्या घरगड्याच्या चेहऱ्यावरील हास्य आणि उसनं अवसान हे गळून पडेल, यात शंका नाही.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### लोकोत्सव थाटात संपन्न

२० नोव्हेंबरला नेहमीपेक्षा जास्त मतदान झाले. यामुळे लोकोत्सवाला आगळेवेगळे महत्त्व आल्याचे दिसून आले व लोकोत्सव थाटात संपन्न झाला. जास्त मतदानाचा फटका मतदार कोणाला देतील हे आज कळेलच. एक्झिट पोलचे बहुमताचे पारडे महायुतीकडे दाखवीत आहे. माझ्या मते महाविकास आघाडी व महायुती यांच्यात सर्वत्र काट्याची टक्कर असल्याने स्पष्ट बहुमत दोघांना मिळण्याची शक्यता कमी दिसत आहे. त्यामुळे युती व आघाडी आट्यापाट्यावर राहण्याची दाट शक्यता आहे. महायुती किंवा महाविकास आघाडी फक्त १५० चा आकडा गाठू शकते; यापेक्षा जास्त नाही यालाही नाकारता येत नाही. कारण या विधानसभा निवडणुकीत महायुतीचे घटक पक्ष व महाविकास आघाडीचे घटकपक्ष आणि आजी-माजी आमदार- खासदार- मंत्री हे सुद्धा रिंगणात होते. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात विजयी होणारा उमेदवार किंवा पराजय होणारा उमेदवार यामध्ये ५००-१००० ते ५००० पर्यंत फरक दिसून येईल. या महासंग्रामात महाविकास आघाडीसुद्धा बाजी मारू शकते, हेही नाकारता येत नाही. सत्तेसाठी जर दोन्ही आघाड्यांना बहुमत मिळाले नाही तर मोठ्या प्रमाणात आपल्याला घोडेबाजार होताना दिसेल. मतदार कोणाच्या बाजूने उभे आहेत हे आपल्याला निकालानंतरच कळेल. परंतु महायुतीचे सरकार येवो अथवा महाविकास आघाडीचे सरकार येवो सत्ता स्थापनेसाठी दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात घोडेबाजार आपल्याला दिसून येईल यात दुमत नाही. मतदारांच्या लोकोत्सवाला राजकीय पुढारी सत्तेसाठी घोडेबाजार करून कलंकित करण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. ही बाब लोकशाहीसाठी चिंतेचा विषय आहे.

**रमेश लांजेवार**/९९२१६९०७७९

### विचारांचे ब्लॉकेजेस

मनातले दुःख, भावभावनांचा निचरा होत नाही आणि रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉकेजेस निर्माण होतात; तोच प्रकार सध्याच्या निवडणुकीच्या काळात निर्णय होईपर्यंत होताना दिसतो. वृत्तपत्र म्हणा किंवा मीडिया; आपापल्यापरीने आपले स्वतःचे विचार वाचक आणि श्रोते यांच्यावर लादतात आणि मतदारांच्या व उमेदवारांच्या विचारांचे ब्लॉकेजेस वाढवत राहतात. परिणामस्वरूपी ना तेजस्वी चेहरे होताना दिसतात, ना वेदना कमी होतात. उलट चारित्र्यसंपन्नतेला डाग पडतात. सहजरीत्या होणारी कपालभाती थांबली, खुललेले चेहरे काळवंडू लागले आणि खोटारड्या, सुकलेल्या चेहऱ्याचा दिखाऊपणा जनमानसात डोलू लागला. गोंधळातून आलेले हास्य कोणाचे याची चर्चा एक्झिट पोलमधून रंगू लागली, पण एक सत्य हेच आहे की, तुम्ही धर्माची बाजू घेत नसाल तर विनाश अटळ आहे. हेच गंगापुत्र भीष्म, गुरुश्रेष्ठ द्रोणाचार्य, दानशूर कर्ण यांच्या कर्तृत्व, पुण्य, शारीरिक बळ, आर्थिक बळ यांच्या माध्यमातून सिद्ध झालेले आहे, ते नाकारता येणार नाही; यासाठीच संस्कारित विचार, चारित्र्य यांचा सांभाळ करावा.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### ऊसतोड कामगार मुलांचे शैक्षणिक भविष्य अंधारात

विधानसभा निवडणूक मतदानाच्या आधीच मराठवाडा व विदर्भातील ऊसतोड कामगार आपल्या कुटुंबासह अहल्यानगर जिल्हा, गुजरात राज्य व नाशिककडे निघून गेले. त्यांच्या समवेत शाळेत शिकणारी त्यांची मुले-बाळे ही आता सहा महिने गावाकडे परतणार नाही. या सहा महिन्यांच्या काळात यांच्या मुला-मुलींचे शिक्षण कसे होणार? ते जेथे जेथे जातील तेथे त्यांच्या पाल्यासाठी शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणार काय? त्यांच्या द्वितीय सत्र परीक्षेबाबत काय? त्यांच्या शैक्षणिक साहित्याची पूर्तता कशी होणार? त्यांच्या शालेय उपस्थितीबाबत निकष कसे लावणार? असे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. फुले-शाहू-आंबेडकरांच्या महाराष्ट्र राज्यात ऊसतोड कामगार मुलांच्या शैक्षणिक हेळसांडीची दखल शासनाने त्वरित घेण्याची गरज आहे. ऊसतोड कामगारांप्रमाणे त्यांची मुलेही शिक्षणापासून वंचित राहू नये असे वाटते.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### मतदान न करणे गुन्हा

मतदान न करणे हा राष्ट्रद्रोह, राष्ट्रीय गुन्हा असावा. कुठेही १०० टक्के मतदान झाले नाही याची कारणमीमांसा व्हायला हवी. सुटी असून ज्यांनी मतदान केले नाही त्यांचा पगार कापावा. कामकरी लोकांना मतदानापुरती सुटी दिली होती. त्यांनी मतदान केले नसेल तर त्यांचे रेशन कार्ड, सरकारी सुविधा बंद कराव्या. काही सुशिक्षित नामवंत लोकांनी मतदान केले नाही. त्यांचे वीज, पाणी दोन दिवस बंद करावे. यावेळी ८५ वर्षांवरील मतदान करणारा घरून मत देऊ शकत होता. सार्वजनिक सुटी होती. ऑनलाईन मतदानाची सोय, जास्त बसेसची सोय होती. वरमायपेक्षा यांची जास्त बडदास्त होती. परंतु मतदार उदासीन होता. त्यांनी अनमोल मताचा अपमान केला त्यांची मीमांसा होऊन कारवाई व्हायलाच हवी.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# सत्ता स्थापनेसाठीच्या गणितासाठी जुळवाजुळव सुरू

## महायुती, महाविकास आघाडीचा छोटे पक्ष, अपक्ष उमेदवारांशी संपर्क

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई,दि.२२ नोव्हेंबर-**

संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत जनतेने कोणाला कौल दिला आहे, याचे उत्तर आता अवघ्या काही तासानंतर स्पष्ट होणार आहे. मात्र स्पष्ट बहुमत न मिळाल्यास सत्ता स्थापनेची संधी आपल्या हातातून निघून जाऊ नये, यासाठी सत्ताधारी महायुती व विरोधी महाविकास आघाडीने खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी निवडून येण्याची शक्यता असलेल्या छोटे पक्ष, अपक्ष व नाराज बंडखोर उमेदवारांची संपर्क साधण्यात येत आहे.

महायुतीतील प्रमुख पक्ष भाजपाचे राज्यातील प्रमुख नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर आज दिवसभर त्या अनुषंगाने बैठका व चर्चा भेटीगाठी झाल्या. तर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी हॉटेल ग्रँड हयात येथे बैठक घेऊन निकालानंतर परिस्थिती हाताळण्याबाबतचे नियोजन केले. शनिवारी दुपारी बारा वाजेपर्यंत निवडणुकीचा कौल स्पष्ट झालेला असणार आहे.

राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघासाठी बुधवारी सरासरी ६६ टक्के मतदान झाले आहे. त्याची मतमोजणी उद्या सकाळी आठ वाजता सुरू होणार आहे. सत्ताधारी महायुती की विरोधी महाविकास आघाडीचे सरकार येणार? याबाबत राजकीय नेत्यांकडून वेगवेगळे दावे करण्यात येत आहेत. एक्झिट पोलच्या अंदाजानुसार महायुतीला जास्त जागा तर महाविकास आघाडीला कमी जागा मिळण्याचा अंदाज आहे. मात्र, निकाल समोर आल्यानंतरच कोणाला किती जागा मिळतात? हे स्पष्ट होईल. मात्र मावळत्या विधानसभेचा कालावधी २६ नोव्हेंबर पर्यंतच असल्याने सत्ता



स्थापन करण्यासाठी केवळ दोन दिवसाचा अवधी हाती असणार आहे त्यामुळे बहुमता स्पष्ट बहुमत न मिळाल्यास सर्वाधिक संख्याबळ असणारे आघाडी सत्तेत सत्ता स्थापन करण्यासाठीच दावा राज्यपालाकडे करतील मात्र बहुमत गाठण्यासाठी १४५ आमदारांची साथ असणे आवश्यक असल्याने हे संख्या पूर्ण करण्यासाठी छोटे पक्षी व अपक्ष म्हणून निवडून आलेल्या उमेदवारांची गरज लागू शकते त्यामुळे सत्ताधारी महायुती व विरोधी महाविकास आघाडी कडून आत्तापासूनच संभाव्य विजेते अपक्ष बंडखोर उमेदवार व छोट्या पक्षाचे उमेदवारांची संपर्क साधला जात आहे त्या अनुषंगाने आज मुंबईत दिवसभर राजकारणाचे बैठकीचा सिलसिला चालू होता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निवासस्थान असलेल्या सागर बंगल्यावर आज मनसेचे नेते व शिवडी विधानसभा मतदारसंघातील उमेदवार बाळा नांदगावकर यांनी भेट घेतली नांदगावकर यांना माहितीने पाठिंबा दिला असल्याने त्या ठिकाणी त्यांची ठाकरे गटाचे उमेदवार अजय चौधरी यांच्याशी सरळ सरळ लढत होत आहे त्यामध्ये नांदगावकर बाजी मारण्याची शक्यता वर्तवली जात असून तसे झाल्यास त्यांच्या साथ आपल्याला असावी, यासाठी भाजपाकडून प्रयत्न केले जात आहेत. नांदगावकर यांनीही मनसेचा महायुतीला पाठिंबा असल्याचे जाहीर केले. त्याचबरोबर भाजपाचे कोर कमिटीतील नेत्यांचीही बैठक झाली त्यामध्ये फडणवीस यांनी प्रत्येक नेत्यावर छोटे पक्ष अपक्ष यांच्याशी संपर्क साधण्याबाबत च्या जबाबदारी सोपवली असून उमेदवार विजयी झाल्यानंतर त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याची नियोजन करण्यात आले. तर दुसरीकडे महाविकास आघाडीतील ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत, काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, काँग्रसचे नेते सतेज पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची मुंबईतील ग्रँड हयात हॉटेलमध्ये महत्वाची झाली ऋपडली. या बैठकीत निकालानंतर किती जागा येतात? आणि त्यानंतरची पुढील रणनीती काय असेल? याबाबत चर्चा झाल्याची माहिती सांगितली जात आहे. बैठकीनंतर जयंत पाटील, बाळासाहेब थोरात आणि संजय राऊत यांनी मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांच्याबरोबरही चर्चा केली. त्यामुळे मुंबईत नेमकं काय घडतंय? याकडे अनेकांच्या नजरा लागलेल्या आहेत. यासंदर्भात बाळासाहेब थोरात यांनी बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधत महाविकास आघाडीचं सरकार नक्कीच येईल, असा दावा करत महायुतीचं सरकार सत्तेवरून घालवण्याला आम्ही पहिले प्रधान्य देत असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले ,आम्ही २८८ जागाचा आढावा घेतला. तेव्हा आमच्या लक्षात आलं की महाविकास आघाडीचं सरकार बनेल. महाविकास आघाडीचं सरकार नक्कीच येईल, आम्हाला कोणतीही अडचण येणार नाही. . आम्हाला बहुमतापेक्षा कमी जागा येतील असे वाटत नाही. त्यानंतर आमच्याबरोबर कणी आले तर आनंदच मानतो. आता आधी निवडणूक झालेली आहे. मग निकाल समोर येईल. मग सरकार बनवताना आम्ही मुख्यमंत्रिपदाबाबत चर्चा करू. महायुतीचं सरकार सत्तेवरून घालवणं याला पहिलं प्रधान्य आम्ही देतो'', आमचा कोणीही आमदार फुटणार नाही. आमचा आकडा चांगला आल्यानंतर आम्ही सत्तास्थापनेचा दावा करणार आणि सरकार बनवणार. आजच्या बैठकीत एक ठरले की, मतमोजणीच्यावेळी शेवटचे मत मोजून झाल्यानंतर प्रमाणपत्र घेतल्यानंतर बाहेर पडायचे. त्याआधी कोणीही बाहेर यायचे नाही, असेही त्यांनी सांगितले.

# राज्याच्या घोषित मतदानात एक टक्क्याची वाढ

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २२ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र २८८ विधानसभा मतदार संघातील निवडणूकीत निवडणूक आयोगाने बुधवारी रात्री उशिरा घोषित केलेल्या मतदानाच्या टप्प्यात आणखी एक टक्क्यांनी वाढ झाली आहे.

आयोगाचे नव्याने जाहीर केलेल्या आकडेवारीत राज्यात एकूण सरासरी ६६.०५ टक्के मतदान झाले आहे.२८८ मतदारसंघांत एकूण ६ कोटी ४० लाख ८८ हजार १९५ मतदारांनी आपला हक्क बजाविला असल्याचे नमूद केले आहे.

राज्यात बुधवारी झालेल्या एक मतदानामध्ये एकूण ३ कोटी ३४ लाख ३७ हजार ५७ पुरूष, ३ कोटी ६ लाख ४९ हजार ३१८ महिला तर १ हजार ८२० इतर मतदारांनी मतदान केले असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. मतदानाची अंतिम आकडेवारी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून प्रकाशित झाली आहे. यात प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतदारांचा समावेश आहे. प्रत्यक्ष मतमोजणी करतांना टपाली मतदानाचा समावेश करण्यात येईल. त्याचप्रमाणे मतदान केंद्राध्यक्षाद्वारे भरण्यात आलेला १७ सी हा प्रत्यक्ष झालेल्या मतदानासंदर्भातील फॉर्म उमेदवारांच्या प्रतिनिधींनाही देण्यात आला असल्याचेही मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत स्पष्ट करण्यात येत आहे

# काँग्रेस महाविकास आघाडी स्पष्ट बहुमतासह सत्ता स्थापन करेल

## रमेश चेन्नीथला यांना विश्वास

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २२ नोव्हेबर-**

विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेचा कौल महाविकास आघाडीलाच मिळेल व स्पष्ट बहुमतासह काँग्रेस महाविकास आघाडी सरकार स्थापन करेल असा विश्वास काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी शुक्रवारी व्यक्त केला आहे.

टिळक भवन येथे पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही महाराष्ट्रातील जनता काँग्रेस व महाविकास आघाडीच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहिली आहे. विधानसभेला जास्त मतदान झाल्याचा फायदाही आघाडीलाच होईल. मविआला स्पष्ट बहुमत मिळत असल्याचे दिसत आहे त्यामुळे त्रिशंकु विधानसभेचा प्रश्न उद्भवत नाही. निवडून आलेल्या आमदारांना काँग्रेस पक्षाने हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था केली आहे का, यावर चेन्नीथला म्हणाले की, काँग्रेसचे आमदार कठीण परिस्थितीतही पक्षासोबत राहिले आहेत त्यामुळे त्यांना हॉटेलमध्ये ठेवण्याची आवश्यकता वाटत नाही.

मुख्यमंत्रीपदावरून आमच्यात कोणताही वाद नाही, निकालानंतर महाविकास आघाडीतील प्रमुख नेते एकत्र बसून त्यावर निर्णय घेतील. असेही चेंन्निथला यांनी एका प्रश्नावर स्पष्ट केले.

# महाराष्ट्रात सत्ता आणण्यासाठी काँग्रेसने तीन निरीक्षक नेमले

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २२ नोव्हेंबर-**

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीची उद्या मतमोजणी असून एक्झिट पोल महायुतीच्या बाजुने आले आहेत. असे असले तरीही मविआ आणि महायुती दोघांनीही बहुमत मिळाले नाही तर जुळवाजुळव करण्यावर लक्ष केंद्रीत केले आहे. दोन्ही बाजुंकडून अपक्ष, लहान पक्षांच्या आमदारांना आपल्याबाजुने करण्यासाठी प्रयत्न सुरु झाले आहेत.



महाराष्ट्रातील व झारखंडमधील राजकीय परिस्थितीवर, काँग्रेसच्या आमदारांवर लक्ष ठेवण्यासाठी काँग्रेसने दोन्ही राज्यांसाठी प्रत्येकी तीन-तीन निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. महाराष्ट्रात नियुक्ती करण्यात आलेल्या तीनपैकी दोन निरीक्षक हे दोन राज्यांचे माजी मुख्यमंत्री आहेत आणि त्यांनी त्यांच्या राज्यातील सत्ता गमावलेली आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी महाराष्ट्र आणि झारखंडसाठी निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. खरगे यांनी पक्षाचे नेते राजस्थान माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत, छत्तीसगढचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल आणि कर्नाटकचे नेते डॉ. जी. परमेश्वर यांना निरीक्षक बनवण्यात आले आहे. त्याचबरोबर तारिक अन्वर, मल्लू भट्टी विक्रमार्क आणि कृष्णा अल्लावुरु यांना झारखंडसाठी निरीक्षक म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.

# मतमोजणीचा फॉर्म १७ सी भाग दोन, फेरीनिहाय तक्ता, अंतिम निकालाची प्रत त्वरित मिळावी

## ● काँग्रेसची निवडणूक आयोगाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २२ नोव्हेंबर-**

मतदान मोजणीदिवशीचा फार्म १७ सी भाग दोन, फेरीनिहाय तक्ता (परिशिष्ट-५७) व अंतिम निकाल (फार्म-२०) पडताळणीसाठी याची प्रत उमेदवार प्रतिनिधीला त्वरित देण्यात द्यावी ,अशा सूचना सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना द्याव्यात, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे केली आहे.



त्याबाबत त्यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, निष्पक्ष व पारदर्शक निवडणुकीसाठी लोकप्रतिनिधी कायद्याच्या तरतुदी अन्वये मतमोजणी टेबलवर फेरीनिहाय मतमोजणी झाल्यावर फार्म १७ सी मोजणी प्रतिनिधीची सही घेवून मोजणी पर्यवेक्षक निवडणूक निर्णय अधिकारी यांना देतो. त्या अगोदर त्याची दुय्यम प्रत मोजणी प्रतिनिधी यास किंवा उमेदवार प्रतिनिधी यास त्वरित देण्यात यावी. तसेच फेरीनिहाय तक्ता हा फार्म १७ सी भाग २ वरून सहायक निवडणूक अधिकारी तयार करतो तो परिशिष्ट ५७ च्या तक्त्याची दुय्यम प्रत उमेदवार प्रतिनिधीला त्वरित देण्यात यावी. ही कायदेशीर तरतूद असून या द्वारे मतमोजणी प्रक्रिया पारदर्शक आहे हे समजून येईल.

मताचे संकलन फॉर्म २० मध्ये काटेकोरपणे झाले आहे की नाही हे उमेदवार प्रतिनिधीला प्राप्त फार्म १७ सी भाग २ तसेच फेरीनिहाय तक्त्यावरून होवू शकते. या कायदेसंमत बाबी ध्यानात घेवून संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना आपल्या स्तरावर या प्रक्रियेची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सुचना द्याव्यात, अशी मागणी पटोले यांनी केली आहे.

# छोटे पक्षच किंगमेकर ठरणार : जानकर

## पाठिंबा हवा असल्यास मंत्रिमंडळात सामील करण्याची दोन्ही आघाड्यांसमोर अट

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २२ नोव्हेंबर-**

विधानसभा निवडणुकीचा निकाल शनिवारी (दि.२२) जाहीर होणार आहे. या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागलेले आहे. सत्ता स्थापन करण्यासाठी राजकीय पक्षांकडून संख्याबळाची जमवाजमव केली जात आहे. यंदाच्या निवडणुकीत छोटे पक्ष आणि अपक्षांना महत्व राहणार आहे. अशात राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांनी छोटे पक्षच किंगमेकर ठरणार असल्याचे म्हटले आहे. तसेच रासपचा पाठिंबा हवा असल्यास मंत्रिमंडळात सामील करावे, अशी अट देखील महायुती आणि महाविकास आघाडीसमोर ठेवली आहे.

जानकर म्हणाले की, महाराष्ट्रातील तमाम मतदार बंधू-भगिनींचे आभार मानतो. लोकशाहीच्या उत्सवामध्ये मतदारांचा टक्का वाढल्यामुळे अभिनंदन करतो. हा वाढलेल्या टक्क्यामुळे परिवर्तन होण्याची शक्यता असू शकते. मागील विधानसभा निवडणुकीत एक आणि वरच्या सभागृहात एक असे आमचे दोन आमदार होते. पण आता आमचे दोनाचे चार, चाराचे सहा होतील. जनतेचा कौल शेवटी, त्यांच्या हातात आहे. राष्ट्रीय समाज पक्षाला चांगले यश मिळेल, असा मला विश्वास आहे.

### आम्ही छोटे पक्ष किंगमेकर ठरू

कोणासोबत जाणार यावर बोलताना जानकर म्हणाले, मेजॉरिटी महाविकास आघाडी किंवा महायुतीला असेल तर आमचा कोणाला विरोध असेल असे नाही.आम्ही दोघांसोबतही जायला तयार आहोत. सध्या ५०-५० टक्के दोघांची शक्यता आहे. आम्ही महायुती किंवा महाविकास आघाडी बरोबर नाही. आम्ही छोटे पक्ष असल्यामुळे किंगमेकरची भूमिका निभावणार आहोत.

### महादेव जानकरांच्या अटी काय?

महादेव जानकर म्हणाले की, आम्हाला महाविकास आघाडी किंवा महायुतीकडून कोणाचे निमंत्रण किंवा फोन आलेला नाही आणि आम्ही बिन बुलाय कोणाकडे जाणार नाही. आम्हाला मंत्रिमंडळात भागीदारी पाहिजे. आमची इच्छा आहे, आमचे जर १२ आमदार आले तर १२ चे १२ कॅबिनेट मंत्री झाले पाहिजे. आणि जर दोघांना वाटले तर मुख्यमंत्रीपण आमचा पक्षाचा झाला पाहिजे. त्यांनी हे मान्य केले, तर आम्ही त्यांचे स्वागत करू.

# २९ वी तत्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमाला २४ नोव्हेंबरपासून

## विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठातर्फे आयोजन

**पुणे, दि.२१ नोव्हेंबर-**

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत आणि संत श्री ज्ञानेश्वर-संत श्री तुकाराम महाराज स्मृती व्याख्यानमाला न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने, युनेस्को अध्यासना अंतर्गत २४ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत २९वी तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या संतश्री ज्ञानेश्वर सभागृह, कोथरूड, पुणे येथे संपन्न होईल.

याचे उद्घाटन २४ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वा. उज्जैनचे आध्यात्मिक गुरू व लेखक पंडित विजयशंकर मेहता व संत एकनाथ महाराजांचे १४ वे वंशज ह.भ.प.श्री. योगीराज महाराज गोसावी पैठणकर यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न होणार आहे. जगविख्यात संगणक शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर हे सन्माननीय पाहुणे असतील. अध्यक्षस्थानी एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष व युनेस्को अध्यासनाचे प्रमुख प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड असतील. तसेच एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्यकारी अध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड व एमआयटी एडीटीचे कार्याध्यक्ष डॉ. मंगेश तु. कराड उपस्थित राहतील.

व्याख्यानमालेचा समारोप ३० नोव्हेंबर रोजी स. ११ वा.नवी दिल्ली येथील मौलाना आझाद नॅशनल उर्दु विद्यापीठाचे माजी कुलगुरू मा. फिरोज बख्त अहमद यांच्या प्रमुख उपस्थित होईल. यावेळी एअर मार्शल भूषण गोखले, (सेवा निवृत्त) व्हीएसएम, एव्हीएसए, पीव्हीएसएम हे विशेष अतिथि म्हणून उपस्थित राहतील.



Philosopher Saint
Shree Dnyaneshwara



Philosopher Jagadguru
Saint Shree Tukaram

२५ ते २९ नोव्हेंबर या कालावधीत दुपारी ४ वा. होणाऱ्या व्याख्यानमालेत वैश्विक स्तरावरील बनारस हिंदू विश्वविद्यालयाचे महामहोपाध्याय प्रा. सदाशिव द्विवेदी, (भारतीय ज्ञान परंपरा व विश्वशांती) व आयआयएसईआर चे प्राध्यापक प्रा.डॉ. रामकृष्ण भट (विज्ञान, अध्यात्म आणि धार्मिक ग्रंथांचे संघटन), मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. संजय देशमुख (विज्ञान आणि आध्यात्माचा सुसंवादः जागतिक शांततेसाठी आयकेएस आणि एनईपी २०२० चा मार्ग उजळणे), माजी मुख्य वनसंरक्षक व हभप रंगनाथ नाईकडे, सुप्रसिध्द अभिनेते श्री. सुरेंद्र पाल (द्रोणाचार्य - धर्म, नीती आणि कर्तव्य यांच्यातील संघर्षाचे प्रतिक) आणि यूजीसीचे माजी उप संचालक डॉ.भूषण पटवर्धन (जीनोम ते ओम) अशा अनेक मान्यवरांची व्याख्याने होणार आहेत.

या व्याख्यानमालेला जोडूनच रोज स. ८.४५ ते १२.०० पर्यंत कार्यशाळा होईल. यामध्ये प्रसिद्ध गप्पाष्टककार डॉ. संजय उपाध्ये, प्रसिद्ध लेखक डॉ. ज्ञानश्री लेले, रामकृष्ण मिशनचे सचिव स्वामी आर्यानंद, प्रसिद्ध संशोधक डॉ. निलेश ओक, वरिष्ठ अभियंता विष्णू भिसे, शिवम फाउंडेशनचे संस्थापक आचार्य श्री शिवम, भारत सरकारच्या संगीत नाट्य अकादमीचे माजी अध्यक्ष पद्मश्री शेखर सेन, प्रा.डॉ. अक्षय मल्होत्रा, डॉ. श्रुती निरगुडकर, डॉ. ज्ञानदेव निलवर्णा, संकल्प संघई, प्रसिद्ध हृदय रोग तज्ञ डॉ. जगदीश हिरेमठ, आणि शिव व्याख्याते नितिन बालगुडे इत्यादी विविध विषयांवर व्याख्यानांची विशेष कार्यशाळाही आयोजित केली आहे. प्रत्येक व्याख्यानानंतर वक्ता व श्रोते यांच्यामधील प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम या व्याख्यानमालांचे वैशिष्ट्ये आहे. विशेष म्हणजे या मध्ये २५ ते २९ नोव्हेंबर पर्यंत माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठ संकुलातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी स. ७ ते ८ या वेळात योगासन वर्गाचे आयोजन क्रीडा विभागाचे संचालक प्रा.डॉ. पी. जी. धनवे यांच्या मार्गदर्शनाखाली होईल.

अशी माहिती एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे सल्लागार डॉ. संजय उपाध्ये, कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस, २९ व्या तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमालेचे समन्वयक व प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, प्रा. मिलिंद पात्रे यांनी दिली. ही व्याख्यानमाला सर्वांसाठी खुली ठेवण्यात आली आहे.

Classifieds

**पाहिजेत**

डॉक्टरांच्या घरी, घरगुती कामासाठी गरीब होतकरु अनुभवी ड्रायव्हर पाहिजे.
भेटण्याची वेळः- ९-५/६
फोन नं : ७०२०१४८४२६
८६५२७५१९०२

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

## जाहीर प्रसिध्दीकरण

नि.६
दिवाणी न्यायालय अंकीः २२/११/ २०२४
दि.की. अर्ज नं. २७/२०२४

### अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज.ज्यु.डी. यांचे कोर्टात

**श्री. सतीश अप्पा शिंदे**
रा. स्वागत नगर, जेऊर रोड, अक्कलकोट -- **अर्जदार**
**श्री. संजय अप्पा शिंदे**
रा. स्वागत नगर, जेऊर रोड, अक्कलकोट
**विरुध्द**
**कोणीही नाही** -- **सामनेवाले**

ज्या अर्थी वरील अर्जदारानी या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. २७/२०२४ हा इंडियन सक्सेशन ॲक्टचे कलम ३७२ प्रमाणे दाखल केला असून अर्जदारांची आई कै. सुधाताई अप्पा शिंदे ह्या दि. २२/०१/२०२४ रोजी मयत झाल्या आहेत. अर्जदार हेच कै. सुधाताई अप्पा शिंदे यांचे कायदेशीर वारस असल्याने तसा वारसा दाखला मिळणेकामी अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे कै. सुधाताई अप्पा शिंदे यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हा जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक २१/१२/२०२४ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

हा जाहीर प्रसिध्दकरण प्रसिध्द केले. ता. २२/११/२०२४

**सही/-क.लि**
आज रोजी मे. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या सहीने प्रसिध्द केले.

शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी फौजदारी न्यायालय**
**सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र. ७२/२०२४
पुढील नेमलेली तारीख : ०४/०१/२०२५
निशान क्र. ५

### बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु.डि. साहेब यांचे कोर्टात

१) श्रीमती सुनिता राजगोपाल सोमाणी,
वय- ५४ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. मोती निवास, आगळगांव रोड,
सुभाष नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) सिध्दांत राजगोपाल सोमाणी, -- **अर्जदार**
वय- २९ वर्षे, धंदा- व्यापार, रा. सदर ह.मु. अमेरिका
३) सौ. शरयु हर्ष जाजु,
वय- ३२ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. १२२, विष्णुकांतम, सरदार पटेल कॉलनी,
उस्मानपुराजवळ, अहमदाबाद, गुजरात
**विरुध्द**
कोणीही नाही -- **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील राजगोपाल नंदकिशोर सोमाणी हे दि. २९/५/२०२४ रोजी मयत झालेले आहे. तद्पश्चात कै. राजगोपाल नंदकिशोर सोमाणी यांचे अर्जदार क्र. १ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ३ यांनी राजगोपाल नंदकिशोर सोमाणी यांचे कायदेशीर वारस असलेबाबत मे. सि. ज. ज्यु. डि. साहेब, बार्शी यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाची कसलीही हरकत तक्रार असल्यास त्यांनी सदर प्रकरणात प्रसिध्दीपासून ३० दिवसाच्या आत किंवा पुढील नेमलेल्या ०४/०१/२०२५ या तारखेस न्यायालयात हजर राहुन कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची कसलीही हरकत नाही, असे समजून सदर प्रकरणी न्यायालय पुढील योग्य ते निर्णय पारीत करतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे. दि.२२/११/२०२४.

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**कनिष्ठ स्तर, बार्शी**

शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**कनिष्ठ स्तर, बार्शी**

## महत्त्वाचे

### ओम धारव कोलकाता फुटबॉल संघात

**यवतमाळ** : मूळचा यवतमाळ व सध्या कोलकाता येथे वास्तव्यास असलेला राष्ट्रीय फुटबॉल खेळाडू ओम



राजेश धारव याची नुकतीच फुटबॉल या खेळाचे माहेरघर असलेल्या बंगालमधील कोलकाता विद्यापीठ फुटबॉल संघात 'राईट विंगर' या पोझिशनसाठी निवड झाली आहे. ओमच्या या यशाने यवतमाळचे फुटबॉल प्रशिक्षक व खेळाडूंनी त्याचे कौतुक केले आहे. ओम धारवला कोलकाता येथील फुटबॉल प्रशिक्षक अनुप नाग व भारतीय फुटबॉल संघाचा माजी उपकर्णधार तसेच मोहन बागान संघाचा कर्णधार प्रीतम कोटला यांचे मार्गदर्शन मिळत आहे. ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशन अंतर्गत मंडी, हिमाचल प्रदेश येथे आयोजित डॉ. बी. सी. रॉय या अतिशय प्रतिष्ठेच्या 'नॅशनल टुर्नामेंट चॅम्पियन २०२०'मध्ये महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व ओमने केले होते. अप्रतिम खेळाच्या जोरावर महाराष्ट्र संघाने प्रथमच ट्रॉफी जिंकून सुवर्णपदक पटकावले होते. ओम आपल्या यशाचे श्रेय फुटबॉल महर्षी हरिहर मिश्रा, जिल्हा फुटबॉल संघटनेचे सुशील दीक्षित, प्रीतम शहाडे, अक्षय शहाडे, रवी मेश्राम, श्याम तायवाडे यांना देतो.

### प्रीमियर लीग फुटबॉल हंगाम १६ ऑगस्टपासून

**लंडन** : आगामी प्रीमियर लीग फुटबॉल हंगाम १६ ऑगस्ट २०२५ पासून प्रारंभ होणार असून अंतिम फेरीचा सामा २४ मे २०२६ रोजी खेळली जाणार आहे, असे लीगने शुक्रवारी जाहीर केले. ३८ फेऱ्यांपैकी ३३ सामने आठवड्याच्या अखेरच्या रविवारी खेळल्या जातील, तर पाच फेऱ्या मिडवीक गेम असतील. पुढील हंगामात नाताळच्या पूर्वसंध्येला कोणतेही सामने होणार नाहीत. २०२३-२४ हंगामात ख्रिसमसच्या पूर्वसंध्येला वॉल्व्हरहॅम्प्टन वॅण्डरर्सशी खेळण्यास भाग पडले होते, त्यामुळे आयोजकांना टीकेचा सामना करावा लागला. या हंगामात २४ डिसेंबर रोजी कोणताही खेळ नियोजित नाही, तर पुढील हंगामाच्या वेळापत्रकात जोडलेल्या लीग व्यस्त उत्सव कालावधीत एकमेकांच्या ६० तासांच्या आत दोन फेऱ्या होणार नाहीत याची खात्री करेल. २०२४-२५ मोहिमेच्या समाप्तीनंतर हंगाम सुरू करण्यास जवळपास तीन महिने शिल्लक आहे. क्लब विश्वचषकाच्या वचनबद्धतेमुळे चेल्सी आणि मॅन्चेस्टर सिटीला विश्रांती मिळणार नाही. मॅन्चेस्टर सिटीचे व्यवस्थापक पेप ग्वार्डियेला यांनी गत महिन्यात प्रीमियर लीग हंगामाची सुरुवात दोन आठवड्यांनी पुढे ढकलण्याची विनंती केली होती, जेणेकरून त्यांचे खेळाडू बरे होऊ शकतील परंतु त्यांची विनंती नाकारण्यात आली.

### आशिया चषकासाठी भारतीय कनिष्ठ हॉकी संघ मस्कतकडे

**बंगळुरू** : भारतीय कनिष्ठ गट पुरुष हॉकी संघ शुक्रवारी बंगळुरूहून आपल्या आशिया चषक २०२४ मोहिमेसाठी, मस्कतकडे रवाना झाला आहे. मस्कत, ओमान येथे २६ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर या कालावधीत ही स्पर्धा होणार आहे. भारताने २००४, २००८, २०१३, २०१५ यासह विक्रमी चार वेळा ही स्पर्धा जिंकली आहे. भारताने गतवर्षी अंतिम फेरीत पाकिस्तानचा २-१ असा पराभव केला व विजेतेपद पटकावले. यावेळी या स्पर्धेत १० संघ सहभागी झाले असून भारताला कोरिया, जपान, चीन तैपेई थायलंडसह अ गटामध्ये स्थान देण्यात आले आहे. ब गटातील उर्वरित पाच संघ पाकिस्तान, मलेशिया, बांगलादेश, ओमान आणि चीन आहेत. कर्णधार अमीर अली आणि उपकर्णधार रोहित यांच्या नेतृत्वाखाली भारत २७ नोव्हेंबरला थायलंडविरुद्ध आणि त्यानंतर २८ नोव्हेंबरला जपानविरुद्धच्या लढतीत आपल्या मोहिमेची सुरुवात करेल.

### बहिणीचे स्वप्न पूर्ततेसाठी खो-खोपटू नसरीन शेख सज्ज

**नवी दिल्ली** : आपल्या बहिणीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भारतीय खो-खोपटू नसरीन शेख सज्ज झाली आहे. ती आगामी १३ ते १९ जानेवारी दरम्यान नवी दिल्ली येथे होणाऱ्या खो-खो विश्वचषक स्पर्धेच्या आगामी पहिल्या आवृत्तीसाठी सज्ज झाली आहे. नसरीनच्या बहिणीने खो-खोमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करण्याचे स्वप्न पाहिले होते, परंतु तिच्या कुटुंबाच्या पाठिंब्याच्या अभावामुळे ती ते करू शकली नाही. तिच्या पाठिंब्याने आणि प्रोत्साहनाने खेळ हाती घेतल्याने, नसरीनने चौथ्या आशियाई खो-खो स्पर्धेत भारतीय संघाची कर्णधार म्हणून सुवर्णपदक जिंकून तिच्या बहिणीचे स्वप्न पूर्ण केले. तिच्या खेळातील केवळ दुसरी अर्जुन पुरस्कारप्राप्त नसरीनला आता तिला आपल्या पदकांच्या रांगेत विश्वचषक सुवर्णपदकाची भर टाकायची आहे व आपल्या बहिणीचे स्वप्न पूर्ण करायचे आहे. विश्वचषक स्पर्धेसाठी ती तयार होत असताना नसरीनचा प्रवास इतरांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

# पहिल्या दिवशी गोलंदाजांचे वर्चस्व, १७ बळी

- भारत सर्वबाद १५०, ऑस्ट्रेलिया ७ बाद ६७
- जोश हेझलवूड, जसप्रीत बुमराहचे प्रत्येकी ४ बळी

◆ **पर्थ, २२ नोव्हेंबर**

बॉर्ड-गावस्कर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला शुक्रवारपासून येथे प्रारंभ झाला असून पहिल्या कसोटी सामन्याचा पहिला दिवस गोलंदाजांनी गाजवला. ऑप्टस स्टेडियमवर अनुकूल परिस्थितीत दोन्ही संघांतील वेगवान गोलंदाजांनी वर्चस्व गाजवले. सामन्याच्या पहिल्याच दिवशी १७ बळींची नोंद झाली. जोश हेझलवूडच्या (२९ धावांत ४ बळी) प्रभावी गोलंदाजीच्या बळावर ऑस्ट्रेलियाने भारताला १५० धावांत गुंडाळले, तर प्रत्युत्तरात हंगामी कर्णधार जसप्रीत बुमराहने १७ धावांत टिपलेल्या ४ बळींच्या बळावर भारताने पहिल्या दिवस अखेर ऑस्ट्रेलियाची ७ बाद ६७ धावा अशी स्थिती करून टाकली.

बुमराहने आपल्या १० षटकांत १७ धावा देत ४ गडी टिपण्याची उल्लेखनीय कामगिरी केली व ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजीची पहिली फळी उद्ध्वस्त केली. त्याने तिसऱ्या षटकांत नवोदित नॅथन मॅकस्विनीला १० धावांवर बाद केले आणि उस्मान ख्वाजा व स्टीव्ह स्मिथला सातव्या षटकात चेंडू टाकून पहिल्या कसोटी सामन्याला वेगवान वळण दिले.



स्टीव्ह स्मिथ बाद झाल्याची अपील करताना जसप्रीत बुमराह



देवदत्त पडिक्कलला बाद केल्यानंतर जोश हेझलवूडचे कौतुक करताना ऑस्ट्रेलियन खेळाडू

भारतीय संघाचा हंगामी कर्णधार जसप्रीत बुमराहने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु ते अपेक्षेनुसार फलंदाजी करणत अपयशी ठरले. भारताने सकाळच्या पहिल्या सत्रात उपहारापर्यंत २५ षटकांत अवघ्या ५१ धावांत चार महत्त्वपूर्ण मोहरे गमावले. यशस्वी जयस्वाल व देवदत्त पडिक्कल भोपळा न फोडताच तंबूत परतले. मिचेल स्टार्कने जयस्वालला, तर हेझलवूडने देवदत्तला बाद केले. पुढे विराट कोहली पाच धावा काढून हेझलवूडच्या गोलंदाजीला बळी पडला. २६ धावा काढणारा केएल राहुल याला मिचेल स्टार्कने ॲलेक्स कॅरीकडे झेल सोपवण्यास भाग पाडले.

नंतर ऋषभ पंत, ध्रुव ज्युरेल व नितीश कुमार रेड्डीने ऑस्ट्रेलियन गोलंदाजांचा धैर्याने सामना केला व संघाची धावसंख्या वाढवण्याचा प्रत्न केला, परंतु इतर फलंदाज एक अंकी धावसंख्येवरच बाद झाले. या बरोबरच भारताचा पहिला डाव ४९.४ षटकांत १५० धावांतच आटोपला. पंतने ७८ चेंडूंत ३ चौकार व एका षट्कारसह ३७ धावांचे, ज्युरेलने २० चेंडूंत २ चौकारांसह ११ धावांचे, तर नितीश कुमार रेड्डीने ५९ चेंडूंत ६ चौकार व एका षट्कासह ४१ धावांचे योगदान दिले. ऑस्ट्रेलियाकडून हेझलवूडने ४ बळी, तर मिचेल स्टार्क, पॅट कमिन्स व मिचेल मार्शने प्रत्येकी २ बळी टिपलेत.

प्रत्युत्तर देताना ऑस्ट्रेलियाची दाणादाण उडाली व दिवस अखेरपर्यंत त्यांची ७ बाद ६७ धावा अशी दयनीय स्थिती झाली. बुमराहने तोडीस तोड गोलंदाजी करत ऑस्ट्रेलियाच्या चार फलंदाजांना बाद केले. मोहम्मद सिराज व हर्षित राणानेसुद्धा प्रभावी मारा केला. सिराजने १७ धावांत २ बळी, तर राणाने ३३ धावांत एक बळी टिपला ऑस्ट्रेलियाकडून ॲलेक्स केरीने तेवढ्या सर्वाधिक नाबाद १९ धावा केल्या. ट्रॅव्हिस हेडने ११, तर नॅथन मॅकस्वीनीने १० धावांची भर घातली. (वृत्तसंस्था)

# जेद्दाह येथे आयपीएल लिलाव आजपासून

◆ **नवी दिल्ली, २२ नोव्हेंबर**

सौदी अरबमधील जेद्दाह येथे २३ व २४ नोव्हेंबर रोजी भव्य आयपीएल लिलाव आयोजित करण्यात आला आहे. भारताच्या बाहेर आयपीएल लिलाव होण्याची ही दुसरी वेळ असून यापूर्वी मागीललिलाव दुबईमध्ये घेण्यात आला होता. दोन दिवसीय हा लिलाव शनिवारी दुपारी १२.३० वाजतापासून सुरू होईल व रविवारी दुपारी ३.०० वाजता सुरू होईल.

या आयपीएल २०२२५ मेगा लिलावासाठी सुरुवातीला एकूण १५७४ खेळाडूंनी नोंदणी केली, परंतु ही संख्या ५७४ खेळाडूंवर कमी करण्यात आली आहे, ज्यात ३६६ भारतीय, २०८ परदेशी खेळाडू आणि सहयोगी राष्ट्राचे तीन खेळाडू आहेत.

या आयपीएल लिलावात एकूण २०४ जागा उपलब्ध आहेत, यात परदेशी खेळाडूंसाठी ७० जागा राखीव आहेत.

आयपीएल २०२५ लिलावात जोस बटलर, श्रेयस अय्यर, ऋषभ पंत, कॅगिसो रबाडा, अर्शदीप सिंग, मिशेल स्टार्क, युझवेंद्र चहल, लियाम लिव्हिंगस्टोन, डेव्हिड मिलर, केएल राहुल, मोहम्मद शमी व मोहम्मद सिराज यांच्यावर प्रामुख्याने मोठी बोली लागणार आहे. (वृत्तसंस्था)

## नितीश रेड्डी, हर्षित राणाचे कसोटी पदार्पण

**पर्थ** : बॉर्डर-गावस्कर करंडक स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी भारताच्या वेगवान गोलंदाज नितीश कुमार रेड्डी व हर्षित राणाने कसोटी पदार्पण केले. आर. अश्विन व विराट कोहलीने अनुक्रमे हर्षित व नितीशला त्यांची पहिली कसोटी कॅप दिली. आपल्या पदार्पणाच्या सामन्यात आपली छाप सोडणारा वेगवान गोलंदाज नितीश कुमार रेड्डी याने आपला आदर्श विराट कोहलीकडून कॅप स्वीकारल्याबद्दल आनंद व्यक्त केला. आज माझे स्वप्न प्रत्यक्ष साकारले गेले. मी नेहमीच भारतीय क्रिकेटसाठी चांगली कामगिरी करण्याचे स्वप्न पाहत होतो, आणि विराट भाऊकडून कॅप स्वीकारणे हा एक विलक्षण क्षण होता. मी क्रिकेट खेळायला सुरुवात केल्यापासून तो माझा आदर्श आहे. त्याच्याकडून कॅप मिळणे हा माझ्यासाठी आनंदाचा क्षण होता, असे २१ वर्षीय नितीश कुमार म्हणाला. रेड्डीने भारतीय डावाला चालना देण्याचा प्रयत्न सुरूच ठेवला आणि ४१ धावांवर उस्मान ख्वाजाकडे झेल देण्याआधी संघाला १५० पर्यंत खेचण्यात यश मिळविले, त्यामुळे तो दिवसांतील भारताचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला.

# स्कॉट बोलण्डची ऑस्ट्रेलियन पीएम एकादश संघात निवड

◆ **पर्थ, २२ नोव्हेंबर**

आगामी ३० नोव्हेंबरपासून कॅनबेरा येथे सुरू होणाऱ्या भारतीय संघाविरुद्धच्या दोन दिवसीय गुलाबी-चेंडूच्या सामन्यासाठी शुक्रवारी ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधान एकादश संघात कसोटी वेगवान गोलंदाज स्कॉट बोलण्ड याची निवड करण्यात आली. पंतप्रधान एकादश संघाचे नेतृत्व न्यू साऊथ वेल्सचा नवोदित अष्टपैलू जॅक एडवर्ड्स करणार आहे.



स्कॉट बोलंड

दुसऱ्या मुलाच्या जन्मामुळे शुक्रवारी येथे सुरू झालेल्या बॉर्डर-गावस्कर करंडक स्पर्धेच्या पहिल्या कसोटीला मुकलेला भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा मनुका ओव्हल येथे पंतप्रधान एकादशविरुद्धच्या दोन दिवसीय सामन्यात सहभागी होण्याची शक्यता आहे. हा सामना भारतासाठी महत्त्वाची तयारी म्हणून काम करेल, कारण ॲडलेडमध्ये ६ डिसेंबरपासून सुरू होणारी दुसरा कसोटी सामना सुमारे तीन वर्षांतील पहिलाच गुलाबी-चेंडूचा कसोटी सामना असेल. येथील पहिल्या कसोटीसाठी बोलण्ड ऑस्ट्रेलियाच्या संघात आहे व कॅनबेरा येथे चांगल्या प्रदर्शनासह ॲडलेडमध्ये गुलाबी-चेंडूच्या दुसऱ्या कसोटीसाठी ऑस्ट्रेलियाच्या अंतिम एकादशमध्ये स्थान मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे. तो १४ खेळाडूंच्या पंतप्रधान एकादश संघातील सर्वात अनुभवी खेळाडू आहे.

आम्ही कसोटी संघाचा एक भाग म्हणून स्कॉट बोलण्डचा त्याच्या तयारीसाठी संधीचा उपयोग करत आहोत, असे निवड प्रमुख जॉर्ज बेली यांनी सांगितले.

आम्ही पंतप्रधान एकादशमध्ये देशातील काही सर्वात रोमांचक युवा क्रिकेटपटू व अत्यंत अनुभवी खेळाडूंचे मिश्रण आहे.

पंतप्रधान एकादशमध्ये गतवर्षीचे १९ वर्षांखालील विश्वचषक विजेत्या संघातील सॅम कोन्सास, महली बियर्डमन, चार्ली ॲंडरसन व ओ'कॉनर या खेळाडूंचासुद्धा समावेश करण्यात आला आहे. माजी कसोटी सलामीवीर मॅथ्यू रेनशॉला ऑस्ट्रेलिया अ सामन्यांमधून वगळण्यात आले होते, तर मधल्या फळीतील उदयोन्मुख फलंदाज ऑली डेव्हिसचाही समावेश होता.

पंतप्रधान एकादशचा ऑस्ट्रेलियन क्रिकेटमध्ये समृद्ध इतिहास आहे आणि या उन्हाळ्यात भारताविरुद्धच्या सामन्यासाठी संघ निश्चित करताना मला आनंद होत आहे, असे पंतप्रधान ॲन्थनी ॲल्बानीज म्हणाले.

विराट, जसप्रीत बुमराह आणि ऋषभ पंत यांसारख्या जागतिक क्रिकेटमधील सर्वोत्कृष्ट संघांपैकी एक असलेल्या भारताचा सामना करणे, संघासाठी एक आश्चर्यकारक अनुभव असेल, असेही ते म्हणाले.

**ऑस्ट्रेलियन पंतप्रधान एकादश संघ** : जॅक एडवर्ड्स (कर्णधार), चार्ली ॲण्डरसन, महली बियर्डमन, स्कॉट बोलँड, जॅक क्लेटन, एडन ओ'कॉनर, ऑली डेव्हिस, जेडेन सॅम हार्पर, हॅनो जेकब्स, सॅम कोन्स्टास, लॉयड पोप, मॅथ्यू रेनशॉ, जेम रायन. (वृत्तसंस्था)

## टीव्ही अम्पायरकडे पुरेशी व्यवस्था नव्हती : मांजरेकर

◆ **पर्थ, २२ नोव्हेंबर**

पर्थ येथे सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटीच्या पहिल्या दिवशी भारताचा सलामीवीर केएल राहुल बाद झाल्याचा निर्णय पुनरावलोकन प्रणालीच्या (डीआरएस) वापर करून देण्यात आला, परंतु हा निर्णय देताना तिसरा पंच म्हणजे टीव्ही अम्पायरकडे महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यासाठी पुरेशी व्यवस्था नव्हती, असे भारताचे माजी क्रिकेटपटू संजय मांजरेकर यांनी म्हटले आहे. त्यांनी तंत्रज्ञानाच्या वापरावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

भारताने फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर उपहाराच्या आधी ही घटना घडली, त्यावेळी भारताची स्थिती ४ बाद ४७ धावा अशी झाली.

२६ धावांच्या ७४ चेंडूंच्या खेळीत प्रचंड संयम दाखवणाऱ्या राहुलला ऑस्ट्रेलियाने रिव्ह्यू घेण्याचा निर्णय घेतल्यावर मिचेल स्टार्कच्या चेंडूवर झेलबाद केले. मैदानावरील पंच रिचर्ड यांनी सुरुवातीला त्याला नाबाद दिले होते. तथापि, थर्ड अंपायर रिचर्ड इलिंगवर्थ यांनी स्निकोच्या आधारे निर्णय रद्द केला, ज्यात चेंडू राहुलच्या बॅटमधून गेल्याचे दिसून आले. हताश झालेला राहुल डोके हलवत निघून गेला. आवाज चेंडूला नव्हे तर बॅटने पॅडला आदळल्याने झाला होता. (वृत्तसंस्था)

# आगामी आयपीएलची धूमशान १४ मार्चपासून

## बीसीसीआयने जाहीर केले

◆ **नवी दिल्ली, २२ नोव्हेंबर**

पुढील वर्षीचा इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) हंगाम १४ मार्च ते २५ मे २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे, असे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आयपीएल फ्रॅन्चायझींना सांगितले आहे, तसेच २०२६ आणि २०२७ च्या आवृत्त्यांसाठीसुद्धा तारखा निश्चित करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले आहे.

बीसीसीआयने रविवारी जेद्दाह येथे होणाऱ्या दोन दिवसीय मेगा खेळाडूंच्या लिलावात दुखापतग्रस्त इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चर, भारतीय वंशाचा अमेरिकन वेगवान गोलंदाज सौरभ नेत्रावळकर आणि मुंबईचा यष्टिरक्षक-फलंदाज हार्दिक तामोरे आदिंचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

आयपीएल लिलावाच्या नियोजनात फ्रॅन्चायझींना मदत करण्यासाठी पुढील तीन हंगामांच्या तारखा एकाच वेळी सामायिक केल्या जात आहेत, असे बीसीसीआयने म्हटले आहे.

स्पर्धेची २०२६ आवृत्ती १५ मार्चपासून सुरू होईल आणि ३१ मे रोजी ग्रॅण्ड फिनालेचे आयोजन करण्यात येणार आहे. २०२७ आवृत्ती पुन्हा एकदा १४ मार्च रोजी सुरू होईल व ३० मे रोजी अंतिम सामना होईल.



**पुढील ३ हंगामांसाठीचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| आयपीएल २०२५ | : | १४ मार्च ते २५ मे |
| आयपीएल २०२६ | : | १५ मार्च ते ३१ मे |
| आयपीएल २०२७ | : | १४ मार्च ते ३० मे |

तिन्ही अंतिम फेरीचे सामने रविवारी होतील. आयपीएलचे सामने दीड आठवडे चालतील याची खात्री करण्यासाठी बीसीसीआयने सामन्यांची संख्या वाढवण्याची योजना आखली होती आणि शिल्लक ठेवलेल्या तारखा लक्षात घेता साखळी सामन्यांची संख्या वाढेल असे दिसते.

आर्चर यावर्षी आयपीएलमध्ये सहभागी झाला नाही आणि कोपरच्या दुखापतीमुळे तो २०२३ च्या आवृत्तीत खेळला नाही.

सौरभ नेत्रावळकर हा या वर्षाच्या सुरुवातीला यूएसए टी-२० विश्वचषकातील ब्रेकआउट स्टार्सपैकी एक होता. त्याने प्रभावी कामगिरी केली होती व त्याची संघाला सुपर ८ मध्ये प्रवेश करण्यास मदत झाली होती.

भारताचा माजी १९ वर्षाखालील खेळाडू नेत्रावळकर रणजी करंडक स्पर्धेतही मुंबईमध्ये आला होता. तो संगणक अभियांत्रिकी करण्यासाठी अमेरिकेला स्थलांतरित झाला आणि सध्या तो ओरॅकलमध्ये नोकरीला आहे.

उन्मुक्त चंदचा हा दुसरा भारत-अमेरिकन खेळाडू असून त्याला छाटणी केलेल्या लिलाव यादीतून वगळण्यात आले. कारण तो नंतरच्या टी-२० विश्वचषकातील अमेरिकन संघाचा भाग नव्हता. (वृत्तसंस्था)

# सय्यद मुश्ताक अली चषक स्पर्धा आजपासून

◆ **नवी दिल्ली, २२ नोव्हेंबर**

एकीककडे जेद्दाह येथे आयपीएल लिलावाला प्रारंभ होणार असताना दुसरीकडे भारतात प्रतिष्ठेच्या सय्यद मुश्ताक अली चषक क्रिकेट स्पर्धेला शनिवारपासून विविध ठिकाणी प्रारंभ होणार आहे. या स्पर्धेत स्टार हार्दिक पांड्या व मोहम्मद शमीसारखे खेळाडू खेळणार आहेत.

हार्दिक पांड्याला मुंबई इंडियन्सने संघात कायम ठेवल्यामुळे त्याला आयपीएल लिलावाची चिंता करण्याची गरज नाही. त्यामुळे हार्दिक बडोद्याच्या जर्सीमध्ये अष्टपैलू खेळाडू म्हणून दिसणे हे बीसीसीआयच्या प्रमुख क्रिकेटपटूंना देशांतर्गत स्पर्धांमध्ये अनिवार्यपणे उपस्थित राहण्याच्या धोरणाशी सुसंगत आहे. बडोद्याला विजेतेपदासाठी मदत करणे हे त्याचे उद्दिष्ट असेल.

पण बंगालसाठी मोहम्मद शमीची खेळी बहुआयामी आहे. अलीकडेच मध्यप्रदेशविरुद्धच्या रणजी करंडक सामन्यात आपल्या राज्यासाठी सात बळी टिपल्यानंतर अनुभवी वेगवान गोलंदाज आपली तंदुरुस्ती अधिक अधोरेखित करण्यासाठी उत्कृष्ट प्रदर्शन करण्यास उत्सुक असेल. गुजरात टायटन्सने करारमुक्त केल्यानंतर ३४ वर्षीय खेळाडूला आयपीएल लिलावात सुद्धा निवडले जाईल.

त्याचप्रमाणे श्रेयस अय्यर (मुंबई) याने आयपीएल २०२४ मध्ये कोलकाता नाईट रायडर्ससाठी जेतेपद पटकावले होते आणि युझवेंद्र चहल (हरयाणा) या स्पर्धेत चांगले प्रयत्न करून आपले आयपीएल सीव्ही वाढवण्याचा प्रयत्न करेल.

तामिळनाडूला एसएमए विजेतेपद मिळवून दिल्यानंतर शाहरुख खानचे मूल्य काही पटींनी वाढले होते. या वर्षी सुद्धा युवा व नवोदित खेळाडूंना लिलावातून मोठी रक्कम आकर्षित करेल अशी आशा आहे. बंगालचा यष्टिरक्षक-फलंदाज अभिषेक पोरेल हा अलीकडेच भारत अ संघाचा ऑस्ट्रेलिया दौऱ्याचा भाग होता. तो तीव्र गतीने धावा करू शकतो व २२ वर्षीय खेळाडूला सुरुवातीच्या फेऱ्यांमध्येच आपले सर्वोत्तम पाऊल पुढे टाकायचे आहे.

कर्नाटकचा अभिनव मनोहरला गुजरात टायटन्सने करारमुक्त केले. अभिनवने अलीकडेच केएससीए महाराजा टी-२० मध्ये तब्बल १९६.५ स्ट्राइक रेटने ८४.५ च्या सरासरीने ५०७ धावा केल्या आणि मधल्या फळीत भरीव योगदान दिले. त्यामुळे तो आपला दावा आणखी मजबूत करण्यासाठी उत्सुक असेल.

राजस्थानचा तरुण मानव सुथार सुद्धा याच श्रेणीत येतो. डावखुरा फिरकी गोलंदाज सुथारने तळाच्या फळीतील एक उत्कृष्ट फलंदाज अशी प्रतिमा तयार केली आहे. (वृत्तसंस्था)

# मोदींनी गयानामध्ये घेतली वेस्ट इंडीजच्या क्रिकेट दिग्गजांची भेट

◆ **जॉर्जटाऊन, २२ नोव्हेंबर**

क्रिकेट हा खेळ भारताला वेस्ट इंडीजशी जोडणारा एक अनोखा बंध आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वेस्ट इंडीजमधील प्रमुख क्रिकेट दिग्गजांशी संवाद साधताना म्हणाले.

पंतप्रधान मोदी यांचे बुधवारी गयाना येथे आगमन झाले. ५० वर्षांहून अधिक काळानंतर भारतीय पंतप्रधानांची ही वेस्ट इंडीजला पहिलीच भेट आहे. शुक्रवारी त्यांनी गयानाचे अध्यक्ष इरफान अली यांच्यासह क्रिकेट क्षेत्रातील मान्यवरांची भेट घेतली. यावेळी वेस्ट इंडीजचे माजी क्रिकेटपटू क्लाईव्ह लॉईड, संघाचा माजी विश्वचषक विजेता कर्णधार, फलंदाज अल्विन कालिचरण व माजी फिरकी गोलंदाज देवेंद्र बिशू यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधला. या भेटीदरम्यानचे छायाचित्र समाजमाध्यमात सामायिक करण्यात आले.



पंतप्रधान मोदी यांच्याशी संवाद साधताना क्लाईव्ह लॉईड व वेस्ट इंडीजचे माजी क्रिकेटपटू

मैत्रीची खेळी! भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व गयानाचे अध्यक्ष इरफान अली यांनी आज जॉर्जटाऊनमध्ये वेस्ट इंडीजमधील प्रमुख क्रिकेट दिग्गजांची भेट घेतली, असे परराष्ट्र मंत्रालयाने एक्सवर एका पोस्टमध्ये म्हटले आहे. क्रिकेट भारताला कॅरिबियनशी जोडते जसे इतर माध्यम नाही! असे त्या छायाचित्राखाली लिहिले आहे.

तीन देशांच्या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यावर पंतप्रधान मोदी गयानामध्ये आहेत.

या भेटीमध्ये नायजेरियाच्या उत्पादक सहलीचा समावेश होता. १७ वर्षांमध्ये भारतीय पंतप्रधानांचा पश्चिम आफ्रिकन देशाचा हा पहिला दौरा होता. नायजेरियातून मोदी जी-२० परिषदेत सहभागी होण्यासाठी ब्राझीलला गेले होते. (वृत्तसंस्था)

# फिडे विश्वविजेतेपदासाठी गुकेश, लिरेन लढणार

◆ **सिंगापूर, २२ नोव्हेंबर**

आगामी २५ नोव्हेंबरपासून सिंगापूरमध्ये सुरू होणाऱ्या फिडे जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद २०२४ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताच्या डी. गुकेशची गाठ गतविजेत्या चीनच्या डिंग लिरेनशी पडणार आहे.

अंतिम सामना सिंगापूरच्या दक्षिणेकडील किनारपट्टीवरील सेंटोसा येथील रिसॉर्ट्स वर्ल्ड येथे होणार आहे. १९७८ मधील बागुइओ नंतर आग्नेय आशियामध्ये विश्व बुद्धिबळ विजेतेपदासाठीचा अंतिम सामना आयोजित करण्याची ही दुसरी वेळ असेल. अंतिम फेरीचा पहिला सामना २५ नोव्हेंबर रोजी होणार असून स्पर्धेचा उद्घाटन समारंभ दोन दिवस आधी होणार आहे. १४वी आणि




अंतिम फेरी १२ डिसेंबरला होणार आहे, आवश्यक असल्यास दुसऱ्या दिवशी टायब्रेकसाठी राखीव दिवस ठेवण्यात आला आहे.

विश्वविजेतेपदासाठीच्या इतिहासातील हा पहिला अखिल आशियाई खेळाडूंचा अंतिम सामना आहे. भारत आणि चीन यांच्यातील स्पर्धा पाहणे मनोरंजक असेल. हा एक ऐतिहासिक सामना आहे, कारण १८ वर्षीय गुकेश हा जगातील सर्वात तरुण आव्हानवीर आहे व तो सर्वात तरुण जागतिक विजेता होण्याचीही शक्यता आहे, असे भारतीय ग्रॅण्डमास्टर विश्वनाथन् आनंद म्हणाला. (वृत्तसंस्था)

# मेस्सी, अर्जेंटिना संघ केरळमध्ये खेळण्याची शक्यता

◆ **तिरुवनंतपुरम्, २२ नोव्हेंबर**

लियोनेल मेस्सी व अर्जेंटिना फुटबॉल संघ पुढील वर्षी आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण फुटबॉल सामन्यासाठी केरळला भेट देणार आहेत, या वृत्ताला राज्याच्या क्रीडामंत्र्यांनी पुष्टी दिली.

अर्जेंटिना राष्ट्रीय फुटबॉल संघ आपल्या कर्णधारासह पुढील वर्षी राज्याला भेट देणार आहे व आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण खेळेल अशी अपेक्षा आहे. अब्दुरहिमन यांच्या नेतृत्वाखालील राज्याचे क्रीडा मंत्रालय आणि माद्रिदमध्ये अर्जेंटिना फुटबॉल असोसिएशन यांच्यात गेल्या सप्टेंबरमध्ये झालेल्या चर्चेनंतर हे विधान करण्यात आले. केरळचे मुख्यमंत्री पिनारी विजयन यांनीही फेसबुक पोस्टद्वारे अशीच घोषणा केली आहे.

मेस्सीसह जगातील प्रथम क्रमांकाचा फुटबॉल संघ अर्जेंटिना पुढील वर्षी केरळला भेट देणार आहे. हा सामना राज्य सरकारच्या संपूर्ण देखरेखीखाली होणार आहे. राज्याच्या व्यापाऱ्यांनी सामना आयोजित करण्यासाठी आर्थिक मदत देण्याचे आश्वासन दिले आहे, असे अब्दुरहिमान यांनी पत्रकारांना सांगितले.

पुढील चर्चा करण्यासाठी एएफएचे अधिकारी पुढील दीड महिन्यात केरळला भेट देतील, असे मंत्री म्हणाले. (वृत्तसंस्था)

# युगेंद्र पवार आमदार होणार, महाविकास आघाडीला १६० जागा मिळणार

## जितेंद्र आव्हाडांचा दावा

**मुंबई, दि. २२ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक अनेक कारणांमुळे चांगलीच गाजल्याचे पाहायला मिळाले. मतदानाची प्रक्रिया पार पडली असून, आता संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष २३ नोव्हेंबर रोजी लागणाऱ्या निकालांकडे लागले आहे. मतमोजणीसाठी अवघे काही तास राहिले असताना आता राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग आला आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीतील नेते अनेक दावे-प्रतिदावे केले जात आहेत.

यातच शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी मोठा दावा केला आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे. १६० पेक्षा जास्त जागा येणार आहेत. बारामतीत युगेंद्र पवार निवडून येतील. एक मताने का होईना पण युगेंद्र आमदार होतील, असे आव्हाड म्हणालेत. तसेच भाजपाकडे प्रचंड पैसा आहे, निवडणुकीत त्यांनी कोटींच्या कोटी वाटले, त्यामुळे आताही ते पैसे वाटणार, अपक्ष आमदारांना पैसे देणार, भाजपाला अजून काय येते, असे आव्हाड म्हणाले.

शरद पवार कुठल्याही क्षणी त्यांच्या पक्षातील आमदारांच्या हितासाठी राज्याच्या हिताचा निर्णय घेऊ शकतात, असे मला वाटते. निकालानंतर पवार आपला ट्रॅक बदलू शकतात. पवार हे उद्धव ठाकरे आणि काँग्रेससोबत राहणार नाहीत. शरद पवार महायुतीसोबत हातमिळवणी करु शकतात, असा दावा नारायण राणे यांनी केला. यावर बोलताना, नारायण राणे यांना सल्ला आहे, तुम्ही किती पक्ष बदलले ते बघा, तीन पक्ष बदलेल्या माणसाने शरद पवारांना सांगू नये, तुम्ही तुमचे बघा, असे प्रत्युत्तर आव्हाडांनी दिले.

# संगमेश्वर व केबीपी पंढरपूरचे वर्चस्व

## महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत येथील संगमेश्वर महाविद्यालय व पंढरपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या खेळाडूंनी वर्चस्व प्राप्त केले.

मराठा समाज सेवा मंडळ संचलित छत्रपती शिवाजी नाईट कला वाणिज्य महाविद्यालयाने या स्पर्धेचे आयोजन राजर्षी शाहू सभागृहात केले आहे. या स्पर्धेमध्ये १५० खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

याचे उद्घाटन मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य डॉ एम एस पवार, विद्यापीठाचे क्रीडा संचालक प्रा. डॉ अतुल लकडे, संस्थेचे सचिव प्रा महेश माने, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा सचिन गायकवाड, निवड समिती अध्यक्ष प्रा विजय पवार, सदस्य प्रा डॉ सुभाष मारकड, प्रा आनंद ढवण, प्रा सोनटक्के, आयोजन समिती सदस्य प्रा नंदकिशोर देशपांडे, प्रा डी के देशमुख, प्रा डॉ प्रशांत तांबिले, प्रा बापू मोहीते, पंच प्रमुख ज्ञानेश्वर उत्पात, प्रा गणेश बागल आदी उपस्थित होते. प्रस्ताविक प्रा संतोष गवळी यांनी केले.

### बॉक्सिंग;जीवनात लढण्याची क्षमता विकसीत करतो : सपाटे

माजी महापौर सपाटे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धामध्ये सातत्याने सहभाग घेतला पाहिजे खेळामुळे मानसिक व शारीरिक क्षमता विकसित होते. बॉक्सिंग हा खेळ जीवनात लढण्याची क्षमता विकसित करतो. जीवन जगत असताना संघर्ष अटळ असतो त्यामुळे संघर्ष करायचा असेल तर लढण्याची क्षमता असली पाहिजे ती बॉक्सिंग या खेळामुळे विकसित होते.

**अंतिम निकाल (प्रथम तीन ) :**

**महिला :** ४५ ते ४८ किलो : समृद्धी मुळे (के बी पी कॉलेज पंढरपूर), श्रावणी सूपाते (छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज), वैष्णवी बस्के (के.एन भिसे कॉलेज, कुर्डवाडी), ४८ ते ५० किलो : श्रुती नगरे (डी एस जी कॉलेज मोहोळ), साक्षी गाडे (के.एन भिसे कॉलेज, कुर्डूवाडी), स्वाती जाधव (बी पी सी एस कॉलेज, अननगर), प्रचिती जोगदंडे (सुशीलकुमार शारीरिक शिक्षण महाविद्यालय). ५२ किलो ते ५४ किलो : शेख सानिया (के. एन. भिसे कॉलेज, कुर्डूवाडी), वैष्णवी ताटे (सोलापूर). ५४ ते ५७ किलो : नगरे कीर्ती (संगमेश्वर कॉलेज) पायल लोकरे (बीएमआयटी सोलापूर). ५७ ते ६० किलो : अपूर्वा गायकवाड (गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोला), अपूर्वा गायकवाड (डी.बी. एफ दयानंद).६० ते ६३ किलो : स्वामिनी डोळसे (कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी) दीक्षा पवार (संगमेश्वर कॉलेज). ६३ ते ६६ किलो : दीपक गलांडे (संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ), शेख महेक, ढोरे समीक्षा (छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज). ६६ ते ७० किलो : निर्जला माळी (के.बी.पी., पंढरपूर), हर्षिता पठारे (छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज). ७० ते ७५ किलो : सृष्टी काळे (पंढरपूर), संस्कृती केशिट्टीवार (एन. बी. नवले सिंहगड कॉलेज). ८१ किलो : सुप्रिया वळवे (संगमेश्वर कॉलेज), वैष्णवी भोसले (संगमेश्वर कॉलेज), वैष्णवी भारती (के. एन. भिसे कॉलेज, कुर्डूवाडी).



सोलापूर : सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदार संघातील मतमोजणीसाठी सिंहगड महाविद्यालयात तयारी पूर्ण झाली आहे.

# देवेंद्र कोठे यांच्या विजयासाठी भाजपा कार्यकर्त्यांकडून श्रीरामाची महाआरती!

## प्रभू श्रीरामाला घातले विजयाचे साकडे



**सोलापूर, दि.२२ नोव्हेंबर -**

विधानसभा निवडणुकीचे भाजपा आणि महायुतीचे उमेदवार देवेंद्र कोठे यांच्या विजयासाठी भाजपा कार्यकर्त्यांनी शुक्रवारी दाजी पेठ येथील श्रीराम मंदिरात महाआरती केली. देवेंद्र कोठे यांच्या रूपाने भाजपचा शहरातील तिसरा आमदार विधानसभेत जावा अशी प्रार्थना प्रभू श्रीरामाकडे करण्यात आली.

यावेळी भाजपाचे माजी शहर अध्यक्ष रामचंद्र जन्नू म्हणाले, भारतीय जनता पार्टी आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम करून भाजपा आणि महायुतीचे उमेदवार देवेंद्र कोठे यांचा प्रचार केला आहे. सर्वांच्या प्रयत्नाला यश यावे आणि देवेंद्र कोठे यांचा विजय व्हावा याकरिता प्रभू श्रीरामांकडे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी साकडे घातले.

यावेळी गुरुशांत धुत्तरगावकर म्हणाले, अत्यंत चुरशीच्या झालेल्या निवडणुकीत भाजपा आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांनी विजयासाठी प्रयत्न केले आहेत. त्यामुळे आमचा विजय निश्चित आहे, याची खात्री आहे. या विजयाकरिता प्रभू श्रीरामांचे आशीर्वाद मिळावेत यासाठी महाआरती करण्यात आली.

याप्रसंगी भाजपाचे माजी शहर अध्यक्ष रामचंद्र जन्नू, नागनाथ सोमा, रवींद्र नक्का, काशिनाथ गड्डम, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, माजी नगरसेवक मेघनाथ येमुल, मधुकर वडनाल, भाजपा शहर चिटणीस नागेश सरगम, बजरंग कुलकर्णी, महिला मंडल अध्यक्ष लक्ष्मी बदलापुरे, दत्तात्रय पोसा, ओबीसी मोर्चा सरचिटणीस श्रीनिवास जोगी, शिक्षक आघाडीचे दत्ता पाटील, विश्वनाथ बदलापुरे, प्रभाकर गोरंटी, राम गड्डम, संतोष चन्ना, विजय महिंद्रकर, अनिल वंगारी, शावरसिद्ध कोंडा, उमेश अंबाल, प्रकाश गाजुल, ज्ञानेश्वर गवते, अभिषेक चिंता, अंबादास साकीनाल, आदीसह भाजपा प्रभाकर क्रमांक नऊ मधील कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विशेष लक्ष केंद्रित करणारी आरोग्य विमा योजना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

मणिपालसिग्ना सर्व या नवीन आरोग्य विमा योजनेची घोषणा करण्यात आली आहे.संपूर्ण आरोग्य विमा उपाय ऑफर करण्यासाठी डिझाइन केलेली,सर्व-ज्याचा अर्थ सर्वांसाठी आहे,भारताच्या मिसिंग मिडल लोकसंख्येवर विशेष लक्ष केंद्रित करून,व्यापक ग्राहक वर्गासाठी परवडणारे आणि सर्वसमावेशक आरोग्य कव्हरेज प्रदान करते.व्यवस्थापकीय संचालक प्रसून सिकदार यांनी की,मणिपालसिग्नामध्ये आमची वचनबद्धता केवळ आरोग्य विमा ऑफर करणे ही नाही,तर नवनवीन उपाय शोधून भारतातील मिसिंग मिडलसह परवडणारी आरोग्यसेवा सर्वांपर्यंत पोहोचविणे आणि त्यातील अंतर भरून काढणे ही आमची वचनबद्धता आहे.

## निधन वृत्त...

### नरहरी अलाट

**बार्शी, दि. २२ नोव्हेंबर-**



येथील माऊली चौक, अलिपूर रस्ता येथील रहिवाशी व करमाळ्याचे माजी नगरसेवक नरहरी बाबुराव अलाट (वय ७७) यांचे वृद्धापकाळाने शुक्रवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सुना, एक मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. दलित महासंघाचे शहराध्यक्ष संदीप अलाट व अॅड. अमोल अलाट यांचे ते वडील होत.

### दीपक गाडे

**नातेपुते, दि. २२ नोव्हेंबर-**



माळशिरस, सिद्धार्थनगरमधील रहिवाशी दीपक तुकाराम गाडे (वय ५२) यांचे यांचे अल्पशा आजाराने उपचारादरम्यान गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, दोन मुली, नातवंडे, जावई, बहिणी असा परिवार आहे. पत्रकार सुनील ओवाळ यांचे ते ज्येष्ठ मावस बंधू होते.

### कलावती एक्कलदेवी

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**



दाजी पेठेतील कलावती पुंडलिक एक्कलदेवी (वय ८५) यांचे शुक्रवारी २२ नोव्हेंबर रोजी निधन केले. त्यांची अंतयात्रा शनिवारी २३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या निवासस्थानापासून निघणार आहे. माजी परिवहन समिती सदस्य मधुकर एक्कलदेवी यांच्या त्या मातोश्री होत.

### अण्णाप्पा कोकटनूर

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**



अशोक चौक येथील हॉटेल व्यावसायिक अण्णाप्पा अमोगी कोकटनूर यांचे वयाच्या ९४ व्या वर्षी वृद्धापकाळाने गुरुवारी पहाटे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर अक्कलकोट रोड येथील स्मशानभूमी अंत्यसंस्कार करण्यात आले. शिंदे सेनेचे उपजिल्हा प्रमुख सुरेश कोकटनूर यांचे ते वडील होत.

# एक कोटी लिटर इथेनॉलचा करणार पुरवठा

## रोहन परिचारक : युटोपियन शुगर्स इथेनॉल ब्लेंडिग प्रोग्रॅममध्ये सहभागी




**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २२ नोव्हेंबर-**

कचरेवाडी (ता. मंगळवेढा) येथील युटोपियन शुगर्स लि. कारखान्याच्या या गळीत हंगामातील प्रथम इथेनॉल टँकरचे पुजन कारखान्याचे चेअरमन उमेश परिचारक व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

युटोपियन शुगर्सचा २०२४-२०२५ हा अकरावा गळीत हंगाम नुकताच सुरु झाला आहे. युटोपियन शुगर्सने केंद्र शासनाच्या आवाहनास प्रतीसाद देत राष्ट्रीय स्तरावरील इथेनॉल ब्लेंडिंग प्रोग्रॅममध्ये सहभाग घेतला आहे. त्यानुसार सुमारे १.०० कोटी लिटर इथेनॉलचा पुरवठा हिंदुस्तान पेट्रोलियम, भारत पेट्रोलियम, इंडियन ऑइल या कंपन्यानकडे करण्यात येणार असल्याचा मानस मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक यांनी सांगीतले.

रोहन परिचारक म्हणाले, युटोपियन शुगर्सने मागील दहा हंगामात भरीव कामगिरी केली आहे. चालू गळीत हंगामात ६.०० लाख मे.टन ऊसाचे गाळप करणेचे उद्दिष्ट ठेवले आहे. कारखान्याने पेट्रोलियम कंपन्याकडे १.०० कोटी लिटर इथेनॉल निर्मितीची निविदा भरलेली आहे. पेट्रोलियम कंपन्यांनी कारखान्यास ऊसाच्या रसापासुन ४० लाख लिटर व बी हेवी मोलॅसेस पासून ६० लाख लिटर इथेनॉल निर्मिती व पुरवठा करणेस मान्यता दिलेली आहे. ऊसाच्या रसापासुन इथेनॉल निर्मिती करताना १.३० इतकी रिकव्हरी खर्च होत आहे.

तसेच बी हेवी मोलॅसेस पासून इथेनॉल निर्मिती करताना १.३५ इतकी रिकव्हरी खर्च होत आहे. इथेनॉल विक्रीच्या मिळणाऱ्या रकमेतुन ऊस उत्पादकांना वेळेत ऊस बिल रक्कम अदा करणे पुढील काळात शक्य होणार आहे. यावेळी कारखान्याचे चेअरमन उमेश परिचारक, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक, चिफ फायनान्सियल ऑफीसर दिनेश खांडेकर, जनरल मॅनेजर (टेक.) सुधिर गाढवे, डिस्टलरी मॅनेजर महेश निंबाळकर, मुख्य शेती अधिकारी धनंजय व्यवहारे, चिफ केमिस्ट चंद्रकांत विभुते, सिव्हिल इंजिनिअर अनिल भोसले आदी खातेप्रमुख तसेच राज्य उत्पादन शुल्क विभाग अभिजीत सुर्यवंशी, मनोज सावंत व कामगार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार ईडीपी मॅनेजर अभिजीत यादव यांनी मानले.

# राज्यात २१व्या पशुगणनेस सोमवारपासून सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि.२२ नोव्हेंबर-**

राज्यात एकविसाव्या पशुगणनेस सोमवार २५ नोव्हेंबरपासून आरंभ होणार असून आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत मोबाईल ॲपच्या माध्यमातून ही पशुगणना करण्यात येणार आहे, अशी माहिती पशुसंवर्धन आयुक्तालयाचे सहसंचालक सुषमा जाधव यांनी कळविली आहे.

सर्व पशुपालकांनी पशुगणना करण्यासाठी येणाऱ्या प्रगणकांना आपल्याकडील पशुंची अचूक व योग्य ती माहिती देण्यात यावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे. पशुगणनेच्या माध्यमातून राज्यातील नागरी व ग्रामीण क्षेत्रनिहाय कुटुंब, कौटुंबिक उपक्रम, बिगर-कौटुंबिक उपक्रम आणि संस्था, गोशाळा यांच्याकडे असलेल्या राज्यात आढळणाऱ्या १६ पशुधन प्रजाती व कुक्कुटादी पक्षी यांची जातीनिहाय, वयोगट तसेच लिंगनिहाय आकडेवारी गोळा केली जाणार आहे. ही पशुगणना नोव्हेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत घेण्यात येणार आहे. पशुपालन ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून देशाच्या तसेच राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये याचे लक्षणीय योगदान आहे. शासनाला नियोजनासाठी पायाभूत सांख्यिकीची आवश्यकता असून ही माहिती गणनेच्या स्वरुपात गोळा केली जाते. पशुधनामध्ये महाराष्ट्र संपन्न राज्य असून देशामध्ये ७ व्या क्रमांकावर आहे. तसेच कुक्कुट व कुक्कुटादी पक्षी यामध्ये ५ व्या क्रमांकावर आहे.

पशुपालन पूरक उत्पन्ननिर्मिती बरोबरच दूध, अंडी व मांस ही पशुधन उत्पादने पोषक आहाराचा महत्त्वाचा स्रोत आहे. देशात १९१९ पासून दर ५ वर्षांनी पशुगणना घेण्यात येत आहे. २०१९ मध्ये २० व्या पशुगणनेमध्ये प्रथमच प्रजाती व ग्रामीण आणि नागरी क्षेत्रनिहाय पशुधनाची आकडेवारी गोळा करण्यात आली.

# देशभक्तीचा अंगार फुलवणारी क्रांतिवीरांची वीरगाथा

**"क्रांतिवीरांची वीरगाथा सादर करतांना माझ्या वाणीतून क्रांतिकारकांचा इतिहास जीवंत उभा करु शकलो नाही, तर एक पैसाही मोबदला घेणार नाही, याउलट आयोजकांना एक हजार रुपये दंड देईलं." आपल्या सादरीकरणातील आत्मविश्वास व्यक्त करतांना एखाद्या सादरकर्त्यांनी हे आव्हान स्विकारावे ,यावरुन तो प्रयोग सादर करतांना तो सादरकर्ता क्रांतिवीरांच्या त्याग,बलिदान व आत्मसमर्पणाशी किती एकरुप होत असेल याची प्रत्येकाला कल्पना यावी.**

सव्वा ते दीड तासाच्या या प्रयोगात १८५७ ते १९४७ या नव्वद वर्षाच्या कालावधीतील मंगल पांडे, वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक, चाफेकर बंधू, बंकीमचंद्र चटर्जी, स्वामी विवेकानंद, खुदीराम बोस, प्रफुल्ल चक्रवर्ती, स्वा.सावरकर, मदनलाल धिंग्रा, प्रफुल्ल, चाकी, अनंत कान्हेरे, विष्णू पिंगळे, कर्तारसिंग, अशफाक उल्लाखान, चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, नेताजी सुभाषचंद्र बोस अशा अनेक क्रांतिकारकांच्या जीवनातील प्रसंग जीवंत उभे करुन आबालवृद्धांच्या मनात ज्वलंत देशभक्ती निर्माण करण्याचा प्रयोग अव्याहतपणे निर्माण करण्याचे कार्य मेहकर (जि. बुलडाणा) येथील प्रा. वसंत गिरी जानेवारी १९९५ पासून करत आहेत. सहस्त्र प्रयोगाकडे त्यांची वाटचाल सुरु आहे.

त्यांच्या सादरीकरणाविषयी अनेक मान्यवरांनी त्यांची विशेष दखल घेवून दिलेले अभिप्राय वाचकांनी लक्षात घेण्यासारखे आहेत. प्राचार्य यशवंत पाटणे म्हणतात,''क्रांतिकारकांच्या जीवनातील अनेक व्याख्याने ऐकली. त्यावेळी त्या व्याख्यात्याच्या विरोधातच क्रांती करुन उठावे असे वाटत होते पण प्रा. गिरींना ऐकल्यावर हा बुलढाण्याचा ढाण्या वाघ क्रांतिकारकांचे जीवंत चित्र उभे करतो हे लक्षात आले.'' प्रख्यात वक्ते स्व.शिवजीराव भोसले (कुलगुरु) म्हणाले होते.''स्वातंत्र्यानंतर स्वार्थी माणसांनी ज्या महान कार्याकडे पाठ फिरविलीआहे. त्या कार्यात प्रा. गिरींनी स्वत:ला झोकून दिले आहे.त्यांच्या महान राष्ट्रकार्याला माझ्या शुभेच्छा.'' स्व. मुजफ्फर हुसेन,:-'' प्रा.गिरीजीका प्रयास युवा पिढीको त्याग, बलिदान और राष्ट्रभक्ती सिखाएगा.'' स्व.प्राचार्य राम शेवाळकर म्हणाले होते,'' युवा पिढीसमोर क्रांतिवीरांची वीरगाथा सादर केलीच पाहिजे. या क्षेत्रात कार्य करण्यासाठी त्यांना शुभेच्छा.'' तिफनकार कविवर्य प्राचार्य विठ्ठल वाघ म्हणतात ''तरुण पिढीला राष्ट्रकार्याने झपाटून टाकण्याची आणि प्रचंड परिवर्तन घडवून आणण्याची ताकद प्रा.गिरी यांच्या शब्दात आहे.'' मेहकर येथील स्व.कविवर्य ना. घ.देशपांडे यांचा त्यांच्या सादरीकरणाविषयी अभिप्राय असा,''१८५७ ते १९४७ या नव्वद वर्षाच्या स्वातंत्र्य संग्रामाचा परीणामकारक आलेख प्रा. गिरी आपल्या ओघवत्या शैलीत घेवून वातावरण भारावून टाकतात.स्वातंत्र्याच्या यज्ञवेदीवर बलिदान देणाऱ्या थोर क्रांतिकारकांचा परिचय उगवत्या पिढीला व्हावा आणि त्यांच्या आयुष्यात त्यांना हा इतिहास प्रेरणा देणारा ठरावा या हेतूने प्रेरित होवून ते प्रसंग जिवंत करतात.'' बाबा आमटे यांचे जेष्ठ चिरंजीव थोर समाजसेवक विकास आमटे म्हणतात,'' प्रा. गिरींचे व्यक्तीमत्व शब्दाची फेक विलक्षण आहे. अशा लोकोपयोगी,लोकशिक्षणात्मक उपक्रमास आनंदवन परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा.'' भारताचार्य सु. ग. शेवडे म्हणतात,'' क्रांतिवीरांची वीरगाथा सादरीकरणासाठी आवश्यक असणारे सुस्पष्ट व खणखणीत उच्चार रसपरिपोष आणि श्रोत्यावरील पकड ह्या सर्व बाबी गिरी सरांजवळ आहेत.



प्रा. वसंत गिरी

२०१२ मध्ये उद्यान मंगल कार्यालय,सदाशिव पेठ,पुणे येथे बाबासाहेब पुरंदरे यांच्या उपस्थितीत या वीरगाथेचे सादरीकरण केल्यावर बाबासाहेबांनी त्यांच्या सादरीकरणाची प्रशंसा करुन त्यांच्या पाठीवर थाप देणे. हा त्यांच्या जीवनातील खूप मोठा सन्मान आहे.क्रांतिवीरांची वीरगाथेच्या सादरीकरणासोबतच त्यांच्या व्याख्यानाचे अनेक विषय आहेत.सतत वाचन आणि विविध वृत्तपत्रातून त्यांचे लेखन सुरु असते.त्यांच्या प्रकाशित पुस्तकांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.२०१८ ला पलुस (जि. सांगली) येथे राज्यस्तरीय ग्रामिण साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या वाणीतून क्रांतिवीरांची वीरगाथा ऐकणे हा एक अविस्मरणीय प्रसंग असतो.

**- रामदास राजेगावकर**
मो. ९०११२२९२३२/८४८२८९०९९१

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## एस.एस. स्पोर्टस अकॅडमीच्या दोघांची राष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर -**

नेहरुनगर शासकीय मैदानावरील एस.एस. स्पोर्ट्स अकॅडमीच्या दोन खेळाडूंची राष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली.

पूजा राठोड हिने डेरवण (चिपळूण) येथे झालेल्या शालेय राज्य मैदानी स्पर्धेत १०० मीटर धावणे या क्रीडाप्रकारात रौप्य पदक पटकावले. तिची रांची, झारखंड येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय मैदानी स्पर्धेसाठी झाली.

तसेच विनीत दिनकर याने राज्य आंतर विद्यापीठ मैदानी स्पर्धेत १०० मीटर धावणे या क्रीडाप्रकारात सुवर्णपदक पटकावले. त्याची भुवनेश्वर येथे होणाऱ्या नॅशनल इंटर युनिव्हर्सिटी थलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी निवड झाली.

या खेळाडूंना एन.आय.एस. प्रशिक्षक सूर्याजी लिंगडे व भारती लिंगडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचा राज्य कबड्डी पंच सुभाष माने व रेल्वे अधिकारी निलेश वरवडकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.





## घरकुल येथील महापालिका उद्यानाची बकाल अवस्था

● स्मार्ट सिटीतील ४३ लाखांचा निधी गेला पालापाचोळ्यात
● मद्यपींचा बनला अड्डा; मोकाट जनावरांचा मुक्त वावर

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

स्मार्ट सिटी योजनेतून ४३ लाखाचा निधी खर्चून सुशोभीकरण करण्यात आलेल्या विडी घरकुल येथील स्व. विष्णुपंत कोठे उद्यानाची बकाल अवस्था झाली आहे. कंपाउंडचे काम अर्धवट राहिल्याने या ठिकाणी मोकाट जनावराचा मुक्त वावर होत आहे तर मद्यपींचा अड्डा झाला असल्याचे विदारक चित्र आहे. यामुळे नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे.

सोलापूर शहरातील हैदराबाद रोडवरील घरकुल येथील पोशम्मा मंदिर शेजारीच महापालिकेचे स्व. विष्णुपंत कोठे उद्यान आहे. या परिसरातील नागरिकांची सोय असणारे हे उद्यान आहे. यापूर्वी स्मार्ट सिटी योजनेतून तब्बल ४३ लाख रुपये निधी खर्चून या उद्यानाचे सुशोभीकरण करण्यात आले होते. येथील कंपाउंडचे काम अर्धवट करण्यात आले आहे. यामुळे या उद्यानात थेट मोकाट जनावरांचा मुक्त वावर होत आहे. हे उद्यान म्हणजे या जनावरांसाठी चरायचे ठिकाण झाले आहे. तातडीने येथील कंपाउंडचे काम पूर्ण करण्याची आवश्यकता आहे.

या उद्यानाचे मोठ्या प्रमाणात बकाल अवस्था झाली आहे. या ठिकाणी मद्यपी दिवसाढवळ्याही बसतात. दारुड्यांचा अड्डा बनला आहे. यामुळे सुजाण नागरिकांना येथे वावरणे अडचणीचे ठरते. सद्यस्थितीत असलेले प्रवेशद्वार बंद करून वसाहतीच्या दिशेकडून या उद्यानाचे प्रवेशद्वार करण्याची गरज आहे. तरच अशा लोकांना उद्यानात येण्यास मज्जाव होऊ शकतो. या उद्यानात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता झाली आहे. काटेरी झुडपे वाढली आहेत. महापालिका उद्यान विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. यामुळे परिसरातील सुजाण नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे. तातडीने या उद्यानाची स्वच्छता, देखभाल दुरुस्ती करण्यात यावी, अशी ही मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. स्मार्ट सिटी योजनेतून ४३ लाख रुपये खर्चून या उद्यानात कामे करण्यात आली असली तरी या उद्यानाची बकाल अवस्था का असा सवाल उपस्थित होत आहे. झालेल्या कामांची तपासणी आणि चौकशी करण्याची गरज वर्तवली जात आहे.

**उद्यानात ना शिपाई, ना रखवालदार**

या उद्यानात महापालिकेचा कोणताही कर्मचारी कार्यरत नाही. शिपाई नाही ना रखवालदार नाही. यामुळे या उद्यानाचा गैरवापर होत आहे. पर्यावरण रक्षणासाठी उद्यान फुलविणे गरजेचे आहे मात्र महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. या ठिकाणी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून आवश्यक ती दैनंदिन कामे करण्याची गरज आहे.

## हगलूर येथे हिंदू स्मशानभूमी शेड बांधकामाचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

येथील बालाजी अमईन्सच्यावतीने सी. एस. आर. अंतर्गत उत्तर सोलापूर तालुक्यातील हगलूर गावातील हिदू स्मशानभुमीच्या सुशोभिकरण व नविन शवदाहिनीकरीता आर. सी. सी शेड बांधण्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

हगलूर येथील हिंदु स्मशानभूमीमध्ये काही सुविधा सुविधा नव्हती. मोकळया जागेत अंत्यसंस्कार केले जात होते. यामुळे हगलूर ग्रामपंचायतीने बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे स्मशानभुमी मधील कामे करून मिळावीत अशी मागणी केली. यामुळे बालाजी अमईन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी व संचालक मंडळांनी या गावातील स्मशानभूमी सुशोभीकरण करून यामध्ये शवदाहिनीकरीता आरसीसी नविन शेड बांधकाम, बिडची शवदाहिणी बसवणे. वेटिंग कटटा, पत्रा शेड, कंपाऊंड, गेट, पेव्हर ब्लॉक, पाण्याची टाकी विविध कामे करण्यास तात्काळ मंजुरी दिली.या कामाचे भूमिपूजन बालाजी अमाईन्सचे तांत्रिक सल्लागार मल्लिनाथ बिराजदार यांचे हस्ते नारळ वाढवून करण्यात आले. यावेळी सरपंच कुमार खेळळे, उपसरपंच अंगद चव्हाण, सुरेश मगर, ज्ञानेश्वर कुंभार, पांडूरंग नवगिरे, सुरज नवगिरे, हरी शिंदे व बालाजी अमाईन्सचे दत्तप्रसाद सांजेकर, प्रदिप कोंडले, हगलूर ग्रामपंचायतीचे सदस्य व गावातील नागरीक उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### मिरवणुका काढण्यास तसेच सभा घेण्यास मनाई; पोलिस आयुक्तांचे आदेश


**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर -**

विधानसभा निवडणुकीची मतमोजणी शनिवार दि. २३ नोव्हेंबर रोजी होणार असून निकाल जाहिर झाल्यानंतर सोलापूर शहरात मिरवणुका काढण्यास तसेच सभा घेण्यास पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी मनाई केली आहे. निकाल जाहिर झाल्यानंतर विनापरवाना मिरवणुका व सभा घेणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा यावेळी आयुक्तांनी दिला आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरातील कायदा व सुव्यवस्थेस बाधा होण्याची शक्यता नाकारून पोलिस आयुक्तांनी शहरात विनापरवाना मिरवणुका तसेच सभा घेण्यास पोलिस आयुक्तांनी मनाई केली आहे. १५ नोव्हेंबर पासून २९ नोव्हेंबर पर्यंतच्या कालावधीत पोलिस आयुक्तांनी हे मनाई आदेश दिलेले आहेत. त्यामुळे निवडणुकीचा निकाल जाहिर झाल्यानंतर कोणीही विनापरवाना मिरवणुक अथवा सभा घेतली तर त्यांच्यावर कडक फौजदारी कारवाई होणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

### सराईत गुन्हेगार श्रीनिवास नंदाल दोन जिल्ह्यातून तडीपार

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर -**

शहरातील सराईत गुन्हेगार श्रीनिवास नंदाल यास पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपार करण्यात आल्यानंतर नंदाल यास पुणे येथे सोडण्यात आले आहे. श्रीनिवास नरेश नंदाल (वय २९, रा. प्लॉट नं. ५६, रा. जुना विडी घरकुल, पंचमुखी हनुमान मंदीरजवळ, सोलापूर) असे तडीपार करण्यात आलेल्याचे नाव आहे. नंदाल याच्याविरुध्द सन २०१३, २०१४ व २०२४ या कालावधीमध्ये घरफोडी करणे, चोरी करणे यासारखे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे नंदाल यास त्याच्या गुन्हेगारी कारवायापासून रोखण्यासाठी तडीपार करण्याबाबतचा प्रस्ताव सलगर वस्ती पोलिसांकडून उपायुक्त विजय कबाडे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्या प्रस्तावास पोलिस उपायुक्त कबाडे यांनी मंजुरी देत नंदाल यास सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीच्या आदेशानंतर नंदाल यास पोलिसांनी पुणे येथे सोडले आहे.



### तरूणास दगडाने मारहाण करणाऱ्या बारमधील महिलेसह सातजणांविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर -**

शहरातील मुरारजी पेठेतील सुराणा मार्केटमधील एलोरा बार बाहेर तरूणास दगडाने मारहाण करणाऱ्या बारमधील महिलेसह सातजणांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अमित शशिकांत पडवळकर (वय २६, रा. संग्राम गल्ली, कल्पना टॉकीजजवळ, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन अनोळखी व्यक्ती व महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री पावणे बाराच्या सुमारास सुराणा मार्केट येथील एलोरा बार मध्ये दोन मुले व एक मुलगी यांच्यासोबत झालेल्या अमित पडवळकर याच्या मित्राचे भांडण मिटविण्यासाठी अमित गेला होता. त्यावेळी त्या दोन मुले व मुलीने त्यांच्या ओळखीच्या लोकांना बोलावून घेऊन बार बाहेर अमित व त्याचा मित्र जात असताना मारहाण केली. त्यावेळी चार अनोळखी व्यक्तींनी अमितचा मित्र ऋषिकेश यास जबर मारहाण करून अमित यास रस्त्यावरील दगड फेकून मारहाण केली. यामध्ये अमितच्या डोक्यास जखम झाली असून याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक कामुर्ती तपास करीत आहेत.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त विशेष रेल्वे गाड्या सोडण्याची मागणी

● बसपाच्या वतीने रेल्वेचे वाणिज्य व्यवस्थापक पाटील यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रेल्वे प्रशासनाने विशेष गाड्या सोडाव्यात यासह विविध मागण्यांचे निवेदन बहुजन समाज पार्टीच्या वतीने सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांना देण्यात आले.

महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने दरवर्षी हजारो अनुयायी चैत्यभूमी, मुंबई येथे डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी ५ डिसेंबर रोजी मुंबईकडे प्रस्थान करतात. यासाठी रेल्वे प्रशासनाने विशेष गाड्या सोडण्याची मागणी करण्यात आली आहे.



दि. ४ व ५ डिसेंबर रोजी कलबुर्गी-सोलापूर-मुंबई तर दि. ६ व ७ डिसेंबर रोजी मुंबई-सोलापूर-कलबुर्गी या मार्गावर विशेष गाड्या चालवल्या जातात. मात्र, वाढत्या प्रवाशांच्या संख्येमुळे यंदा आणखी विशेष गाडी सायंकाळच्या सत्रात सोडण्यात याव्यात. महिलावर्ग, लहान मुले व वयोवृद्धांसाठी गाड्यांमध्ये स्लिपर डबे जोडण्यात यावेत. विशेष गाड्यांना सोलापूर जिल्ह्यातील प्रमुख स्थानकांवर थांबा देण्यात यावा. यामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांनाही मुंबईला जाण्याची सोय होईल, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी श्री. पाटील यांनी मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन पदाधिकाऱ्यांना दिले. निवेदन देतेवेळी बसपाचे शहर युवक अध्यक्ष अमरसेन साळवे, माजी शहर अध्यक्ष देवा उघडे, शिलवंत काळे, जालिंदर मसलखांब, युवराज बडेकर, महेंद्र कांबळे आणि पदाधिकारी उपस्थित होते.

## बाळे येथे ७ डिसेंबरपासून खंडोबा यात्रेस प्रारंभ

● विविध धार्मिक विधी व पालखी सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ नोव्हेंबर-**

बाळे येथे श्री खंडोबा देवस्थान यात्रेस शनिवार दि. ७ डिसेंबर रोजी विविध धार्मिक कार्यक्रमाने प्रारंभ होणार आहे. या निमित्ताने यात्रा काळात शनिवारी चंपाषष्ठी व चार रविवारी विविध धार्मिक कार्यक्रम आणि पालखी सोहळा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विनय ढेपे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



सोमवार दि. २ डिसेंबर २०२४ रोजी घटस्थापना करण्यात येणार आहे. त्यानंतर चंपाषष्ठी निमित्त शनिवार दि.७ डिसेंबर २०२४ रोजी काकड आरती अभिषेक व महापूजा पालखी सोहळ्याने यात्रेस उत्साहात मंगलमय वातावरणात प्रारंभ होणार आहे. शनिवार तसेच पहिला रविवार दि. ८ , १५ , २२ आणि २९ डिसेंबर २०२४ या चार रविवारी असे एकूण चार दिवस खंडोबा देवाची यात्रा भरणार आहे. या प्रत्येक रविवारी पहाटे ५ वाजता काकड आरती, सकाळी ८ वाजता अभिषेक व महापूजा, सायंकाळी ८ वाजता अभिषेक व महापूजा, सायंकाळी ७ वाजता घोडा व नंदी ध्वजासह पालखी सोहळा होणार आहे. बांगरषष्ठी रविवार दि. ५ जानेवारी २०२५ रोजी निमित्त महाप्रसाद वाटप कार्यक्रमाने या यात्रेची सांगता होणार आहे. पाटील, तोडकरी, कांबळे, सुरवसे व गावडे आदी सर्व मानकरी व भाविकांना प्रसाद वाटप करण्यात येतो.चंपाषष्टी शनिवार, चार रविवार असे एकूण चार दिवस खंडोबा देवाची यात्रा भरणार आहे. दिवसभर जागरण गोंधळ, वाघ्या मुरळी नाचणे, तळी भंडारा उचलणे, वारू सोडणे, नवस फेडणे, जावळ काढणे आदी धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. या यात्रेत दर्शनासाठी लाखो भाविक महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र या राज्यातून येतात. चौथ्या रविवारी रात्री ८ वाजता शोभेचे दारू काम होणार आहे. सोलापूर महापालिकेच्या वतीने सिटी बस सेवा आणि पाण्याची सोय करण्यात आली आहे. यात्रा काळात दर्शनासाठी मंदिर दिवसभर खुले राहणार आहे. देवस्थान ट्रस्टच्या वतीने या ठिकाणी नेटके नियोजन व चांगली व्यवस्था करण्यात आली असल्याचेही अध्यक्ष विनय ढेपे यांनी यावेळी सांगितले. या पत्रकार परिषदेस सागर पुजारी, आदिनाथ पुजारी, सुरेश पुजारी आदी उपस्थित होते.

## शहरात थंडीचा कडाका वाढला

● उबदार कपडे घेण्याकडे तिबेटियन मार्केटमध्ये ग्राहकांची वाढली वर्दळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ नोव्हेंबर -**

सोलापूर शहरात गेल्या काही दिवसांपासून थंडीचा जोर वाढला आहे. एरव्ही थोड्याफार प्रमाणात जाणवणारी थंडी यंदा वाढलेली दिसत आहे. सकाळ सत्रात थंडीचा काडाका मोठ्या प्रमाणात असल्याने विद्यार्थ्यांना तसेच चाकरमन्यांना उबदार कपड्यांचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे शहरातील तिबेटियन मार्केट येथे स्वेटर, मफलर, कानटोपी, चिमुकल्या बाळगोपाळांसाठी स्वेटर, हातमोजे, पायमोजे असे विविध उबदार कपडे घेण्यासाठी ग्राहकांची वर्दळ वाढलेली दिसत आहे.

दिवाळीनंतर सोलापूर शहरात थंडीचा जोर वाढत आहे. यंदा थंडीचा जोर वाढेल असा हवामान खात्याचा अंदाज आहे.



सोलापूर : तापमान घसरल्यामुळे शहरात थंडीची लाट आली. सोलापुरकर गरम कपडे खरेदी करण्यासाठी गर्दी करीत आहेत. (छायाचित्र : केवल तिवारी)

त्यानुसार शहरात पहाटे आणि रात्री थंड गारवा पसरत आहे. तर सकाळी धुके आणि अल्हाहदायक गारवा पसरत आहे. शाळेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच नोकरदारांना स्वेटर आणि हातमोजे यांचा आधार घ्यावा लागत आहे. दिवसभर देखील थंड वातावरण पसरत असल्याने नागरिक उबदार कपडे परिधान करत आहेत. थंडीचा कडाका दरवर्षीपेक्षा यावर्षी जास्त प्रमाणात असेल, असे हवामान खात्याने शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे नागरिकांनी थंडीपासून आपल्या शरीराचे संरक्षण व्हावे, यासाठी उबदार कपडे, स्वेटर, मफलर आदींचा आधार घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. दरम्यान मध्यरात्री आणि सकाळी थंडगार वारे वाहत असल्याने या बोचनाऱ्या थंडीपासून आपल्या शरीराचे संरक्षण व्हावे, यासाठी स्वेटर, जरकिन, हातमोजे असे उबदार कपडे खरेदी करण्यासाठी यंदा तिबेटियन मार्केट येथे ग्राहकांची मोठी वर्दळ दिसत आहे. तरुणांना स्वेटर आणि जर्किन यांचे आकर्षण दिसून येत आहे. विविध प्रकारचे स्टायलिश जर्किन बाजारात उपलब्ध झाले असून, याला सर्वाधिक मागणी दिसून येत आहे. सुमारे ५०० रुपयांपासून ते ३ हजार रुपये पर्यंतचे जर्किन मार्केटमध्ये उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे महिलांसाठी लेडीज स्वेटर देखील उपलब्ध आहेत. यांची किंमत देखील ४०० ते ९०० रुपयापर्यंत असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले.

**उबदार कपड्यांचे वाढले दर**

सोलापूर शहरात थंडीचा जोर वाढल्याने स्वेटर घेण्यासाठी तिबेटियन मार्केट येथे आलो आहोत. विविध प्रकारचे स्वेटर, जर्किन आदींसह उबदार कपडे उपलब्ध आहेत. मात्र दरामध्ये वाढ झालेली दिसत आहे.

**- संजना बनसोडे, ग्राहक**


श्रीनिवास सिनेमॅटिक जेलरोड जवळ, सोलापूर
Book The Ticket At BookMyShow
आजपासुन शानदार सुरूवात

सनी लिओनचे हॉरर सस्पेन एक्सपोझिंग
१२॥,०३॥, वा.





सत्यदेवचे फुल ॲक्शन तेलगु चित्र
०६॥ वा.




भागवत उमामंदिर
एअर कुल्ड
प्रेक्षकाच्या तुफान गर्दीत चालू




12.30 PM



03.30 PM



06.30 PM



09.30 PM

Book The Ticket At BookMyShow तिकीट बुक करण्यासाठी कॉल करा-9158142780

CMYK

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## २५० वर्षांपूर्वीच्या पार्श्वनाथ मूर्तीचे वज्रलेप, आज लघुपंचकल्याणक महोत्सव

चिंतामणी-२३

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन कासार मंदिर सोलापूर येथील २५० वर्षांपूर्वीची मूलनायक १००८ चिंतामणी पार्श्वनाथ भगवान मूर्तीचे वज्रलेप कार्य संपन्न झाल्यानंतर मुनीश्री सौम्यसागर महाराज, मुनीश्री विभास्वरसागर महाराज, मुनीश्री सारस्वतसागर महाराज, मुनीश्री जयंतसागर महाराज, मुनीश्री शुद्धोपयोगसागर महाराज, क्षुल्लक श्री श्रुतसागर महाराज यांच्या मंगल सान्निध्यात एक दिवसीय लघुपंचकल्याण महोत्सव आयोजित करण्यात आले आहे. सकाळी ६:४५ वाजता ध्वजारोहण, अभिषेक, इंद्र प्रतिष्ठा, सकलीकरण, यागमंडल विधान, तप कल्याण, केवलज्ञान कल्याण, मोक्ष कल्याण, विश्वशांती महायज्ञ इत्यादी विधानांचे आयोजन आज करण्यात आले आहे.



प्रतिष्ठाचार्य म्हणून बाल ब्रम्हचारी पियुष, प्रशांत मोहरे, विजय काळेगोरे कार्य पाहतील. दिवसभर असणाऱ्या या महोत्सवात महाराष्ट्र कर्नाटक राज्यातील श्रावक श्राविका उपस्थित राहणार असल्याची माहिती मंदिर समितीचे अध्यक्ष विलास कंदले यांनी केले आहे. महोत्सव यशस्वी करण्यासाठी संजय कंदले, सुभाषचंद्र वनकुद्रे, रविकिरण मैंदर्गे, महेश नळे, नेमेश वनकुद्रे, बाबुराव तंगा, प्रा. धन्यकुमार बिराजदार, उमेश सगरशेट्टी, सचिन पाटील, चेतन वनकुद्रे, बाहुबली वनकुद्रे, महावीर लाळे, विभुते, ज्ञानदीप महिला मंडळाच्या पदाधिकारी व कासार समाज बांधव परिश्रम घेत आहेत.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

दसरा, दिवाळी निमित्त
यल्लम्मा हॅण्डलूम
20% पर्यंत सूट
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं. १ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो. 9371289887
शाखा नं. २ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो. 9372351860

# धाकधूक आज थांबणार; मुख्यमंत्रीपदाची स्वप्नं

## उमेदवारांचे देव पाण्यात

## महायुती-महाआघाडीचे दावे-प्रतिदावे; काही निकाल धक्कादायक

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

**महाराष्ट्र विधानसभा निवडणूक महाउत्सवाचा समारोप आज निकालाने होत असून मैदानातील उमेदवारांची धाकधूक आज संपणार आहे. विजयाच्या अपेक्षेने अनेक उमेदवारांनी देव पाण्यात ठेवलेत तर काही ठिकाणी धक्कादायक निकाल देखील अपेक्षित आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सत्तेचे दावे-प्रतिदावे सुरु केलेले असून अनेकांना मुख्यमंत्रीपदाची स्वप्नं देखील पडू लागल्याचे चित्र आहे. जागा वाटपावरून झालेली तू-तू मै-मै आता मुख्यमंत्रीपदावरून देखील पहावयास मिळाल्यास नवल वाटायला नको. वाढलेला मतांचा टक्का आणि लाडकी बहिण कोणाला पावणार यावर निकालाच्या अंदाजांचे भवितव्य ठरणार आहे.**

भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस, शरदचंद्र राष्ट्रवादी, ठाकरे सेना, मनसे, वंचित, प्रहार, स्वाभिमानी, माकप आणि एमआयएम या राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवारांनी यंदाच्या विधानसभा निवडणुकीत मोठी रंगत आणली. या निवडणुकीत पैसे वाटपाचे प्रकार देखील अनेक ठिकाणी दिसून आले तर आयोगाच्या भरारी पथकाने कोट्यवधी रुपये आणि मालमत्ता देखील जप्त केली. जवळपास महिनाभर चाललेला हा निवडणुकीचा महाउत्सव निकालानंतर संपणार असला तरी सरकार कोणाचे यावरून पुन्हा महाराष्ट्राचे राजकारण तापणार आहे. विविध संस्था आणि प्रसारमाध्यमांनी प्रसिध्द केलेल्या एक्झिट पोलनुसार महायुती आणि महाविकास आघाडी दोघांनाही सत्तेची स्वप्नं दाखवलेली आहेत. बहुतांशी एक्झिट पोल्सनी महायुतीला सत्तेचा कौल दिलेला आहे. असे असले तरी शनिवार, २३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणी निकालानंतरच निवडणुकीचे सर्व चित्र स्पष्ट होणार आहे.

यंदा महाराष्ट्रात जवळपास चार टक्के इतके मतदान वाढले असून गत ३० वर्षातील दुसरे सर्वाधिक मतदान २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत झाल्याचे दिसून आले आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत सरकारची लाडकी बहिण योजना मोठी चर्चेची ठरलेली आहे. तर आरक्षणावरून मराठा आणि ओबीसी समाजाची नाराजी देखील निवडणुकीवर परिणाम करणारी ठरेल अशी चर्चा आहे. निवडणूक काळात यंदा पहिल्यांदाच महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये राडा झाल्याचे दिसले. तर विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी प्रचाराची रणधुमाळी उडवली. आरोप-प्रत्यारोपांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा आखाडा यंदा चांगलाच गाजल्याचे पहावयास मिळाले.



**प्रशांत माने**
**मो. ९८८११९१४४३**

गतवेळी २८८ पैकी १०६ जागा जिंकून मोठा भाऊ ठरलेल्या भाजपाला राज्यात सत्ता स्थापन करता आलेली नव्हती. त्या एका घटनेने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ देखील महाराष्ट्राच्या जनतेने पहिलेले आहे. तर एक्झिट पोलनुसार यंदाही महाराष्ट्रात पुन्हा एकदा भाजपाचा सर्वाधिक जागा जिंकून मोठा भाऊ असणार असल्याचे दिसून आले आहे.

गतवेळचा प्रकार लक्षात घेता भाजपा यंदा सावध भूमिका घेणार हे निश्चित आहे. शनिवारच्या निकालात प्रत्यक्षात कोणाला किती जागा मिळतील हे स्पष्ट झाल्यानंतर सत्तेसाठीचे रामायण-महाभारत सुरु होणार आहे. प्रत्येक पक्षाला मुख्यमंत्रीपदाची स्वप्नं पडू लागली आहेत. तर मुख्यमंत्रीपदावरून पुन्हा राज्यातील राजकारणात नवी समीकरणे देखील पहावयास मिळतील, अशी चर्चा राजकीय जाणकारांमध्ये रंगू लागली आहेत. भाजपा सत्तेत असणार हे नक्की असले तरी भाजपाचे सत्तेतील सवंगडी कोण असतील, आहे ती महायुती तशीच राहिले का त्यात बदल होतील याचीही उत्सुकता महाराष्ट्राच्या जनतेला लागली आहे.

> **जिल्ह्यावर वर्चस्व कोणाचे?**
> शहर मध्य, शहर उत्तर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बाशी, मोहोळ, माढा, करमाळा, सांगोला, माळशिरस, पंढरपूर-मंगळवेढा या जिल्ह्यातील ११ मतदारसंघांच्या निकालाकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहेत. शहर मध्य, बार्शी, सांगोला या मतदारसंघांकडे सर्वांचे विशेष लक्ष असणार आहे. जिल्ह्यावर कोणाचे राजकीय वर्चस्व हे आज स्पष्ट होणार आहे.

महायुतीत मुख्यमंत्रीपदासाठी देवेंद्र फडणवीस यांनाच अधीक पसंती आहे. तर एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री असावेत यासाठी शिवसेना आग्रही आहे. विशेष म्हणजे एक्झिट पोलमध्ये कमी जागा दाखवल्यानंतरही अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून मुख्यमंत्रीपदासाठीचे दावे सुरु झाले आहेत. मुख्यमंत्रीपदासाठी तडजोडीचाही प्रकार होण्याची शक्तया जाणकार व्यक्त करीत आहेत. निकालानंतरचे आकडे पाहूनच दाव्यांना महत्व असणार हे मात्र नक्की.

महाविकास आघाडी देखील मुख्यमंत्री कोण यावरून रुसवे-फुगवे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ठाकरे सेनेकडून मुख्यमंत्रीपदासाठी उध्दव ठाकरे यांचे नावे निवडणूक सुरु झाल्यापासूनच चर्चेत आहे. संजय राऊत हे सातत्याने उध्दव ठाकरे यांचे नाव पुढे करण्यात आघाडीवर आहेत. तर काँग्रेसकडूनही मुख्यमंत्रीपदासाठी दावा केला आहे. काही कार्यकर्त्यांनी तर नाना पटोले हेच मुख्यमंत्री होतील असेही सांगितले आहे. काँग्रेसवाले मात्र हायकमांड निर्णय घेतील असे सांगत आहेत. धुरंधर राजकारणी शरद पवार यांनी मात्र निकालनंतर नंबरच ठरवतील मुख्यमंत्री कोणाचा हे अगोदरच स्पष्ट केले आहे. याचा अर्थ शरद पवारांची राष्ट्रवादी देखील यंदा मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतील अग्रेसर आहे. एकूणच काय तर आजचा मतमोजणी निकालाचा दिवस हा महाराष्ट्रासाठी खूपच मोलाचा असणार आहे. पुढील पाच वर्षासाठी महाराष्ट्र कोणाच्या ताब्यात असणार हे स्पष्ट होणार आहे. परंतु आजचे राजकारण नव्या वळणाचे असल्याने कोण कोणासोबत असणार हे मात्र निकालानंतरच कळणार आहे.

## ▶▶ क्राईम वृत्त...

### हॅण्डल लॉक केलेली दुचाकी पळवली

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच १३ इडी ३३५८ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १७ नोव्हेंबर रोजी दुपारी सव्वा बारा ते पावणे दोन वाजण्याच्या सुमारास सोलापूर मंगळवेढा रोडवरील सांस्कृतिक मंगल कार्यालय येथे घडली. याप्रकरणी शेखर बिरू जाधव (वय २२, रा. मु. पो. गुंजेगाव) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार उपास हे करीत आहेत.

### पतीची बदनामी करत जातीवाचक शिवीगाळ

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

पतीची बदनामी करून जातीवाचक शिवीगाळ करत दमदाटी करून मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हि घटना २० ते २१ नोव्हेंबर दरम्यान होटगी रोड येथील यल्लमा देवी मंदिर शंकर नगर शिवशाही समोर घडली. याप्रकरणी अंजली संतोष कांबळे (वय २५, रा. शंकर नगर, होटगी रोड, शिवशाही समोर) यांनी एम आयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून लक्ष्मीबाई दिंडोरे व शिवशंकर उर्फ बाबुशा कामशेट्टी (रा. शंकर नगर, होटगी रोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. लक्ष्मीबाई दिंडोरे व शिवशंकर कामशेट्टी यांनी अंजली कांबळे व त्यांच्या पतीची बदनामी करून जातीवाचक शिवीगाळ करत दमदाटी केली. त्यानंतर कांबळे यांच्या अंगावर येऊन मारहाण केल्याचे फिर्यादीत आहे. तपास स. पोलीस आयुक्त पोमण हे करीत आहेत.

### जमाबंदीच्या आदेशाचे उल्लंघन; सहा जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

बेकायदेशीरपणे एकत्रित येऊन गैर कायद्याची मंडळी जमवून जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून शरद कोळी यांचा प्रतिकात्मक पुतळा गाढवावर बसवून आंदोलन करणाऱ्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस शिपाई आसिफ मौला शेख (नेमणूक जेलरोड पोलीस ठाणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलीस ठाण्यात शोएब महागामी व त्याच्या सोबत असलेले इतर चार ते पाच कार्यकर्ते यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. २१ नोव्हेंबर रोजी दुपारी पावणे चार वाजण्याच्या दरम्यान संपर्क कार्यालय समोरील सोशल कॉलेज जवळ मुस्लिम पाच्छा पेठ येथे बेकायदेशीरपणे आंदोलन केल्यामुळे पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस हवालदार खान हे करीत आहेत.

### विनापरवाना आंदोलन; ११ जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

विनापरवाना निषेध आंदोलन केल्याप्रकरणी अकरा जणांविरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना २१ नोव्हेंबर रोजी वॉटर फ्रंट इमारतीमधील असलेल्या शरद कोळी यांच्या बाळासाहेब ठाकरे शिवसेना कार्यालय येथे घडली. याप्रकरणी महिला पोलिस शिपाई क्रांती भीमराव कांबळे (नेमणूक सदर बझार पोलीस ठाणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून युवा काँग्रेस अध्यक्ष गणेश दत्तात्रय डोंगरे, शुभांगी विश्वजीत लिंगराज, सुनिता महादेव इंगळे, मनीषा राहुल साठे, प्रियंका भिमण्णा लिंबोळे, भाग्यश्री संतोष जाधव, जयश्री बाबुराव खैराटे, राधा भास्कर मोरखडे, देवता गोपीनाथ धायगुडे, सुजता श्रीपती माने व मिराबाई जगन्नाथ घटकांबळे (सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यातील आरोपी यांनी वरील ठिकाणी पोलीस प्रशासनाकडून आंदोलन करण्यास परवानगी नसताना देखील विनापरवाना आंदोलन करत जमाबंदी आदेशाचे व आचारसंहिताचे उल्लंघन करून गैर कायद्याची मंडळी एकत्र जम वून आंदोलन करून घोषणाबाजी केली म्हणून पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सोलापूर जिल्ह्यातील सर्व मतमोजणी केंद्र परिसरात कलम १६३ लागू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ नोव्हेंबर-**

विधानसभा निवडणुकीच्या मतदानाची दि.२३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. ही निवडणूक प्रक्रिया विना अडथळा व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्ह्यातील सर्वच मतमोजणी केंद्र परिसरात १६३ कलम लागू केल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

सोलापूर जिल्हयातील विधानसभा मतदार संघासाठीच्या मतमोजणी कामी मतमोजणीच्या ठिकाणी येणा-या उमेदवारांचे सोबत त्यांचे समर्थक, वाहने, कार्यकर्ते हे मोठ्या संख्येने उपस्थित असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मतमोजणी ठिकाणच्या परीसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे करीता खालील नमुद केलेली कृत्ये करणेस प्रतिबंध करण्यात येत आहे.

जिल्हादंडाधिकारी यांच्या आदेशान्वये भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १६३ खाली प्रतिबंध अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन असा आदेश देतो की, जिल्हयातील सर्व विधानसभा मतदार संघनिहाय मतमोजणी ठिकाणच्या परीसरात दिनांक २३ नोव्हेंबर रोजी पहाटे ५ वाजलेपासून ते मतमोजणीची संपूर्ण प्रक्रिया संपेपर्यंत खालील कृती करण्यास मनाई करीत आहे. मतमोजणी दिवशी मतमोजणी ठिकाणापासून २०० मीटर परिघाच्या परीसरात मतमोजणी कर्मचारी/पुरवठादार, उमेदवार व त्यांचे नियुक्त केलेल्या प्रतिनिधी व्यतिरीक्त कोणाही व्यक्तिला प्रवेश करणेस मनाई आहे. मतमोजणी कालावधीत अथवा मतमोजणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही प्रकारच्या लाऊड स्पिकरचा वापर सक्षम पोलीस अधिकाऱ्यांच्या लेखी पूर्वपरवानगी शिवाय रस्त्यावर, व्यासपिठावर किंवा फिरत्या वाहनावर बसविणेस मनाई आहे.

> **मतदानाची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत भरारी पथक**
> सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ अनुषंगाने मा. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व मार्गदर्शक सुचनेनसार मतदानाची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत भरारी पथक व देखरेख पथकाकडून कार्यवाही सुरू ठेवण्यात यावी, असे आचार संहिता कक्ष प्रमुख सार्वत्रिक निवडणूक २०२४ तथा अपर जिल्हादंडाधिकारी सोलापूर मनिषा कुंभार यांनी आदेशित केले आहे.



**सोलापूर : विधानसभा निवडणुक निकाल मतमोजणी केंद्रावर जयत तयारी केली आहे. शहर मध्य मतदारसंघातील मतमोजणी केंद्रावर टिपलेले छायाचित्र (छायाचित्र : केवल तिवारी)**

आदर्श आचारसंहितेचा भंग होईल अशा प्रकारचे भाषण करणे, नक्कल करणे, चित्रे/चिन्हे रेखाटणे अगर त्यांचे प्रदर्शन करणे अथवा तत्सम कृती करणेस मनाई आहे.इंन्स्ट्राग्राम, व्हॉटस्अॅप, व्टिटर, फेसबुक, इत्यादी समाज माध्यमाद्वारे जातीय तणाव निर्माण करणा-या गोष्टी पसरवण्यास मनाई आहे.

मतमोजणी ठिकाणाच्या २०० मीटर परिघाच्या परिसरामध्ये कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण, वाद्य वाजवणे, गाणी वाजविणे, गाणी म्हणणे, गुलाल उधळणेस, वाहनांच्या सायलेन्सरच्या पुंगळ्या काढुन मोठ्याने आवाज करण्यास, गलाल, रंग उधळणे अशा प्रकारचे गैरशिस्त वर्तन करण्यास मनाई करणेत येत आहे.

## मतमोजणी केंद्रासह स्ट्राँगरूम परिसरात कडेकोट बंदोबस्त

**उमेदवारांचे भवितव्य उघडणार आज**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील मतदानानंतर आता मतमोजणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आज शनिवार (दी.२३) नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. त्याआधी विविध संस्थांचे एक्झिट पोल आले आहेत. काही संस्थांनी महायुती तर काही संस्थांनी महाविकास आघाडीचे सरकार येईल, असा अंदाज व्यक्त केला आहे. यंदा मतदानाची टक्केवारी वाढली आहे. त्यामुळे वाढलेल्या मतांच्या टक्केवारी महायुती आणि महाविकास आघाडीचाही विश्वास दुणावला आहे.

दरम्यान सकाळी आठ वाजता सर्व मतमोजणी केंद्रांवर मतमोजणी सुरू होईल. या प्रक्रियेदरम्यान, पोस्टल मतपत्रिकांची मतमोजणी सकाळी आठ वाजता सुरू होईल, त्यानंतर ईव्हीएमवरील मतांची मोजणी सकाळी साडे आठ वाजता सुरू होईल. दुपारनंतर खरे चित्र स्पष्ट होईल. मतमोजणी केंद्रांच्या प्रस्तावास निवडणूक आयोगाने मंजुरी दिली असून सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी यांनी याबाबत व्यापक प्रसिद्धी दिली आहे. निवडणूक लढविणारा उमेदवार, राजकीय पक्षांना मतमोजणी केंद्रांच्या ठिकाणाबाबत लेखी स्वरूपात कळविण्यात आले आहे. निरीक्षक व उपस्थित उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्यासमोर सीलबंद स्ट्राँग रूम्स उघडण्यात येतील व ईव्हीएम मतमोजणी केंद्रावर नेण्यात येतील.



> **अनाधिकृत होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनरवर बंदी**
> विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने उच्च न्यायालयाने नवे आदेश पारित केले. निवडणुकीचे निकाल स्पष्ट झाल्यानंतर विजयी उमेदवार किंवा त्यांच्या समर्थकांनी अनाधिकृत होर्डिंग्स फ्लेक्स बॅनर लावल्यास त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात येणार आहे. संबंधित व्यक्तींवर आणि फ्लेक्स तयार करणाऱ्या संस्थेंवर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. तसा देश उच्च न्यायालयाने विभागीय अधिकाऱ्यांना त्याच पद्धतीने महापालिका प्रशासनाला देण्यात आले आहेत.

मतमोजणी केंद्रातील सर्व कार्यवाही सीसीटीव्ही द्वारे चित्रित केली जाईल. दरम्यान शनिवारी स्ट्राँग रूम परिसरात पोलीस आणि सशस्त्र बल यांचा कडेकोट बंदोबस्त होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांच्या ज्यादा कुमक मागवण्यात आली होती.

शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील मतमोजणी केंद्र नूतन मराठी विद्यालय येथे कडक बंदोबस्त लावण्यात आला होता. केंद्राकडे जाणाऱ्या सर्व रस्ते बॅरिगेट्स लावून बंद करण्यात आले होते.


## उमेदवारांची घालमेल तर कार्यकर्त्यांची उत्कंठा शिगेला

### आज दुपारपर्यंत निवडणुकीचा कल स्पष्ट होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

२० नोव्हेंबरला मतदान झाल्यापासून प्रत्येक मतदारसंघातील उमेवारांत धाकधुक वाढली असून, विविध पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सर्वसामान्य जनतेची निकालाची उत्कंठा मात्र शिगेला पोहोचल्याचे दिसून येते. यामुळे मतमोजणीच्या पूर्वसंध्येपर्यंत अमूक मतदारसंघातून कोण निवडूण येणार? कोण पडणार? महायुतीची सत्ता येईल का मविआची सत्ता येईल अशी चर्चा, तर्कवितर्क सुरू होते. या सर्व प्रश्नांना आज मतमोजणीच्या दुपारपर्यंत उत्तरे मिळणार आहेत. कारण दुपारी १ वाजेपर्यंत निकालाचा कल येवून सायंकाळी ५ वाजेपर्यंत निकाल जाहीर होणार आहेत.

जिल्ह्यातील विविध मतदारसंघातील निकालाकडे सर्व मतदारांचे लक्ष लागले आहे. सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात सर्वात जास्त म्हणजेच २९ फेऱ्या होतील. तसेच सोलापूर शहर उत्तरसाठी २१, शहर मध्यसाठी २२, करमाळा मतदारसंघात २५, माढा मतदारसंघासाठी २६, मोहोळ मतदारसंघात २४, बार्शी मतदारसंघात २४, माळशिरस मतदारसंघात २५. सांगोल्यात २२, सोलापूर दक्षिण मतदार संघात २७ मतदानाच्या फेऱ्या होण्याची शक्यता आहे. दुपारपर्यंत या निवडणूक निकालाचा कल स्पष्ट होईल. तसेच सायंकाळी पाच वाजेपर्यंत अंतिम निकाल हाती येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



विधानसभा निवडणुकीतील मतदानानंतर आता मतमोजणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उद्या मतमोजणी होणार आहे. याआधी विविध संस्थांचे एक्झिट पोल आले आहेत. काही संस्थांनी महायुती तर काही संस्थांनी महाविकास आघाडीचे सरकार येईल, असा अंदाज व्यक्त केला आहे. यंदा मतदानाची टक्केवारी वाढली आहे. त्यामुळे वाढलेल्या मतांच्या टक्केवारी महायुती आणि महाविकास आघाडीचाही विश्वास दुणावला आहे. निकालाच्या पार्श्वभूमीवर शरद पवार गटानेही तातडीने आपल्या सर्व उमेदवारांची ऑनलाईन मिटींग घेतली आहे. उद्या विधानसभा निवडणुकीचा निकाल आहे. त्याआधीच पवारांनी आपल्या उमेदवारांची ऑनलाईन मिटींग घेतली. या बैठकीला पवारांसह सुप्रिया सुळे व जयंत पाटील यांनीही मार्गदर्शन केल्याची माहिती मिळत आहे. निकालापूर्वी काही महत्त्वाच्या सूचना देण्यासाठी ही मिटींग घेतल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, निकाल लागल्याबरोबर प्रमाणपत्र घेऊन पवारांनी त्यांच्या सर्व उमेदवारांना मुंबईला बोलावले आहे. याच धर्तीवर महायुतीच्या पक्षश्रेष्ठींनीही आपल्या उमेदवारांना बैठका घेवून सुचना दिल्याचे समजते. एकंदरीत, एखाद्या पक्षाला स्पष्ट बहुमत नाही मिळाल्यास पुन्हा तोडफोडीचे राजकारण राज्यात चालणार असल्याचीही चिंता जाणकार नागरिकांतून व्यक्त होत आहे. आपले आमदार सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक पक्षाचे श्रेष्ठी अशी रणनिती आखत आहेत. राज्यात पुन्हा महायुतीचेच सरकार येणार असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादांना वाटत आहे तर राज्यात महाविकास आघाडीचेच सरकार येईल, असा विश्वास उध्दव ठाकरे, नाना पटोले आणि शरद पवारांनी व्यक्त केला आहे. यामुळे विधानसभा निवडणूक निकालाची उत्कंठा राजकीय नेते, कार्यकर्त्यांनाच नाही तर सर्वसामान्यांनाही लागली आहे.

## शहर उत्तर मतमोजणीसाठी ४०० शासकीय कर्मचारी तैनात

### २१ राऊंडमध्ये २८९ केंद्रांवरील होणार मतमोजणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

शहर उत्तरमध्ये विद्यमान आमदार विजयकुमार देशमुख आणि माजी महापौर महेश कोठे यांच्यात अटीतटीचा प्रचार रंगला होता. दोघांनीही जोरदार प्रचार केल्याने कोण बाजीगर ठरणार? हे शनिवारच्या मतमोजणीतच कळणार आहे.

या मतदारसंघाची मतमोजणी पुणे रोडवरील सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये पार पडणार असून, यासाठी ४०० शासकीय अधिकारी आणि कर्मचारी तैनात केले आहेत. तर सीआरपी, एसआरपी आणि महाराष्ट्र पोलिसांचाही तगडा बंदोबस्त आहे. या मतमोजणीसाठी १४ टेबल लावण्यात आले असून, २१ फेऱ्यात ही मतमोजणी होणार आहे. या मतदारसंघातील प्रथम पोस्टल मतमोजणी होईल, त्यानंतर व्हिव्हिपॅट आणि नंतर सैनिकांची मते मोजली जाणार आहेत. सिंहगड कॉलेजवर शुक्रवारीच दुपारनंतर तगडा पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. मतमोजणी करणाऱ्या सर्वच पदाधिकाऱ्यांना शहर उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी अमोलसिंह भोसले यांनी योग्य ते प्रशिक्षण दिले आहे. एकंदरीत, या मतमोजणीसाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली योग्य ते मायक्रोप्लॅनिंग केल्याने मतदानाप्रमाणेच मतमोजणी शांततेत पार पडेल, असा आशावाद शहर उत्तरचे निवडणूक निर्णय अधिकारी भोसले यांनी दैनिक तरूण भारतशी बोलताना व्यक्त केला.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९५२

**सुखें घाली जन्मासी । हेचि बरे की मानसी ।।**
**वारी करीन पंढरीची ।आवडी ही माझी साची ।।**

आशा, अपेक्षा, इच्छा हा न संपणारा विषय आहे. म्हणूनच की काय जवळपास सर्वांच्या संपत्ती मिळवण्याच्या व अवास्तव आशा, इच्छा पूर्ण करण्याच्या अपेक्षा मरेपर्यंतही पूर्ण होत नाहीत. एक आशा पूर्णत्वास न्यावी तोवर दुसरी आ वासून उभी राहते. दुसरी पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न करावा तो तिसरी उभी राहते. अर्थात, आयुष्य संपते मात्र विषयाची पूर्ती संपत नाही. संसारात राहूनही संसारापेक्षा वेगळे राहणाऱ्या सेनाजींच्या आशा, अपेक्षा वेगळ्या आहेत. समता, बंधुता, नि:स्वार्थ प्रेम, कर्तव्य आदिचे पालन करून याचे पालन करण्याचा प्रसार करण्याचे त्यांचे काम सदैव चालू होते. आता देह सोडण्याची वेळ जवळ आली. त्यामुळे हे कार्य अर्धवट राहिल. म्हणून भगवंताने पुन्हा मनुष्याच्या जन्माला घालून माझ्याकडून हे काम करून घ्यावे, सुखें घाली जन्मासी । हेचि बरे की मानसी ।।, असे सेनाजींना वाटते. तुकाराम महाराजांनीही, तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावें आम्हांसी ।।, असे म्हणतात. जीवाला पुनर्जन्म आहे की नाही याविषयाकडे न वळता आपणाला जेव्हा संसारात राहून संसारापेक्षा वेगळे वागण्याची सद्बुध्दी सुचेल तेव्हा आपला पुनर्जन्म झाला असे समजून आपण चांगले वागलो तरी पुरेसे होणार आहे. अर्थात, आपण असा चांगुलपणाचा पुनर्जन्म करून घेणे आपल्याच हाती आहे. वाल्याचा महर्षी वाल्मिकी होणे हा एक प्रकारचा पुनर्जन्मच आहे. एखादया संकटातून वाचलो तरीही भगवंताची कृपा समजून, पुनर्जन्मच समजून खूप चांगले वागण्याचा प्रयत्न केला पाहीजे.



स्वभावामुळे म्हणा की परीस्थितीतमुळे म्हणा पण अनेक जीवांच्या मनावर सातत्याने चिंता ताण-तणावाचे, मानसिक दारिद्र्याचे ओझे वाढत आहे. हे वाढते ओझे माणसाला खऱ्या सुख समाधानापासून दूर नेते. डोक्यावरील ओझे उतरवण्यास कोणी तरी मदत करू शकतो. पण मनावरचे ओझे उतरवण्यास सहजा सहजी कोणाला मदत करता येत नाही. ही मदत फक्त संत, महात्मेच करू शकतात. डोक्यावरचे ओझे कोणालाही सहज दिसते. पण मनावरील ओझे सहजपणे कोणाला दिसत नाही. हे न दिसणारे पण अत्यंत क्लेशकारी ओझे संत सहवासाने उतरले जाणार असल्याने आणि डोक्यात, मनात खऱ्या सुख, समाधान व शांतीचा प्रवेश होणार असल्याने पंढरीच्या वारीत ज्ञानोबा-तुकोबांचा, भानुदास-एकनाथांचा गजर करणाऱ्यांची संख्या दिवसें दिवस वाढते आहे. ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध, अहंकार, लोभ, स्वार्थ, मीपणा आदिने गंजलेल्या या मनरूपी लोखंडाचे संत सहवासरुपी परिसाच्या स्पर्शाने सोने होणार असल्याने आपण, वारी करीन पंढरीची । आवडी ही माझी साची ।।, पुन्हा पुन्हा पंढरीची वारी करू हीच आपली आवड असल्याचे सेनाजी म्हणतात. आपणालाही सेनाजींसारखी आवड लागली तर खरे सुख समाधान दूर असणार नाही. कारण दिंडीची अनुभूती अहंकार व अवास्तव अपेक्षा मुक्त करणारी असते. त्यामुळे कशाही परीस्थितीत माणूस आनंदी राहतो. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - कालभैरव जयंती |
| दि. २३ नोव्हेंबर २०२४ | कालाष्टमी, सिध्दनाथ यात्रा |
| विक्रम संवत् २०८०-८१ | चांगला दिवस |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - कार्तिक | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. अष्टमी (१९.५५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - मघा (१९.२५) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - ऐंद्र (११.४०) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (०६.५७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : व्यापारात नवीन योजना आखताल. राजकीय किंवा शासनाकडून मान सन्मान मिळण्याचे योग आहेत. आरोग्याची काळजी घ्या.

**वृषभ** : जमीनी संदर्भातील व्यवहार सुरळीत पार पडतील. प्रभावपूर्ण वातावरण राहील. व्यवसायिक करार फायदेशीर ठरतील.

**मिथुन** : आपल्या सल्ला घेतला जाईल. रोजगारात विस्तार होण्याची शक्यता आहे. अनोळखी व्यक्तिवर विश्वास दाखवू नका.

**कर्क** : आर्थिक योजनेमध्ये यश मिळेल. कार्यकुशलतेमुळे आपला फायदा होईल. विरोधकांपासून सावध रहा. कौटुंबिक संबंध चांगले राहतील. परमेश्वरावरील विश्वास वाढणार आहे.

**सिंह** : आपले ध्येय्य साध्य करण्याच्या दिशेने हालचाल करा. आर्थिक फायदा होण्याचे योग आहेत. व्यापारत नवीन योजना सुरू होतील.

**कन्या** : धावपळ केली तरच आपल्याला यश मिळणार आहे. स्वविवेक बुद्धीने निर्णय घेऊनच व्यवहार करा. सामाजिक स्थिती चांगली राहणार आहे.

**तुळ** : आपली कार्यक्षमता वाढणार असून आपल्या योग्यतेची समाजात प्रशंसा होईल. कौटुंबिक स्थिती आनंददायी राहील.

**वृश्चिक** : सकारात्मक परिस्थिती राहील. कोणत्याही प्रकारच्या जोखमीचे कामे करू नका. व्यापारात अपेक्षेप्रमाणे लाभ होईल.

**धनु** : आपल्या ज्ञानात भर पडणार आहे. व्यावसायिक अडचणी दूर होतील. नवीन संबंध फायदेशीर राहतील. उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ ठेवा. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**मकर** : घरगुती समस्यांचा सामना करावा लागणार आहे. आपल्या कामाची व्यवहारात स्तुती होणार आहे. आर्थिक देणेघेणे व्यवहारात सावधानी बाळगा.

**कुंभ** : उत्पन्नात वाढ झाली तरी खर्चावर नियंत्रण ठेवा. अनोळखी व्यक्तिवर विश्वास ठेवूच नका. आर्थिक व्यवहार फायदेशीर राहतील. नौकरीतमध्ये आपले महत्व वाढणार आहे.

**मीन** : आपल्या मनासारखे व्यवहारात यश मिळणार आहे. सज्जन लोकांच्या मदतीमुळे आपल्या यशात भर पडेल. कोणाचाही राग करू नका.

# सोलापुरात २९ नोव्हेंबरपासून जिल्हास्तरीय युवा महोत्सव

## क्रीडा कार्यालयातर्फे आयोजन; २७ नोव्हेंबरपर्यंत नोंदणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ नोव्हेंबर-**

क्रीडा व युवा सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर व जिल्हा क्रीडा परिषद सोलापूरतर्फे जिल्हा युवा महोत्सवाचे आयोजन २९ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत केले आहे.

राज्यात २०२४-२५ मध्ये जिल्हा ते राष्ट्रीय स्तरापर्यंत युवा महोत्सवाचे आयोजन केले आहे. युवकांचा सर्वांगीण विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्तगुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता लागणे यासाठी प्रतिवर्षी जिल्हास्तर, विभागस्तर, राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर याचे आयोजन क्रीडा विभागातर्फे करण्यात येते.

राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन १२ ते १६ जानेवारी या कालावधीत होणार आहे. राष्ट्रीय व राज्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान या संकल्पनेवर आधारित या महोत्सवाचे आयोजन होणार आहे. यात १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती सहभागी होऊ शकतील. यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासनाद्वारे पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येईल. यातील प्रथम युवक व युवती यांची विभागस्तरावर निवड करण्यात येते. विभागस्तरावर प्रावीण्य प्राप्त युवक-युवतीची निवड राज्यस्तरीय व पुढे राष्ट्रीय युवा महोत्सवाकरिता प्राविण्यप्राप्त युवक व युवती यांची निवड केली जाते. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूरतर्फे याचे आयोजन केले आहे.



यामध्ये सोलापूर जिल्हयाचे संगीत महाविद्यालय, वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय, समाजकार्य महाविद्यालय, इंजिनिअरिंग महाविद्यालय, वैद्यकीय महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शाळा, महाविद्यालय, शैक्षणिक संस्था इत्यादींनी (दि.१२ जानेवारी २०२५ या दिनांका रोजी वयाची परिगणना १५ ते २९ असावी) १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक व युवती यांनी युवा महोत्सवामध्ये जास्तीत जास्त स्पर्धेकांनी सहभाग घ्यावा. सोलापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होणा-या संस्था, मंडळ, वैयक्तिक, युवक व युवती यांनी आपले प्रवेश अर्ज दिनांक २७ नोव्हेंबर पर्यत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कुमठा नाका सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत. विहित मुदतीनंतर आलेल्या प्रवेश अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी अधिक माहितीकरिता गणेश पवार राज्य क्रीडा मार्गदर्शक ९९७००९५३१५ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

### या स्पर्धांचा समावेश

युवा महोत्सवामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान, लोकगीत, लोकनृत्य, कौशल्य विकास स्पर्धा, कथालेखन, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, कविता, हस्तकला, वस्त्रोद्योग अशा विविध स्पर्धाचा समावेश आहे.

### अशी आहेत प्रथम तीन बक्षिसे

संकल्पना आधारित स्पर्धा (२,३,५ हजार), सांस्कृतिक (१५०० ते ७ हजार), कौशल्य विकास व युवा कृती (१५०० ते ३ हजार).

# लिटल फ्लॉवर स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा २२ डिसेंबरला मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ नोव्हेंबर-**

लिटल फ्लॉवर कॉन्व्हेंट हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा मेगा रियुनियन सोहळा रविवार दि. २२ डिसेंबर रोजी एलएफसी स्कूल कॅम्पस, सोलापूर येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती नितीन बलदवा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या मेळाव्यामध्ये १९८० ते २०१८ या ३९ वर्षाच्या विविध बॅचचे माजी विद्यार्थी सहभागी होणार आहेत. भारतात आणि भारताबाहेर स्थायिक झालेल्या माजी विद्यार्थ्यांनी या सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याची तयारी केली आहे. माजी विद्यार्थ्यांच्या विशेष समितीने याचे नियोजन केले आहे. सहभागी होण्यासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी अंतिम मुदत दि. ३० नोव्हेंबर आहे. अधिक माहितीसाठी ८३ ९०२२१२२४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन नितीन बलदवा यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस उदय चाकोते, अभय जोशी, स्मिता यादव आदी उपस्थित होते.

# माजी महापौर मनोहर सपाटे यांची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपीस शिक्षा व दंड

## कोंडी येथील जमीन व्यवहार प्रकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ नोव्हेंबर-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी येथील जमीन व्यवहारात माजी महापौर मनोहर सपाटे यांची फसवणूक केल्याप्रकरणी न्यायालयाने आरोपीस दंड व शिक्षा सुनावली आहे, अशी माहिती फिर्यादी माजी महापौर मनोहर सपाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



मौजे कोंडी येथील जमिनीवर माजी महापौर मनोहर सपाटे यांनी शरदचंद्रजी पवार एग्रीकल्चर कॉलेज काढण्यासाठी राहुरी कृषी विद्यापीठाकडे प्रस्ताव दाखल केलेला होता. ही जमीन यातील आरोपी गिरीश केशव कनेकर (कुलमुखत्यार धारक) यांनी मौजे कोंडी येथील ही जमीन खरेदी देतो असे आश्वासन देऊन या जमिनीच्या खरेदीपोटी फिर्यादी सपाटे यांच्या कडून वेळोवेळी एकूण ५७ लाख रुपये घेतले. कब्जा साठे खत करून दिलेले असतानाही या जमिनी फिर्यादी यांना विक्री न करता अथवा यासाठी घेतलेले ५७ लाख रुपये परत न करता फिर्यादी सपाटे यांचा विश्वासघात केला आणि फसवणूक केली असा आरोप सपाटे यांनी केला आहे.

यातील आरोपीने फिर्यादीच्या परस्पर माहिती न देता कागदपत्रे वापरून इतरांच्या नावे जमिनीचे खरेदीखत परस्पर करून दिले. फिर्यादीची फसवणूक केली म्हणून याप्रकरणी फिर्यादीने आरोपीविरुद्ध फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली होती. त्याप्रमाणे दोषारोप पत्र दाखल केलेले होते. या प्रकरणी प्रथम वर्ग न्यायदंडधिकारी दीप्ती कोळपकर यांनी आरोपी गिरीश कनेकर यांना याप्रकरणी दोन वर्षे शिक्षा व पाच हजार रुपये दंड तसेच एक वर्ष शिक्षा व तीन हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणी सरकार पक्षातर्फे सरकारी वकील आनंद काळे यांचा युक्तिवाद महत्त्वाचा ठरला. आरोपीतर्फे पुणे येथील एड. एस. पी. कदम यांनी काम पाहिले, असे यावेळी मनोहर सपाटे यांनी सांगितले.

# विद्यार्थी संस्कार करणारी शाळा जैन गुरुकुल : पं. शौनक अभिषेकी

## अभिषेकी परिवाराच्या वतीने दीपक व मनीषा कलढोणे यांचा सपत्नीक सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२२ नोव्हेंबर-**

सध्याच्या शैक्षणिक वातावरणात जैन गुरुकुलने उत्तम संस्कार करण्याची परंपरा कायम राखली आहे. दीपक कलढोणे यांनी आपल्या संगीत साधनेतून अनेक गुणवंत विद्यार्थ्यांना घडविले, असे गौरवोद्गार पंडित शौनक अभिषेकी यांनी काढले.

भारतीय शास्त्रीय संगीतातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गायक पंडित शौनक अभिषेकी यांनी वालचंद शिक्षण समूहातील श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय बाळीवेस सोलापूर येथे सदिच्छा भेट दिली आणि पं. अभिषेकी परिवाराच्यावतीने पंडित दीपक कलढोणे व मनीषा कलढोणे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सपत्नीक सत्कार केला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे, निरज कलढोणे व निरंजनी कलढोणे, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्पा झुंजुर्डे व बालकमंदिर विभाग प्रमुख विभावरी रणदिवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी गुरुकुल प्रणालीचे प्रणेते परम पूज्य १०८ गुरुदेव समंतभद्र महाराज यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक राजकुमार काळे यांच्या हस्ते पं.शौनक अभिषेकी यांचा स्वागत सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन सभा सांस्कृतिक विभाग प्रमुख मिलिंद खोबरे यांनी केले तर विकास शिळ्ळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी जैन गुरुकुलातील बालक मंदिर,प्राथमिक शाळा,प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंद उपस्थित होते.

# शालेय राष्ट्रीय हँडबॉल स्पर्धेसाठी कोमल पाटीलची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**


Patil Komal

इंडियन मॉडेल स्कूल सी.बी.एस.ई च्या कोमल पाटील हिची दिल्ली येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय हँडबॉल स्पर्धेसाठी १७ वर्षाखालील मुलींच्या महाराष्ट्र संघात निवड झाली. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जळगाव यांच्या मार्फत झालेल्या राज्य हँडबॉल निवड चाचणीतून तिची निवड झाली.

तिला क्रीडाशिक्षक सचिन ढवाण, राजकुमार माने, प्रशिक्षक आकाश अमदीपूर आणि श्रेयश मालप यांचे मार्गदर्शन मिळाले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, अचला राचर्ला, ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

# तिसऱ्या दिवसाअखेर महाराष्ट्राची सामन्यावर पकड, आज डावाने जिंकण्याची संधी

## १९ वर्षांखालील कुचबिहार क्रिकेट : आसाम पहिला डाव २१२, दुसऱ्या डावात ५ बाद ८२

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सुरू असलेला १९ वर्षांखालील कुचबिहार क्रिकेट स्पर्धेतील महाराष्ट्र विरुद्ध आसाम सामन्यात तिसऱ्या दिवस अखेर महाराष्ट्र संघाने सामन्यावर मजबूत पकड मिळवली असून आज आसामचा पहिला डाव २१२ धावांवर गुंडाळल्यानंतर दुसऱ्या डावात ५ गडी बाद केले असून उद्या सकाळच्या सत्रात राहिलेले ५ बळी मिळवून एका डावाने सामना जिंकण्याची संधी महाराष्ट्राला आहे तर आसामला डावाचा पराभव टाळण्यासाठी अद्यापी १९४ धावांची गरज असून महाराष्ट्राला बोनस गुण मिळविता येईल का कसे हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.



कालच्या ५१/२ वरून आसामने पहिला डाव पुढे सुरू केला, नाबाद फलंदाज ऋषिकेश दास (९) चौथ्या षटकात योगेश चव्हाणचा बळी ठरला आणि नंतर राजवीर सिंगला (४५) निरजने पायचीत केले. द्युतीमोय नाथ (३६), प्रबल कलिता (१८), दीपांकर पॉल (२५), आयुष्मान मालकर (२०), हिमांशू सारस्वत (२५) यांनी उपयोगी फलंदाजी करायचा प्रयत्न केला. जेवणाला खेळ थांबला तेंव्हा १६७/७ (६८) अशी धाव संख्या होती. नंतर शेवटचा फलंदाज हर्ष कुमार (१८) ने थोडाफार प्रतिकार करत धावसंख्या २०० पार नेली. योगेश चव्हाण ३२/२, नीरज जोशी ३१/३, किरण चोरमले ५८/३, अनिष जोशी व शुभम कदम प्रत्येकी १ बळी मिळवत आसाम संघावर फॉलोऑन लादला. आसामच्या दुसऱ्या डावाची सुरुवात देखील निराशाजनक ठरली, अभिजीत भद्रा (४) सातव्या षटकात बाद झाला.

चहापानाला खेळ थांबला तेव्हा १० षटकात १ बाद १९ अशी अवस्था होती. चहापानानंतर दूसऱ्याच चेंडूवर नीरज जोशीने राजवीर सिंग (१४) ला बाद करत दुसरा आणि त्याच धाव संख्येवर पुढच्या षटकात ऋषिकेश दास शून्यावर यष्टीचीत बाद करत तिसरा (२१/३) बळी मिळविला. द्युतीमोय नाथ (२३), प्रबल कलीता (०) यांना कर्णधार किरण चोरमले ने बाद (२६/२) करत सामन्यात रंगत निर्माण केली असून बरूनज्योती मालकर (१८) व दिपांकर पॉल (१७) हे खेळपट्टीवर नाबाद आहेत.



# शालेय किकबॉक्सिंग स्पर्धेत अहिल्याबाई प्रशालेस १५ पदके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

कुमठा नाका येथील क्रीडा संकुलात झालेल्या शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेत अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील खेळाडूंनी तीन सुवर्ण, सहा रौप्य तर सहा कांस्य अशी १५ पदकांची कमाई केली. सुवर्ण विजेत्या खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

त्यांना क्रीडा शिक्षक रमेश हेगडे, प्रशिक्षक प्रा.धनंजय धेंडे, सना कुरेशी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक सचिव हाजी बी.एम.शेख, प्राचार्य इस्माईल शेख, प्रा. अनंत सुरते यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी केलेले पदक विजेते खेळाडू - १४ वर्षाखालील** : अहमद बेग, करण वाघमारे (रौप्य). १७ **वर्षाखालील** : अनिश गुजले, विनायक गायकवाड (रौप्य), चेतन कैरमकोंडा, सुनील गायकवाड, संदीप गायकवाड (कास्य). १९ **वर्षाखालील** : अफरोज पठाण, श्रेया बनसोडे (सुवर्ण), कौसर पठाण (रौप्य). रोहन बल्लाळ, नोमन इनामदार, अफान शेख, हुसेन मुल्ला (कास्य).

# महिलांनी न घाबरता कॅन्सर तपासणी करून घ्यावी : डॉ. चिडगुपकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

आजही भारतात अनेक महिला आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. आपली नियमित तपासणी करून घेण्याला महिला प्राधान्य देत नाहीत. वय जसजसे वाढत जाईल तसतसे अनेक व्याधींना सामोरे जावे लागते. वय वर्षे ३५ च्या पुढील महिलांनी तर नियमित आरोग्य तपासणी करून घेतली पाहिजे. गर्भाशयाच्या मुखाची व स्तनाच्या कॅन्सरची वेळेत तपासणी करून घेतल्यास आपली सद्यस्थिती काय आहे हे महिलांना समजते. भविष्यात कॅन्सर होऊ नये यासाठी काळजी घेणे कधीही चांगले असते. फॅमिली प्लॅनिंगची स्पेशल सर्विस सेशन अंतर्गत सुरू असलेली मोफत कॅन्सर तपासणी हा उपक्रम स्तुत्य असून त्याचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ करून घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.




त्या फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभाग व सोलापूर कॅन्सर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने स्पेशल सर्विस सेशन अंतर्गत सो. म. पा. अहिल्यादेवी होळकर प्रसूती गृह, डफरीन चौक येथे आयोजित महिलांच्या गर्भाशयाच्या मुखाचा व स्तनाचा कॅन्सर तपासणी शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते.

यावेळी व्यासपीठावर सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या प्रसूतिशास्त्र व स्त्री रोगतज्ञ डॉ. मीनल चिडगुपकर, डॉ. दीपिका चिंचोली, बालरोग तज्ञ डॉ. ज्योत्स्ना कोरे, सदस्या प्रा. डॉ. विजया महाजन, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, सोलापूर कॅन्सर सोसायटीच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. विजयालक्ष्मी होमकर, फॅमिली प्लॅनिंगच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक, अधिपरिचारिका संगीता लोकूरवाळे, पियुशा देशपांडे आदी उपस्थित होते. यावेळी सो. म. पा. वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपिका चिंचोली यांनी एच.पी. व्ही. लसीकरणा संदर्भात शास्त्रोक्त माहिती दिली व महिलांनी आपल्या किशोरवयीन मुला-मुलींना ही लस देण्याचे आवाहन केले. प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी अध्यक्ष समारोप करताना म्हणाले की, महिलांनी नी संकोच नियमित आपल्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. वर्षातून एकदा तरी गर्भाशयाची व स्तनाची तपासणी करून घेतली पाहिजे. उपचारापेक्षा व आजार होण्यापेक्षा तो होऊ न देणे कधीही चांगले. या तपासणी शिबिरात २२ महिलांनी गर्भाशयाच्या मुखाची तर ३२ महिलांनी स्तनाच्या कॅन्सरची तपासणी करून घेतली. स्वागत प्रा. डॉ. विजया महाजन यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिचारिका आशालता मस्के, पुष्पा जाडकर, आकाश गायकवाड, सत्यभामा कांबळे, संगीता पारशेट्टी, वंदना टोणपे, करण खानापुरे आदींनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# योगामुळे कार्यक्षमता वाढते

## आर्ट ऑफ लिव्हिंगच्या साध्वी तत्वमयी : स्वेरीत पाचवा मासिक योग दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ नोव्हेंबर -**

'नियमित योग केल्याने आपले मन प्रसन्न राहते. हाती घेतलेल्या कार्यात सकारात्मकता निर्माण होते, उत्साह वाढतो व आपल्या कार्य करण्याच्या क्षमतेत कमालीची वाढ होते.' असे प्रतिपादन आर्ट ऑफ लिव्हिंगच्या साध्वी तत्वमयी यांनी केले.

प्रत्येक वर्षी दि.२१ जून रोजी 'जागतिक योग दिन' हा आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्थात जगभरात साजरा केला जातो. दि.२१ जून रोजी स्वेरीत मुख्य 'जागतिक योग दिन' साजरा करण्यात आला. यावेळी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी यापुढेही 'स्वेरी अंतर्गत असलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक महिन्याच्या दि.२१ तारखेला सामुहिक 'योग दिन' साजरा करण्याचे घोषित केले होते. तेंव्हापासून प्रत्येक महिन्याच्या दि. २१ तारखेला न चुकता स्वेरीत 'योग दिन' घेतला जातो. गुरुवार, दि. २१ नोव्हेंबर २०२४ हा स्वेरीमध्ये 'पाचवा योग दिन' साजरा करण्यात आला. अभियांत्रिकीच्या दुसऱ्या, तिसऱ्या व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना पीएल (पेपर लिव्ह) निमित्त सुट्टी आहे तरीही यामध्ये खंड न पडता 'योगा' घेण्यात आला. या उपक्रमाला प्रथम वर्ष अभियांत्रिकी व वसतीगृहातील सर्व विद्यार्थ्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला. डॉ.एन.पी. कुलकर्णी यांनी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या साध्वी तत्वमयी यांचे स्वागत करून कार्यक्रमाचे प्रास्तविक केले. प्रार्थनेने सुरवात करून साध्वी तत्वमयी यांनी विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक यांच्याकडून पुढे तासभर विविध प्राणायम करवून घेतले. सूर्यनमस्कार सह विविध आसने, भस्त्रीका प्राणायम तसेच श्वास, फुफुस्से, शरीराच्या विविध अवयवांच्या हालचालीसाठी योगाचे विविध प्रकार करून घेतले.

हा कार्यक्रम स्वेरीचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार यांच्या सहकार्याने, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा.सतीश मांडवे, इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्या उपस्थितीत पार पडला. प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

### योगामुळे शरीराच्या प्रत्येक अवयवाचा व्यायाम

मार्गदर्शन करताना अनुयायी साध्वी तत्वमयी म्हणाल्या की, 'योग हा शरीर, स्वास्थ्य आणि मनाच्या एकाग्रतेबरोबर शरीराच्या प्रत्येक अवयवाचा व्यायाम करुन घेतो. त्यामुळे मन, शरीर आणि आत्मा संतुलित राहण्यासाठी नियमित योगाची गरज आहे तसेच ध्यान केल्यामुळे मनाची एकाग्रता वाढते. नियमितच्या कामामुळे नकळत ताण-तणावामुळे मनाची अवस्था बदलते. म्हणून मानसिक शांतीसाठी नियमित योगा करणे आवश्यक आहे.' असे सांगून 'योगा' चे फायदे सांगितले.

# शौकिनांची चांदी... चॉईस नंबरची संधी

## सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयात दुचाकीसाठी नवीन मालिका सुरू; आकर्षक क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर. दि. २२ नोव्हेंबर -**

सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयात लवकरच दुचाकी मालिका सुरू करण्यात येत आहे. यामुळे व्हीआयपी, आकर्षक क्रमांकांच्या शौकिनांची चांदी होणार असून, यासाठी चांगली संधी निर्माण झाली आहे.

वाहनांची नवीन मालिका चालू होण्याच्या दिवशी प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणावर इच्छुकांची गर्दी होते व त्यामुळे कार्यालयीन व्यवस्थेवर त्याचा ताण पडतो. बऱ्याचवेळा नागरिकांनाही याचा त्रास होतो. नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा व त्यांना हवा असणारा आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध असल्यास त्यांना सुलभतेने तो मिळावा, यासाठी ज्या दुचाकी वाहन मालकांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहीत शुल्क भरुन हवे असतील त्यांनी २६ नोव्हेंबर रोजी वेळापत्रकानुसार कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते




दुपारी ४ या दरम्यान विहीत नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या नवीन नोंदणी विभागात डीडी (केवळ क्र १६ अन्वये जारी झालेले डीडी), पत्याचा पुरावा, आधार लिंक मोबाईल नंबर, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह स्वत: जमा करावा.हा डीडी फक्त डीवाय आरटीओ सोलापूर यांच्या नावे नॅशनलाईज, शेड्युल्ड बँकेचा असावा. या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील.

अर्जासोबत केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ४ तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५ अमध्ये विहीत केलेल्या पत्त्याच्या पुराव्याची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक असेल. (उदा. आधार कार्ड, टेलिफोन बील इ.) एकाच नंबरकरिता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी २६ नोव्हेंबर रोजी दुपारी ५ वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. या यादीतील अर्जदारांना लिलावाकरिता जर जास्त रक्कमेचा डीडी जमा करावयाचा असेल त्यांनी सोबतच्या वेळापत्रकानुसार दर्शविलेल्या दिवशी (दि. २७ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत) सीलबंद लिफाफ्यात कार्यालयात जमा करावा. लिलावासाठी सदर केलेला डीडी ३०० रुपयांपेक्षा कमी रक्कमेचा नसावा.

सदर डीडी फक्त डी वाय आरटीओ सोलापूर यांच्या नावे नॅशनलाईज, शेड्युल्ड बँकेचा असावा. या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील. डीडी कमीतकमी एक महिना मुदतीमध्ये असावा. २७ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ४ वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या उपस्थितीत संबंधित अर्जदारांसमोर लिफाफा उघडून ज्या अर्जदाराने विनिर्दिष्ट शुल्कापेक्षा जास्तीतजास्त रकमेचा डीडी सादर केला असेल. त्यास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाईल.

### नोंदणीसाठी १८० दिवसांची मुदत

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून १८० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर करून वाहन क्रमांक प्राप्त करून घ्यावा. अन्यथा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकारजमा होईल. कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेली फी, कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही. वाहनधारकाने एका वाहनासाठी एकापेक्षा जास्त आकर्षक नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी कार्यालयात डीडी जमा केल्यास सदर बाबीस कार्यालय जबाबदार राहणार नाही, अशी माहिती सहायक प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# निराळे वस्ती, रंगभवन परिसरात अतिक्रमण हटाव

## महापालिकेने केले हातगाड्यांसह इतर साहित्य जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने यशोधरा हॉस्पिटल समोर ते रंग भवन आणि निराळे वस्ती परिसरात रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले. हातगाड्या, काउंटर व इतर साहित्य या मोहिमेत जप्त करण्यात आले.

महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. आज सकाळच्या सत्रात यशोधरा हॉस्पिटल समोर ते रंग भवन रस्त्यावरील हात गाड्या व फुटपाथ वरील अतिक्रमण काढण्यात आले. या मोहिमेत ६ हातगाड्या, लोखंडी पलंग , दोन लोखंडी वजन काटे, पडदे, स्पीकर व साहित्य जप्त करण्यात आले. तर दुपारच्या सत्रात निराळे वस्ती येथील रस्त्यावरील अडथळा ठरणारे अतिक्रमण हटविण्यात आले. या मोहिमेत एक लोखंडी काउंटर, जाहिरात बोर्ड व इतर साहित्य जप्त करण्यात आले. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे, मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.



### अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचा इशारा

सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.



# स्मार्ट रस्त्यांवरील दुभाजक झाले चकाचक

## महानगरपालिका प्रशासनाने हाती घेतली वृक्ष लागवड मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ नोव्हेंबर -**

शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या व्हीआयपी रोड, प्रमुख रस्त्यावरील दुभाजकांचा कायापालट झाला आहे. एरव्ही कचऱ्याने भरलेले दुभाजक आज चकाचक झाले असून, त्यांमध्ये वृक्ष लागवड केली जात आहे. महापालिका प्रशासनाने मोहीम हाती घेत शहरातील दुभाजकांचे चित्र पालटलेले दिसून येत आहे.

स्मार्ट सिटीतील रस्त्यांच्या मधोमध असणारे दुभाजक अस्वच्छ आणि तोडक्या मोडक्या स्थितीत होते. यामध्ये स्थानिक नागरिकांकडून नेहमी कचरा टाकला जायचा. त्यामुळे हा परिसर अस्वच्छ राहत असे, परंतु आता दृश्य बदलत आहे. अशोक चौक, गुरुनानक चौक ते महावीर चौक येथील दुभाजकांममध्ये स्वच्छता अभियान राबवले. त्यामधील माती काढून त्यानंतर काळी माती टाकून वृक्ष लागवड करण्यात आली आहे. स्वच्छता मोहीम शहरातील प्रत्येक रस्त्यांवर राबवली जाणार आहे. दुभाजक दुरुस्त करून त्यामध्ये वृक्षारोपण करण्यात येत आहे. अशी माहिती सोलापूर महानगरपालिकेच्या संबंधित विभागीय कार्यालयाकडून देण्यात आली.

### शहराच्या वैभवात पडणार आणखी भर

शहरातील अनेक दुभाजकांची दयनीय अवस्था आढळून येत आहे. अशा दुभाजकांची देखील दुरुस्ती करून त्यात वृक्षारोपण करण्यात करावे. यामुळे शहराच्या सौंदर्यात आणखीन भर पडेल.

# आंतर महाविद्यालयीन ज्युदो स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ नोव्हेंबर -**




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर महाविद्यालयीन ज्युदो स्पर्धेत येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयाने घवघवीत यश मिळविले. ही स्पर्धा के. एन. भिसे महाविद्यालय कुर्डूवाडी येथे नुकतीच पार पडली. या स्पर्धेत विद्यापीठातील एकूण आठरा महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या सहा विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्यापैकी चार विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

यामध्ये ७३ किलो वजनी गटात चंद्रिका बाबर बी.एस्सी भाग २ हिने प्रथम क्रमांक मिळविला. त्यामुळे तिची भोपाळ येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी वेस्ट झोन स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. तसेच जयदीप पवार ६० किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक, पवन रुपनर १०० किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक, दिव्यसाक्षी धोत्रे ५६ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन संजीव पाटील, प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, महाविद्यालय विकास समितीमधील सर्व सदस्य, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकवळस, उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षचे समन्वयक डॉ. अमर कांबळे व स्वायत्त महाविद्यालय समन्वयक डॉ. मधुकर जडल यांनी विशेष अभिनंदन केले.

या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा. विठ्ठल फुले, प्रा. मनोज खपाले व प्रा. अनिल परमार यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयीन क्षेत्रात सिनिअर विभागातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांनी विशेष कौतुक केले.

# गरजू रुग्णांसाठी ऑक्सिजन मशिनचे लोकार्पण

**सांगोला, दि.२२ नोव्हेंबर-**

सांगोला शहर व तालुक्यातील गरजू रुग्णांना आपल्या घरीच ऑक्सिजन घेता यावा यासाठी आपुलकी प्रतिष्ठानच्यावतीने ऑक्सिजन मशीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मशीनचा लोकार्पण कार्यक्रम आपुलकी प्रतिष्ठानच्या डॉक्टर सदस्यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी आपुलकीचे राजेंद्र यादव, संतोष महिमकर, डॉ.मच्छिंद्र सोनलकर, डॉ.संतोष पिसे, डॉ.सचिन गवळी, डॉ.अनिल कांबळे, अरविंद केदार, अरविंद डोंबे, अमर कुलकर्णी, महादेव बोराळकर, सुभाष शिंदे, रमेश देशपांडे, सुरेश चौगुले, प्रा.राजेंद्र सूर्यवंशी, अजयकुमार बाबर, रविंद्र कदम, संजय शेळके, प्रकाश महाजन, वैभव म्हेत्रे उपस्थित होते. नाममात्र शुल्क घेऊन ही मशीन रुग्णांना देण्यात येणार असल्याचे अध्यक्ष राजेंद्र यादव यांनी सांगितले. गरजू रुग्णांनी ऑक्सिजनच्या मशीनसाठी मो. ९४२३९६९६४४ या नंबर वर संपर्क साधावा असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# विज्ञान प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद

## वैज्ञानिक डॉ. अभय देशपांडे यांचे आज व्याख्यान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ व मराठी विज्ञान परिषद सोलापूर विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जुळे सोलापूर युनिक इंग्लिश मीडियम स्कूल येथे आयोजित विज्ञान प्रदर्शनास परिसरातील सर्व शाळांनी भेटी देऊन मोठ्या उत्साहात प्रतिसाद मिळाला आहे.

उद्या (शनिवारी) विज्ञान प्रदर्शनाचा अंतिम दिवस असून प्रदर्शनातील पारितोषिक विद्यार्थ्यांची नावे व बक्षीस वितरण सरस्वती विद्यामंदिर सोलापूर गणपती घाट येथे संध्याकाळी ६ वाजता होणार आहे. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे खगोल वैज्ञानिक डॉ. अभय देशपांडे यांचे विश्वाचे अंतरंग या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यामध्ये नाविन्यपूर्ण असे अनेक प्रयोग उपक्रम विद्यार्थ्यांनी उत्तमरीत्या सादरीकरण करून दाखवले. यातील सेन्सबेस टेक्नॉलॉजी, ग्रीन एनर्जी, प्लास्टिकचा कमीत कमी वापर, ध्वनी, हवा, पाणी यांचे प्रदूषण कसे कमी करायचे याचा उपाय, सॉईल पोलुशन, वॉटर पोल्युशन यावरील उपक्रम पाहिल्यानंतर मुलांना पोलुशन कमी करण्याबद्दलचा विचारांचे सादरीकरण करून दाखवले. आपल्या जिल्ह्यातील कंबर तलावातील जलपर्णी कमी करण्याचा उपाय त्यांनी प्रयोगांच्या माध्यमातून सादर केले. सध्य परिस्थितीत ऑरगॅनिक फार्मची आवड निर्माण होत आहे हे अनुभव या विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांना पहावयास व शिकण्यास मिळाले.

# जिल्ह्यात २ लाख हेक्टरवर ज्वारीची पेरणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील ११ तालुक्यात यंदा मुबलक पाऊस झाल्याने रब्बी हंगामातील पेरण्या लांबल्या असल्या तरी यंदा रब्बीचे क्षेत्र आणि उसाचे क्षेत्र वाढणार असल्याची गुड न्युज जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी शुक्रवारी (दि. २२) दिली. दरम्यान, आजतागायत जिल्ह्यात सरासरी ७० टक्के पेरणी झाली असून, रब्बी ज्वारीचे क्षेत्र २ लाख हेक्टरपर्यंत पेरून झाल्याचेही त्यांनी सांगितले.

दुष्काळी स्थितीमुळे गतवर्षी ऊस क्षेत्र कमी झाल्याने यंदा साखर कारखाने कमी क्षमतेने चालणार आहेत. ऊस कमी असल्याने सर्वच कारखान्याचा पट्टा लवकर पडणार आहे. मात्र यंदा मोठ्या प्रमाणात ऊस लागवड होत असल्याने आगामी वर्षात उशिरापर्यंत कारखान्यांचे ऊस गाळप चालणार आहे. तसा तर रब्बीसाठीच आपला जिल्हा पोषक असतो. मंगळवेढा, पंढरपूर भागात ज्वारी मोठ्या प्रमाणात येते. यामुळे या भागाला ज्वारीचे कोठारही म्हटले जाते. आता खरिपाचाही पाऊस मोठ्या प्रमाणात जिल्ह्यात पडत असल्याने सोयाबीन पीक सर्वच तालुक्यात घेण्यात येत आहे. ज्वारीपिक दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मोहोळ व इतर तालुक्यातही घेतात. चांगला पाऊसकाळ झाल्याने यंदा ज्वारीचे क्षेत्रही वाढणार आहे. यंदा परतीचा पाऊस उशिरापर्यंत थांबल्याने जमिनीचा वापसा लवकर झाला नाही. यामुळे दिवाळीनंतरच शेतकऱ्यांनी तिफणीवर हात ठेवला. यामुळे आजही अनेक भागात पेरणीमध्ये शेतकरी गुंग असल्याचे दिसून येत आहे. एकीकडे पेरणीची लगबग आणि दुसरीकडे विधानसभा निवडणुकीचा धुराळा यंदा दिसून आला. ज्यांची लवकर पेरणी झाली अशा काही भागात ज्वारी पिके डोलू लागली असून, यंदा हुरडा पार्ट्या चांगल्याच रंगणार असल्याचे चित्र आहे. काही भागात लवकर पेरण्या झाल्याने त्या भागातील ज्वारी पिके गुडघ्याला लागत आहेत, त्यांनी आंतरमशागतीही चालू केल्या आहेत. तर काही ठिकाणी अजून पेरण्या चालूच आहेत.

### ज्वारी, गहू, हरभरा, कांद्याचा पेरा वाढला

ज्वारीबरोबर, यंदा गहू, हरभरा, कांदा पिकांचाही टक्का वाढला आहे. खरिपामध्ये अतीपावसाने काही भागात पिकांचे नुकसान झाले मात्र आता पाऊस थांबल्याने रब्बीची पिके शेतकऱ्यांच्या पदरात पडतील आणि जिल्ह्यातील रब्बी हंगामाचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात निघेल, असा आशावाद कृषी खात्याने व्यक्त केला.



# पंढरपूरच्या खवय्यांनी मतदान करुन घेतली बिलामध्ये सवलत

## मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद; श्री विठ्ठल कृपा स्वीटस् अँण्ड बेकर्स असोसिएशनचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ नोव्हेंबर -**

पंढरपूर शहर व तालुक्यातील खवय्या ग्राहकांसाठी पंढरपूरच्या ४५ हॉटेल चालकांनी मतदान करून मतदानाची निशाणी दाखवल्यानंतर त्या दिवशी त्यांच्या हॉटेलमधील बिलात १० टक्क्यांची भरघोस सूट देण्याचा निर्णय घेतला होता. या त्यांच्या स्तुत्य निर्णयाला खवय्या ग्राहकांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभला. अनेक ग्राहकांनी या चांगल्या उपक्रमासाठी सहभागी हॉटेल व्यवसायिकांचे आभार मानले

येथील श्री विठ्ठल कृपा स्वीटस् बेकर्स हॉटेल्स असोसिएशनच्या वतीने मतदानानिमित्त खाद्यपदार्थांवर दहा टक्के सवलत देण्याचा निर्णय पंचेचाळीस हॉटेल धारकांनी घेतल्याने खवय्यांसाठी पर्वणीच ठरली. मतदान करा आणि सवलत असलेल्या हॉटेलमध्ये उपलब्ध असलेल्या ४० विविध खाद्यपदार्थांवर दहा टक्के बिलात सवलत मिळवा अशी ही योजना पंढरपूर शहर व तालुक्यातील खवय्यांसाठी मतदानाचा टक्का वाढावा व लोकशाही बळकट व्हावी या उदात्त हेतूने प्रेरित होऊन घेतल्याचे पांडुरंग बापट यांनी सांगितले.



विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान झाले. मतदानासाठी सदर उपक्रमातून जनजागृती झाली, याचा लाभ असंख्य खवय्यां ग्राहकांनी घेतला. हल्ली मतदानाचा टक्का घटू लागला आहे. मतदानाचा टक्का वाढावा यासाठी विविध संस्था, संघटना आणि व्यक्तींकडून जनजागृती करण्यात येत आहे. त्या अंतर्गतच पंढरपुरातील श्री विठ्ठल कृपा स्वीटस् बेकर्स अँण्ड हॉटेल्स असोसिएशनने मतदान केलेल्या प्रत्येक खवय्या ग्राहकांना मतदानाच्या दिवशी त्याने केलेल्या हॉटेलच्या बिलामध्ये दहा टक्के सवलत देण्यात आली. हॉटेल हॉटेल असोसिएशनच्या या उपक्रमात शहरातील विविध ४५ हॉटेलचे मालक सहभागी झालेले होते. या सर्व हॉटेलच्या ठिकाणी मतदारांचे मतदान केल्या बद्दल आभार देखील मानण्यात आले. मतदारांनी देखील हॉटेल व्यवसायीकांनी राबविलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले.

> खवय्या ग्राहकांचा मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता अशा प्रकारचे विविध उपक्रम यापुढेही देखील राबवण्याचा निर्णय आमच्या हॉटेल असोसिएशन कडून घेण्यात आलेला आहे.
>
> **- पांडुरंग उर्फ आबा बापट,** मालक, श्री विठ्ठल कृपा स्वीटस् बेकर्स

## अक्कलकोटमध्ये मतमोजणीसाठी तगडा पोलिस बंदोबस्त

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ नोव्हेंबर-**

महाराष्ट्रातील लोकशाही उत्सवाचा आज निकाल लागणार आहे. अक्कलकोट विधानसभा निवडणुकीकरिता झालेल्या मतदानाची मतमोजणी अक्कलकोट तहसिल कार्यालय येथे शनिवारी सकाळी ८ पासून होत आहे. याकरिता एसआरपी कर्मचारी ३०, बीएसएफ ८०, पोलीस कर्मचारी ८०, पोलीस अधिकारी दहा तैनात करण्यात आले आहेत.



मतमोजणीसाठी सर्व यंत्रणा सज्ज असून सकाळी ८ वाजता मतमोजणीस प्रारंभ होणार आहे. याकरिता ईटीपीबीएस मतमोजणी टेबल सात असून मतमोजणी टेबल सोळा आहेत. मतमोजणीच्या पंचवीस फेऱ्या होतील. मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी कर्मचारी संख्या २०५ आहे. पोलीस अधिकारी, पोलीस, एसआरपी, बीएसएफ असे एकूण ३६५ अधिकारी, कर्मचारी लोकशाहीचा उत्सव अंतिम टप्प्यात पूर्णत्वास नेण्यासाठी योगदान देत आहेत.

## मोहोळमध्ये २४ फेऱ्यांमध्ये फैसला

### १४ टेबलची व्यवस्था; तहसीलदार सचिन मुळीक यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २२ नोव्हेंबर-**

उद्या होणाऱ्या मतमोजणीसाठी एकूण २४ फेऱ्यांमध्ये मतमोजणी होणार असून पुरेशा संख्येने कर्मचारी वर्ग तैनात करण्यात आल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार सचिन मुळीक यांनी दिली.

ही मतमोजणी टेलिफोन कार्यालयाजवळ असलेल्या धान्य गोडाऊनमध्ये होईल. यासाठी तयारीची माहिती ते म्हणाले, सकाळी आठ वाजता मतमोजणीला सुरुवात होईल. पहिल्यांदा टपाली मतदान मोजले जाईल. या मतमोजणीसाठी १४ टेबलची व्यवस्था केली असून याद्वारे २४ फेऱ्या होणार आहेत तर पोस्टल मतमोजणीसाठी ७ टेबल, आणि इटीपीबीएस (इलेक्ट्रॉनिकली ट्रान्समिटेड पोस्टल बॅलेट सिस्टीम) साठी २ टेबलद्वारे मोजणी केली जाणार आहे. मतमोजणी प्रक्रियेत एका टेबलला ३ कर्मचारी व १ अधिकारी असे एकूण ५६ कर्मचारी तर पोस्टलसाठी ३० कर्मचारी, अधिकारी इटीपीबीएससाठी ८ कर्मचारी, ईव्हीएम मशिनची ने-आण करण्यासाठी ५० कर्मचारी सिलिंग करण्यासाठी ३० कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे. तसेच या सर्व यंत्रणेला राखीव ११० टक्के कर्मचारी ठेवले आहेत. मतमोजणी शांततेत पार पाडण्यासाठी १३ पोलिस अधिकारी १०० पोलिस कर्मचारी, एक दंगा काबू पथक, तसेच शहर परिसरात पेट्रोलिंग करण्यासाठी एक पथक, मतमोजणी परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. ही निवडणूक शांततेत पार पाडण्या साठी निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन मुळीक, नायब तहसीलदार सुधाकर धाईजे, नायब तहसीलदार अनिल शहापुरे, मंडल अधिकारी प्रकाश दळवी, मंडळ अधिकारी जे. एफ. नदाफ, निवडणूक महसूल सहाय्यक अजित वाघमोडे प्रयत्नशिल आहेत. तसेच शुक्रवार २२ रोजी मतमोजणी निवडणूक निरीक्षक दर्शनाबीन भागलानी यांनी मतमोजणी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. मतमोजणी केंद्रापासून १०० मीटर परिसरात पादचारी मार्ग तालुका कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी घोषित केला आहे.

या मतदारसंघांमध्ये २ लाख ३० हजार ८४४ जणांनी मतदान केले. त्यात १,२३,६८९ पुरुष आणि १,०७,१५५ महिला मतदार आहेत. साधारणपणे ६९.६५ टक्के एवढी टक्केवारी होते. महायुतीचे विद्यमान आ. यशवंत माने यांच्याविरुद्ध महाविकास आघाडीचे राजाभाऊ खरे अशी प्रामुख्याने लढत झाली भाजपातून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश करून तिथले तिकीट न मिळालेले लोकसेवक संजय क्षीरसागर यांनी बंडखोरी करून फॉर्म ठेवला होता. मात्र अखेरच्या दिवशी त्यांनी खरे यांना पाठिंबा दिला खरा. पण त्यांचे नाव मतपत्रिकेमध्ये आलेलेच आहे. या तीन जणाशिवाय १० जण आणि नोटांमध्ये सामना झाला. आता घड्याळाची टिकटिक चालणार की तुतारी वाजणार याकडे मतदार संघाचे लक्ष लागून राहिले आहे.

### अफवा पसरविल्यास कारवाई करणार

नागरिकांनी चुकीच्या अफवा पसरवू नये. कोणत्याही खोट्या अफवांना बळी पडू नये, निवडणूक आयोगाची प्रतिमा मालिन होऊन लोकशाही व लोकांच्या मनात संभ्रम निर्माण होण्याची शक्यता असते असे आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल. पारदर्शक मतमोजणीची प्रशासनाकडून प्रक्रिया सुरू आहे. ईव्हीएम मशीन हे कोणत्याही नेटवर्कला कनेक्ट होत नाही. चुकीची माहिती व्हायरल करू नयेत, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर यांनी केले.

## विधानसभा निवडणूक काळात गुन्हेगारी प्रवृत्तींवर आळा; वळसंग पोलिस ठाण्याची कामगिरी

# गर्दीवर वर्दीचे वचक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर, अक्कलकोट हे दोन विधानसभा मतदारसंघ, दोन राष्ट्रीय महामार्ग, संवेदनशील कुंभारी, कॉ. गोदुताई परुळेकर विडी घरकूल आणि ३६ गावांची हद्द यावर नियंत्रण ठेवणे फार जिकिरीचे. यंदा या सर्व आव्हानांवर ताभा मिळवत वळसंग पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अनिल सनगल्ले यांनी थेट आणि नीट नियोजन करत गुन्हेगारांच्या गर्दीवर वर्दीचे वचक ठेवले आणि नेहमीच वादग्रस्त असलेल्या हद्दीत यंदा शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. यामुळे जिल्हा प्रशासनाने सुटकेचा निश्वास सोडला.

चोऱ्या, खून, मारामारी, सतत वाढणारी गुन्हेगारी, विडी घरकूलमध्ये दिवसागणिक वाढत असलेली लोकसंख्या, त्यात रे-नगरची पडलेली भर. सोलापूर-हैदराबाद, सोलापूर-अक्कलकोट राष्ट्रीय महामामार्गामुळे वाढलेली वाहतूक अन् ताण, सिमेंट कारखाने, साखर कारखाने आणि ऊस वाहतूक त्यात चोहोबाजूंनी पसरलेली मोठी हद्द, वाड्या, वस्त्या, तांडे यावर निवडणूक काळात नियंत्रण ठेवणे पोलिसांसाठी फारच आव्हानात्मक. २०१४ विधानसभा निवडणूक काळात विडी घरकुल हद्दीत दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे माजी विरोधी पक्षनेते गुरुनाथ कटारे यांचा खून झाला होता. यामुळे निवडणूक काळात नेहमीच वळसंग पोलिस ठाण्यासमोर मोठे आव्हान निर्माण होते. अवैध धंद्यांसाठी कुंभारीसह विडी घरकूल, एनटीपीसी परिसर, होटगी यासह अन्य गावे कलंकित झाली आहेत. पक्षांची फोडाफोडी, नेत्यांची बंडखोरी, कार्यकर्त्यांचा वाढलेला उत्साह यामुळे वळसंग पोलिस ठाण्याच्या हद्दीत शांतता व सुव्यवस्था आबाधित ठेवण्याबाबत अनेकांच्या मनामध्ये शंका निर्माण होतात. मात्र या सर्व शंका, आव्हानांवर मात करत प्रभारी अधिकारी अनिल सनगल्ले यांनी योग्य नियोजन करुन विधानसभा निवडणूक शांततेत पार पाडली.

कायदा व सुव्यस्था आबाधित ठेवण्यासाठी सपोनि अनिल सनगल्ले यांच्याबरोबर तीन अधिकारी, ६० पोलिसांचा फौजफाटा, सीएपीएफ, एसएसबी, बीएसएफच्या तुकड्यांसह खडा पहारा ठेवला. त्यात पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अक्कलकोट उपविभागीय पोलिस अधिकारी विलास यामावार यांनी कुंभारीसह अनेक गावांना भेटी देऊन मार्गदर्शन केले. गुन्हेगारांना सूचक इशारे दिले. याचाही फायदा वळसंग हद्दीत शांतता राखण्यास झाला. याशिवाय निवडणूक काळात गोपनीय यंत्रणा विविध पद्धतीने कार्यान्वित असल्याने गुन्हेगारांच्या हालचाली टिपता आल्या आणि त्यांच्यावर कारवाई करणे सुलभ झाले. अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील २२ आणि दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील १४ गावांना वारंवार भेटी देऊन नागरिकांसह गुन्हेगारांना सपोनि अनिल सनगल्ले यांनी आदर्श नागरिकत्वाचे धडे दिले. यामुळे तंटे, वाद, भांडण यासह अन्य अनुचित प्रकाराचे एकही गुन्हा दाखल न होता यंदाची विधानसभा निवडणूक प्रक्रिया पार पडली. या कालावधीत प्रतिबंधात्मक कारवाई करत अनेकांना बेड्या ठोकल्या. तडीपार केले. अवैध वाहतूक होणाऱ्या दारुवरही नियंत्रण मिळवत गुन्हे दाखल केले.



दोन विधानसभा मतदारसंघात विभागलेल्या वळसंग पोलिस ठाण्याचा विस्तार फार मोठा आहे. त्यात ३६ गावे, विडी घरकूल, रे-नगरचा समावेश आहे. यंदा वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार योग्य नियोजन केल्याने निवडणूक प्रक्रियेला गालबोट लागले नाही. सहकाऱ्यांबरोबरच केंद्रीय सुरक्षा बलाच्या तुकड्यांनीही मोठे योगदान दिले आहे.

**- अनिल सनगल्ले,** प्रभारी अधिकारी, पोलिस ठाणे, वळसंग

### निवडणूक काळातील कारवाई

| | |
|---|---|
| प्रतिबंधात्मक कारवाई | ५६० |
| तात्पुरती तडीपार | ७ जण |
| दोन वर्षांसाठी तडीपार | ३ जण |
| तडीपार प्रस्ताव | ५ जण |
| दारुबंदी गुन्हे | ५१ |

दारुचा मुद्देमाल जप्त ४ लाख २७ हजार ९६५

### कुंभारीत मतदान केंद्रांना स्वतंत्र ओळख

कुंभारी येथे एकाच ठिकाणी तब्बल २० हजार मतदारांना मतदान करण्यासाठी व्यवस्था असते. यामुळे नेहमी गर्दी होऊन वादावादीचे प्रसंग उद्‌भवायचे. यंदा मात्र सपोनि अनिल सनगल्ले यांनी मतदान केंद्रांना स्वतंत्र ओळख निर्माण करुन देत त्या-त्या केंद्रांसाठी बॅरिगेटिंग केल्याने गर्दीवर नियंत्रण मिळविणे, वादावादी टाळण्याबरोबरच मतदारांना सुलभ मतदान करण्यासाठी मदत झाली. पोलिसांच्या फौजफाट्यासह केंद्रीय सुरक्षा बलाच्या विविध तुकड्यांबरोबर सहा गावांत रुट मार्च काढण्यात आले. याचाही चांगला परिणाम झाला.

## करमाळा मतदारसंघात यंदाही ‘टफ फाईट’

### आबा, मामा की प्रिन्स आज फैसला

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २२ नोव्हेंबर**

करमाळा विधानसभा निवडणुकीत करमाळा तालुक्यातील जनता सतत नवीन व धक्कादायक निकाल देत असते. यंदाही करमाळा विधानसभेसाठी अशीच टफ फाईट दिसून येणार आहे. संपूर्ण राज्याचे लक्ष लागून रहिलेल्या या मतदारसंघात कोण बाजी मारणार हे कोणीही सांगण्याचे धाडस करणार नाही. करणं येथे महाविकास आघाडीचे नारायण पाटील व अपक्ष उमेदवार आ. संजयमामा शिंदे यांच्यात चरशीची लढत पहायला मिळणार आहे. त्यातच महायुतीचे उमेदवार दिग्विजय बागल यांनीही तगडे आव्हान उभे केले आहे.

रामदास झोळ हे कोणाचे मताधिक्य कमी करणार यावर निकालाची सूत्रे ठरणार आहेत. या मतदारसंघात एकूण ३ लाख २८ हजार ९९४ इतक्या मतदारा पैकी २ लाख २९ हजार ३७५ मतदारांनी मतदान केले आहे. एकूण ६९.७२ टक्के मतदारांनी मतदान केले आहे. करमाळा तालुक्यातील १०८ गावे तर माढा तालुक्यातील ३६ गावांचा समावेश आहे. गेल्या वेळेस ३६ गावांतील भरघोस मताधिक्याने आ. संजयमामा शिंदे यांनी बाजी मारली होती. यंदा ते तिथे किती लीड घेतात यावर त्यांचे भवितव्य अवलंबून आहे. मात्र यंदा ३६ गावात अपेक्षित मतदान झाले नाही. ६७ टक्के मतदान हा आकडा कमी आहे तर महाविकास आघाडीचे शरद पवार गटाचे उमेदवार नारायण पाटलांना बड्या नेत्यांनी केलेला प्रचार, मोहिते-पाटलांची साथ व करमाळ्यातील जयवंतराव जगताप व सावंत गटाची हातमिळवणी किती फायद्याची ठरणार यावर त्यांचा विजय ठरणार आहे. दिग्विजय बागल यांना शिवसेना शिंदे गटाने उमेदवारी दिल्याने व स्वतः मुख्यमंत्री करमाळ्यात प्रचाराला आल्याने व दिगंबर बागल यांच्यावरील सहानुभूतीने बागलही रेसमध्ये आहेत. मात्र लाडकी बहीण योजनेचा फायदा त्यांना विजयाच्या समीप घेऊन जाईल का? हे सांगणे कठीण आहे.



### चुरशीने निवडणूक

अपक्ष उमेदवार रामदास झोळ यांनीही आपली पहिलीच निवडणूक ताकदीने लढले आहेत. मात्र जरांगे-पाटील फॅक्टर त्यांना तितकासा लाभदायक ठरताना दिसला नाही. यंदाची निवडणूक ही अत्यंत चरशीची निवडणूक ठरणार आहे. सर्वच उमेदवारांनी आपला प्रचार मोठ्या ताकदीने केला आहे. ही निवडणूक अत्यंत चुरशीची असल्याने यात कोण आमदार होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## माळशिरस विधानसभेची उत्कंठा शिगेला?

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २२ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागण्याला अवघा काही तासांचा कालावधी शिल्लक राहिला आहे. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार येणार की महाविकास आघाडीचे सरकार येणार याची उत्कंठा शिगेला पोहचली असताना माळशिरस विधानसभा निवडणुकीत भाजपाचे विद्यमान आमदार रामभाऊ सातपुते व राष्ट्रवादीचे उत्तमराव जानकर यांच्यातच मुख्य लढत होत आहे. यंदा कोण विजयी होणार याबाबत उत्कंठा शिगेला पोहचली आहे.

यामध्ये इतर बारा उमेदवारही आपले नशीब अजमावून पाहत आहेत.लोकसभा निवडणुकीपासून माळशिरस तालुक्याची सर्व राजकीय समीकरणे बदलली आहेत. एकमेकांचे हाडवैरी असणारे मोहिते-पाटील गट व उत्तमराव जानकर यांनी आपली दुश्मनी संपवून एकत्र येण्याचा निर्णय घेतला. यामुळे प्रमुख विरोधी गट एकत्र आल्यामुळे राजकीय वातावरण पूर्णपणे बदलले आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपाने पुन्हा एकदा आमदार रामभाऊ सातपुते यांना उतरवले असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटातून उत्तमराव जानकर या दोघांमध्ये लढत होत आहे. उत्तमराव जानकर यांच्यासाठी मोहिते-पाटील कुटुंबातील खा. धैर्यशील मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, अर्जुनसिंह मोहिते-पाटील, स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांनी संपूर्ण तालुक्यात प्रचार केला तर भाजपाकडून तालुक्यातील सर्वच पदाधिकाऱ्यांनी प्रचार केला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी राम सातपुते यांच्या प्रचारार्थ अकलूज येथे सभा घेतली. प्रचारात उत्तम जानकर यांच्यावर जातचोर, कारखान्याचे शेअर्स असे अनेक विषय आहे तर राम सातपुते यांच्यावर टक्केवारीचा आरोप करण्यात आला. आरोप-प्रति आरोपांच्या फैरी थांबल्या असून आता उद्याच्या निकालाकडे लक्ष लागले आहे. रतालुक्यात एकूण तीन लाख ४९ हजार ५६८ एवढे मतदान आहे. यापैकी २ लाख २९ हजार ६६९ एवढ्या मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला असून तालुक्यात ६८.९० टक्के एवढे मतदान झाले आहे. सुरुवातीला सोपी वाटणारी लढत अंतिम टप्प्यात मोठी चुरशीची झाली. यामुळे या मतदारसंघात कोण बाजी मारणार याकडे तालुक्यातील मतदारांचे लक्ष लागले आहे.





## यंदा अक्कलकोटमध्ये मतदान टक्केवारीत वाढ

### प्रबोधन मंच अक्कलकोटच्या प्रयत्नाला यश

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ नोव्हेंबर-**

अक्कलकोट तालुक्यात प्रबोधन मंचच्या माध्यमातून गत महिन्याभरापासून तालुक्यातील वाड्या, वस्त्या, तांडा येथे मतदानासाठी आवाहन करीत शिबीर राबविण्यात आले. या प्रयत्नाला मोठे यश मिळत मतदान टक्केवारीत वाढ झाली आहे.

तालुक्यातील १३५ गावे, वाड्या-वस्त्यामध्ये घरोघरी जाऊन देशहितासाठी १०० टक्के मतदान करा, जाती, भाषा, नेता या क्षणिक स्वार्थाचा विचार न करता राज्याची सुरक्षा, शाश्वत विकास, आरोग्य योजना, शैक्षणिक सुविधा, विचारधारा या मुद्यांचा विचार करून १०० टक्के मतदान करा असे आवाहन करून पत्रक वितरणाचे काम प्रत्येक गावातील विचार परिवारातील कार्यकर्त्यांच्या माध्यमातून प्रबोधनाचे, मतदार जागृतीचे कार्य जोमाने झाले आहे. लोकसभेला मतदानाची टक्केवारी कमी झाली तसे विधानसभेला होऊ नये म्हणून अक्कलकोट तालुक्यात प्रबोधन मंच्याच्या माध्यमातून गावागावात कॉर्नर बैठका, मतदार जागृती पर व्याख्यान, घरोघरी पत्रक वितरण, वैयक्तिक संपर्क, प्रत्यक्ष मतदान दिवशी प्रत्येक मतदाराकडून मतदान घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे अश्या विविध पद्धतीने कार्यकर्ते कामे केल्याने यंदा मतदानाची टक्केवारीत वाढ झाली आहे असे मत प्रबोधन मंचाचे संयोजक तम्मा शेळके यांनी व्यक्त केली आहे. या कामासाठी संघ विचार परिवारातील अक्कलकोट शहरातील व ग्रामीण भागातील शेकडो कार्यकर्ते मागील १ महिन्यापासून परिश्रम घेतल्याने मतदान टक्केवारीत वाढ़ झाल्याने कार्यकर्ते आनंद व्यक्त करत आहेत.




# बार्शी विधानसभा मतमोजणीसाठी तयारी पूर्ण

### सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची माहिती; २४ फेऱ्यांत प्रक्रिया होणार पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ नोव्हेंबर-**

बार्शी विधानसभा मतदारसंघ (क्रमांक २४६) सार्वत्रिक निवडणुकीच्या मतमोजणीसाठी प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली आहे. आज सकाळपासून सुरु होणाऱ्या मतमोजणी प्रक्रियेबाबत सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार एफ. आर. शेख यांनी माहिती दिली. मतमोजणी २४ फेऱ्यांमध्ये पार पडणार असून, प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी १५० कर्मचारी आणि कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

बार्शी विधानसभा मतमोजणीसाठी एकूण २४ फेऱ्या होणार आहेत. यासाठी १४ ईव्हीएम टेबल्स आणि १० पोस्टल मतपत्रिकांसाठी स्वतंत्र टेबल्स ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक टेबलवर तीन प्रमुख कर्मचारी असणार आहेत. सुपरवायझर संपूर्ण फेरीचे व्यवस्थापन पाहणार. सहाय्यक-तांत्रिक बाबी हाताळणार. मायक्रो ऑब्झर्व्हर-पारदर्शकतेसाठी प्रक्रिया देखरेख करणार. मतमोजणीचे पहिले टप्पे वेळखाऊ असल्यामुळे पहिल्या फेरीला साधारणतः २ तास लागतील. त्यानंतर प्रत्येक पुढील फेरी ३० मिनिटांत पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे. मतमोजणी वेळापत्रक सकाळी ८ वाजता पोस्टल मतपत्रिकांची मोजणी सुरु होईल. ८.३० वाजता ईव्हीएम मतमोजणीला प्रारंभ होईल.

प्रत्येक फेरी पूर्ण झाल्यावर संबंधित निकाल जाहीर केला जाईल. सुरक्षा आणि नियोजन मतमोजणी केंद्रामध्ये कडक सुरक्षा उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. सीसीटीव्ही देखरेख: मतमोजणी कक्ष आणि परिसर सीसीटीव्ही कॅमेऱ्याखाली असेल. अधिकृत ओळखपत्राशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. मतमोजणी केंद्र आणि परिसरात पोलीस तैनात असतील. मतमोजणीसाठी विशेष नियंत्रण कक्ष कार्यरत असेल. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सर्व उमेदवार, राजकीय पक्ष, आणि जनतेला शांतता राखण्याचे आवाहन केले आहे. मतमोजणी प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने पार पडेल आणि निवडणूक आयोगाच्या सर्व नियमांचे पालन केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



### निकालाकडे सगळ्यांचे लक्ष

बार्शी विधानसभा निवडणुकीचे निकाल येताच मतदारसंघाचा पुढील राजकीय प्रवास ठरवला जाईल. उमेदवारांसाठी हा निर्णायक क्षण असताना, बार्शीकरांचे लक्ष निकालांकडे लागले आहे. प्रशासनाने निवडणूक प्रक्रियेत कोणतीही त्रुटी होऊ नये यासाठी विशेष काळजी घेतली आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## रस्ता अपघात एकाचा मृत्यु; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**

शेतातून घराकडे पायी जात असताना मोटारसायकलच्या धडकेत एकाचा मृत्यु झाल्याची घटना सुंभा ते आरणी रोडवर घडली आहे. याप्रकरणी ढोकी पोलीसात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी की, मयत शिवाजी गणपती मुसळे (वय ३६, रा. आरणी ता.जि. धाराशिव) हे दि.१६ नोव्हेंबर रोजी शेतातुन घराकडे पायी जात होते. दरम्यान आरणी गावातील परेश शहाजीराव यांचे शेताजवळ सुंभा ते आरणी रोडवर मोटारसायकल (क्र एमएच २५/बीबी २००४) चा चालक दयानंद माणिक पवार (वय ३०, रा. आरणी ता.जि. धाराशिव) यांनी त्याचे ताब्यातील मोटरसायकल ही हायगयी व निष्काळजीपणे चालवून शिवाजी मुसळे यांना पाठीमागून धडक दिली. या अपघातात शिवाजी मुसळे हे गंभीर जखमी होवून मयत झाले. याप्रकरणी फिर्यादी सतीश गणपती मुसळे (वय २८, रा. आरणी ता.जि. धाराशिव) यांनी दि.२१ नोव्हेंबर रोजी दिलेल्या तक्रारीवरुन ढोकी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### संक्षिप्त वृत्त...



## खानापुर येथे चोरट्यांनी मारला डल्ला; लाखो रुपयांचा मुद्देमाल लंपास

**इटकळ, दि.२२ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील खानापुर येथे बुधवार दि.२० रोजी रात्रीच्या सुमारास घरात कोणी नसल्याचा फायदा घेत चार घरातील मुद्देमाल लंपास करण्यात आला आहे. येथील आलमबाशा हुसेन मुजावर हे पत्नीसह शेतात पाणी देण्यासाठी गेले होते तर मुले कामासाठी सोलापूर येथे गेल्याने घरी कोणी नसल्याचा फायदा घेत त्यांच्या घरातील कपाट फोडून मुलाच्या लग्नासाठी ठेवलेली ३ लाख २६ हजार ५०० रोख रक्कम, दिड तोळे सोन्याचे दागिने व चांदीचे २० तोळे दागिने लंपास केले. यासह शेजारच्या संजय साबाय्या तेलंग हे पत्नीसह नातेवाईकाकडे गेले होते याची संधी साधून त्यांच्या घराचे कुलूप तोडून घरातील एक तोळे सोन्याचे दागिने, तीस हजार रोख रक्कम लांबवली. जवळच्या रहेमतबी महेबुब व्होगे यांच्या घरातील लाकडी कपाटातून आठ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. याबाबत पोलिसांकडून श्वान पथकास पाचारण करण्यात आले आहे.



## राष्ट्रीय इनलाईन हॉकी स्पर्धेसाठी संघरत्न नगदे यांची निवड

**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**

धाराशिव येथील संघरत्न सुभाष नगदे याची तामिलनाडू राज्यातील कोईंबतूर येथे होणाऱ्या ६२ व्या राष्ट्रीय इनलाईन हॉकी स्पर्धेकरिता महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे. त्याच्या या निवडीबद्दल शुक्रवार २२ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी नायब तहसीलदार सचिन पाटील, लघुपाटबंधारे विभागातील जलसंधारण अधिकारी सुभाष नगदे उपस्थित होते.



## मानमोडी शाळेस हॅलोतर्फे पुस्तकांचे वाटप

**इटकळ, दि.२२ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मानमोडी शाळेस हॅलो फाउंडेशन, अणदूर यांच्यावतीने विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून विद्यार्थ्यांना वाचनाची अधिक गोडी निर्माण व्हावी. यासाठी नोबल पारितोषिक विजेत्या मलाला, सामर्थ्य आहे चळवळीचे, साधना, लिंगभाव मानवी हक्क व कायदे, लिंगभाव लैंगिकता हिंसाचार आणि आरोग्य अशी अनेक प्रकारची विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी पुस्तके देण्यात आली. यावेळी हॅलो फाउंडेशन, मानमोडी गावातील समन्वयक ललिता पवार, मुख्याध्यापक विक्रम पाचंगे, सुचिता चव्हाण व प्रवीण गायकवाड तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. हॅलो फाउंडेशनच्यावतीने घेण्यात येणारे उपक्रमाविषयी पाचंगे यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

### जाहीरनामा

**उस्मानाबाद येथील ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्रा बद्दल जाहीरनामा**

**सीएनआर-एमएचओएस ०२-००२१४३२०२४**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ७३७/२०२४**
**प्रयागबाई/निरंक**
**नि.क्रं. ०६**

ज्यापेक्षा मयत कै. बाबुराव नामदेव आडसुळ, रा. सुर्डी, ता.जि. उस्मानाबाद हे दिनांक १५/०७/२०२४ रोजी किंवा त्यासुमारास निरामय हॉस्पीटल, उसमानाबाद येथे मयत झाले असून अर्जदार १. प्रयागबाई बाबुराव आडसुळ, २. राजकुमार बाबुराव आडसुळ, ३. सुरेखा परसुराम वाघमारे, यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत कै. बाबुराव नामदेव आडसुळ यांच्या नावचे वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा अर्जदारास सदरहू प्रमाणपत्र हे कै. बाबुराव नामदेव आडसुळ यांचे मृत्यू पश्चात शासकीय व निमशासकीय कामासाठी अर्जदारांचे नावे वारसा हक्काने नांवे लावणेकामी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सदरहू अर्जदार मयत कै. बाबुराव नामदेव आडसुळ यांचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचे हक्क शाबीत दिसल्यास त्याचा सदरहू मयत कै. बाबुराव नामदेव आडसुळ चे वारसाचे प्रमाणपत्र देईल.

**दिनांक १८/१०/२०२४ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.**
**पुढील तारीख २२/११/२०२४**

| | |
|---|---|
| **स्वाक्षरित/-** | **स्वाक्षरित/-** |
| **(व्ही.के. बेग)** | **(एस.एम. नावाडे)** |
| **कनिष्ठ लिपीक** | **सहा.अधिक्षक** |


**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद**

## महासत्तेचा आज फैसला...

# मतमोजणीसाठी जिल्ह्यात तगडा पोलीस बंदोबस्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**

महाराष्ट्राच्या सत्ताकारणाचा आज फैसला होणार असून त्या अनुषंगाने जिल्ह्यातील धाराशिव-कळंब, उमरगा-लोहारा, भूम-परंडा-वाशी आणि तुळजापूर विधानसभा मतदारसंघात आज (दि.२३) मतमोजणी होणार असून यासाठी जिल्ह्यातील चारही मतमोजणी केंद्रावर पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.





धाराशिव जिल्ह्यात विधानसभा मतमोजणी अनुषंगाने लावण्यात आलेला पोलीस बंदोबस्त दि.२३ नोव्हेंबर रोजी धाराशिव जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघ उमरगा- २४०, तुळजापूर- २४१, उस्मानाबाद- २४२ व परंडा- २४३ मतमोजणी असल्याने मतमोजणी शांततेत व भयमुक्त वातावरणात पार पडण्याकरीत , कोणतीही अप्रिय घटना घडु नये, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निमार्ण होवू नये याकरीता जिल्ह्यामध्ये बंदोबस्तकामी ०५ पोलीस उप अधीक्षक, १७ पोलीस निरीक्षक, १०० सपोनि., पोउपनि पोलीस अधिकारी तसेच १ हजार ४९४ पोलीस अमंलदार व १ हजार ४४२ होमगार्ड तसेच निम्नलष्करी दलाच्या कंपन्या असा बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. धाराशिव जिल्ह्यातील ४ मतदार संघात लावण्यात आलेला बंदोबस्त खालील प्रमाणे उमरगा- २४० येथे ०१ पोलीस उप अधीक्षक, ३ पोलीस निरीक्षक, १७ सपोनि, पोउपनि पोलीस अधिकारी, तसेच ३३२ पोलीस अमंलदार व ३०५ होमगार्ड असा बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. तुळजापूर- २४१ येथे १ पोलीस उप अधीक्षक, ४ पोलीस निरीक्षक, २३ सपोनि, पोउपनि पोलीस अधिकारी तसेच ३७३ पोलीस अमंलदार व ३८४ होमगार्ड असा बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. उस्मानाबाद- २४२ येथे २ पोलीस उप अधीक्षक, ६ पोलीस निरीक्षक, ३० सपोनि, पोउपनि पोलीस अधिकारी, तसेच ४०१ पोलीस अमंलदार व ३८६ होमगार्ड असा बंदोबस्त लावण्यात आलेला आहे परंडा- २४३ येथे १ पोलीस उप अधीक्षक, ४ पोलीस निरीक्षक, ३० सपोनि, पोउपनि पोलीस अधिकारी तसेच ३८८ पोलीस अमंलदार व ३६७ होमगार्ड असा बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.

मतमोजणी ठिकाणी कोणीही मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक गॅजेट सोबत ठेवू नये, असे निवडणूक अधिकाऱ्यांकडून कळविण्यात आले आहे.




**तेर :** निवडणुकीच्या आधीच धाराशिव तालुक्यातील तेर येथे झळाळले भारतीय जनता पार्टीचे उमेदवार राणाजगजितसिंह पाटील यांच्या विजयाचे बॅनर झळकल्याचे दिसून आले.

## कोण मारणार बाजी; परंडा मतदार संघात चर्चेला उधान

**तभा वृत्तसेवा / आप्पासाहेब शिंदे**
**परंडा, दि.२२ नोव्हेंबर -**

२४३ परंडा विधान सभा मतदार संघात भूम परंडा वाशी तालुक्यात अतिशय चुरशीने बुधवारी दि.२० नोव्हेंबर रोजी मतदान शांततेत पार पडले असुन जवळ जवळ ६५ टकेच्या पुढे मतदान झाले आहे. विशेष म्हणंजे महिला मतदारांनी भरभरून मतदान करण्यासाठी घराच्या बाहेर पडून मतदान बुथवर मोठी गर्दी करित आपला मतदानांचा हक्क बजावला आहे. परंडा मतदार संघात ३ लाख ३० हजार ३७३ असे स्त्री आणि पुरुष मतदारा असुन त्यांनी मोठ्या उत्साहात आपले मतदान केले आहे. अतिशय चुरशीने झालेल्या मतदानात कोण मारणार बाजी याचा फैसला शनिवारी होत असुन जवळ जवळ ६५ टक्केच्या पुढे मतदान झाल्याने लाडक्या बहिणीने कोणाच्या पारड्यात भरभरून मतदान टाकले आहे, यांची चर्चा सर्वत्र सुरु असुन परंडा मतदार संघात एकून २१ उमेदवार आपले नसीब अजमावत आहेत.





खरी टक्कर महायुतीचे शिवसेना उमेदवार धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री तथा परंडा विधानसभेचे विद्यमान आमदार प्रा.डॉ. तानाजीराव सावंत व महाविकास आघाडीचे माजी आमदार राहुल मोटे यांच्यात अतितटीची लढाई झाली असुन त्याच बरोबर वंचितचे उमेदवार प्रविण रणबागुल व रासपाचे उमेदवार डॉ. राहुल घुले यांनी सुद्धा चांगलीच टक्कर दिली असुन ते किती मतदान घेतात यावरच सावंत आणि मोटे यांचे विजयाचे गणित अवलंबून आहे. परंडा मतदार संघाच्या निवडणुकीची मतमोजणी आज भूम येथे होत असुन या निवडणुकीत मतदारांनी कोणाच्या पारड्यात भरभरून मताचे दान दिले आहे याचा फैसला होत असुन कोण गुलाल उधळतोय याची चर्चा मतदार संघात जोरात सुरु असुन शनिवारी दुपारी ३ वाजेपर्यंत याचे चित्र स्पष्ट होणार आहे. गेल्या निवडणुकीत झालेल्या पराभवचा वचपा या निवडणुकीत राहुल मोटे काढणारच अशी चर्चा होत आहे तर विद्यमाने आमदार तानाजी सावंतच यावेळीही राहुल मोटे यांना असमान दाखवणार अशी खंमग चर्चा मतदार संघात रंगु लागली आहे.

## निवडणुकीच्या वातावरणात थंडावा...

# पर्यावरणातील गारव्यामुळे शेकुट्या पेटल्या

**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**तेरखेडा, दि.२२ नोव्हेंबर -**

राज्यात विधानसभा निवडणुकांचे वातावरण आता गार झाले आहे. आज काही वेळात निकाल समोर येणार आहेत. यापूर्वी दिग्ज उमेदवार यांची आता धाकधूक वाढली आहे. राज्यात महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये थेट सामना पाहायला मिळाला होता. आता प्रत्यक्षात मात्र निकाल जाहीर झाल्यानंतर खरे चित्र स्पष्ट होणार आहे. कोणत्या पक्षाच्या किती जागा निवडून येणार यावर सत्तेचे गणित जुळणार आहे. यात अपक्ष उमेदवार किती निवडून येथील हे सुध्दा सत्ता स्थापनेसाठी महत्वाचे ठरणार आहे. सत्ता स्थापनेचा दावा कोण करणार आणि सत्ता स्थापनेपासून कोणाला वंचित राहावे लागणार हे चित्र लवकरच समोर येणार आहे.

यात अपक्ष निवडून आलेले उमेदवार यांची चांदी होणार अशी चर्चा सध्या राजकीय अभ्यासक सांगत आहेत. निकाल जाहीर झाल्यानंतर सत्तेचे गणित जुळवण्यासाठी आमदारांची देखील पळवापळवी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर २६ नोव्हेंबरला रात्री १२ वाजेपर्यंत सरकार स्थापन करावे लागणार आहे. असे नाही झाल्यास महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दुसऱ्या बाजूला राज्यात आता थंडीचा जोर वाढत चालला आहे. मागील काही दिवस झाले विधानसभा निवडणुकीने राजकीय वातावरण चांगलेच तापले होते, मात्र २० नोव्हेंबरला मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर राजकीय वातावरण गार झाले आणि निसर्गाचे वातावरण देखील गार झाले. वाशी तालुक्यातील तेरखेडा परिसरात किमान तापमानात सतत घसरण होत असल्याने थंडीची लाट उसळली आहे.

रात्रीच्या सुमारास आणि पहाटे उशिरापर्यंत तापमानात घट होत असल्याने गारटा वाढला आहे. त्यामुळे तेरखेडा परिसरातील नागरिकांनी थंडीपासून बचाव करण्यासाठी घरातील स्वेटर, मपरेल, टोपी गरम कपडे बाहेर काढले आहेत. तसेच रात्रीच्या आणि पहाटेच्या सुमारास नागरिक गरम उबदार भेटावी म्हणून शेकोटी पेटवत आहेत.

### निकाला आधीच झळकले भावी आमदारांचे पोस्टरवार






**धाराशिव / तेरखेडा :** निवडणुकीच्या आधीच धाराशिव शहरात उबाठाचे उमेदवार कैलास पाटील व तेरखेडा येथे शिवसेना शिंदे गटाचे उमेदवारी प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांचे भावी आमदार असा उल्लेख असलेले बॅनर झळकले.

# तुळजापूर विधानसभा मतदारसंघावर ‘पाटीलकी’ कोणाची?

**तभा वृत्तसेवा / मेघराज किलजे**
**जळकोट, दि.२२ नोव्हेंबर -**

तुळजापूर विधानसभा निवडणुकीत महायूतीचे राणाजगजितसिंह पाटील व महाविकास आघाडीचे धीरज पाटील यांच्यात सरळ सामना रंगला होता. दोन पाटलामधील राजकीय झुंज पहावयास मिळाली. राजकीय पटलावर या विधानसभेच्या निवडणुकीत राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी महायुती व महाआघाडीच्या कार्यकर्त्यांनी जीवाचे रान केल्याचे दिसून आले. दोन पाटलामधील लढाईत कोणाचा उदय तर कोणाचा अस्त होणार आहे. याकडे तालुका वासियांचे लक्ष लागले आहे. एकंदरीत तुळजापूर मतदारसंघावर आमदाररुपी ‘पाटीलकी’ कोणाची राहणार आहे. याची जोरदार चर्चा मात्र ऐकावयास मिळत आहे.

महाराष्ट्र जिल्ह्याच्या व तुळजापूर तालुक्याच्या आगामी काळातील राजकीय भविष्य घडवणाऱ्या या निवडणुकीत महायुती व महाविकास आघाडी कसून कामाला लागली होती. संपूर्ण जिल्ह्याचा इतिहास पाहता राज्याच्या राजकारणात व जिल्ह्याच्या राजकारणावर प्रदीर्घकाळ आपली एकहाती सत्ता टिकवलेले माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यानंतर राणाजगजितसिंह पाटील यांनी सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली. काही काळ राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घालवल्यानंतर त्यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश करून तुळजापूरच्या विधानसभेवर गेल्या वेळेस कब्जा केला.





माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांचा पराभव करून काँग्रेसच्या ताब्यातील हा मतदारसंघ भारतीय जनता पार्टीच्या गोटात सामील करण्यात राणा पाटील हे यशस्वी ठरले. धाराशिव जिल्ह्याच्या राजकारणात डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब पाटील यांनी काँग्रेसच्या विचाराची धुरा संपूर्ण जिल्ह्यावर पसरवून काँग्रेस टिकवण्यात मोलाचे कार्य केले आहे. अनेक निवडणुका आप्पासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली लढण्यात आल्या. काँग्रेसचे प्रदीर्घकाळ अध्यक्ष ते राहिले. परंतु अलीकडच्या काळात काँग्रेसमधील दिग्गज मंडळीनी दुसऱ्या पक्षात घरोबा केल्याने काँग्रेससाठी कठीण काळ आहे. असे वातावरण निर्माण झाले. यात माजी मंत्री मधुकरराव चव्हाण पुन्हा एकदा निवडणूक मैदानात उतरणार आहेत. असे चित्र निर्माण झाले. परंतु पक्षश्रेष्ठींनी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धीरज पाटील यांना उमेदवारी दिली. धीरज पाटलांनी धीर न सोडता तेवढ्यात ताकतीने निवडणूक लढवली. धीरज पाटील जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष, विद्यमान काँग्रेस जिल्हाध्यक्ष आहेत. संपूर्ण जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचा विचार तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी त्यांनी संपूर्ण जिल्ह्यात काँग्रेसची जनसंवाद यात्रा काढली. यात्रेच्या माध्यमातून त्यांच्या जलसंपर्कात भर पडली.

महाविकास आघाडीने शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार, मित्रपक्ष काँग्रेसची अधिकृत उमेदवारी धीरज पाटील यांना मिळाल्यानंतर सुरुवातीला संथगतीने सुरू असलेला प्रचार शेवटच्या टप्प्यात जोर धरल्यानंतर निवडणुकीत खरी रंगत आली. धीरज पाटील यांच्या प्रचारसभेत मधुकररव चव्हाण यांनी पूर्णपणे पाठ दाखवली तर अशोकराव जगदाळे यांनी नॉट रिचेबल असतानाही पुन्हा प्रचारात रिचेबल झाले. त्यानंतर निवडणुकीतला खरा प्रचार सुरू झाला.

अशाच चित्र विचित्र परिस्थितीत महाविकास आघाडीचे धीरज पाटील यांना सुरुवातीला यश मिळणार का? याची जोरदार चर्चा ऐकावयास मिळत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे प्रमुख उद्धव ठाकरे, मराठवाड्याचे काँग्रेसचे मोठे नेते अमित देशमुख आदींनी प्रचार सभा घेऊन महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून देण्याचे आवाहन केले. आगामी काळात काँग्रेसचे प्राबल्य टिकणार का ? हे या निवडणुकीच्या निकालात स्पष्ट होणार आहे.

एकेकाळी डॉ. पद्मसिंह पाटील व आप्पासाहेब पाटील यांनी जिल्ह्याच्या राजकारणावर ठेवलेले वर्चस्व कायम नेमके कोणत्या पाटलाच्या हातात जाणार! याची उत्सुकता मात्र जनतेला लागली आहे. धीरज पाटील पहिल्यांदाच विधानसभा निवडणूक लढवत आहेत. तर दुसऱ्यांदा राणाजगजीतसिंह पाटील तुळजापूर विधानसभेतून पुन्हा कमळ फुलवण्यासाठी सज्ज आहेत. ‘पाटील’ पैकी कोणते पाटील आमदाररुपी ‘पाटीलकी’ राजकारण हाकणार आहेत. याचा फैसला आज होणार आहे. सध्या थंडीचे दिवस आहेत. प्रचाराच्या थंडीमध्ये विजयाची ऊब कोणाला मिळणार? याकडे आम जनतेचे लक्ष लागले आहे. दोन पाटील यामध्ये प्रत्यक्ष राजकीय झुंज पहावयास मिळाली. आरोप-प्रत्यारोप करण्यात आले. उत्तर प्रत्युत्तर देण्यात आले. निवडणूक रिंगणात अनेक उमेदवार उभे असले तरीही खरी लढत दोन पाटील मधील राजकीय द्वंदयुद्ध ठरणार आहे. कारण जिल्ह्याच्या राजकारणावर वर्चस्व ठेवायचे असेल तर हा विजय जिल्ह्याचे राजकीय भविष्य ठरवणारे आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूका या विजयावर अवलंबून आहेत. एकंदरीत तुळजापूर विधानसभेवर आमदार म्हणून पाटीलकी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची आमदारकी कायम राहणार? की धीरज पाटील नवे पाटील म्हणून राजकीय ‘पाटीलकी’ सुरू करणार? याचे उत्तर आजच्या निवडणूक निकालानंतर स्पष्ट होणार आहे.

### रूपामाता शुगर युनिट क्रम.३ देवसिंगा (तुळ) चा गळीत हंगामाचा शुभारंभ...

# रूपामाता नॅचरल शुगर युनिट क्र.१ कडून २५०० रुपये प्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग

### चेअरमन ॲड. व्यंकटराव गुंड यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**

धाराशिव तालुक्यातील पाडोळी (आ.) येथील रुपामाता नँचरल शुगर यु.क्र. १ या कारखान्याच्या २०२४-२५ हंगामातील पहिल्या पंधरवड्यात गाळपासाठी आलेल्या उसाची बिल २५०० रुपये प्रमाणे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आल्याची माहिती रुपामाता उद्योग समूहाचे संस्थापक ॲड. व्यंकटराव गुंड यांनी दिली.

उत्पादक शेतकऱ्यांनी रूपामाता मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट साठी शाखेत जाऊन बिल घ्यावे व ज्या शेतकऱ्यांनी अद्याप खाते उघडले नाही त्यांनी त्वरित आपले खाते उघडून घ्यावे असेही अँड. गुंड यांनी सांगितले.

तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी कारखान्याला ऊस देऊन सहकार्य करण्याचे त्यांनी आवाहन केले. रुपामाता नँचरल शुगर युनिट क्र.३ देवसिंगा (तुळ) ता. तुळजापूर येथील २०२४- २५ चा मोळी पूजन करून गळीत हंगामाचा शुभारंभ माऊली उद्योग समूहाचे चेअरमन व्ही.पी.पाटील, बँक ऑफ महाराष्ट्र आनंद नगर शाखेचे मुख्य प्रबंधक राजेश कुशवाह, जि.प. माजी उपाध्यक्ष सुधाकर गुंड, हभप. बाबुराव पुजारी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी मुख्य पूर्वक ॲड. गुंड यांनी म्हणाले की तुळजापूर तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या जीवनात 'रूपामाता' च्या माध्यमातून आर्थिक उन्नती साधणे हेच आमचे लक्ष असल्याचे यावेळी सांगितले.

या समारंभास ऊस उत्पादक शेतकरी, दुध ऊत्पादक, ऊस तोड वाहतूक ठेकेदार, उद्योग समुहाचे पदाधिकारी, कारखान्यातील सर्व विभाग प्रमुख, कर्मचारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## नळदुर्ग बसस्थानकातील सिमेंट रस्त्याचे काम संथगतीने; प्रवाश्यांत नाराजी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ नोव्हेंबर -**

नळदुर्ग येथील बसस्थानकात सुरु असलेले सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम अतिशय संथगतीने सुरु असुन यामुळे प्रवाशांना धुळीचा तसेच बस पकडण्यासाठी कमालीचा त्रास होत आहे.

नळदुर्ग बसस्थानकात वारंवार मागणी केल्यानंतर सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम मंजुर झाले आहे. हे काम महाराष्ट्र औद्योगिक वसाहत महामंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

मात्र हे काम ज्या ठेकेदाराने घेतले आहे तो ठेकेदार हे काम अतिशय संथगतीने करीत आहे. त्याचबरोबर कामाच्या ठिकाणी संबंधित ठेकेदाराने कामाच्या माहितीचा फलकही लावलेला नाही.

सध्या संथगतीने सुरु असलेल्या कामाची गती वाढवुन हे काम लवकर पुर्ण करण्याचे आदेश संबंधित ठेकेदाराला द्यावे अशी प्रवाशांमधुन मागणी होत आहे.

## भैरवनाथ शुगर सोनारीचा १७ वा गळीत हंगाम मोळीपूजन कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२२ नोव्हेंबर -**

प्रा.डॉ. तानाजीराव सावंत, प्रा. शिवाजीराव सावंत (चेअरमन, भैरवनाथ शुगर्स समुह) यांच्या मार्गदर्शनाखाली १७ वा गळीत हंगाम मोळीपूजन कार्यक्रम संपन्न झाला. या सोहळ्यात पारंपरिक पद्धतीने गव्हाणची पूजन करून मोळी पूजन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी महिला आघाडी जिल्हाप्रमुख अर्चना दराडे, सारिका अंधारे, गंगाताई सातपुते, सोहम सावंत, अविनाश वाडेकर, ठोंबरे, काळे, भोसले, गडगे, गोविंद कुलकर्णी, सिंग, सुरेश साळुंखे, बोरकर, मालवदे कुटुंब उपस्थित होते. यावेळी दादा काळे, सुभाष भोसले यांनी सूत्रसंचालन व आभार मानले. तसेच यावेळी पंचक्रोशीतील ऊस उत्पादक शेतकरी, ऊस वाहतूक, तोडणी ठेकेदार सर्व खाते प्रमुख, विभाग प्रमुख व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेत असताना या हंगामात उच्चांकी गाळप करत यशस्वीपणे कारखाना चालवण्याचा संकल्प केला.




साखर उद्योग हा शेतकऱ्यांच्या अर्थकारणाचा कणा आहे. त्यामुळे त्यांची प्रगती आमची जबाबदारी आहे, अशा भावना त्यांनी याप्रसंगी व्यक्त केल्या.

## डॉ. आंबेडकर साखर कारखान्याचा २१ वा गळीत हंगाम शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**

तालुक्यातील केशेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगाम २०२४-२५ चा २१ व्या ऊस गळीत हंगामाचा शुभारंभ शुक्रवार (दि.२२) रोजी राजर्षी शाहू ट्रस्टचे तज्ञ विश्वस्थ चंद्रकांत माळी व ज्येष्ठ पत्रकार दिलीप पाठक-नारीकर यांचे हस्ते प्रथमतः वजन काटयाचे पुजन करुन तद्नंतर विधीवत गव्हाणीत ऊसाची मोळी टाकून गव्हाण पूजन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रास्तावीक संचालक ॲड, चित्राव गोरे यांनी केले. त्यात त्यांनी चालू हंगामासाठी एकूण ८५०० हे. ऊस नोंद झाली असून हेक्टरी ८० मे.टन उत्पादन गृहीत धरून एकूण ६५०००० मे. टन ऊस उपलब्ध असून इतर विल्हेवाट चजा जाता ५ लाख मे.टन ऊस आपणास उपलब्ध होत असल्याचा तपशील शेतकऱ्यांसमोर मांडला. यावर्षी बैलगाडी २००, मिनी १५०, मोठे वाहने ६५ ८ हार्वेस्टर ३० अशी भक्कम यंत्रणा कारखान्याकडे उपलब्ध असून कारखाना आज गाळप हंगाम चालू करण्यासाठी सज्ज आहे. तसेच यावर्षी चांगले गाळप होईल असे अपेक्षित असल्याचे सांगीतले. तसेच लचकर पक्क होणाऱ्या व साखर उतारा चांगला असणाऱ्या ऊस जातीमध्ये कोसी ६७१ च एमएस १०००१ या ऊस जातीची लागवड शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त करावी जेणे करून शेतकऱ्यांच्या ऊसाला जादाचा दर देता येईल. तसेच कारखान्याने यावर्षी केलेल्या धोरणाप्रमाणे या दोन ऊस जाती लवकर पक्क होणार असल्याने पुढील वर्षी यांचा प्रोग्राम सुरुवातीला काढून चाकीच्या ऊस जातीचा नंतर प्रोग्राम काढला जाईल असे नमूद केले.

कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष अरविंद गोरे यांनी सभेस मार्गदर्शन करताना सांगीतले की, ऊस शेती हेच शेतकयांचे प्रमुख उत्पन्नाचे साधन असून कमी पाण्यात व कमी खर्चात शेतीचे नियोजन करणे गरजेचे आहे. तसेच आपला कारखान्यासाठी आजपर्यंत सर्वसाधारण शेतकऱ्यांचे सहकार्य लाभले. त्यांच्या सहकार्यातूनच आपण आज संकटातून मार्ग काढ़त इतपर्यंत पोहोचली आहेत. आज ३ कोटी रकमेतून चालू केलेला कारखान्याची ३०० कोटी संपत्ती झाली आहे. आपल्याला आवर्षण काळात पाण्याची गरज भासल्याने आपण ३-३ कोटीची दोन मोठी शेततळी निर्माण केली, तसेच ऊसापासून मिळणाऱ्या पाण्यावर कारखाना चालवला. एखाद्या वर्षी कमी पाणी असताना आपण ऊस तुटून गेल्यावर फक्त पावसाच्या पाण्यावर ऊस जगवला, तसेच पाचट जाळण्याचे प्रमाण कमी होऊन त्याचे महत्य लोकांना सांगीतले. आपल्यापुढील निसर्ग आणि सरकारचे धोरण ही दोन संकटे आहेत. इथेनॉल बंदच्या धोरणामुळे कारखान्यास मोता आर्थिक तोटा सहन करावा लागला. या अशा सरकारच्या बदलत्या धोरणामुळे बँका कर्ज देण्यास तयार नाहीत. त्यामुळे सरकारने थकहमी घेऊन कारखान्यास कर्ज वाटप केले. परंतू आपणास सरकारची मदत घेण्याची गरज पडली नाही, तसेच यंत्रणेमुळे आपणास मोठे धोके निर्माण झाल्यामुळे हार्वेस्टर वाढवण्याचा आपला मानस असल्याचे सांगीतले.

## श्रीक्षेत्र वाशी येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**वार्शी, दि.२२ नोव्हेंबर -**

श्री क्षेत्र वाशी यांचा पारंपारिक श्री सद्गुरु कै. हभप. तात्यासाहेब (आबा) वास्कर तसेच सद्गुरू संत ज्ञानेश्वर माऊली महाराज श्री क्षेत्र चाकरवाडी व वै. हभप. साताप्पा महाराज थोबडे कृपा आशीर्वादाने अखंड हरिनाम सप्ताह श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण ज्ञान यज्ञ सोहळा मिती मार्गशीर्ष शुद्ध एक सोमवार दि.२ ते मार्गशीर्ष अष्टमी सोमवार ९ डिसेंबर या कालावधीत गुरुवर्य हभप. नामदेव महाराज वासकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमासाठी पहाटे ४ ते ६ काकडा आरती सकाळी ७:३० ते ९:३० पारायण सकाळी ९:३० ते १० अल्पोपहार १० ते ११:३० ज्ञानेश्वरी पारायण दुपारी १२ ते १ भोजन नंतर २ ते ४ गाथा भजन सायंकाळी ५: ते ६ हरिपाठ रात्री ९ ते ११ किर्तन व रात्री १२ ते ४ हरी जागर असे कार्यक्रम होणार आहेत. सोमवार दि.२ रोजी हभप. भिकाजी महाराज शिंदे, कोल्हापूर मंगळवार हभप. प्रमोद महाराज जगताप पुणे, बुधवार हभप. तुमो निधी शांती ब्रह्म गुरुवर्य महादेव महाराज चाकरवाडी कर गुरुवार हभप. भागवताचार्य

पोपट महाराज चकणे घाटकोपर मुंबई शुक्रवार हभप. ॲड. जयवंत महाराज बोधले श्रीक्षेत्र पंढरपूर शनिवार हभप. केशव महाराज उखळीकर परळी रविवार हभप. गुरुवर्य विठ्ठल महाराज वासकर वाशीकर सोमवार हभप. देवेंद्र निढळकर महाराज यांचे सकाळी १० ते १२ काल्याचे किर्तन व नंतर हभप. गुरुवर्य नामदेव महाराज वासकर यांचे काला अभंग व काला वाटप व त्यानंतर महाप्रसादाणे सांगता होणार आहे.

या सप्ताहात अन्नदाते म्हणून विठ्ठल साळुंखे, गणपत चौधरी, पद्मराज गपाट, भारत कवडे, शहाजी कागदे, भाऊसाहेब जगताप, श्रीधर पवार, देविदास मस्कर, अशोक थोरबोले, गुरुलिंग नगरे, किशोर भांडवले, संतोष ढवळे, ॲड. परमेश्वर कोठावळे, किशोर भांडवले, डॉ. दत्तात्रय कवडे, किशोर माने, आधी अन्नदान करणार आहेत.

## दोनशे रुपये लाच घेतल्याप्रकरणी दुकाने निरीक्षकाला तीन वर्षांचा कारावास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**

धाराशिव शहरातील सरकारी कामगार अधिकारी कार्यालयातील दुकाने निरीक्षक विवेक वासुदेव हेडाऊ यांना लाचखोरी प्रकरणी धाराशिवच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाने ३ वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. हेडाऊ यांनी २०१२ मध्ये राज ऑफसेट व स्टेशनरी सप्लायर्स या दुकानाचा परवाना नूतनीकरण करण्यासाठी दुकानाच्या मालकाकडून २०० रुपयांची लाच मागितली होती.

याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. याबाबत माहिती अशी की, हेडाऊ यांनी पंचासमक्ष २०० रुपयांची लाच मागितली होती आणि ती रक्कम खाजगी लेखनिक दत्तात्रय आनंदराव दाने यांच्याकडे दिली होती. दाने यांनी ही रक्कम त्यांच्या शर्टच्या खिशात ठेवली होती. न्यायालयाने हेडाऊ यांना कलम ७ आणि १३ (१) (ड), १३ (२) अन्वये ३ वर्षांचा कारावास आणि १००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. दंड न भरल्यास त्यांना १ महिन्याचा अतिरिक्त कारावास भोगावा लागेल. या प्रकरणाचा तपास अश्विनी भोसले, तत्कालीन पोलीस उप-अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव यांनी केला होता.

## धाराशिव जिल्ह्यात विधानसभा मतमोजणी अनुषंगाने वाहतुक मार्गात बदल




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुक-२०२४ करिता दिनांक २३.११.२०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया आयोजित असुन उमरगा- २४०, विधानसभा मतदार संधाची मतमोजणी पंचायत समिती मिटींग हॉल, उमरगा येथे, तुळजापूर-२४१ मतदार संघाची मतमोजणी स्पोटर्स हॉल, श्री तुळजाभवानी इंजिनिअरींग कॉलेज, तुळजापूर, उस्मानाबाद- २४२ मतदार संघाची मतमोजणी शासकीय ओध्योगिक ट्रेनिंग इन्स्टिट्युट(आयटीआय), तुळजापूर रोड धाराशिव व परंडा-२४३ मतदार संघाची मतमोजणी अनुसुचित जातीच्या मुलांची शासकीय निवासी शाळा गोळेगाव ता. भुम या मतमोजणी ठिकाणी पार पडणार आहे.

जिल्हादंडाधिकारी धाराशिव यांचे आदेशनुसार विधानसभा मतमोजणी दि.२१ नोव्हेंबर अन्वये धाराशिव जिल्ह्यातील सर्व मतमोजणी केंद्रावर व परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा सहिंता २०२३ चे कलम १६३ अन्वये मतमोजणी ठिकाणापासुन २०० मिटर परिघाच्या परिसरामध्ये (निवडणुकीच्या अनुषंगाने वापरात असलेली शासकीय वाहने वगळुन) मोटारगाड्या, वाहनांचा वापर करणे अथवा थांबविणेस मनाई करण्यात आली आहे.

विधानसभा मतदार संघ २४० उमरगा,२४१- तुळजापूर, २४२- उस्मानाबाद व २४३ परंडा साठीच्या मतमोजणी कामी दि.२३ नोव्हेंबर रोजी नमुद मतमोजणी ठिकाणी येणाऱ्या उमेदवारांचे सोबत त्यांचे समर्थक, कार्यकर्ते, वाहने हे मोठ्या संख्येने उपस्थित असण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशा वेळी वाहतुकीची कोंडी हावु नये. तसेच मतमोजणी निकाल ऐकण्यासाठी येणारे लोकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारचा अपघात होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये या करीता मतमोजणी ठिकाणा समोरुन, जवळून, मार्गे होणारी वाहतुक अन्य मार्गाने वळविणे सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने पोलीस अधिक्षक संजय जाधव यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३(१) (ब) अन्वये अधिकाराचा वापर करुन मतमोजणी निकाल ऐकण्यासाठी येणारे लोकांचे सुरक्षीततेच्या कारणावरुन दि.२३ नोव्हेंबरपासून सकाळी ६. वा. ते मतमोजणी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मतदार संघ निहाय मतमोजणी ठिकाणांच्या अनुषंगाने वाहतुक मार्गात बदल करण्यात आले आहेत.

### नावात बदल

मी कोंडाबाई मधुकर बंडगर मौजे इटकळ ता. तुळजापुर येथील रहिवाशी असुन माझे पहिलेच नाव छायाबाई मधुकर बंडगर हे होते पण माझे आत्ताचे नाव कोंडाबाई मधुकर बंडगर हेच माझ्या कागदपत्रानुसार बरोबर व सत्य आहे व मला कोंडाबाई मधुकर बंडगर याच नावाने ओळखतात.

**कोंडाबाई मधुकर बंडगर**
मु. पो. इटकळ, ता. तुळजापुर

## माध्यमांच्या प्रतिनिधीसाठी मतमोजणी कक्षात मोबाईल नेण्यास प्रतिबंध

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या मतमोजणीचे २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी केंद्रावर वृत्त संकलन करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रादेशिक व जिल्ह्यातील शासनमान्य वृत्तपत्रांचे संपादक, त्यांचे प्रतिनिधी, उपग्रह वाहिन्यांचे प्रतिनिधी व त्यांचे कॅमेरामन आणि अधिस्वीकृतीधारक यांना हिरव्या रंगाची प्राधिकार पत्र दिले आहे. अशाच माध्यमांच्या प्रतिनिधींना मतमोजणी कक्षात प्रवेश दिला जाणार आहे.



माध्यम कक्षात माध्यम प्रतिनिधीना संपर्क करण्यासाठी इंटरनेट, संगणक, टिव्हीची व चहापानाची व्यवस्था करण्यात आली आहे. माध्यमांच्या प्रतिनिधींना माध्यम कक्षापर्यतच आपला मोबाईल वापरता येईल. मतमोजणी केंद्राच्या दारावरून निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ठरवून दिलेल्या जागेवरूनच स्टील कॅमेरा किंवा मुव्हीज कॅमेरा वापरता येईल. आक्षेपार्ह कोणतेही चित्रण करता येणार नाही. मात्र कोणत्याही परिस्थितीत मतमोजणी कक्षाच्या आतमध्ये मोबाईल घेवून जाण्यास परवानगी असणार नाही. याठिकाणी माध्यम कक्षाच्या नोडल अधिकाऱ्यांसोबत पाच किंवा त्यापेक्षा मर्यादित माध्यमांच्या प्रतिनिधींचा गट करुन पाहणी करता येईल.

माध्यम कक्षातून फेरीनिहाय माहिती, परवानगी मिळालेले छायाचित्र माध्यम कक्षाच्या नोडल अधिकाऱ्यांच्या माध्यमातून माध्यम प्रतिनिधींच्या व्हॉटसअप ग्रुपवर प्रसिध्दीसाठी देण्यात येईल, असे जिल्हा निवडणूक विभागाने कळविले आहे.

### निवडणुक संपली आणि उमेदवार लागले कामाला...

# आठ महिन्यापासून बंद असलेला डीपी तीन तासात सुरू

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ नोव्हेंबर -**


हगलुर (ता. तुळजापुर) येथील शिवारामध्ये एका डीपीवर लोड येत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रयत्नांतून १०० चा डीपी आठ महिन्यापुर्वी बसवण्यात आला होता परंतु त्याला कनेक्शन दिले गेले नाही.

तत्कालीन वायरमन भोसले यांनी सदर कनेक्शन जोडण्यासाठी शेतकऱ्यांच्या कडुन ५१ हजार रुपये घेतले एकुण १७ शेतकरी एकत्र येऊन प्रत्येकी तीन हजार रुपये प्रमाणे भोसले यांना ५१ हजार रुपये देण्यात आले तरीसुद्धा डीपी कनेक्शन देऊन सुरू करण्यात आला नाही. त्यानंतर भोसले यांची बदली झाली व त्यांच्या जागी पटेल हे नवीन वायरमन नियुक्त झाले. त्यांच्याकडे शेतकऱ्यांनी डीपी सुरू करण्यासाठी विनंती केली असता त्यांनी वरिष्ठाकडून आदेश मिळाल्याशिवाय डीपी चालु करता येणार नाही असे सांगितले.

त्यामुळे शेतकऱ्यांनी पुन्हा पुर्वीचे वायरमन ज्यांना ५१ हजार रुपये दिले होते त्यांच्याकडे डीपी जोडण्या संदर्भात विनंती केली. भोसले यांनी डीपी सुरू करण्यासाठी पुन्हा तीस हजार रुपये द्यावे लागतील असे शेतकऱ्यांना सांगितले.

यामुळे हवालदीप झालेले शेतकरी अण्णासाहेब दराडे यांना भेटुन त्यांची अडचण मांडली.

यानंतर अण्णासाहेब दराडे यांनी संबंधित महावितरण विभागाचे सहाय्यक अभियंता यांच्याकडे लेखी निवेदन देऊन डीपी तात्काळ सुरू नाही झाल्यास चालु डीपीवर चढुन आत्मदहन करण्याचा इशारा दिला असता सदरील डीपी जोडण्याचे काम तीन तासांमध्ये पुर्ण करण्यात आले.



गेल्या तीन महिन्यापासुन प्रचारामध्ये व्यस्त असलेले अण्णासाहेब दराडे यांनी कालच मतदान झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी कामाचा सपाटा सुरू केलेला असुन येणाऱ्या काळात रात्र दिवस सर्वसामान्यांसाठी शेतकऱ्यांसाठी ते कायमस्वरूपी जनतेच्या सेवेत रुजु झाल्याचे त्यांनी सांगितले.

तुळजापूर मतदारसंघातील तसेच धाराशिव जिल्ह्यातील सर्वसामान्यांच्या कोणत्याही अडचणी असतील तर त्यांनी माझ्याशी थेट संपर्क करावा, असे आवाहन दराडे यांनी केले आहे.

# विद्यापीठात आज ६ विधानसभा व लोकसभेसाठी मतमोजणी

## किनवट, हदगाव व लोहा येथे त्या-त्या ठिकाणी मतमोजणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ नोव्हेंबर**

नांदेड जिल्ह्यात लोकसभा पोटनिवडणूक व ९ विधानसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान झाले. निवडणूक आयोगाने २१ तारखेला दुपारी जाहिर केलेल्या अंतिम आकडेवारी नुसार नांदेड जिल्ह्याने यावेळी २०१९ च्या तुलनेने विक्रमी मतदान केले असून यावेळी विधानसभेसाठी ६९.४५ टक्के मतदान झाले आहे. तर लोकसभा पोटनिवडणुकीतही गेल्या वेळेच्या तुलनेत ७ टक्के अधिक मतदान झाले असून ही टक्केवारी ६७.८१ आहे. उद्या शनिवार २३ नोव्हेंबर रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये ज्ञान स्त्रोत केंद्र ( नॉलेज रिसोर्स सेंटर ) येथे सकाळी ७ वाजल्यापासून मतमोजणी सुरु होणार आहे.



पहिल्या व दुसऱ्या माळ्यावर विधानसभा व लोकसभा निवडणुकीची मतमोजणी होणार आहे. पहिल्या माळ्यावर खोली क्रमांक १०२ व खोली क्रमांक ६ याठिकाणी सहा विधानसभा क्षेत्राची मतमोजणी होणार असून सर्व मतयंत्र याठिकाणच्या स्ट्रॉंगरुममध्ये पोहोचले आहे. तसेच दुसऱ्या माळ्यावर खोली क्रमांक २०२ ते २०६ मध्ये लोकसभा पोटनिवडणुकीची मतमोजणी होणार आहे. याठिकाणच्या स्ट्रॉंगरुममध्ये मतयंत्र पोहोचली आहेत. उमेदवारांच्या उपस्थितीत सर्व मतपेट्या स्ट्रॉंगरुममध्ये बंद झाल्या असून सीसीटीव्हीच्या निगराणीत ठेवण्यात आल्या आहेत. २३ नोव्हेंबरला सकाळी उमेदवारांच्या व त्यांच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत मतदान यंत्र बाहेर काढले जातील व त्यानंतर मतमोजणीला सुरुवात होईल. याठिकाणी वेगवेगळे कक्ष करण्यात आले असून उमेदवारांचे प्रतिनिधींसाठी देखील थांबण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. विधानसभेची १४ टेबलावर मोजणी होणार आहे. लोकसभा व विधानसभेसाठी १४ गुन्हीले ६ असे ८४ टेबल लोकसभा आणि विधानसभासाठी असणार आहे. अंदाजे २४ ते २८ फेऱ्यांमध्ये मतमोजणी होणार आहे.

**किनवट, हदगाव व लोहा येथे त्या-त्या ठिकाणी मतमोजणी**

किनवटला आयटीआय कॉलेजमध्ये तर हदगावला समाज कल्याण भवन येथील अनुसूचित जातीचे मुलींचे शासकीय वसतीगृह तर लोहा येथे महसूल हॉल, तहसिल कार्यालयाच्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे.

**सुसज्ज मीडिया कक्ष**

भारत निवडणूक आयोगाने ज्यांना हिरव्या रंगाची प्राधिकार पत्र दिले अशा पत्रकारांना मतमोजणी कक्षात प्रवेश दिला जाणार आहे. याठिकाणी माध्यम प्रतिनिधींना संपर्क करण्यासाठी इंटरनेट, संगणक, टिव्हीची व खानपानाची व्यवस्था करण्यात आली आहे. पत्रकारांना माध्यम कक्षापर्यंत आपला मोबाईल वापरता येईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत मतमोजणी कक्षाच्या आतमध्ये मोबाईल घेवून जाण्यास परवानगी असणार नाही. याठिकाणी जिल्हा माहिती अधिकाऱ्यांसोबत पाच किंवा त्यापेक्षा मर्यादित पत्रकारांचा गट करुन पाहणी करता येईल. माध्यम कक्षातून फेरीनिहाय माहिती, परवानगी मिळालेले छायाचित्र ई-मेल व व्हॉटसअप ग्रुपवर प्रसिध्दीसाठी देण्यात येईल.

# विष्णुपुरी प्रकल्पाच्या कालव्याची व रस्त्याची दुरुस्ती करून नऊ पाणी पाळ्या देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ नोव्हेंबर**

आशिया खंडातील सर्वात मोठ्या विष्णुपुरी प्रकल्प डेरलां लिफ्ट यांच्या कालव्याची व रस्त्याची दुरुस्ती यांत्रिकी विभागामार्फत करून नऊ पाणी पाळ्या सोडण्याचे नियोजन करण्यासाठी कालवा सल्लागार समितीची सचिव, अधीक्षक अभियंता यांना शेतकऱ्यांच्या उपस्थित बैठक घेण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर यांनी केली आहे.

आशिया खंडातील सर्वात मोठा उपसा जलसिंचन प्रकल्प म्हणून विष्णुपुरी डेरला ओळखले जाते. विष्णुपुरी प्रकल्प हा पूर्ण क्षमतेने भरला असून जायकवाडी प्रकल्पसुद्धा भरलेला आहे व गोदावरी नदीवरील नऊ बंधारेही भरलेले आहेत. खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे, त्यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या हलाकीचा झालेला आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी रब्बी हंगाम महत्त्वाचा आहे. या रब्बी हंगामासाठी विष्णुपुरी प्रकल्प डेरला लिफ्टच्या कालव्याद्वारे लोहा, कंधार, नांदेड तालुक्यातील परिसरामध्ये अनेक गावांना रब्बी सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे, परंतु निवडणुकीमुळे कालवा सल्लागार बैठक झाली नाही.

विष्णुपुरी डेरला प्रकल्पाची कालव्यांना रब्बी व उन्हाळी पाण्याचे नियोजन करण्याचा अधिकार कायद्याने २००५ जलसंपदा कालवा सल्लागार समितीला मिळतो. या कालवा सल्लागार समितीचे अध्यक्ष पदसिद्ध हे महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री असतात, परंतु सध्या महाराष्ट्रात निवडणुका चालू असल्यामुळे त्या संदर्भात बैठक घेण्यात आली नाही. या समितीचे सचिव अधीक्षक अभियंता असतात. त्यांच्या अध्यक्षेखाली बैठक घेऊन रब्बी व उन्हाळी हंगामासाठी नऊ पाणी पाळ्यांचे नियोजन करण्याचे आदेश संबंधित अधीक्षक अभियंता सर्कल नांदेड पाटबंधारे यांना द्यावेत व शेतकऱ्याला न्याय द्यावा. तसेच कालव्याची दुरुस्ती करण्यासाठी व कॅनॉलवरील रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी यांत्रिकी विभागाला आदेशित करावे, असेही राज्याचे मुख्य सचिव यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

या निवेदनावर मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर, लिंगोजी पाटील हरबळकर, खुशाल पाटील दगडगावकर, त्र्यंबक पाटील जानापुरीकर, जाधव पिपरणवाडीकर माधवराव देसाई, गोविंदराव मुकादम, नवनाथराव मोरे, शंकरराव मोरे, अंबादासराव देशमुख जवळेकर, विजयकुमार बोरगावकर, ज्ञानोबा टोणगे दापसेडकर, बळी पाटील मडकीकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### तेलंगाना भैंसा डिपो मॅनेजर यांची कालावधीची मुदत संपली



**धर्माबाद**-महाराष्ट्र शासनाचा व राष्ट्रीय परिवहन महामंडळ यांचा महसूल बुडत आहे. तहसीलदार यांनी दिलेल्या पत्राची अंमलबजावणी होत नसून अनाधिकृत आंध्रा बस स्टॉप हे महर्षी वाल्मिकी चौक येथे राष्ट्रीय राष्ट्रीय परिवहन महामंडळ विभागासोबत कसलाही करार तेलंगाना येथील आगारप्रमुखांनी न करता तेलंगणातील बसेस चालूच ठेवल्या. सविस्तर वृत्त असे की धर्माबाद ही एक मोठी बाजार पेठ असून दररोज आंध्रा प्रदेश व तेलंगणा आणि महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातून हजारो लोक विविध कामांच्या निमित्ताने धर्माबाद शहरात येत असतात. तालुक्यात महाराष्ट्र बस स्थानक आहे तेलंगणातील काही बस सेवा फक्त महर्षी चौक पर्यंतच येऊन तिथून परतत होतात त्यामुळे इतर नागरिकांना चक्क महाराष्ट्र बस स्थानकापासून महर्षी चौक पर्यंत पायी चालत जावे लागते किंवा ऑटो ने तीस रुपये देऊन जावे लागत असे याचा त्रास महाराष्ट्रातून आंध्र प्रदेश व तेलंगणा राज्यात जाणाऱ्या महाराष्ट्रीयन प्रवाशांना होत होता म्हणून रिपब्लिकन सेनेचे तालुका अध्यक्ष साहेबराव दुगाने, डी के पाटिल व वंचित बहुजन आघाडी चे शहर उपाध्यक्ष किरण गजभारे, राहुल शिरसे यांनी व सहकार्यांनी दिनांक १३ सप्टेंबर रोजी रिपब्लिकन सेनेचे धर्माबाद तालुकाध्यक्ष साहेबराव दुगाने यांच्या नेतृत्वात महर्षी चौक येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाची दखल घेत धर्माबाद तहसीलदार यांनी भैसा व निर्मल वाहतूक नियंत्रण अधिकाऱ्यांना पत्र देऊन सदर आंदोलनांची माहिती देत तेलंगणा राज्यातून येणाऱ्या बसेस महर्षी चौक अनधिकृत (आंध्रा बस स्टॉप) येथे थांबवण्या ऐवजी ते अधिकृत महाराष्ट्र बसस्थानकात थांबवण्यात यावेत अन्यथा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो अशी लेखी विनंती वजा सल्ला दिला होता. या रास्ता रोको आंदोलनाच्या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी मा. अभिजीत राऊत, पोलीस अधीक्षक नांदेड, धर्माबाद तहसीलदार व पोलीस निरीक्षक व तेलंगणा राज्याच्या आगार प्रमुख यांना देण्यात आले होते. या दरम्यान सर्व बाबींची चौकशी करून नायब तहसीलदार गावंडे यांनी तोंडी व लेखी आश्वासन दिले व सदरील विभागाला पत्रव्यवहार केला त्यामुळे आज पासून (आंध्रा बस स्टॉप) च्या ऐवजी महाराष्ट्र व स्थानक या ठिकाणी तेलंगणातील सर्व बसेस थांबण्यात येणार आहे. त्यामूळे महाराष्ट्रातून आंध्र व तेलंगणा राज्यात जाणाऱ्या धर्माबाद तालुका वाशीयांसाठी व महाराष्ट्र राज्याच्या विविध भागांतून धर्माबाद शहरात ये जा करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय या पुढे होणार नसल्याने समाधान व्यक्त केल्या जात आहे. परंतु तहसीलदारांचा आदेश तेलंगानातील आगार प्रमुख यांनी कचऱ्याच्या डब्यात टाकून आपला मनमानी कारभार सुरूच ठेवला आहे. याकडे वाहतूक शाखेने सुद्धा कानाडोळा केला आहे. अनधिकृत आंध्रा बस स्टॉप या ठिकाणी बसेस थांबून विद्यार्थी नागरिक व्यवसायिक यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

### विनापरवाना शुभेच्छा फलक, बॅनर लावल्यास कारवाई..!

**नांदेड**-संपूर्ण महाराष्ट्रात शनिवारी विधानसभा निवडणुकीचा निकाल लागणार आहे. त्याचवेळी नांदेडमध्ये विधानसभेसह नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचाही निकाल लागणार आहे. या निवडणूक निकालानंतर विनापरवानगी शुभेच्छा बाबतचे जाहिरात फलक, पोस्टर, किऑस, झेंडे, भित्तीपत्रके लावू नयेत, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे या आदेशाची नांदेडात काटेकोरपणे अंमलबजावणी होईल, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे. नांदेड शहरात कोणीही विनापरवानगी बॅनर, पोस्टर लावल्यास कारवाई केली जाईल, असा इशारा नांदेड महापालिकेचे उपायुक्त स. अजितपालसिंघ संधू यांनी दिला आहे. याबाबत संपूर्ण क्षेत्रिय अधिकाऱ्यांनाही निर्देश दिले आहेत. कुठेही विनापरवानगी बॅनर, पोस्टर लावल्यास तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना दिल्या असल्याचे उपायुक्त संधू यांनी सांगितले.

### निवडणुकीतील स्त्री-पुरुषनिहाय मतदान

**नांदेड**-लोकसभा पोटनिवडणूकीसाठी भोकर मतदारसंघात पुरुष १ लाख २० हजार ११७ तर महिला १ लाख ११ हजार २३६ व इतर ३ असे एकूण २ लाख ३१ हजार ३५६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. नांदेड उत्तर मतदारसंघात पुरुष १ लाख १३ हजार ५२४ तर महिला १ लाख ३ हजार ९८३ तर इतर १५ असे एकूण २ लाख १७ हजार ५२२ तर नांदेड दक्षिण मतदारसंघात पुरुष १ लाख ६ हजार ३९० व महिला ९६ हजार ३२६ व इतर २ असे एकूण २ लाख २ हजार ७१८ मतदारांनी आपला हक्क बजावला. नायगाव मतदारसंघात पुरुष १ लाख १९ हजार ६३७ तर महिला १ लाख १० हजार ११४ व इतर १ असे एकूण २ लाख २९ हजार ७५२ मतदारांनी मतदान केले. देगलूर मतदारसंघात पुरुष १ लाख २ हजार २९० महिला ९५ हजार १११ व इतर ८ असे एकूण १ लाख ९७ हजार ४०९ मतदारांनी मतदान केले. मुखेडमध्ये पुरुष १ लाख ११ हजार ८७६ तर महिला १ लाख ३ हजार ५२४ व इतर २ असे एकूण २ लाख १५ हजार ४०२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

# थडीसावळी, गळेगांव शिवारात हरभऱ्यास तुषारने पाणी सुरू

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. २२ नोव्हेंबर**

थडीसावळी,गळेगांव परिसरातील शेत शिवारात हरभरा या पीकास शेतकरी तुषार सिंचनाने पाणी देण्यात मग्न आहेत. एकंदरीत परिसरातील पीक पेरणी होऊन एक महिना जवळपास उलटला आहे. महिन्याचे हरभरा पीक शेता शेतात डोलू लागले आहे. वातावरणात थोडासा गारठाही वाढलेला दिसून येत आहे.पहिली फवारणी देखील पुढेमागे शेतकरी करीत आहेत. आया बायांची पीकात निंदणी देखील सुरू झाली आहे.काही शेतकरी धनियाचे पीक घेतल्याचे पहायला मिळाले.



रात्री अपरात्री शेत शिवारात शेतकरी आपल्या हरभरा पीकास तुषार सिंचनाने पाणी देत असल्याचे चित्र सध्या थडीसावळी, गळेगांव परिसरात पहायला मिळत आहे.शेताच्या उशाला,पायथ्याला,धुऱ्याला बोअरवेल असलेल्या शेजारील शेतकऱ्यांना थोड्या कष्टाने सहजासहजी पाणी, पाईप मिळत आहे,मात्र बोअरवेल पासून दूरदूर असलेल्या शेतांना पाण्यासाठी अतिरिक्त पाईपांची तडजोड करावी लागत आहे. कारण सगळेच शेतकरी पाणी देण्यात जिकडेतिकडे व्यस्त आहेत. त्या उपरही जाऊन विजेचा सिंगल फेज आणि थ्री फेज पुरवठा असल्याने अधेमधे वीजही गुल होत राहते.त्याचाही सामना शेतकरीवर्गास करावा लागतो.

थडीसावळी, गळेगांव परिसरातील हरभरा पीकास सद्यस्थितीत जोमदार उगवण क्षमता लाभल्याने शेतकरी समाधानी आहेत. मात्र, पाणी देण्यासाठी राना शिवारात रात्री अपरात्री शेतात ठाण मांडून असल्याचे चित्र आहे.

# शकुंतलाबाई चन्नावार यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ नोव्हेंबर**

येथील डॉक्टर्स लेन परिसरातील प्रतिष्ठित श्रीमती शकुंतलाबाई गोविंदराव चन्नावार (वय ८० वर्षे) यांचे दि. १८ नोव्हेंबर रोजी रात्री १.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात कापड व्यापारी दीपक, संतोष व कृष्णा अशी तीन मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. श्रीमती शकुंतलाबाई चन्नावार यांच्या पार्थिवावर दि. १९ नोव्हेंबर रोजी दुपारी शांतीधाम गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व स्तरातून मोठा जनसमुदाय उपस्थित होता. श्रीमती शकुंतलाबाई चन्नावार यांचा स्वभाव मनमिळावू होता. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते स्व. नारायणराव पांडुरंग चन्नावार यांच्या त्या स्नुषा होत.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी राजाराम काकानी सहकार विद्या मंदिरच्या सोनाक्षी गिरीची निवड

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. २२ नोव्हेंबर**

नांदेड येथे नुकतेच राज्यस्तरीय हॉकीच्या स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धेत राजाराम काकांनी सहकार विद्या मंदिरच्या विद्यार्थ्यांनी १७ वर्षाखालील मुलींच्या स्पर्धेत सहभाग घेतला होता. स्पर्धा संपन्न झाल्यानंतर राज्य निवड समिती आयोजित निवड चाचणीत आर के एस व्ही एम या शाळेतील सोनाक्षी गिरी हिचे १७ वर्षाखालील मुलींच्या संघात निवड करण्यात आली.



दिनांक २१ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर दरम्यान हरियाणा येथील रोहतक येथे संपन्न होणारे राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सोनाक्षी महाराष्ट्राचा प्रतिनिधित्व करणार आहे. सोनाक्षीच्या निवडीसाठी शाळेचे क्रीडा शिक्षक तथा हॉकी प्रशिक्षक श्रीनिवास कांबळे यांनी परिश्रम घेतले तर सोलापूरचे क्रीडा अधिकारी श्री कुरेशी सर, क्रीडा प्रबोधनी पूनेचे सागर करांदे, सोलापूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी श्रुत पवार सर, नांदेड चे श्री सरदार हरविंदर सिंग कपूर आणि सचिन कांबळे या अधिकाऱ्यांनी सोनाक्षीचे निवड केली. सोनाक्षीचे निवड झाल्याबद्दल शाळेचे व्यवस्थापकीय संचालक श्री सुबोध काकांनी यांनी शाळेच्या क्रीडा अनुकूल धोरण व विद्यार्थ्यांना मिळणारे प्रोत्साहनामुळे हे यश प्राप्त झाले आहे असे म्हटले, सोनाक्षी गिरी चे अभिनंदन करत राष्ट्रीय स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा दिले तसेच शाळेतील प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक पालकांकडूनही कौतुक होत आहे.

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख गणेश गिरी महाराज यांची मुलगी आहे.

सोनाक्षी गिरी सध्या जळगाव येथे प्रशिक्षण घेत असून तिला देण्यात आलेल्या प्रोत्साहनाबद्दल तिने शाळेचे व्यवस्थापकीय संचालक श्री सुबोध काकानी, क्रीडा शिक्षक श्रीनिवास कांबळे, प्राचार्य व सर्व शिक्षकांचे व पालकांचे आभार मानले.

# धर्मगुरु बाबुसिंगजी महाराज यांची वामनराव विष्णुपूरीकर यांनी घेतली भेट

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ नोव्हेंबर**



धर्मगुरु प.पू. बाबुसिंगजी महाराज गादीपती बंजारा काशी पोहरादेवी शक्तीपिठ (धाम) ता. मानोरा जि. वाशिम (महाराष्ट्र) यांची त्यांच्या पोहरादेवी येथील निवासस्थानी श्री संत रोहिदास महाराज मंदिर प्रस्तावित तिर्थक्षेत्र वर्ग ब एमआयडीसी एरिया बळीरामपूर नांदेड चे संस्थापक वामनराव मे. विष्णुपूरीकर यांनी सदिच्छा भेट घेऊन दि. १५ ऑक्टोंबर २०२४ रोजी त्यांची विधान परिषदेवर सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार, स्मृतीचिन्ह, नऊ भाषेतील गुरु महाराज यांचा ग्रंथ भेट देऊन सहृदय सत्कार करण्यात आला.

यावेळेस चर्चेअंती सदरील तिर्थक्षेत्राचा मागील ४०-४१ वर्षाचा इतिहास व प्रगतीचा उलगडा त्यांच्यासमोर करण्यात आला. याप्रसंगी बसव संघटनेचे कार्यकर्ते गुंडप्पा बसलिंगप्पा बारोळे हे आवर्जुन उपस्थित होते.

# लोहा नगरपालिकेने काढले स्वच्छतेचे धिंडवडे

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. २२ नोव्हेंबर**

शहरात सध्या प्रशासकराज चालू असून त्यांचे शहराकडे दुर्लक्षच अधिक दिसत आहे. शहरातील जिकडे तिकडे नाल्या तुडुंब कचऱ्याने, घाणीच्या पाण्याने भरभरून वाहत आहेत. रस्त्यावर घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे नागरिकांना दुर्गंधीचा नाहक त्रास सहन करावा लागतो आहे. स्वच्छता विभाग प्रमुख यांचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्यामुळे आजही लोहा शहरात घाणीचा सामना करावा लागत आहे. शहरातील स्वच्छता ठेवणे हे नगरपालिकेच्या स्वच्छता विभागाचे आद्यकर्तव्य असताना मुख्य रस्त्याने जुन्या गावात जाणाऱ्या रस्त्यावरील नालीतील पाणी कचरा घाणीने ओसंडून वाहत आहे, पोस्टामागील परिसर हा घाणीने (नालीच्या पाण्याने) वेढला आहे. त्यामुळे डासाचा प्रादुर्भाव वाढला आहे. असे चित्र सर्वच प्रभागात दिसून येत आहे.

कचऱ्याचे ढीग तर विचारूच नका, प्लास्टिक बंदीचे नियम तर नगरपालिकेने बासणात गुंडाळून ठेवले आहे. मोकाट जनावरांचा देखील त्रास होत आहे. शहराची स्वच्छता होत नसल्याने नागरिकांना दुर्गंधीयुक्त वासावर आणि नाल्याच्या घाण पाण्यातून रस्ते पार करावे लागत आहे. स्वच्छता विभागाच्या नाकर्तेपणामुळे शहरातील अस्वच्छतेचा कळस गाठला गेल्याचे दिसून येत आहे. ज्येष्ठ नागरिकांना साथीच्या रोगाचा सामना करण्याची वेळ आली आहे. मुख्याधिकारी यांचे दुर्लक्ष होत असल्यामुळे स्वच्छता विभागाच्या कारभाराबाबत नियमानुसार कर भरणाऱ्या नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. प्रशासनाचे माणसं नाल्या साफ करण्यासाठी जवळपास सहा महिन्यापासून नाली साफ करायला आलेच नाहीत. त्यामुळे तुडूंब भरल्या आहेत. घरावर लावलेल्या स्टिकर चा काहीच उपयोग होत नसल्याचे दिसून येत आहे. त्याचे स्कॅनिंगपण होत नाही. सध्या ते ऍक्टिव्ह झाल्याचे दिसून येत नाही. स्वच्छता विभागाचे काम एखाद्या चांगल्या जबाबदार व्यक्तींना देऊन महिन्याला स्वच्छतेचा कर भरणाऱ्या नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी नागरिकातून होत आहे.

# देगलूर-बिलोली विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत माध्यम कक्षाने केले उत्तम नियोजन

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. २२ नोव्हेंबर**

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक, देगलूर- बिलोली विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी देगलूर तहसील कार्यालयाने माध्यम कक्षाची निर्मिती केली यामुळे देगलूर - बिलोली सार्वत्रिक निवडणुकीच्या विविध कार्यक्रमाची माहितीला प्रसिद्धी मिळाल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली देगलूर बिलोली विधानसभा सार्वत्रिक निवडणूक निर्णय निवडणूक अधिकारी तथा बिलोली उपविभागीय अधिकारी श्रीमती क्रांती डोंबे यांनी येथील तहसील कार्यालयात माध्यम कक्षाची निर्मिती केली. यामध्ये बिलोली तहसीलदार गजानन शिंदे यांना माध्यम नोडल अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली बिलोली नायब तहसीलदार पुरवठा सुषमा मोहोड यांना सहाय्यक मीडिया कक्षाची जबाबदारी सोपविली यांच्या अंतर्गत



सहाय्यक नरहरी कोलगाणे, प्रा.महेश कुलकर्णी विठ्ठल चंदनकर, विजय शिकारे यांनी काम पाहिले. विधानसभा तसेच लोकसभा पोट निवडणुकीसाठी स्थापन झालेल्या माध्यम कक्षाने कामाचे उत्तम नियोजन करत जिल्हास्तरावर संपर्क ठेवून माध्यमांना प्रसिद्धीस येणाऱ्या मजकुरावर नजर ठेवली वर्तमानपत्रात देखील प्रसिद्ध होणाऱ्या मजकुरावर ,वृत्तावर बारकाईने लक्ष ठेवले सुषमा मोहोळ यांच्या टीमने काम करून प्रशासकीय कामासाठी सहकार्य केले आहे .

माध्यम कक्षाने दिवसभरात घडलेल्या प्रशासनातील घटना घडामोडींना प्रसिद्धीसाठी वर्तमानपत्रांच्या वृत्त संकलन करणाऱ्या वार्ताहरांना बातम्या प्रसिद्धीला दिल्या.निवडणूक कार्यालयावर एक वेगळी छाप करूनदिलीआहे. नायबतहसीलदार सुषमा मोहोड, नरहरी कोलगाने, प्रा. महेश कुलकर्णी, विठ्ठल चंदनकर, विजय शिकारे यांनी लक्षवेधी काम केल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

# लातूर दिनांक

**लातूर तरुण भारत**, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल




## विद्यापीठ क्रॉस कंट्री संघात पिराजी गित्तेची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २२ नोव्हेंबर-**



महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर येथील पिराजी गित्ते या खेळाडूची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या क्रॉस कंट्री संघात निवड झालेली आहे.

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉस कंट्री स्पर्धा दिनांक १९ ते २० नोव्हेंबर २०२४ या कालावधीमध्ये मेंगलोर युनिव्हर्सिटी, मेंगलोर अंतर्गत अलवाज एज्युकेशन फाउंडेशन ,मूडबिद्री (कर्नाटक ) येथे होत आहेत.या स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी गित्ते पिराजी या खेळाडूची विद्यापीठ संघात निवड झाली आहे. या खेळाडूस क्रीडा संचालक प्रा. सतीश मुंढे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के व सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

---

## संक्षिप्त वृत्त...



### राज्यस्तरीय उंच उडी स्पर्धेस जयहिंद स्कूलच्या अंजली नाईकची निवड

**उदगीर, दि. २२ नोव्हेंबर-**

जय हिंद पब्लिक स्कूल व ज्युनियर कॉलेज उदगीर मधील क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेड यांच्या वतिने पोलीस मुख्यालय परेड मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या १९ वर्ष वयोगटातील विभागीय शालेय मैदानी उंच उडी स्पर्धेत अंजली नाईक द्वितीय क्रमांक मिळवून राज्यस्तरीय शालेय मैदानी उंच उडी स्पर्धेस निवड झाली आहे. तसेच १७ वर्ष वयोगटातील विभागीय शालेय मैदानी उंच उडी स्पर्धेत गोरखनाथ सुभाष बोलके तृतीय क्रमांक मिळवला. स्पर्धेत मिळवलेल्या यशाबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. सुधीर जगताप यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य खेळाडूंना मिळाले. व स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळच्या प्रशासकीय अधिकारी ज्योती स्वामी, प्राचार्य संजय हट्टे, नॉबेट समन्वयक मनोरमा शास्त्री, उपप्राचार्य सतिश वाघमारे, आणि नांदेड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील राज्य क्रीडा मार्गदर्शक शिवकांत देशमुख यांनी सत्कार केला आणि क्रिडा विभाग प्रमुख व राष्ट्रीय पंच - संदीप पवार यांचे प्रशिक्षण मार्गदर्शन लाभले आणि क्रीडा शिक्षक सोमेश्वर सूर्यवंशी, अशलेशा गडदे, अतार इस्माईल, राहुल गुड्डे, व स्नेहा लांडगे, राकेश अंबरखाने, सोमनाथ झरकुंटे, विजय सपाटे, रत्नदीप मोरे, सुशांत जाधव यांनी शुभेच्छा दिल्या.



### महाराष्ट्र उदयगिरीच्या छात्र सैनिकांचे निवडणूक बंदोबस्त कार्यात सहकार्य

**उदगीर, दि. २२ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेतील छात्रसैनिकांनी दिनांक २० नोव्हेंबर रोजी झालेल्या विधानसभा निवडणुकीत उदगीर येथील विविध मतदान केंद्रावर पोलीस बंदोबस्ताच्या कार्यात पोलीस यंत्रणेला सहकार्य व मदत करण्याचे कार्य केले आहे. यावेळी मतदान केंद्रावर आलेल्या अपंग, वृद्ध मतदारांना मदत करणे तसेच मतदान केंद्रा बाहेरील शांतता व शिस्त निर्माण करणे बाबत पोलीस यंत्रणेला सहकार्य करण्याचे कार्यही राष्ट्रीय छात्र सेनेच्या छात्र सैनिकांनी केले आहे. या कार्यासाठी छात्र सैनिकांना ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी चे प्रभारी कमांडिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल वाय.बी. सिंग, कंपनी कमांडर कॅप्टन डॉ. राम साबदे तसेच पोलीस यंत्रणेचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या छात्र सैनिकांनी योगदान दिल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. मस्के आणि उपप्राचार्य डॉ. एस. जी. पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

### गोपाळबुवा ग्रंथालयात उद्या दिवाळी अंकांचे प्रदर्शन, गुणवंतांचा सत्कार

लातूर, दि. २२ नोव्हेंबर-

औसा तालुक्यातील मौजे माळकोंडजी येथील गोपाळबुवा सार्वजनिक ग्रंथालयाच्यावतीने रविवार, दि.२ ४ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाळी अंकांचे प्रदर्शन आणि गुणवंतांचा सत्कार समारंभ आयोजिला असून, दिवाळी अंक प्रदर्शनाचे साहित्यिक मोहीब कादरी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षणाधिकारी राम गारकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय डॉ.एस.आर.रंगनाथन ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त तुळजापूरच्या विजय वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश जोशी, राज्य शासनाचा विभागीय डॉ.एस. आर. रंगनाथन् ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालयाचे उपाध्यक्ष तथा शिवणीच्या लोकमान्य सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव, रोटरी क्लबचा व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार प्राप्त कर्करोगतज्ञ डॉ. ब्रिजमोहन झंवर,माळकोंडजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा तालुकास्तरीय दोन लाखांचा पुरस्कार मिळवून देणाऱ्या मुख्याध्यापिका अर्चना पूरी, आलमलाच्या शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.विश्वेश्वर धाराशिवे यांना पीएचडी मिळाल्याबद्दल, तसेच गोपाळबुवा माध्यमिक विद्यालयातून विशेष प्राविण्याने दहावी उत्तीर्ण झालेले दोन विद्यार्थी, सन २०२३-२४ मध्ये सेवेत रुजू झालेल्या नोकरदारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

### रामराव घोनसे यांचे निधन

**उदगीर, दि. २२ नोव्हेंबर-**



तालुक्यातील तळेगाव (भो) येथील कर्तबगार शेतकरी, जेष्ठ नागरिक रामराव मालबा घोनसे वय ८८ वर्षे यांचे गुरुवारी दि. २१ रोजी रात्री वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्यावर तळेगाव (भो) ता. देवणी येथील त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार असून अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पार्टीचे लातूर जिल्हा उपाध्यक्ष मालबा घोणसे पाटील यांचे ते वडील होत.

---

## मतदानाचा हक्क बजावण्यात लाडक्या बहिणींची आघाडी

**पाच वर्षांत उदगीरमध्ये वाढले २४ हजार ८२२ मतदार**

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २२ नोव्हेंबर-**

सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत उदगीर विधानसभा मतदार संघाची एकूण मतदार संख्या दोन लाख ९८ हजार ४३९ इतकी होती. तर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत २४ हजार ८२२ मतदार वाढले असून आता एकूण मतदार संख्या तीन लाख २३ हजार २६१ इतकी झाली आहे.

संख्येत ९३७८ इतके मतदार वाढले असून एक लाख ६७ हजार ६३८ इतकी मतदार संख्या झाली आहे. स्त्री मतदारांमध्ये १५ हजार ४२५ इतकी वाढ होऊन आता एक लाख ५५ हजार ६०४ मतदार झाले आहेत. तर इतर मतदार १९ ने वाढले आहेत. उदगीर विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी मतदान पार पडले. या निवडणुकीत पुरुषांचे ६७.०२ टक्के आणि



स्त्रियांचे ६७.२२ टक्के मतदान झाले. एकंदरीत पुरुषांच्या बरोबरीने पुढे येऊन पुरुषांपेक्षा अधिक स्त्री मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावल्याचे दिसून येते.

२०१९ मध्ये उदगीर विधानसभा मतदारसंघात पुरुष मतदार संख्या एक लाख ५८ हजार २६० तर स्त्री मतदार संख्या एक लाख ४० हजार १७९ इतकी होती. मागच्या पाच वर्षात पुरुष मतदार होते २०१९ च्या तुलनेत ७.४७ टक्क्यांनी मतदान वाढले सन २०१९च्या विधानसभा निवडणुकीत उदगीर विधानसभा मतदारसंघात ३२१ मतदान केंद्रावर ५९.६४ टक्के इतके मतदान झाले होते. मागच्या पाच वर्षात मतदारसंघात २४८२२ मतदार वाढलेले आहेत. तर बुधवारी (दि. २०) झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदारसंघातील एकूण ३५९ मतदान केंद्रावर ६७.११ टक्के इतके मतदान झाले आहे. २०१९ च्या तुलनेत या निवडणुकीत ७.४७ टक्क्यांनी मतदान वाढलेले आहे. निवडणूक विभाग व प्रशासनाच्या वतीने लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी अभियान राबविण्यात आले. या अभियानाअंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावला पाहिजे असे आवाहन करण्यात आले होते.

---

## जानेवारीमध्ये महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक संघाचे फेस कॉमचे राज्यस्तरीय अधिवेशन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २२ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ फेस्कॉम चे ३४ वे राज्यस्तरीय अधिवेशन दिनांक ११ व १२ जानेवारी २०२५ ला लातूर नगरीत दिवाणजी व श्याम मंगल कार्यालयात होणार आहे या संदर्भात लातूर येथे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. (फेस्कॉम)चे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे मुंबई, उपाध्यक्ष अशोक तेरकर नांदेड, मुख्य सचिव चंद्रकांत महामुनी पुणे, माजी अध्यक्ष अरुण रोडे पुणे, डॉ. दामोदर थोरात अंबाजोगाई अध्यक्ष दक्षिण मराठवाडा विभाग, डॉ. माया कुलकर्णी, डॉक्टर बी.आर. पाटील, संघटक सचिव प्रभाकर कापसे, महिला संघाच्या अध्यक्षा व सचिव व ज्येष्ठ नागरिक संघाचे सर्व पदाधिकारी यांच्या सोबत बैठक घेण्यात आली. अधिवेशनात मान्यवरांची भाषणे, उद्घाटनसत्र, परिसंवाद, फेस्पुकाम पुस्कार वितरण, स्मर्णीका प्रकाशन, व समारोप कार्यक्रम यात काही ठराव संमत होणार आहेत अधिवेशन यशस्वी करण्याकरिता सर्वांनी सहकार्य करावे असे आव्हान आण्णासाहेब टेकाळे ,चंद्रकांत महामुनी डॉक्टर बी.आर.पाटील, प्रभाकर कापसे, डॉक्टर दामोदर थोरात, जगदीश जाजू, डॉ. निर्मला कोरे, आर.बी.जोशी, प्रकाश नीला, रमेश भोयरेकर ,शहाजी घाडगे, डॉक्टर भास्कर बोरगावकर, अधिवेशनाचे कार्यवाह प्रकाश घादगिने आदींनी केले. अधिक माहितीसाठी प्रकाश घादगिने ९४२१६९५४५४ वर संपर्क साधावा.

---

## रेणा कारखान्याने कधीच भेदभाव केला नाही

**माजी मंत्री संस्थापक दिलीपराव देशमुख**

**१९ वा गळीत हंगामाचा शानदार शुभारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २२ नोव्हेंबर-**

देशात नावलौकिक असलेल्या मांजरा साखर परिवारातील रेणा साखर कारखान्याने सुरवाती पासून शेतकरी सभासदांना अधिक भाव देत राज्यात व आपल्या कार्यक्षेत्रात वेगळेपण जपलेले असून सभासद व बिगर सभासदांचा विश्वास संपादन केला आहे मात्र काही विरोधक काटा मारत असल्याचे बिनबुडाचे आरोप करत असल्याचे निदर्शनास आले असून दवंडी द्यावी विरोधकांनी बघावे उगीच बिनबुडाचे आरोप करू नये असा इशारा देत विरोधकांना फटकारले आमच्या परिवारातील संस्थांनी कधीही काटा मारला नाही मारणार नाही असा पलटवार राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी येथे बोलताना व्यक्त केला तसेच आगामी गाळप हंगामात पाच लाख मेट्रिक टन उसाचे गाळप करण्याचे उद्दिष्ट असून रेणा साखर कारखाना सर्वाधिक भाव देणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

ते रेणापूर तालुक्यांतील निवाडा दिलीपनगर येथील रेणा सहकारी साखर कारखान्याच्या १९ वा गळीत हंगामाचा शुभारंभ माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब व आमदार धीरज देशमुख व इतर मान्यवर व संचालक मंडळाच्या हस्ते करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी लातूर ग्रामीणचे आमदार तथा जिल्हा बँकेचे चेअरमन आमदार धीरज देशमुख, माजी आमदार ॲड. त्रिंबक भिसे, रेणा साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, रेणा साखर कारखान्याचे माजी चेअरमन यशवंतराव पाटील, माजी चेअरमन आबासाहेब पाटील, कारखान्याचे उपाध्यक्ष अनंतराव देशमुख, कार्यकारी संचालक बी. व्ही. मोरे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष ॲड. प्रमोद जाधव, लातूर बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, उमाकांत खलंग्रे, चंद्रचूड चव्हाण, लालासाहेब चव्हाण, सुरेश लहाने, ॲड. शेषराव हाके, बाळासाहेब कदम, सचिन दाताळ, हरिराम कुलकर्णी, प्रभाकर केंद्रे, मकबूल वलांडीकर, हरिभाऊ गायकवाड, उपस्थित होते.

यावेळी प्रास्ताविक रेणा साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे यांनी केले. आभार कार्यकारी संचालक बी.व्ही. मोरे यांनी मानले. कार्यक्रमास रेणा साखर कारखान्याचे संचालक संचालक चंद्रकांत सूर्यवंशी धनराज देशमुख प्रेमनाथ आकनगीरे, शहाजीराव हाके, संजय हरिदास, अनिल कुटवाड, तानाजी कांबळे, संचालिका वैशाली माने, संचालिका अमृता देशमुख, सतीश पाटील स्नेहल देशमुख पंडितराव माने, रमेश सूर्यवंशी, प्रदीप राठोड, दिलीप गोटके, ॲड. शिरीष यादव, तुकाराम कोल्हे, निवाडाचे सरपंच दिनेश साळुंखे, शेतकरी सभासद उपस्थित होते.




**नूतन १० हार्वेस्टरचे मान्यवरांच्या हस्ते पूजन**

यावेळी रेणा साखर कारखान्याकडून नूतन खरेदी केलेल्या १० हार्वेस्टरचे पूजन माजी मंत्री दिलीपराव देशमुख, आ. धीरज देशमुख यांच्यासह मान्यवर सन्माननीय संचालक मंडळांच्या हस्ते करण्यात आले.

**मांजरा परिवारातील संस्थांनी शेतकऱ्यांना न्याय दिला : आ. देशमुख**

राज्यात नावलौकिक असलेल्या मांजरा साखर परिवाराने केवळ उस गाळप यावर न थांबता वेगवेगळे उपपदार्थ प्रकल्प कार्यान्वित झाल्याने शेतकऱ्यांना अधिक भाव देण्याचा प्रयत्न होतोय यासाठी आदरणीय दिलीपराव देशमुख यांचे मार्गदर्शन सूक्ष्म नियोजन पारदर्शकता ठेवून सगळ्या संस्था काम करीत असून यामुळे जिल्ह्यातील शेतकरी आर्थिक दृष्ट्या सक्षम झालेले दिसत आहेत याचे सर्व श्रेय आदरणीय साहेब यांच्या कडे जाते लवकरच रेनाकडून बायो सीएनजी प्रकल्प सुरू होईल त्यामधून एक नवे पर्व सुरू होईल, असा विश्वास आमदार धीरज देशमुख यांनी व्यक्त केले.

---

## लातूरमधील मतमोजणी केंद्रांमध्ये प्रतिबंधात्मक आदेश लागू

**सहाही मतदारसंघात आज होणार मतमोजणी**

लातूर, दि. २१ :

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यातील २० लाख ४२ हजार ७४७ मतदारांपैकी १३ लाख ६९ हजार २४५ म्हणजेच ६७.०३ टक्के मतदारांनी आपला हक्क बजाविला. जिल्ह्यात सर्वत्र शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली असून शनिवारी (दि. २३) मतमोजणी होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिली.

गतवेळच्या तुलनेत या विधानसभा निवडणुकीत सुमारे ५ टक्के अधिक मतदान झाले असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाल्या. लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात ६९.९२ टक्के, लातूर शहर विधानसभा मतदारसंघात ६२.७४ टक्के, अहमदपूर विधानसभा मतदारसंघात ६८.७१ टक्के, उदगीर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघात ६७.११ टक्के, निलंगा विधानसभा मतदारसंघात ६५.७५ टक्के आणि औसा विधानसभा मतदारसंघात ६८.८८ टक्के मतदान झाले, असल्याचे त्यांनी सांगितले.

लातूर जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघात २३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ८ पासून मतमोजणी सुरु होणार आहे. लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ आणि लातूर शहर विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी लातूर शहरातील बार्शी रोडवरील शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन येथे होईल, तर अहमदपूर विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी अहमदपूर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे होणार आहे. उदगीर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी उदगीर शहरातील देगलूर रोडवरील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे होणार असून निलंगा विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी निलंगा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे होईल. तसेच औसा विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी औसा तहसील कार्यालयाजवळील प्रशासकीय इमारतीमध्ये होणार आहे.

**मतमोजणी केंद्राच्या २०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू**

लातूर जिल्ह्यात २३ नोव्हेंबर रोजी लातूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा आणि औसा येथे विधानसभा निवडणुकीची मतमोजणी होत आहे. या मतमोजणी केंद्रांच्या २०० मीटर परिसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार मतमोजणी केंद्रापासून २०० मीटर परिसरात मंडपे, दुकाने उभारणे, तसेच मोबाईल फोन, स्मार्ट फोन, कॉर्डलेस फोन, पेंजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे बाळगण्यास तसेच निवडणूकीच्या कामाव्यतिरिक्त खाजगी वाहन, संबंधीत पक्षाचे चिन्हाचे प्रदर्शन व निवडणुकीच्या कामा व्यतिरिक्त व्यक्तीस प्रवेश करण्यासाठी प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी करण्यात आले आहेत.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ कार्यक्रमानुसार लातूर जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघातील मतमोजणी २३ नोव्हेंबर २०२४ रोजी होणार आहे. यादिवशी मतमोजणी प्रक्रिया संपेपर्यंत लातूर जिल्ह्यातील मद्यविक्री बंद राहणार आहे.

---

## औसामध्ये ग्रीन, सखी मतदान केंद्र ठरले आकर्षण

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. २२ नोव्हेंबर-**

औसा विधानसभा मतदान केंद्रातील ३०९ बुथमध्ये ३लाख ४ हजार ३०७ मतदारापैकी २ लाख ९ हजार ५९३ मतदारांनी मतदान केले. यामध्ये १ लाख ११ हजार १५० पुरुष तर ९८ हजार ४४२ स्त्री मतदारांनी ६८.८८ टक्के मतदान केले असून उंबडगा येथे ८४.१९ टक्के ची सर्वाधिक नोंद झाली आहे. तर या निवडणुकीत निवडणूक विभागाच्यावतीने सुरु करण्यात आलेले ग्रीन, सखी मतदान केंद्र मतदारांचे प्रमुख आकर्षण ठरले आहे.

औसा विधानसभेच्या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी निवडणुक विभागाच्या वतीने निवडणुक अधिकारी अविनाश कोरडे व सहाय्यक निवडणुक अधिकारी घनशाम अडसुळ यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रीन औसा मतदान केंद्र या वैशिष्टपुर्ण अभिनव मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली .याचा मतदान करणाय़ांनी तर लाभ घेतलाच पण इतर मतदारांनीही या केंद्रास भेट दिली.

औसा विधानसभा मतदार संघातील औसा व निलंगा तालुक्यातील ३०९ मतदान केंद्रात १ लाख ६०हजार ७३२ पैकी १ लाख ११हजार १५० पुरुषांनी मतदान करुन ६९.१५ टक्के नोंद केली. तर १ लाख ४३ हजार ५७१ पैकी ९८ हजार ४४२ स्त्री यांनी मतदान करुन ६८.५७ टक्के ची नोंद केली आहे. या मतदार संघातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंबडगा खुर्द येथील केंद्रात ८४.१९ टक्के ची सर्वाधिक मतदानाची नोंद झाली आहे. यानंतर अंगणवाडी सेलू येथे ८४.०८ टक्के , जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डावी बाजू सेलू येथे ८३. ९३ %, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कासारशिरशी येथे ८३.५० टक्के व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा औसा तांडा येथे ८२.९८ टक्के ची नोंद झाली आहे.तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वासका केंद्रात मतदार संघात सर्वात कमी ४६. ९९टक्के व जिल्हा परिषद हायस्कुल माळेगाव केंद्रात ४९.६४ टक्के नोंद झाली आहे. या दोन मतदान केंद्राशिवाय इतर ३०७ केंद्रात जवळपास ५० टक्के पेक्षा अधिक मतदान झाले आहे.

**शहरात ग्रीन मतदान केंद्र**

या निवडणुकीत औसा विधानसभा मतदारसंघात वैशिष्टपुर्ण आदर्श मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली. यामध्ये 'ग्रीन औसा मतदान केंद्र' मतदारांसाठी आकर्षण ठरल आहे. या मतदार केंद्रामुळे मतदारांमध्ये उत्साह दिसून आला. औसा येथील पंचायत समिती कार्यालयात वृक्ष लागवड, वृक्ष संगोपन व वन्यजीव संरक्षण या संकल्पनेतून 'ग्रीन औसा मतदान केंद्र' या वैशिष्ट्यपूर्ण अभिनव मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली होती. या मतदान केंद्राच्या दर्शनी भागात मंडप व सेल्फी पॉईटसह आकर्षक सजावट करण्यात आली होती. मतदान केंद्राच्या प्रवेशदारापासून वृक्ष लागवड व संगोपनामुळे पर्यावरणात होणारे वातावरणीय बदल, पर्जन्यमानात होणारी वाढ, तापमानातील घट, जमिनीची होणारी धूप थांबविणे. यासह वृक्षतोडीच्या दुष्परिणामाबाबत व वनस्पती व नैसर्गिक अधिवास संरक्षण कायमस्वरुपी टिकवून ठेवणे. निसर्गाचे संतुलन टिकविण्यासाठी वन्यजीव संरक्षण व संरक्षणासाठीच्या उपायाबाबत आकर्षक फलकाद्वारे माहिती देण्यात आली. याच मतदान केंद्रात मतदारांना उन्हापासून संरक्षण मिळावे म्हणून विशेष व्यवस्था करण्यात आली होती. तसेच स्तनादा मातेसाठी हिरकणी कक्षाचीही निर्मिती करुन महिला मतदारांनाही सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

**सखी मतदान केंद्रात मार्गदर्शन**

औसा येथील मुक्तेश्वर माध्यमिक विद्यालयात सखी मतदान केंद्र स्थापन करुन देशातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, रमाई आंबेडकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, सिंधुताई सपकाळ, कल्पना चावला यांच्या कार्याची कार्याची माहिती देण्यात आली होती.

**लोदगा केंद्रावर बांबूचे प्रदर्शन**

औसा विधानसभा मतदारसंघातील लोदगा येथील बांबू मतदान केंद्रावर मतदान केंद्राच्या दर्शनी भागात बांबूची लागवड, बांबू लागवडीचे फायदे, बांबूच्या विविध जाती, बांबूपासून बनविण्यात येणाऱ्या विविध वस्तूंची माहिती फलकाद्वारे मतदारांना देण्यात आली होती. तसेच बांबूपासून बनविलेले खुर्ची, टेबल, कापड, बडस, विविध प्रतिकृती आदी वस्तूंचे प्रदर्शन या मतदान केंद्राच्या प्रवेशद्वारात मांडण्यात आले होते.